

# भगवान बुद्ध

पुर्वार्ध

धर्मानंद कोसंबी

हे पुस्तक प्रताधिकार मुक्त असून विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध आहे.

आपण हे स्वतः वाचून इतरांनाही फ़ॉरवर्ड करू शकता.

ई साहित्य प्रतिष्ठान ची पुस्तके विनामूल्य असतात.

ती मिळण्यासाठी लिहा

esahity@gmail.com

भेट द्या

www.esahity.com

नवभारत ग्रंथमाला
१६

# भगवान बुद्ध

(पूर्वार्ध)

# नवभारत ग्रंथमालेचीं

## लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

### भगवान बुद्ध (उत्तरार्ध)

**आचार्य धर्मानन्द कोसम्बी**

हा उत्तरार्ध पूर्वार्धाप्रमाणेच, किंवा काकणभर अधिकच बोधप्रद व विचारप्रवर्तक आहे आत्मवाद, कर्मयोग, जातिभेद, यज्ञयाग, अहिंसा, मासाहार, इत्यादि हजारो वर्षे आपल्या समाजाला जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या विषयावरील बुद्ध भगवन्ताचा उपदेश या भागात चित्ताकर्षक रीतीने ग्रथित केला आहे. भगवन्ताची दिनचर्या व त्याचा आहार-विहार इत्यादिकाचे मनोरम वर्णनही या भागात आले असल्यामुळे त्याच्या चित्तवेधकपणात भर पडली आहे.

### भाषाशास्त्र

**प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी**

भाषा हे मानवी सुधारणेचे एक प्रमुख साधन आहे तिच्या स्वरूपाचा अभ्यास केल्याने मानवी मनाच्या व सस्कृतीच्या अनेक अगावर उत्कृष्ट प्रकाश पडतो हा अभ्यास शास्त्रशुद्ध रीतीने केल्यास जितका मनोरजक तितकाच उद्बोधक होऊ शकतो. अशा तऱ्हेचा ग्रथ प्रस्तुत विषयावर मराठीत अद्याप झालेला नाही दीर्घकालीन व्यासगाचे फल असलेला व अद्ययावत् सिद्धान्ताचे विवरण करणारा हा ग्रथ मराठीत सर्वांसच अपूर्व वाटेल.

# भगवान बुद्ध

## (पूर्वार्ध)

लेखक

धर्मानन्द कोसम्बी

सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड,
नागपूर व पुणे

शके १८६२ ]       किंमत दोन रुपये       [ सन १९४०

## मालेंतील पुस्तकांचें पुनर्मुद्रण

अभ्यासू गृहस्थास स्वभाषेंतून ज्ञान मिळविण्याचे साधन निर्माण करून ते सदोदित उपलब्ध अवस्थेत ठेवावयाचे, हे 'नवभारत ग्रथमाले'चे प्रारभापासूनचेच ध्येय आहे ज्या पुस्तकाच्या प्रती सपल्या असतील त्याचे पुनर्मुद्रण करून वाचकास ती उपलब्ध करून देणे, हे अर्थात् मालेच्या चालकाचे महत्त्वाचे कर्तव्य ठरते तदनुसार

**शेक्सपियर व तत्कालीन इंग्रजी रंगभूमि**

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति सुमारे दोन वर्षांपूर्वीच चालकानी प्रसिद्ध केली असून आता

**ज्ञानोपासना व भारतीयांचें कर्तव्य**

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणास सुरवात झाली आहे सर्वतोमुखी वाखाणला गेलेला हा ग्रथ गेली कित्येक वर्षे मिळत नव्हता. त्याची पुनरावृत्ति नोवेबरपर्यंत प्रसिद्ध होईल सध्याच्या बिकट परिस्थितीमुळे प्रती फारच थोड्या काढण्यात येत असल्यामुळे ग्राहकानी आगाऊ नावे नोदविण्याची त्वरा करावी

मुद्रक व प्रकाशक—**पांडुरंग नारायण बनहट्टी**, बी. एस्सी,
व्यवस्थापक, **नारायण मुद्रणालय**, धनतोली, नागपूर
आणि
डायरेक्टर, **सुविचार प्रकाशन मंडळ**, लि०
धनतोली, नागपूर.

# प्रस्तावना

पालि वाङ्मयात तिपिटक (त्रिपिटक) नावाचा ग्रथसमुदाय प्रमुख आहे त्याचे सुत्तपिटक, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक असे तीन भेद आहेत सुत्तपिटकात बुद्धाच्या आणि त्याच्या अग्रशिष्याच्या उपदेशाचा प्रामुख्याने सग्रह केला आहे. विनयपिटकात भिक्षूनी कसे वागावे यासबधाने बुद्धाने केलेले नियम, ते करण्याची कारणे, वेळोवेळी त्यात केलेले फेरफार आणि त्याच्यावर केलेली टीका, याचा सग्रह केला आहे अभिधम्मपिटकात सात प्रकरणे आहेत त्यात बुद्धाच्या उपदेशात आलेल्या कित्येक मुद्द्याचा ऊहापोह करण्यात आला आहे.

दीघनिकाय, मज्झिमनिकाय, सयुत्तनिकाय, अगुत्तरनिकाय आणि खुद्दकनिकाय असे सुत्तपिटकाचे मोठे पाच विभाग आहेत दीघनिकायात मोठमोठाल्या चौतीस सुत्ताचा सग्रह करण्यात आला आहे. दीर्घ म्हणजे मोठी (सुत्ते) त्याचा यात सग्रह असल्यामुळे याला दीघनिकाय म्हणतात.

मज्झिमनिकायात मध्यम प्रमाणाची सुत्ते सगृहीत केली आहेत, म्हणून त्याला मज्झिम-(मध्यम) निकाय हे नाव देण्यात आले सयुत्तनिकायात गाथामिश्रित सुत्ते पहिल्या भागात आली आहेत आणि नतरच्या भागात निरनिराळ्या विषयावरील लहानमोठी सुत्ते सगृहीत केली आहेत. यामुळे याला सयुत्तनिकाय, म्हणजे मिश्रनिकाय, असे नाव देण्यात आले अगुत्तर म्हणजे ज्यात एका एका अगाची वाढ होत गेली तो. त्यात एकक निपातापासून एकादसक निपातापर्यंत अकरा निपाताचा सग्रह आहे. एकक निपात म्हणजे एकाच वस्तूसबधाने बुद्धाने उपदेशिलेली सुत्ते ज्यात आहेत तो. त्याचप्रमाणे दुक–तिक–निपात वगैरे जाणावे.

खुद्दकनिकाय म्हणजे लहान प्रकरणाचा सग्रह. त्यात पुढील पधरा प्रकरणे येतात—खुद्दकपाठ, धम्मपद, उदान, इतिवुत्तक, सुत्त-

निपात, विमानवत्थु, पेतवत्थु, थेरगाथा, थेरीगाथा, जातक, निद्देस, पटिसभिदामग्ग, अपदान, बुद्धवस व चरियापिटक हा सुत्तपिटकाचा विस्तार विनयपिटकाचे पाराजिका, पाचित्तियादि, महावग्ग, चुल्लवग्ग व परिवारपाठ असे पाच विभाग आहेत.

तिसरे अभिधम्मपिटक. याचीं धम्मसगणि, विभग, धातुकथा, पुग्गलपञ्ञत्ति, कथावत्थु, यमक व पट्ठान अशी सात प्रकरणे आहेत.

बुद्धघोषाच्या समकाली म्हणजे इसवी सनाच्या सरासरी चौथ्या शतकात या सर्व ग्रथसमुदायातील वाक्याना किवा उताऱ्याना **पालि** म्हणत असत. बुद्धघोषाच्या ग्रथात तिपिटकातील वचनाचा निर्देश 'अयमेत्थ पालि (ही येथे पालि)' किवा 'पालिय वुत्त (पालीत म्हटले आहे)' अशा शब्दानी केला आहे. पाणिनि जसा 'छदसि' या शब्दाने वेदाचा आणि 'भाषायाम्' या शब्दाने स्वसमकालीन सस्कृत भाषेचा उल्लेख करतो, तसाच बुद्धघोषाचार्य 'पालिय' या शब्दाने तिपिटकातील वचनाचा आणि 'अट्ठकथाय' या वचनाने त्या काळी सिहली भाषेत प्रचलित असलेल्या 'अट्ठकथा'तील वाक्याचा उल्लेख करतो

अट्ठकथा म्हणजे अर्थासहित कथा. त्रिपिटकातील वाक्याचा अर्थ सागावयाचा व जरूर असेल तेथे एखादी गोष्ट द्यावयाची असा परिपाठ सिहलद्वीपात होता. कालातराने ह्या अट्ठकथा लिहून ठेवण्यात आल्या. पण त्यात बरेच पुनरुक्तिदोष होते, आणि पुन्हा त्या सिहल-द्वीपाबाहेरील लोकाना फारशा उपयोगी पडण्याजोग्या नव्हत्या. यास्तव बुद्धघोषाचार्याने त्यापैकी प्रमुख अट्ठकथाचे सक्षिप्त रूपान्तर त्रिपिटकाच्या भाषेत केले. ते इतके चागले वटले की, त्याचा मान त्रिपिटक ग्रथाइतकाच होऊ लागला. ('पालि विय तमग्गहु'). अर्थात् त्या अट्ठकथाना देखील पालिच म्हणू लागले. खरे म्हटले तर 'पालि' हे भाषेचें नावच नव्हे. या भाषेचे मूळचे नाव मागधी असें आहे, आणि हें नवे नाव अशा रीतीने तिला मिळाले.

वर सांगितलेले त्रिपिटकाचे विभाग राजगृह येथे भरलेल्या पहिल्या सभेत ठरविण्यात आले, असे बुद्धघोषाचार्यांचे म्हणणे आहे. भगवान् बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर भिक्षु शोकाकुल झाले. तेव्हा एक सुभद्र नावाचा वृद्ध भिक्षु म्हणाला, "आमचा शास्ता परिनिर्वाण पावला, हे बरे झाले तुम्ही अमुक केले पाहिजे आणि तमुक करता कामा नये, अशा प्रकारे तो आम्हास सतत बंधनात ठेवीत होता. आता वाटेल तसे वागण्यास मोकळीक झाली." हे ऐकून महाकाश्यपाने विचार केला की, जर धर्मविनयाचा संग्रह केला नाही, तर सुभद्रासारख्या भिक्षूंना स्वैराचार करण्यास मुभा मिळेल, म्हणून तावडतोब भिक्षुसंघाची सभा बोलावून धर्म आणि विनय यांचा संग्रह करून ठेवला पाहिजे त्याप्रमाणे महाकाश्यपाने राजगृह येथे त्या चातुर्मासात पांचशे भिक्षूंना गोळा केले, आणि त्या सभेत प्रथमतः उपालीला विचारून विनयाचा संग्रह करण्यात आला, आणि नंतर आनंदाला प्रश्न करून सुत्त आणि अभिधम्म या दोन पिटकांचा संग्रह करण्यात आला. कित्येकांच्या मते खुद्दकनिकायाचा अंतर्भाव अभिधम्मपिटकातच केला गेला होता. पण इतर म्हणत की, त्याचा अंतर्भाव सुत्तपिटकातच करावयास पाहिजे.

हा सुमंगलविलासिनीच्या निदानकथेत आलेल्या मजकुराचा सारांश आहे. हाच मजकूर समन्तपासादिका नावाच्या विनय अट्ठकथेच्या निदानकथेतही सापडतो. पण त्याला तिपिटक ग्रंथात कोठेच आधार नाही. बुद्ध भगवंताच्या परिनिर्वाणानंतर राजगृहात भिक्षुसंघाची पहिली सभा झाली असेल, पण तीत सध्याचे पिटकांचे विभाग किंवा पिटक हे नाव देखील आले असेल असें दिसत नाही. अशोककालपर्यंत बुद्धाच्या उपदेशाचे धर्म आणि विनय असे दोन विभाग करण्यात येत असत, पैकी धर्माची नऊ अंगे समजली जात असत, ती अशीः—सुत्त, गेय्य, वेय्याकरण, गाथा, उदान, इतिवुत्तक, जातक, अब्भुतधम्म आणि वेदल्ल या अंगांचा उल्लेख मज्झिमनिकायातील

अलगद्दूपमसुत्तात, आणि अगुत्तरनिकायात सात ठिकाणी मापडतो

**सुत्त** हा पालि शब्द सूक्त किवा सूत्र या दोनही सस्कृत शब्दा-बद्दल असू शकेल., वेदात जशीं सूक्ते आहेत, तशीच ही पालि सूक्तें होत, असे कित्येकाचें म्हणणे परतु महायानसप्रदायाच्या ग्रथात याना सूत्रे म्हटलें आहे, आणि तोच अर्थ बरोबर असावा. अलीकडे सूत्रे म्हटली म्हणजे पाणिनीची आणि तशाच प्रकारची इतर सूत्रे समजली जातात. पण आश्वलायन गृह्यसूत्र वगैरे सूत्रे या सक्षिप्त सूत्राहून थोडीशी विस्तृत आहेत, आणि तशाच अर्थाने पालि भाषेतील सूत्रे आरभी रचलीं गेली असावी. त्या सूत्रावरून आश्वलायनादिकानी आपल्या सूत्राची रचना केली किवा बौद्धानी त्याच्या सूत्राना अनुसरून आपल्या सूत्राची रचना केली, या वादात शिरण्याची आवश्यकता नाही एवढें खरे की, अशोककालापूर्वी जी बुद्धाची उपदेशपर वचने असत त्याना सुत्ते म्हणत, आणि ती फार मोठी नव्हतीं

गाथायुक्त सूत्राना **गेय्य** म्हणतात, असे अलगद्दसुत्ताच्या अट्ठकथेत म्हटलें आहे आणि उदाहरणादाखल सयुत्तनिकायाचा पहिला विभाग देण्यात आला आहे परतु जेवढया म्हणून गाथा आहेत त्या सर्वाचा गेय्यामध्ये सग्रह होतो, तेव्हा गाथा नावाचा निराळा विभाग का पाडण्यात आला हे सागता येत नाही. गेय्य म्हणजे अमुकच प्रकार-च्या गाथा अशी समजूत असल्यास नकळे.

**वेय्याकरण** म्हणजे व्याख्या एखादे सूत्र घेऊन त्याचा थोड-क्यात किवा विस्तारपूर्वक अर्थ सागणे याला वेय्याकरण म्हणतात (अर्थात् या शब्दाचा सस्कृत व्याकरणाशी काही सबध नाही )

धम्मपद, थेरगाथा आणि थेरीगाथा हे तीन ग्रथ **गाथा** सदरा-खाली येतात, असें बुद्धघोषाचार्याचे म्हणणे आहे परतु थेर आणि थेरी गाथा बुद्धाच्या परिनिर्वाणानतर तीन चार शतके अस्तित्वात असतील असे वाटत नाही, आणि धम्मपद तर अगदीच लहानसा ग्रथ. तेव्हा

गाथा म्हणजे तो एकच ग्रथ होता किंवा दुसऱ्या काही गाथाचा या विभागात समावेश होत असे हे सागणे कठीण आहे

वर दिलेल्या खुद्दकनिकायाच्या यादीत उदानाचा उल्लेख आलाच आहे त्यातील उदानें व तशाच प्रकारचीं सुत्तपिटकात इतर ठिकाणीं आलेली वचने याना **उदान** म्हणत असत, असे बुद्धघोषाचार्यांचे म्हणणे आहे. परतु त्यापैकी अशोकसमकाली किती उदाने अस्तित्वात होती, हें सागता येणे शक्य नाही मागाहून त्याच्यात भर पडत गेली यात शका नाही.

**इतिवुत्तक** प्रकरणात ११२ इतिवुत्तकाचा सग्रह आहे त्यापैकी काही इतिवुत्तके अशोककाली किंवा त्यानतर एखाद्या शतकात अस्तित्वात होतीं, मागाहून त्याची सख्या वाढत गेली असावी

**जातक** नावाच्या कथा सुप्रसिद्ध आहेत, आणि त्यापैकी काही कथातील देखावे साची आणि बर्हुत येथील स्तूपाच्या आजूबाजूला कोरलेले आढळतात. यावरून अशोकसमकाली जातकाच्या बऱ्याच कथाचा बौद्धवाङ्मयात प्रवेश झाला होता, असे अनुमान करता येतें.

**अब्भुतधम्म** म्हणजे अद्‌भुत चमत्कार. बुद्धभगवताने आणि त्याच्या प्रमुख श्रावकानी केलेल्या अद्भुत चमत्काराचे ज्यात वर्णन होते असा एखादा ग्रथ त्या काळी अस्तित्वात होता असे दिसते. परतु आता या अद्भुत धर्मांचा मागमूस राहिला नाही त्यातले सर्व भाग सध्याच्या सुत्तपिटकात मिसळून गेले असावेत. बुद्धघोषाचार्याला देखील अद्भुतधर्म काय होता, हे सागणे कठीण पडले. तो म्हणतो, "चत्तारोमे भिक्खवे अच्छरिया अब्भुता धम्मा आनन्दे ति आदिनयपवत्ता सब्बे पि अच्छरियब्भुतधम्मपटिसयुत्ता सुत्तन्ता अब्भुतधम्म ति वेदितब्बा।" ('भिक्षुहो, हे चार आश्चर्य अद्भुतधर्म आनन्दामध्ये वास करतात, इत्यादि प्रकारे अद्भुतधर्मांने सुरू झालेली आश्चर्य-अद्भुतधर्मांनी युक्त असलेली सर्व सूत्रें अब्भुतधम्म समजावीं.') पण या अद्भुतधर्मांचा आणि मूळच्या अब्भुतधम्म ग्रथाचा काही सबध दिसत नाही.

महावेदल्ल व चूळवेदल्ल अशीं दोन सूत्रें मज्झिमनिकायात आहेत. त्यावरून **वेदल्ल** हे प्रकरण कसे होते याचे अनुमान करता येते त्यापैकी पहिल्या सुत्तात महाकोट्ठित सारिपुत्ताला प्रश्न विचारतो आणि सारिपुत्त त्या प्रश्नाची यथायोग्य उत्तरे देतो. दुसऱ्यात धम्मदिन्ना भिक्षुणी आणि तिचा पूर्वाश्रमातील पति विशाख या दोघाचा तशाच प्रकारें प्रश्नोत्तर-रूपाने सवाद आहे ही दोन्ही सुत्तें बुद्धभाषित नव्हत. परतु तशाच रीतीच्या सवादाना वेदल्ल म्हणत असत. श्रमण, ब्राह्मण आणि इतर लोकाबरोबर बुद्ध भगवताचे जे सवाद झाले असतील, त्याचा एक निराळा सग्रह करण्यात आला होता व त्याला वेदल्ल हे नाव देण्यात आले होते, असे दिसते.

ही नऊ अगे अस्तित्वात येण्यापूर्वी सुत्त आणि गेय्य ह्या दोनच अगात बाकीच्या अगाचा समावेश करण्यात येत होता असे महासुञ्ञतासुत्तातील खालील मजकुरावरून दिसून येतेः—बुद्ध भगवान आनदाला म्हणतो, “न खो आनन्द अरहति सावको सत्थार अनुबन्धितु यदिद सुत्त गेय्य वेय्याकरणस्स हेतु । त किस्स हेतु । दीघरत्त हि वो आनन्द धम्मा सुता धाता वचसा परिचिता ” [‘हे आनन्द, सुत्त आणि गेय्य याच्या वेय्याकरणासाठी (स्पष्टीकरणासाठी) श्रावकाने शास्त्या (गुरूच्या) बरोबर फिरणें योग्य नाही. का की, तुम्ही या गोष्टी ऐकल्याच आहेत, आणि तुम्हाला त्या परिचित आहेत.’] म्हणजे सुत्त आणि गेय्य एवढयातच बुद्धोपदेश होता आणि वेय्याकरण किवा स्पष्टीकरण श्रावकावर सोपविण्यात आलें होते. होता होता त्यात आणखी सहा अगाची भर पडली, आणि पुढे त्यातील काही अगाची भेसळ करून सध्याची बरीच सुत्तें बनविण्यात आली. त्यात बुद्धाचा खरा उपदेश कोणता व बनावट कोणता हे सागणे जरी कठीण जाते, तरी अशोकाच्या भाब्रा किवा भाब्रू शिलालेखाच्या आधारे पिटकातील प्राचीन भाग कोणते असावेत याचे अनुमान करता येणें शक्य आहे.

अशोकाच्या भाब्रू शिलालेखात खालील सात बुद्धोपदेश भिक्षूनी, भिक्षुणीनी, उपासकानी आणि उपासिकानी वारवार ऐकावे व पाठ करावे अशी सूचना केली आहे ते उपदेश असेः—

(१) विनयसमुकसे, (२) अलियवसानि, (३) अनागतभयानि, (४) मुनिगाथा, (५) मोनेयसूते, (६) उपतिसपसिने, (७) लाघुलोवादे मुसावाद अधिगिच्य भगवता बुद्धेन भासिते.

या सातापैकी नबर ७ मज्झिमनिकायातील राहुलोवाद सुत्त (न ६१) आहे असे ओल्डेनबर्ग आणि सेनार या दोन पाश्चात्य विद्वानानी दाखवून दिले. बाकीच्याची माहिती देण्याचा प्रयत्न प्रो. ऱ्हिस डेविड्स यानी केला पण सुत्तनिपातातील मुनिसुत्त याच्याशिवाय त्यानी जी दुसरीं सुत्ते दर्शविली ती सर्व चुकीची होती. नबर २, ३, ५ आणि ६ ही चार सुत्ते कोणती असावीत याचा ऊहापोह मी १९१२ सालच्या फेब्रुवारीच्या 'इडियन ॲटिक्वेरी'च्या अकात केला आहे. त्यात दर्शविलेली सुत्ते आता सर्वत्र ग्राह्य झाली आहेत. फक्त पहिल्या सुत्ताचा मला त्या वेळीं थाग लागला नव्हता. 'विनयसमुकसे (विनयसमुत्कर्ष)' याचा विनयग्रथाशी काही तरी सबध असला पाहिजे असे वाटले आणि तशा तऱ्हेचा उपदेश कोठेच न सापडल्यामुळे ते सूत्र कोणते हे मला सागता आले नाही.

परतु विनयशब्दाचा अर्थ विनयग्रथ करण्याचे काही कारण नाही. 'अह खो केसि पुरिसदम्म सण्हेन पि विनेमि फरुसेन पि विनेमि।' (अगुत्तर चतुक्कनिपात, सुत्त न १११), 'तमेन तथागतो उत्तरि विनेति।' (मज्झिम, सुत्त न १०७) 'यन्नूनाह राहुल उत्तरि आसवान खये विनेय्य ति।' (मज्झिम, सुत्त न. १४७). इत्यादि ठिकाणीं विपूर्वक नी धातूचा अर्थ शिकविणे असा आहे, आणि त्याच्यावरूनच नतर विनयाच्या नियमाना विनयपिटक म्हणण्यात येऊ लागले. बुद्धाने ज्या वेळीं भिक्षु गोळा करण्यास आरभ केला, त्या वेळीं विनयग्रथाचे अस्तित्व मुळीच नव्हते. जी काही शिकवणूक होती ती सुत्ताच्या रूपानेच. पहिल्याप्रथम पञ्चवर्गीय

महावेदल्ल व चूळवेदल्ल अशीं दोन सूत्रे मज्झिमनिकायात आहेत. त्यावरून **वेदल्ल** हे प्रकरण कसे होते याचे अनुमान करता येते. त्यापैकी पहिल्या सुत्तात महाकोट्ठित सारिपुत्ताला प्रश्न विचारतो आणि सारिपुत्त त्या प्रश्नाची यथायोग्य उत्तरे देतो. दुसऱ्यात धम्मदिन्ना भिक्षुणी आणि तिचा पूर्वाश्रमातील पति विशाख या दोघाचा तशाच प्रकारें प्रश्नोत्तर-रूपाने सवाद आहे. ही दोन्ही सुत्तें बुद्धभाषित नव्हत. परतु तशाच रीतीच्या सवादाना वेदल्ल म्हणत असत. श्रमण, ब्राह्मण आणि इतर लोकाबरोबर बुद्ध भगवताचे जे सवाद झाले असतील, त्याचा एक निराळा सग्रह करण्यात आला होता व त्याला वेदल्ल हे नाव देण्यात आले होते, असे दिसते.

ही नऊ अगे अस्तित्वात येण्यापूर्वी सुत्त आणि गेय्य ह्या दोनच अगात बाकीच्या अगाचा समावेश करण्यात येत होता असे महासुञ्ञतासुत्तातील खालील मजकुरावरून दिसून येते.—बुद्ध भगवान आनदाला म्हणतो, “न खो आनन्द अरहति सावको सत्थारं अनुबन्धितु यदिद सुत्त गेय्य वेय्याकरणस्स हेतु। त किस्स हेतु। दीघरत्त हि वो आनन्द धम्मा सुता धाता वचसा परिचिता ” [‘हे आनन्द, सुत्त आणि गेय्य याच्या वेय्याकरणासाठी (स्पष्टीकरणासाठी) श्रावकाने शास्त्या (गुरूच्या) बरोबर फिरणें योग्य नाही. का की, तुम्ही या गोष्टी ऐकल्याच आहेत, आणि तुम्हाला त्या परिचित आहेत.’] म्हणजे सुत्त आणि गेय्य एवढयातच बुद्धोपदेश होता आणि वेय्याकरण किंवा स्पष्टीकरण श्रावकावर सोपविण्यात आलें होते. होता होता त्यात आणखी सहा अगाची भर पडली, आणि पुढे त्यातील काही अगाची भेसळ करून सध्याचीं बरीच सुत्ते बनविण्यात आली. त्यात बुद्धाचा खरा उपदेश कोणता व बनावट कोणता हे सागणें जरी कठीण जाते, तरी अशोकाच्या भाब्रा किंवा भाब्रू शिलालेखाच्या आधारे पिटकातील प्राचीन भाग कोणते असावेत याचे अनुमान करता येणें शक्य आहे.

अशोकाच्या भाब्रू शिलालेखात खालील सात बुद्धोपदेश भिक्षूनी, भिक्षुणीनी, उपासकानी आणि उपासिकानी वारवार ऐकावे व पाठ करावे अशी सूचना केली आहे ते उपदेश असेः—

(१) विनयसमुकसे, (२) अलियवसानि, (३) अनागतभयानि, (४) मुनिगाथा, (५) मोनेयसूते, (६) उपतिसपसिने, (७) लाघुलोवादे मुसावाद अधिगिच्य भगवता बुद्धेन भासिते.

या सातापैकी नबर ७ मज्झिमनिकायातील राहुलोवाद सुत्त (न. ६१) आहे असे ओल्डेनबर्ग आणि सेनार या दोन पाश्चात्य विद्वानानी दाखवून दिले. बाकीच्याची माहिती देण्याचा प्रयत्न प्रो. ऱ्हिस डेविड्स यानी केला. पण सुत्तनिपातातील मुनिसुत्त याच्याशिवाय त्यानी जी दुसरीं सुत्ते दर्शविली ती सर्व चुकीची होती. नबर २, ३, ५ आणि ६ ही चार सुत्ते कोणती असावीत याचा ऊहापोह मी १९१२ सालच्या फेब्रुवारीच्या 'इडियन ॲटिक्वेरी'च्या अकात केला आहे त्यात दर्शविलेली सुत्ते आता सर्वत्र ग्राह्य झाली आहेत फक्त पहिल्या सुत्ताचा मला त्या वेळीं थाग लागला नव्हता. 'विनयसमुकसे (विनयसमुत्कर्ष)' याचा विनयग्रथाशी काही तरी सबध असला पाहिजे असे वाटले आणि तशा तऱ्हेचा उपदेश कोठेच न सापडल्यामुळे ते सूत्र कोणते हे मला सागता आले नाही

परतु विनयशब्दाचा अर्थ विनयग्रथ करण्याचे काही कारण नाही. 'अह खो केसि पुरिसदम्म सण्हेन पि विनेमि फरुसेन पि विनेमि।' (अगुत्तर चतुक्कनिपात, सुत्त न. १११), 'तमेन तथागतो उत्तरि विनेति।' (मज्झिम, सुत्त न. १०७) 'यन्नूनाह राहुल उत्तरि आसवान खये विनेय्य ति।' (मज्झिम, सुत्त न. १४७) इत्यादि ठिकाणीं विपूर्वक नी धातूचा अर्थ शिकविणे असा आहे, आणि त्याच्यावरूनच नतर विनयाच्या नियमाना विनयपिटक म्हणण्यात येऊ लागले. बुद्धाने ज्या वेळीं भिक्षु गोळा करण्यास आरभ केला, त्या वेळीं विनयग्रथाचे अस्तित्व मुळीच नव्हते. जी काही शिकवणूक होती ती सुत्ताच्या रूपानेच. पहिल्याप्रथम पञ्चवर्गीय

भिक्षूना बुद्धाने आपले शिष्य केले ते 'धम्मचक्क पवत्तन-सुत्त' उपदेशून. तेव्हा विनय शब्दाचा मूळचा अर्थ शिकवणूक असाच घेतला पाहिजे, आणि त्या विनयाचा समुत्कर्ष म्हणजे बुद्धाचा उत्कृष्ट धर्मोपदेश. 'समुक्कस' हा शब्द जरी पालि वाङ्मयात बुद्धोपदेशवाचक आढळत नाही, तथापि 'सामुक्कसिका धम्मदेसना' हे वाक्य अनेक ठिकाणी सापडते. उदाहरणार्थ, दीघनिकायातील अम्बट्ठसुत्ताच्या शेवटी आलेला हा मजकूर पहा,—"यदा भगवा अञ्ञासि ब्राह्मण पोक्खरसाति कल्लचित्त मुदुचित्त विनीवरणचित्त उदग्गचित्त पसन्नचित्त, अथ या बुद्धान सामुक्कसिका धम्मदेसना त पकासेसि दुक्ख समुदय निरोध मग्ग।" ('जेव्हा भगवताने जाणले की पौष्करसादि ब्राह्मणाचे चित्त प्रसगाला उचित, मृदु, आवरणापासून विमुक्त, उदग्र आणि प्रसन्न झाले आहे, तेव्हा बुद्धाची जी सामुत्कर्षिक धर्मदेशना ती त्याने प्रगट केली. ती कोणती? तर दुःख, दुःखसमुदय, दुःखनिरोध आणि दुःखनिरोधाचा मार्ग.')

याच सुत्तात नव्हे, तर मज्झिमनिकायातील उपालिसुत्तासारख्या दुसऱ्या सुत्तात, आणि विनयपिटकात अनेक ठिकाणी हेच वाक्य आले आहे. फरक एवढाच की येथे हे पोक्खरसाति ब्राह्मणाला उद्देशून आहे आणि तेथे उपालि वगैरे गृहस्थाना उद्देशून आहे यावरून विनय-समुत्कर्ष याचा अर्थ असा होतो की, विनय म्हणजे उपदेश आणि त्याचा समुत्कर्ष म्हणजे ही सामुत्कर्षिका धर्मदेशना एका काळीं ह्या चार आर्यसत्याच्या उपदेशाला विनयसमुक्कस म्हणत असत, यात शका राहत नाही. 'धम्मचक्क-पवत्तन-सुत्त' हे नाव अशोकानतर बऱ्याच काळाने प्रचारात आले असावे. चक्रवर्ती राजाच्या कथा लोकप्रिय झाल्यानतर बुद्धाच्या ह्या उपदेशाला असे भपकेदार नाव देण्यात आले.

'विनयसमुकसे' हेच धम्मचक्कपवत्तनसुत्त आहे असे गृहीत धरले, तर भाब्रू शिलालेखात निर्देशिलेले सात उपदेश बौद्ध वाङ्मयात सापडतात, ते येणेप्रमाणेः—

(१) विनयसमुकसे = धम्मचक्कपवत्तनसुत्त
(२) अलियवसानि = अरियवसा (अगुत्तर चतुक्कनिपात)
(३) अनागतभयानि = अनागतभयानि (अगुत्तर पञ्चकनिपात)
(४) मुनिगाथा = मुनिसुत्त (सुत्तनिपात)
(५) मोनेयसूते = नाळकसुत्त (सुत्तनिपात)
(६) उपतिसपसिने = सारिपुत्तसुत्त (सुत्तनिपात)
(७) लाघुलोवाद = राहुलोवाद (मज्झिम, सुत्त न ६१)

या सातापैकी धम्मचक्कपवत्तन जिकडे तिकडे सापडते. तेव्हा त्याचे महत्त्व विशेष आहे हे सागावयालाच नको, आणि त्याप्रमाणे ते अशोकाने अग्रभागी दिले आहे बाकीच्यापैकी तीन एका लहानशा सुत्तनिपातात आहेत त्यावरून सुत्तनिपाताचे प्राचीनत्व सिद्ध होते त्याच्या शेवटल्या दोन वग्गावर व खग्गविसाणसुत्तावर निद्देस नावाची विस्तृत टीका असून तिचा समावेश ह्याच खुद्दकनिकायात करण्यात आला आहे सुत्तनिपाताचे हे भाग निद्देसापूर्वी एकदोन शतके तरी अस्तित्वात होते असे समजले पाहिजे, आणि त्यावरून देखील सुत्तनिपाताचे प्राचीनत्व सिद्ध होते. त्यात सर्वच सुत्ते अतिप्राचीन असतील असे नव्हे तथापि त्यातील बहुतेक सुत्ते निःसशय फार जुनी आहेत. प्रस्तुत ग्रथात बुद्धचरित्रासबधाने किवा बुद्धाच्या उपदेशासबधाने जी चर्चा करण्यात आली आहे ती अशाच प्राचीन सुत्ताच्या आधाराने.

आता आपण खास बुद्धचरित्राकडे वळू. त्रिपिटकात एकाच ठिकाणी सबध बुद्धचरित्र नाही. ते जातकट्ठकथेच्या निदानकथेत सापडते. ही अट्ठकथा बुद्धघोषाच्या समकाली म्हणजे पाचव्या शतकात लिहिली असली पाहिजे. त्याच्यापूर्वी ज्या सिहली अट्ठकथा होत्या त्यातील बराच मजकूर ह्या अट्ठकथेत आला आहे. हे बुद्धचरित्र मुख्यत्वे ललितविस्तराच्या आधारे लिहिले आहे. ललितविस्तर इसवीसनाच्या पहिल्या शतकात किवा त्यापूर्वी काही वर्षे लिहिला असावा. तो

महायानाचा ग्रथ आहे, आणि त्यावरूनच जातकट्ठकथाकाराने आपली बुद्धचरित्राची कथा रचली आहे. ललितविस्तर देखील दीघनिकायातील महापदानसुत्ताच्या आधारे रचला आहे. त्या सुत्तात विपस्सी बुद्धाचे चरित्र फार विस्ताराने दिले आहे, आणि त्या चरित्रावरून ललितविस्तरकाराने आपले पुराण रचले. अशा रीतीने गोतम बुद्धाच्या चरित्रात भलत्याच गोष्टी शिरल्या.

महापदानसुत्तातील काही भाग निराळे काढून ते गोतमबुद्धाच्या चरित्राला सुत्तपिटकातच लागू केलेले दिसून येतात. उदाहरणार्थ, तीन प्रासादाची गोष्ट घ्या विपस्सी राजकुमाराला राहण्यासाठी तीन राजवाडे होते, ह्या कथेवरून गोतमबुद्धाला राहण्यासाठी तसेच प्रासाद असले पाहिजेत, अशी कल्पना करून गोतमबुद्धाच्या तोडीच असा मजकूर घातला आहे की, त्याला राहण्याला तीन प्रासाद होते, आणि तो त्या प्रासादात अत्यत चैनीने राहत असे. ह्या कथेची असभवनीयता मी दाखवून दिलीच आहे (पृष्ठ १०४). परतु ती कथा अगुत्तरनिकायात आली आहे, आणि त्याच निकायात अशोकाच्या भाब्रू शिलालेखातील दोन सुत्ते येतात. तेव्हा मला ती कथा एके काळीं ऐतिहासिक भासली. पण विचारान्ती असे दिसून आले की ह्या अगुत्तरनिकायात पुष्कळ भाग मागाहून घातले आहेत. तीन वस्तूसबधाने ज्या गोष्टी असतील त्याचा तिकनिपातात सग्रह केला त्यात अर्वाचीनतेचा आणि प्राचीनतेचा विचार करण्यात आलेला दिसत नाही.*

अशा कथातून बुद्धचरित्रासबधाने विश्वसनीय गोष्टी कशा काढता येतील, हे दाखविण्याच्या उद्देशानेच मी हे पुस्तक लिहिले आहे. अशा काही उपयुक्त गोष्टी माझ्या दृष्टोत्पत्तीला आल्या नसतील,

---

* महापदान सुत्तातील विपस्सी बुद्धाच्या दन्तकथा गोतमबुद्धाच्या चरित्रात खण्डश कशा शिरल्या व त्यापैकी सुत्तपिटकात कोणत्या सापडतात, हे दुसऱ्या खडाच्या शेवटी पहिल्या परिशिष्टात पाहावें.

आणि ज्या काही गोष्टींना महत्त्व देऊ नये त्याना माझ्याकडून महत्त्व दिले गेले असेल. पण सशोधन करण्याच्या पद्धतीत माझी चूक असेल, असे मला वाटत नाही. ह्या पद्धतीचा अवलब केल्यास बुद्धचरित्रावर आणि त्या काळच्या इतिहासावर विशेष प्रकाश पडेल, असा मला भरवसा वाटतो, आणि त्याच उद्देशाने मी हे पुस्तक लिहिले आहे. यातील काही लेख काही वर्षांमागे 'पुरातत्त्व' नावाच्या त्रैमासिकात आणि 'विविधज्ञानविस्तारा'त छापले होते. पण ते जशाचे तसे या पुस्तकात घेतले नाहीत. त्यात पुष्कळच फेरफार केला आहे. त्यातला बराच मजकूर या पुस्तकात दाखल केला असला, तरी हे पुस्तक अगदी स्वतत्र आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

प्रस्तुत ग्रथाचें हस्तलिखित नवभारत ग्रथमालेच्या सपादकानी वाचून पाहिले, तेव्हा ग्रथामध्ये ज्याचे विशेष विवेचन आलेले नाही असे काही मुद्दे माझ्या नजरेस आणण्याचा प्रयत्न त्यानी केला. त्याचा येथेच थोडक्यात विचार करणें योग्य होईल असे वाटल्यावरून तसें करीत आहे.

(१) बुद्धाच्या जन्मतिथीसबधाने निरनिराळ्या मताचा उपन्यास करून साधकबाधक प्रमाणानिशीं ऊहापोह प्रस्तुत ग्रथात करावयास नको होता काय? आपल्या प्राचीन अथवा मध्ययुगीन इतिहासातील राज्यकर्ते, धर्मगुरु, ग्रथकार, इत्यादिकाचे चरित्र वर्णन करावयाच्या अगोदर त्याचा काल ठरविण्यासाठी विद्वानाना पुष्कळच मजकूर खर्ची घालावा लागतो, तसें या ग्रथात केलेले दिसत नाही.

या मुद्द्यासबधाने माझे म्हणणें असे : मध्ययुगीन कवि आणि ग्रथकार हे शककर्ते नव्हते. त्याच्या जन्मतिथीसबधी कितीही वाद केला, तरी त्या नक्की ठरविता येतील असे वाटत नाही. बुद्धाची गोष्ट तशी नाही. त्याच्या परिनिर्वाणापासून तहत आजपर्यंत त्याचा शक चालू आहे. मध्यतरी पाश्चात्त्य पडितानी वादविवाद करून ह्या तिथींत ५६ पासून ६५ वर्षांपर्यंत फरक आहे, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

पण अखेरीस जी परपरा सिंहलद्वीपात चालू आहे, तीच बरोबर ठरली पण समजा, बुद्धाच्या जन्मतिथीत थोडासा कमीजास्त फरक पडला तरी त्यापासून त्याच्या चरित्राला काही गौणत्व येईल असे वाटत नाही. मुद्द्याची गोष्ट जन्मतिथि नसून त्याच्या पूर्वीची स्थिति काय होती आणि त्या स्थिती-तून बुद्धाने नवीन धर्ममार्ग कसा शोधून काढला ही होय, आणि ती जर विशद करता आली, तर आजकाल बुद्धासबधाने प्रचलित असलेल्या अनेक भ्रामक कल्पना नष्ट होतील व आम्हाला त्या काळचा इतिहास नीटपणे समजेल तेव्हा तिथीवर पुष्कळ पाने खर्ची न घालता बुद्धाच्या चरित्रावर प्रकाश पडेल अशाच गोष्टीकडे मी विशेष लक्ष दिले आहे

(२) बुद्धाने उपदेशिलेल्या अहिंसेने हिंदी समाज नेभळट झाला व त्यामुळेच परकीयाकडून तो जिकला गेला, असे मत कित्येक ठिकाणी प्रति-पादिले जाते. त्याला या ग्रथात उत्तर असावयास पाहिजे होते.

उत्तर—बुद्धाच्या चरित्राचा आणि या प्रतिपादनाचा काही सबध आहे, असे मला वाटत नाही. बुद्धाचे परिनिर्वाण इ. स. पूर्वी ५४३ व्या वर्षी झाले. त्यानतर दोन शतकानी चद्रगुप्ताने साम्राज्य स्थापन केले. स्वतः चद्रगुप्त जैनधर्मी होता असे म्हणतात. पण ग्रीक लोकाना या देशातून हाकून देण्याला अहिसाधर्म त्याला आड आला नाही त्याचा नातू अशोक पूर्णपणे बौद्ध झाला, तरी तो मोठे साम्राज्य चालवीत होता.

महमद इब्न कासीम याने इ. स. ७१२ साली सिध देशावर स्वारी केली, तेव्हा बौद्धधर्म पश्चिम हिंदुस्थानातून लोप पावला होता, आणि ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व वाढत गेले होते. असे असता खलिफाच्या या अल्पवयी सरदाराने सिध देश हा हा म्हणता पादाक्रात केला, आणि तेथील हिंदु राजाला ठार मारून त्याच्या मुली आपल्या खलि-फाला नजराण्यादाखल पाठवून दिल्या.

मुसलमानानी सिध आणि पजाब देशाचा काही भाग ताब्यात घेतल्यानतर शभर वर्षांनी शकराचार्य उदयाला आले. त्याच्या वेदा-

न्ताचा सर्व रोख म्हटला म्हणजे शूद्रानी वेदाध्ययन करता कामा नये हा ! जर शूद्रानी वेदवाक्य ऐकले, तर त्याचे कान शिशाने किंवा लाखेने भरावे, वेदवाक्य उच्चारले तर त्याची जीभ कापावी, आणि वेदमत्र धारण केला तर त्याला ठार मारावे. हा त्याचा वेदान्त ! मुसलमान जेत्यापासून तरी हे आमचे सनातनी धडा शिकले काय ? बुद्ध तर त्याचा शत्रूच, त्याच्यापासून शिकण्यासारखे होते काय ?

रजपूत लोक चागले सनातनी. ते अहिंसेला निखालस मानीत नसत. प्रसग पडेल तेव्हा आपसात यथेच्छ लढाया करीत. हिंसेच्या ह्या शूर भक्ताना महमूद गझनीने घोड्याच्या पायाखालच्या धुळीसारखे उध्वस्त कसे केले ? ते बुद्धाची अहिंसा मानीत होते म्हणून की काय ?

आमची पेशवाई तर खास ब्राह्मणाच्याच हाती होती शेवटला बाजीराव कर्मठपणाबद्दल प्रसिद्ध आहे हिंसेची तर पेशवाईत परमावधि झाली. इतराशी लढाया तर राहूच द्या, पण घरच्या घरीच एकदा दौलत-राव शिंद्याने पुणे लुटले, तर दुसऱ्यादा यशवतराव होळकराने लुटले ! अशा या निस्सीम हिंसाभक्ताचे साम्राज्य सर्व हिंदुस्थानावर व्हावयास नको होते काय ? त्याना त्याच्यापेक्षा शतपटीने अहिंसक असलेल्या इग्रजाना शरण का जावे लागले ? एकामागून एक मराठे सरदार इग्रजाचे अंकित का झाले ? ते बुद्धाचा उपदेश मानीत होते म्हणून काय ?

जपान आजला हजार बाराशे वर्षे बौद्धधर्मी आहे. १८५३ साली त्याच्यावर कमोडोर पेरीने तोफा रोखल्याबरोबर त्याची जागृति होऊन एकी कशी झाली ? बौद्धधर्माने त्याना नेभळट का बनविले नाही ?

या प्रश्नाची उत्तरे लब्धप्रतिष्ठित टीकाकारानी अवश्य द्यावीत. 'मिरविसि सुज्ञत्व वृथा अन्याला स्वकृत ताप लावूनि,' हें आर्यार्ध मोरो-पताने जणू काय ह्या लब्धप्रतिष्ठित लोकाना उद्देशूनच लिहिलें असावे ! यानी आणि याच्या पूर्वजानी जी पापे केली, त्याचे सर्व खापर बुद्धावर फोडून हे खुशाल सोवळेपणाचा शहाणपणा मिरवीत फिरत आहेत !

(३) बुद्धाच्या सबोधिज्ञानानतर त्याच्या चरित्राचा कालक्रमपूर्वक आराखडा का देण्यात आला नाही ?

उत्तर—सध्या उपलब्ध असलेल्या प्राचीन वाङ्मयाच्या आधारे तसा आराखडा तयार करता येणे शक्य नाही. बुद्धाचे उपदेश कालक्रम पूर्वक दिलेले नाहीत. इतकेच नव्हे, तर जे उपदेश आहेत त्यात पुष्कळच भर पडलेली आहे. त्यातून सत्य शोधून काढणे बरेच अवघड जातें. तो प्रयत्न मी या ग्रथात केलाच आहे. पण कालक्रमानुसार बुद्धचरित्राचा आराखडा तयार करणे शक्य झालें नाही.

(४) 'वैदिक सस्कृति' आर्यांचे भरतखडात आगमन झाल्यानतर उपस्थित झाली, त्यापूर्वी 'दासाची' म्हणजे ब्राह्मणाची सस्कृति होती, याला आधार कोणते ?

उत्तर—याचा विचार मी 'हिंदी सस्कृति आणि अहिसा' या ग्रथाच्या पहिल्या प्रकरणात केला आहे. तो ग्रथ या पुस्तकाबरोबर वाचल्यास पुष्कळ गोष्टींचा नीट खुलासा होईल. माझें म्हणणे सर्व लोकानी स्वीकारावे असा मुळीच आग्रह नाही. ते विचारणीय वाटल्या मुळे वाचकासमोर माडलें आहे. ह्या दासाच्या आणि आर्यांच्या सस्कृतीचा बुद्धाच्या चरित्राशी फार थोडा सबध येतो. त्या दोन्ही सस्कृतीच्या सघर्षाने उत्पन्न झालेली वैदिक सस्कृति बुद्धाच्या वेळी प्रतिष्ठित होऊन बसली होती, एवढे दाखविण्यासाठी पहिलें प्रकरण या ग्रंथात घातले आहे.

(५) उपनिषदें व गीता बुद्धानतर रचली गेलीं याला आधार कोणते ?

उत्तर—याची देखील सविस्तर चर्चा 'हिदी सस्कृति आणि अहिसा' या ग्रथात येऊन गेली आहे,* म्हणून त्या विषयाची पुनरुक्ति या

---

* पृष्ठ ४८–५० आणि १७०–१७२ पहा.

पुस्तकात केली नाही. उपनिषदेंच काय, तर आरण्यकें देखील बुद्धानंतर लिहिलीं गेली हे मी सबळ पुराव्यानिशी दाखवून दिलें आहे शतपथ ब्राह्मणात आणि बृहदारण्यक उपनिषदात जी वंशावलि दिली आहे, तिच्यावरून बुद्धानंतर ३५ पिढ्यापर्यंत त्याची परंपरा चालू होती, असें दिसतें. हेमचंद्र रायचौधरी दर पिढीला तीस वर्षांचा काळ देतात. पण कमींत कमी पंचवीस वर्षांचा काळ दिला तरी बुद्धानंतर ८७५ वर्षांपर्यंत ही परंपरा चालली होती, असें म्हणावे लागते. म्हणजे समुद्रगुप्ताच्या काळापर्यंत ही परंपरा चालू होती, आणि तेव्हा ब्राह्मणे आणि उपनिषदे स्थिर झाली. त्यापूर्वी त्यात यथायोग्य ठिकाणी फेरफार झाले नसतील, असे नाही. पालि वाङ्मयाचा देखील असाच प्रकार झाला आहे बुद्धघोषापूर्वी सरासरी दोनशे वर्षे पालि वाङ्मय स्थिर झाले, आणि बुद्धघोषाने अट्ठकथा (टीका) लिहिल्यावर त्याच्यावर शेवटचा शिक्का बसला. उपनिषदाची टीका तर शंकराचार्यांनी नवव्या शतकात लिहिली. त्याच्यापूर्वी गौडपादाच्या माण्डूक्यकारिका लिहिल्या गेल्या. त्यात तर जिकडे तिकडे बुद्धाची स्तुति आहे. फार कशाला, अकबराच्या कारकीर्दीत लिहिलेल्या अल्लोपनिषदाचा देखील उपनिषदात समावेश करण्यात आला आहे !

उपनिषदांनी आत्मवाद व तपश्चर्या श्रमणसंप्रदायाकडून घेतली यात शंका बाळगण्याचे कारण नाही. का की, ह्या दोन गोष्टींचा यज्ञयागाच्या संस्कृतीशीं काही एक संबंध नाही. आजकाल जसे आर्य आणि ब्राह्म समाज बायबलाचा एकेश्वरी वाद वेदावर किंवा उपनिषदादिक ग्रंथावर लादू पाहतात, तशाच रीतीने आत्मवाद आणि तपश्चर्या वेदावर लादण्याचा उपनिषदाचा प्रयत्न दिसतो. मात्र त्यांनी श्रमणाची अहिंसा स्वीकारली नाही. तेवढ्याने ते वैदिक राहिले. असे असता कर्मठ मीमांसक आजला देखील उपनिषदांना वैदिक म्हणण्यास तयार नाहीत !

ज्याना पालि वाङ्मय किंवा त्याची इग्रजी भाषान्तरे वाचणे शक्य असेल, त्याना बौद्धकालीन इतिहाससशोधनाच्या कामी ह्या पुस्तकाचा उपयोग होईल अशी मी आशा बाळगतो पण ज्याना तशी सवड नसेल, त्यानी निदान खाली दिलेली पाच पुस्तके अवश्य वाचावी.

१. बुद्ध, धर्म आणि सघ २. बुद्धलीलासारसग्रह. ३. बौद्ध-संघाचा परिचय. ४ समाधिमार्ग. ५. हिंदी सस्कृति आणि अहिंसा

हे पुस्तक लोकप्रियता सपादण्यासाठी लिहिले नाही, केवळ सत्यान्वेषणबुद्धीने लिहिले आहे ते लोकादराला कितपत पात्र होईल याची शका आहे. असे असता सुविचार प्रकाशन मडळाच्या सचालकानी या पुस्तकाला आपल्या ग्रथमालेत स्थान दिले, याबद्दल मी त्याचा फार आभारी आहे. निर्विकार मनाने प्राचीन इतिहासाचा विचार करणारे पुष्कळ महाराष्ट्रीय वाचक आहेत आणि ते ह्या ग्रथाला आश्रय देऊन सुविचार प्रकाशन मडळाचा प्रयत्न सफल करतील असा मला भरवसा वाटतो.

प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी यानी प्रुफे वाचण्याच्या कामी मदत केल्याबद्दल मी त्याचे आभार मानतो.

धर्मानन्द कोसम्बी

# अनुक्रमणिका

प्रस्तावना .. ... ... (१) ते (१६)

अनुक्रमणिका . .. .. १

ग्रंथकारपरिचय .. ... ... २ ते ८

प्रकरण पहिले : आर्यांचा जय ... . . ९ ते २३

प्रकरण दुसरे : समकालीन राजकीय परिस्थिति... २३ ते ५३

प्रकरण तिसरे : समकालीन धार्मिक परिस्थिति ... ५३ ते ८३

प्रकरण चवथे : गोतम बोधिसत्त्व .. ... ८३ ते १११

प्रकरण पाचवे : तपश्चर्या व तत्त्वबोध .. ११२ ते १४३

प्रकरण सहावें . श्रावकसंघ ... .. १४३ ते १८१

सूची . ... ... .. १८२ ते १९२

# ग्रंथकारपरिचय

नवभारत ग्रथमालेला आजवर लाभलेले ग्रथकार आपल्या विद्वत्तेने व कर्तृत्वाने महाराष्ट्र समाजात मान्यनेम पावलेले असेच होते, त्यापैकी बरेच जण अखिलभारतीय कीर्ति सपादन केलेले आहेत, हेही सहज लक्षात येण्याजोगें आहे श्री धर्मानद कोसम्बोचा ग्रथ मिळवून नवभारत ग्रथमालेने ग्रथकाराच्या कीर्तिमत्तेच्या बाबतीत उच्चाक गाठला आहे पालिभाषा व बौद्ध धर्म यात निष्णात म्हणून त्याचे नाव जगातील विद्वन्मडळास परिचित आहे.

धर्मानन्द कोसम्बी याचे पूर्वायुष्य हे आधुनिक काळात अत्यत विरलत्वाने आढळणाऱ्या धर्मजिज्ञासेचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे केवळ तेवीस वर्षाच्या वयात तरुण पत्नीला सोडून व ससाराला लाथ मारून कल्याणकारक अशा धर्माचे ज्ञान करून घेण्याच्या तीव्र तळमळीने घराबाहेर पडलेल्या धर्मानन्दाची हकीकत वाचली म्हणजे जगतातील दु खाचा नाश करणाऱ्या धर्ममार्गाच्या सशोधनार्थ गृहत्याग करणाऱ्या गोतमाचे चित्र डोळ्यापुढे आल्याखेरीज राहत नाही सासारिक आपत्ति कुणावर येत नाहीत ? हजारो लाखो लोकावर त्या येतात त्या प्रसगी मनुष्य ज्या तऱ्हेने वागतो, त्यावरूनच त्याची किमत ठरते गोवे प्रातात एका लहानशा गावी १८७६ साली जन्मलेल्या धर्मानन्दावर तरुणपणी काही सासारिक आपत्ति आल्या आणि त्याचे "चित्त प्रपचात रमेनासे झाले." "बुद्धावर माझी अधिकाधिक श्रद्धा जडत चालली. प्रपचाचा जसजसा वीट येत गेला, तसतशी माझी श्रद्धा दृढ होत गेली. माझे सर्वस्व बुद्ध आहे असे वाटू लागले कितीहि सकटे येवोत, कितीहि विपत्ति भोगाव्या लागोत, बुद्धोपदेशाचे ज्ञान मला झाले म्हणजे माझ्या जन्माचे साफल्य झाले असे मला वाटू लागले." असे धर्मानन्दानीच त्या काळातल्या आपल्या मन स्थितीचे वर्णन केले आहे.

प्रबल धर्मजिज्ञासेच्या पायी इ. स १८९९ सालच्या अखेरीस निष्काचन स्थितीत गृहत्याग केल्यानतर या तरुणाने जें पर्यटन केले व ज्या अतर्क्य हालअपेष्टा सोसून बौद्धधर्माचे ज्ञान व त्याबरोबरच आत्मसमाधान सपादिले, त्याचा वृत्तात अतीव अद्भुत व विस्मयकारक आ धर्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी आरभी सस्कृत शिकण्याचे धर्मानन्दानी ठरविले. त्यासाठी प्रथम पुण्यास, तेथून ग्वालेरीस व तेथून काशीस त्यानी गमन केले सस्कृत विद्येच्या या माहेरघरात त्याची अध्ययनाची सोय सहज व चागल्या रीतीने लागली. जेवणाच्या सोयीसाठी मात्र अन्नछत्रच त्याना पाहावे लागले; व तेथे प्रवेशही कष्टानेच मिळाला सुमारे दीड वर्ष व्याकरण (कौमुदी) व साहित्य याचे अध्ययन केल्यानतर धर्मजिज्ञासेनें धर्मानदाना नेपाळात जाण्यास प्रवृत्त केले बुद्ध भगवानाच्या धर्माचे जिवत अवशेष, भगवताची जन्मभूमि असण्याचा मान ज्या राज्यास मिळाला आहे, त्या नेपाळच्या राज्यात काही तरी पाहावयास मिळतील या आशेने नेपाळात गेलेल्या या आर्त व जिज्ञासु तरुणास तेथील विपरीत परि-स्थिति पाहून अत्यत विषण्णता प्राप्त झाली तेथून ते बुद्धगयेला गेले. बौद्धधर्मग्रथाचे सम्यक् ज्ञान सिहलद्वीपात गेल्याने होईल असे तेथील एका भिक्षूने सागितल्यावरून धर्मानन्द तेथून तडक सिलोनास जाण्यास निघाले. अपरिमित त्रास, कष्ट व सकटे सोसून ते एकदाचे सिलोनास पोचले तेथे त्यास अखेर जें पाहिजे होते ते, म्हणजे बौद्ध धर्माच ज्ञान मिळाले. कोलम्बो शहराजवळ असलेल्या ‘ विद्योदय विद्यालय ’ नावाच्या विहारात भिक्षुधर्माने राहून त्यानी महास्थविर सुमगलाचार्य याच्या हाताखाली पालि ग्रथाचा अभ्यास केला परतु सिलोनात खाण्याची आबाळ होऊ लागल्यामुळे त्याची प्रकृति नीट राहीना, म्हणून ते सुमारे एक वर्षाने परत फिरले व मद्रास येथे आले. तेथे सहा महिने राहून अधिक अध्ययन करण्याच्या उद्देशाने ब्रह्मदेशात गेले तेथे विहारात राहून ध्यानमार्गाचा अभ्यास केला, परतु तेथेही प्रकृति चागली न राहिल्यामुळे ते पुन. हिंदुस्थानात आले. भिक्षुवेषातच सारनाथ, कुसिनारा, लुम्बिनीवन, कपिलवस्तु इत्यादि भगवान गोतमाच्या आयुष्यातील चिरस्मरणीय घटनानी पावन झालेल्या बौद्ध क्षेत्राच्या यात्रा त्यानी केल्या. नंतर

पुन ब्रह्मदेशात जाऊन मदाले शहराजवळ निरनिराळ्या विहारात राहून एक वर्षभर बौद्ध धर्मग्रथाचा व ध्यानमार्गाचा अभ्यास केला व तेथून १९०६ च्या आरभी हे धर्मानन्द भिक्षु पुन कलकत्त्यास आले.

यानतरचा कोसम्बीचा आयुष्यक्रम सार्वजनिक स्वरूपाचा झाला असल्यामुळे त्यात इतकी अद्भुतरम्यता व लोकविलक्षणता अनुभवास येत नाही. तथापि त्याचे यापुढील सर्व आयुष्य स्वदेशसेवेच्या हेतूने प्रेरित झालेले असल्यामुळे ते पूर्वीच्या आयुष्याइतकेच उद्बोधक व उदात्त भासते. स्वत. एवढ्या कष्टानी मिळविलेल्या बौद्ध धर्माच्या (व पालि-वाङ्मयाच्या) ज्ञानाचा स्वदेशबाधवामध्ये प्रचार करावयाचा या ध्येयाने यापुढील त्याच्या क्रिया प्रेरित झालेल्या दिसतात वगभगाच्या चळवळीतून निघालेल्या कलकत्याच्या नॅशनल कॉलेजात व कलकत्ता युनिवर्सिटीत पालि भाषेच्या अध्यापकाची जागा त्यानी पतकरली. परतु कोसम्बीची विशेष इच्छा आपल्या महाराष्ट्र बाधवामध्ये बौद्ध धर्माच्या ज्ञानाचा प्रसार करावा अशी होती त्यानी श्रीमत सयाजीराव महाराज गायकवाड याची गाठ घेतली त्या उदारधी नृपतीने थोड्याच अवकाशात तारेने पुढील सदेश पाठविला, "तुम्ही महाराष्ट्रातील कोणत्याहि शहरी रहात असाल तर तुम्हाला बडोदें सरकारातून दरमहा ५० रु. मिळतील व ही मदत तीन वर्षेपर्यंत चालू राहील. मात्र वर्षांतून एखादें पुस्तक बडोदें सरकारासाठी तुम्ही लिहून तयार केले पाहिजे." बरीच भवति न भवति करून अखेर कोसम्बीनी गायकवाड सरकारचा हा आश्रय पतकरला यासबधाने खुद्द कोसम्बी म्हणतात —"द. म २५० रु ची (कलकत्ता युनिवर्सिटीची) नोकरी सोडून श्रीमत गायकवाड महाराजानी दिलेल्या ५० रु. वेतनाचा स्वीकार केल्याबद्दल मला कधीहि पश्चात्ताप झाला नाही. हे वेतन स्वीकारले नसते तर डॉ. वुड्स याची गाठ पडली नसती आणि अमेरिकेला जाण्याची सधि सापडली नसती. पुण्याला येऊन राहिल्यामुळें डॉ भाडारकर याचा निकट सबध जडला व त्याच्या प्रयत्नाने मुबई युनिवर्सिटीत पालि भाषेचा प्रवेश करण्यात आला."

डॉ जेम्स एच. वुड्स हे अमेरिकेतील सुविख्यात हार्वर्ड युनिवर्सिटीचे प्रोफेसर होते. त्याना पालि शिकविण्याच्या निमित्ताने कोसम्बीचा

त्याच्याशी परिचय झाला. परिचयाचे रूपांतर स्नेहात होऊन 'विशुद्धिमार्ग' नामक बौद्ध तत्त्वज्ञान ग्रंथाच्या संशोधनाच्या कामी मदत करण्याकरिता डॉ. वुड्सनी कोसंबीना अमेरिकेत पाचारण केले. सयाजीराव महाराजांची परवानगी घेऊन कोसम्बी यांनी १९१० च्या एप्रिल महिन्यात अमेरिकेस प्रयाण केले हार्वर्डमधील संस्कृत प्रभृति पौरस्त्य भाषांचे प्रमुख आचार्य प्रा ल्यानमन यांच्या सहकार्याने कोसम्बी यांचे काम सुरू झाले. कोसम्बींनी कसून काम करून 'विशुद्धिमार्गा'चे संशोधन १९११ च्या अखेरपर्यंत संपविले परंतु ल्यानमनशी त्यांचे पटेना कोसम्बींचे प्रयत्न गौण लेखून झालेले सर्व संशोधन आपल्याच नांवे प्रसिद्ध व्हावे असा ल्यानमन यांचा मानस दिसला व तो आपला बेत साधत नाही असे दिसताच ते चिडले व संतापले तेव्हा कोसम्बींनी अमेरिकेहून परत फिरण्याचा निश्चय केला व ते जानेवारी १९१२ मध्ये न्यूयार्कहून स्वदेशी यावयास निघाले

हिंदुस्थानांत आल्यानंतर प्रा कोसम्बींनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या चालकांच्या निमंत्रणावरून फर्गसन कॉलेजात पांच वर्षांच्या करारानें पालि भाषेच्या प्राध्यापकाची नोकरी पतकरली त्यांच्या अध्यापकत्वाच्या कारकीर्दीत बौद्धधर्माचे व पालिभाषेचे पुष्कळ विद्वान त्यांच्या हातून तयार झाले कै. चिंतामण वैजनाथ राजवाडे, डॉ पु वि बापट (फर्गुसन कॉलेजातील सध्याचे पालिभाषेचे प्राध्यापक), प्रा चिंतामणराव जोशी (बडोदा कॉलेजातील पालीचे प्राध्यापक), प्रा ना के भागवत (सेंट झेविअर कॉलेज, मुंबई, येथील पालीचे प्राध्यापक) ही सर्व कोसम्बींच्याच शिष्यमालिकेतील चमकदार रत्ने होत.

सहा वर्षे फर्गसन कालेजांत प्राध्यापकाचें काम केल्यानंतर डॉ. वुड्स यांनी अमेरिकेत येण्याबद्दल फार आग्रह केल्यावरून ते १९१८ साली पुन अमेरिकेस गेले "विशुद्धिमार्गाचे संस्करण प्रो ल्यानमनच्या दुराग्रहामुळें तसेंच पडून राहिले हे मला कधीही आवडले नाही. कांही तडजोड करून वॉरनच्या मृत्युपत्राप्रमाणें ते छापून प्रसिद्ध करता येईल अशी आशा दिसली व माझा (अमेरिकेला जाण्याचा) बेत नक्की करण्याला हीच आशा प्रामुख्यानें कारणीभूत झाली." अमेरिकेला पुन. जा[illegible] संबंधात असा 'खुलासा' त्यांनी केला आहे.

त्या वेळी महायुद्ध सुरू असल्यामुळे अमेरिकेचा हा प्रवास कोसम्बीनी पूर्वेकडून पॅसिफिक महासागरातून केला त्याजबरोबर त्याची मुले व श्री. पार्वतीबाई आठवले या होत्या या खेपेस अमेरिकेत कोसम्बीचा मुक्काम सुमारे ४ वर्षे झाला १९२२ च्या आगस्टमध्ये ते परत आले त्यानी तेथे सशोधनकार्य बरेच केले, परतु त्यानमनच्या दुराग्रहामुळे त्याना या खेपेसही त्रास झालाच

कोसम्बीच्या विचाराना नवी दिशा १९११ सालच्या अमेरिकेच्या पहिल्या सफरीपासूनच लागन चालली होती अमेरिकेत त्यानी समाजशास्त्रावरील ग्रथाचे—विशेषत समाजसत्तावादाचे—खूप वाचन केले. भाडवलशाही नष्ट करून समाजाची रचना साम्यवादाच्या पायावर केल्यानेच सामान्य जनतेला सुख मिळेल व समाजातील स्पर्धा, कलह, इत्यादिकाचे मूळ नाहीसे होईल, अशी त्याची खात्री होत चालली होती परतु पाश्चात्त्य देशात साम्यवाद मूळ धरू शकत नव्हता व सर्व राष्ट्राचे हात हिंसा व अत्याचार यानी बरबटलेले होते, हे त्यास सहन होत नव्हते· "जगातील श्रमजीवी वर्गाने अशा प्रकारचा प्रेमाचा मार्ग स्वीकारल्याशिवाय मनुष्यकृत मनुष्यहत्या बद होणार नाही. परतु देशाभिमानाने उन्मत्त झालेल्याना तो सापडणार कसा ? "

अशा मन स्थितीत भाडवलशाहीचे आगर बनलेल्या अमेरिकेत अस्वस्थ चित्ताने कालक्रमणा करीत असता १९२०–२१ सालच्या गाधीजीनी सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या बातम्या तेथे एकामागून एक येऊन पोचू लागल्या. त्या वाचून कोसम्बीचे अत करण धन्यतेने भरून गेले. "राष्ट्रद्वेषाच्या आणि वर्णद्वेषाच्या रोगातून पार पडण्याला याच्याशिवाय दुसरा मार्ग कोणताही असू शकत नाही," असा त्याचा ठाम ग्रह झाला.

"अमेरिकेतील बातमीदार सत्याग्रहाची चळवळ पाहण्यासाठी हिंदुस्थानात गेले. तेथून ते कॉलमचे कॉलम बातम्या पाठवीत असत. ही वर्णनें वाचून माझे अत करण सद्‌गदित होत असे आणि कठ दाटून येऊन डोळ्यातून नकळत आसवे गळत." अशा रीतीने कोसम्बी अमेरिकेहून आले ते मनाने साम्यवादी, सत्याग्रहाचे पुरस्कर्ते बनून आले

हिंदुस्थानात आल्यावर १९२२ ते १९२५ पर्यन्त गाधीजीनी काढलेल्या गुजरात विद्यापीठाच्या पुरातत्त्वमदिर शाखेत पालिभाषाचार्य या नात्याने त्यानी काम केले या अवकाशात मराठीत व गुजरातीत त्यानी अनेक पुस्तके लिहिली प्रा त्यानमन सेवानिवृत्त झाल्यामुळे 'विसुद्धिमग्गा'चे सस्करण पूर्ण करण्याची सधि आता मिळेल या अपेक्षेने १९२६ च्या प्रारभास धर्मानन्द पुन अमेरिकेस गेले व सप्टेंबर १९२७ पर्यंत सर्व सस्करण छापून तयार झाल्यानतर ते स्वदेशी परतल

हिंदुस्थानात आल्यानतर पत्नीला घेऊन त्यानी सर्व क्षत्राच्या यात्रा केल्या व गुजरात विद्यापीठात ते पूर्वीप्रमाणे राहू लागले १९२९ साली लेनिनग्राड (रशिया) येथील बौद्ध सस्कृतीच्या अभ्यासासाठी स्थापिलेल्या सस्थेत काम करण्यास ते रशियात गेले रशियातील अनुभवाचा त्याच्या अगोदरच साम्यवादी बनलेल्या मनावर बराच अनुकूल परिणाम झाला. रशियातील हवा, राहणी व अन्न न मानवल्यामुळे ते एका वर्षाच्या आतच, म्हणजे १९३०च्या प्रारभी, हिंदुस्थानास परत आले येथे आले तो सर्व देश सत्याग्रहयुद्धासाठी सज्ज झालेला त्यास दिसला मार्चमध्ये सुप्रसिद्ध दाडी-कूच झाले. धर्मानदानी या स्वातत्र्ययुद्धात उडी घेतली. खेड्यापाड्यातून प्रचार केला, शिरोडे, (रत्नागिरी) येथील मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला व अखेर विलेपार्ले येथील सत्याग्रह–छावणीचे प्रमुखत्व स्वीकारले. तेथे त्याना पकडल्यानतर लवकरच हायकोर्टाने सोडून दिले आक्टोबर १९३१ मध्ये ते डॉ वुडस्च्या आग्रहावरून चवथ्यादा अमेरिकेस गेले व तेथून १९३२ साली परत आले त्यानतर "१९३४ सालच्या ऑगस्ट महिन्यात मी बनारसला जाऊन राहिलो तेथे सहा महिने हिंदु युनिवर्सिटीचा पाहुणा होतो त्यानतर काशी विद्यापीठात आठ नऊ महिने राहिलो. विद्यापीठाच्या चालकानी माझ्यासाठी एक लहानसे घर बाधून दिले त्या घरात राहून मी 'हिंदी सस्कृति आणि अहिंसा' हे पुस्तक लिहिले"

श्रमजीवी वर्गामध्ये बुद्धाच्या अहिंसा तत्त्वज्ञानाच्या प्रचाराने स्पृश्यास्पृश्य भेद नष्ट करून समता स्थापता येईल की काय हे पाहण्याच्या हेतूने परळच्या वस्तीत एक आश्रम स्थापन करण्याचे कार्य कोसम्बीनी यानतर हाती घेतले. त्याच्या हेतूनुसार १९३७ च्या

जानेवारीत 'बहुजनविहारा'ची स्थापना झाली. तेथे आपल्या उद्देशानुसार ते कार्य करीत असतात

येणेप्रमाणे या महाभागाचे चरित्र आहे दु खनिरोधक व कल्याण-कारक असा मार्ग जो आपणास पराकाष्ठेच्या कष्टानी व श्रमसायासानी प्राप्त झाला, व ज्यास आपल्या आयुष्यातील विविध अनुभवानी पुष्टि मिळाली, त्या मार्गाची शिकवण समाजबाधवाना देण्यासाठी त्यानी आपले जीवित वाहिले आहे

फेब्रुवारी १९१० मध्ये सयाजीराव महाराजाच्या सागण्यावरून बडोदें येथे बौद्ध धर्मावर कोसम्बीनी व्याख्याने दिली त्याचे पुस्तक लगेच 'बुद्ध, धर्म आणि सघ' या नावाने प्रसिद्ध करण्यात आले. पुढे १९१४ साली त्याचे 'बुद्धलीलासारसग्रह' हे पुस्तक प्रसिद्ध झाले या ग्रथाचे तीन भाग असून गोतम हा बुद्ध होण्याच्या पूर्वीच्या जन्मातील काही कथा पहिल्या भागात, खुद्द गोतम बुद्धाच्या कथा दुसऱ्या भागात व बुद्धाचा उपदेश व परिनिर्वाण वर्णन करणाऱ्या कथा तिसऱ्या भागात दिलेल्या आहेत. 'समाधिमार्ग' (१९२५) व 'बौद्धसघाचा परिचय' (१९२६) ही पुस्तके गुजरात विद्यापीठात असताना लिहिली त्यानतर 'हिदी सस्कृति आणि अहिसा' (१९३५) हे पुस्तक काशी येथे असताना लिहिले यात त्यानी प्राचीन भारतासबधीचे आपले परिणतावस्थेतील विचार व आपले सामाजिक तत्त्वज्ञान प्रकट केले आहे 'विसुद्धिमग्गा'च्या सशोधनासबधी वर अनेकवार उल्लेख केलाच आहे या ग्रथाचे सस्करण अधेरी (मुबई) येथील 'भारतीय विद्याभवन' या सस्थेने नागरी लिपीत नुकतेच प्रसिद्ध केले आहे. गुजराती भाषेतही त्याची कित्येक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

धर्मानन्दजीनी आपल्या पूर्वायुष्याचा वृत्तान्त लिहिला, तो 'निवेदन' या नावाने पुस्तकरूपाने १९२४ साली प्रसिद्ध झाला. अगदी अलीकडे १९३७–३८ साली त्यानी 'खुलासा' या नावाने आपल्या उत्तर आयुष्याचा वृत्तात लिहिला आहे, तो मुबईच्या 'प्रकाश' पत्रात क्रमश प्रसिद्ध झाला आहे या दोन्ही आत्मचरित्रात्मक प्रबधावरून प्रस्तुत 'परिचय' लिहिला आहे.

—प्रकाशक.

# भगवान बुद्ध

## प्रकरण पहिलें

## आर्यांचा जय

### उषोदेवीचीं सूक्तें

ऋग्वेदांत जीं उषा देवीचीं सूक्तें आढळतात, त्याच्या अनुरोधानें लो॰ टिळक यानी आपल्या *The Arctic Home in the Vedas* या पुस्तकात आर्य उत्तर ध्रुवाकडे राहत होते, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. 'सदृशीरद्य सदृशीरिदु श्वो दीर्घं सचन्ते वरुणस्य धाम।' ऋ. १।१२३।८ (आज आणि उद्या ह्या सारख्याच आहेत. त्या दीर्घकालपर्यंत वरुणाच्या गृहांत जातात.)* लोकमान्याच्या मतें ही आणि अशा तऱ्हेच्या दुसऱ्या ऋचा उत्तर ध्रुवाकडील उषःकालाला उद्देशून लिहिलेल्या आहेत; दीर्घकाळपर्यंत उषा वरुणगृहांत जातात, म्हणजे तिकडे सहा महिनेपर्यंत अंधार असतो, असा अर्थ असला पाहिजे.

---

*'Arctic Home in the Vedas' पृष्ठ १०३ पहा.

परतु याच सूक्ताच्या बाराव्या ऋचेत 'अश्वावतीर्गोमती-र्विश्ववारा' ही उषा देवीची विशेषणे सापडतात. 'ज्याच्याकडे पुष्कळ घोडे आणि गाई आहेत, आणि ज्या सर्वांना पूज्य आहेत' असा त्यांचा अर्थ.* उत्तर ध्रुवाकडे सध्या घोडे आणि गाई नाहीतच, आणि ते प्राणी हजारो वर्षांपूर्वी तिकडे होते याला‍ही काहीच आधार सापडलेला नाही. ह्या एकाच सूक्तांत नव्हे, तर उषोदेवीच्या इतर सूक्तातून देखील ती घोडे आणि गाई देणारी, गाईची जन्मदात्री, इत्यादि विशेषणे भरपूर सापडतात. यावरून ह्या ऋचा किंवा ही सूक्तें उत्तर ध्रुवाकडे रचलीं नाहीत हे सिद्ध होते.

### इश्तर

तर मग दीर्घकालपर्यंत उषा पाताळात जातात याचा अर्थ कसा करावा? बाबिलोनियन लोकात फार प्राचीन काळापासून प्रचलित असलेल्या इश्तर देवतेच्या दतकथा लक्षात घेतल्या म्हणजे याचा अर्थ सहज जाणता येतो. तम्मुज किंवा दमुत्सि (वैदिक दमूनस्) या देवावर इश्तरचे प्रेम जडते. पण तो एकाएकी मरण पावतो. त्याला जिवत करण्यासाठी अमृत आणण्याच्या हेतूने इश्तर पाताळात प्रवेश करते. तेथील राणी अल्लतु ही इश्तरची बहीण. तरी ती इश्तरचा भयकर छळ करते; क्रमशः तिचे सर्व दागिने काढून घ्यावयास लावून तिला रोगी बनवते आणि कैदेत टाकते. चार किंवा सहा महिने अशा रीतीने दुःख आणि कैद भोगल्यावर अल्लतूकडून इश्तरला अमृत मिळते; आणि ती पुन्हा पृथ्वीवर येते. इश्तरच्या दुसऱ्या अनेक दतकथा आहेत, पण त्यांत ही दतकथा प्रमुख

---

* येथे उषा बहुवचनान्त आहे

† *Lewis Spence* Myths and Legends of Babylonia and Assyria, (1926), pp 125-131.

दिसते. हिचे वर्णन सर्व बाबिलोनियन वाङ्मयात आढळतें. ऋग्वेदांतील वरच्या सारख्या ऋचांचा संबंध या दंतकथेशीं आहे यांत संशय बाळगण्याचें कारण नाही.

इश्तर पाताळातून वर येते, तेव्हा तिचा त्या ऋतूत उत्सव मानण्यात येत होता; तांबड्या बैलाच्या गाडीतून तिची रथयात्रा काढीत असत. घोड्याचा शोध लागल्यानंतर तिचा रथ घोडे ओढीत. 'एषा गोभिररुणभिर्युजाना' ऋ० ५।८०।३ (ही उषा, जिच्या रथाला तांबडे बैल लावले आहेत.) 'वितद्ययुररुणयुग्भिरश्वैः' ऋ. ६।६५।२ (अरुणवर्ण घोड्याच्या रथातून उषा देवी आल्या.)

### घोड्यांचा लढाईत उपयोग

इ. स. पूर्वी दोन हजार वर्षें बाबिलोनियात घोड्याचा उपयोग मुळीच माहीत नव्हता. रथाला बैल किंवा गाढवे जुपीत असत; आणि ते लोक घोड्याना जंगली गाढवे म्हणत. बाबिलोनियाच्या उत्तरेस डोंगरी प्रदेशात राहणारे केशी लोक प्रथमतः माल वाहून नेण्याच्या कामी घोड्यांचा उपयोग करू लागले. या जंगली गाढवाना लगामात आणून आणि त्याच्यावर स्वार होऊन धान्य गोळा करण्याच्या वेळीं ते बाबिलोनियांत येत; आणि तेथील शेतकऱ्याना मदत करून मजुरीबद्दल मिळालेलें धान्य आपल्या घोड्यांवरून वाहून नेत. केशी लोकाना युद्धकला मुळीच माहीत नव्हती. ती कला ते बाबिलोनियन लोकापासून शिकले, आणि त्यानी प्रथमतः लढाईत घोड्याचा उपयोग केला.*

आपल्या घोडदळाच्या बळावर केशींच्या गदश नांवाच्या राजाने इ. स. पूर्वी १७६० या वर्षी बाबिलोनियांत सार्वभौम

---

* *L. W. King* · A History of Babylon, (1915), P. 125.

राज्य स्थापन केलें. आणि त्यानतर त्याच्या वंशजांची परंपरा सुरू राहिली.* मुद्याची गोष्ट ही की, इ. स. पूर्व अठराशे वर्षांमागे घोडयाचा लढाईत उपयोग केला गेल्याचा दाखला कोठेच सापडत नाही; आणि वेदांत तर जिकडे तिकडे घोडयाचे महत्त्व वर्णिलें असून केशींचा आणि घोडयांचा निकट संबंध दाखविलेला आहे. यावरून आर्यांची सप्तसिंधूवरची स्वारी इ. स. पूर्वी सतराशे वर्षांपलीकडे जाऊं शकत नाही, हें स्पष्ट होतें.

## दास

आर्य येण्यापूर्वी सप्तसिंधुप्रदेशात (सिंध आणि पंजाब प्रांतांत) दासाचे राज्य होतें. दास या शब्दाचा अर्थ गुलाम असा होऊन बसला आहे. परंतु वेदांत दास् आणि दाश् या दोन धातूंचा प्रयोग 'देणें' या अर्थी होतो; आणि तसाच तो अलीकडच्या कोशांतही देण्यांत आला आहे. म्हणजे दास शब्दाचा मूळचा अर्थ, दाता, उदार (Noble) असा असला पाहिजे. आवेस्तातील फर्वर्दीन यस्तमध्ये या दास देशांतील पितराची पूजा आहे. त्यात त्याना 'दाहि' म्हटलें आहे. (We worship the Fravashis of the holy men in the Dahi countries)

प्राचीन पर्शियन भाषेत संस्कृत स चा उच्चार ह होत असे. उदाहरणार्थ, सप्तसिंधूला आवेस्तात हप्तहिंदु म्हटले आहे. त्यालाच अनुसरून दासी किंवा दास याचें रूपांतर दाहि असें झाले आहे.

## आर्य

आर्य हा शब्द ऋ धातुपासून साधला आहे; आणि निरनिराळ्या गणांत जे ऋ धातु सापडतात ते बहुतेक गत्यर्थ आहेत. म्हणजे आर्य

---

* *L. W. King*: A History of Babylon, (1915), P. 214.

या शब्दाचा अर्थ फिरस्ते असा होतो. आर्यांना घरेंदारे करून राहणें आवडत नसे असें दिसतें. मोगल लोक जसे तंबूमध्ये राहत असत, तसेच आर्य लोक तंबूतून किंवा मंडप घालून राहत असावेत. एका बाबतींत त्यांची ही परंपरा अद्यापि कायम राहिली आहे. बाबिलोनियांत यज्ञयागाच्या जागा म्हटल्या म्हणजे मोठमोठया मंदिरांचीं आवारें असत. आणि हरप्पा व मंहिंजो-दारो या दोन ठिकाणीं जे प्राचीन नगरावशेष सापडले आहेत, त्यांत देखील दाहि लोकांची मंदिरें यज्ञयागाच्या जागा असत असें तज्ज्ञांना वाटते. ही परंपरा आर्यांनी मोडून टाकली. यज्ञयाग करावयाचा म्हटला म्हणजे तो मंडपातच केला पाहिजे अशी त्यांनी वहिवाट पाडली. आर्यांचे वंशज तंबूतली राहाणी सोडून कालक्रमाने घरे बांधून राहू लागले, पण यज्ञाला मंडपच पाहिजे ही प्रथा अद्यापि टिकून राहिली आहे.

## दासांचा पराजय कां झाला ?

अशा या फिरस्त्या लोकांनी दासासारख्या पुढारलेल्या लोकांचा पराजय केला कसा ? याचे उत्तर इतिहासाने–विशेषतः हिंदुस्थानच्या इतिहासाने–वारंवार दिलें आहे. एका राजवटीखाली लोक आरंभीं सुखी आणि सधन झाले, तरी अखेरीला एका लहानशा वर्गाच्या हातांत सत्ता एकवटते, तो वर्ग तेवढा चैनीत राहतो, आणि आपसात अधिकारासाठी भांडत असतो. त्यामुळे लोकांवर कराचा भार वाढत जातो; आणि ते या सत्ताधाऱ्यांचा द्वेष करतात. अशा वेळीं मागासलेल्या लोकांना चांगले फावते. एकजुटीने असल्या साम्राज्यशाहीवर हल्ला चढवून ते ती पादाक्रांत करतात. तेराव्या शतकाच्या आरंभीं जंगली मोंगलांना एकवटून झंगिशखानाने किती साम्राज्यें लयाला नेलीं ! तेव्हा आर्यांनी आपसांत भांडणाऱ्या दासांना अनायासें जिंकलें असल्यास त्यांत मुळीच नवल नाही.

## शहरें तोडणारा इन्द्र

दास लहान लहान शहरांतून राहत असत. आणि या शहराचे एकमेकांत वैर चालत होतें असे दिसतें. कां की, दासापैकी दिवोदास हा इन्द्राला सामील झाल्याचा उल्लेख ऋग्वेदात अनेक ठिकाणी आढळतो. दासाचे नेतृत्व वृत्र ब्राह्मणाकडे होते. त्याचाच नातलग त्वष्टा; त्याने इन्द्राला एकप्रकारचे यत्र (वज्र) तयार करून दिले. त्याच्या साहाय्याने इन्द्राने दासाची शहरे तोडलीं व अखेरीस वृत्र ब्राह्मणाला ठार मारले. पुरदर म्हणजे शहरे तोडणारा हे विशेषण इन्द्राला ऋग्वेदात अनेक ठिकाणीं लावले आहे.*

## इन्द्राची परम्परा

इन् आणि द्र या दोन शब्दाच्या समासाने इन्द्र शब्द बनला आहे. इन् म्हणजे योद्धा. उदाहरणार्थ, 'सह इना वर्तते इति सेना'. द्र शब्द शिखर किंवा मुख्य अशा अर्थी बाबिलोनियन भाषांत साप-डतो. तेव्हा इन्द्र म्हणजे सैन्याचा अधिपति किंवा सेनापति. होता होतां हा शब्द राजवाचक बनला. जसें देवेन्द्र, नागेद्र, मनुजेद्र इत्यादि. पहिल्या इन्द्राचें नांव शक्र होते. त्यानतर त्याची परपरा बरींच वर्षे चालली असावी. नहुषाला इन्द्र केल्याची दन्तकथा पुराणात आलीच आहे. 'अह सप्तहा नहुषो नहुष्टरः' असा उल्लेख ऋग्वेदांत (१०।४९।८) सापडतो. अर्थात् या दन्तकथेंत काही तथ्य असले पाहिजे.

## इन्द्रपूजा

सार्वभौम राजांना यज्ञांत बोलावून आणून त्यांना सोम देण्याचा विधि बाबिलोनियांत होत असे. त्या प्रसगीं स्तुतीने भरलेलीं त्यांचीं स्तोत्रे गाण्यांत येत. इन्द्राचीं बहुतेक सूक्तें अशाच प्रकारचीं आहेत.

---

*विशेष माहितीसाठी 'हिंदी सस्कृति आणि अहिंसा' पृष्ठ १७-१९ पहा.

इन्द्राची संस्था नष्ट झाल्यानंतर देखील ही स्तोत्रे तशींच राहिलीं आणि त्याचा अर्थ भलताच होऊ लागला. इन्द्र आकाशातील देवाचा राजा आहे, अशी कल्पना होऊन बसली; आणि ह्या सूक्तांचा अर्थ अनेक ठिकाणी कोणाला कांहीच समजेनासा झाला. त्याच्या नुसत्या शब्दात मान्त्रिक प्रभाव आहे असे लोक गृहीत धरून चालू लागले.

## इन्द्राचा स्वभाव

सप्तसिंधूवर स्वामित्व स्थापन करणारा सेनापति इन्द्र मनुष्य होता याला पुरावा ऋग्वेदात भरपूर सापडतो. त्याच्या स्वभावाचे थोडेसें दिग्दर्शन कौषीतकि उपनिषदात आढळते, ते येणेप्रमाणे,-

> दिवोदासाचा पुत्र प्रतर्दन युद्ध करून आणि पराक्रम दाखवून इन्द्राच्या आवडत्या वाड्यात गेला. त्याला इन्द्र म्हणाला, 'हे प्रतर्दना, तुला मी वर देतो.' प्रतर्दन म्हणाला, 'जो मनुष्याला कल्याणकारक होईल असा वर दे.' इन्द्र-'वर दुसऱ्याकरता घेत नसतात. स्वतःसाठी वर मागून घे.' प्रतर्दन-'माझ्यासाठी मला वर नको.' तेंव्हा इन्द्राने सत्य गोष्ट होती, ती सांगितली. कारण इन्द्र सत्य आहे. तो म्हणाला, 'मला जाण. तेच मनुष्याला हित-कारक आहे, की जेणेकरून मला तो जाणेल. त्वष्ट्याच्या मुलाला-त्रिशीर्षाला-मी ठार मारले. अरुमग नावाच्या यतींना कुत्र्यांकडून खावविले. पुष्कळ तहाचे अतिक्रमण करून दिव्यलोकीं प्रह्लादाच्या अनुयायाना, अंतरिक्षात पौलोमांना आणि पृथ्वीवर काल-काश्यांना मी ठार मारले. त्या प्रसगीं माझा एक लोम देखील वाकला नाही. अशा प्रकारे जो मला ओळखील, त्याने मातृवध, पितृवध, चौर्य, भ्रूणहत्या इत्यादि पापे केलीं असता किंवा तो करीत असतां त्याला दिक्कत वाटणार नाही, किंवा त्याच्या तोंडाचा नूर पालटणार नाही.'

आपले साम्राज्य स्थापण्याच्या वेळीं इन्द्राने ह्या उताऱ्यांत दिलेले बरेच अत्याचार केल्याचा निर्देश खुद्द ऋग्वेदातच आढळतो. पण इन्द्रच का, कोणत्याही मनुष्याला साम्राज्य स्थापावयाचे असल्यास आपपरभाव, दयामाया ठेवतां येत नाही; तह मोडण्याचे भय बाळगता येत नाही. शिवाजीने चन्द्रराव मोऱ्याना ठार मारले, तें न्याय्य होते की अन्याय्य होतें, हे वाद निरर्थक आहेत. न्यायान्यायाचा विचार करीत बसला असता, तर शिवाजी साम्राज्य स्थापू शकला नसता. साम्राज्यान्तर्गत लोक देखील असल्या क्षुल्लक पापपुण्याचा विचार करीत बसत नाहीत. ते एवढेच पाहतात की, एकदरीत या साम्राज्याच्या स्थापनेपासून सामान्य जनतेचा फायदा झाला आहे की काय ?

## आर्यांच्या सत्तेपासून फायदे

ह्या दृष्टीने विचार केला असतां इन्द्राच्या किंवा आर्यांच्या साम्राज्यापासून सप्तसिंधूतील जनतेचा फार मोठा फायदा झाला असला पाहिजे. लहान लहान शहराशहरांमधून जीं वारवार युद्धे होत असत, तीं बद पडल्यामुळे लोकाना एक प्रकारचे सुखस्वास्थ्य मिळाले. पेशव्याच्याच नातलगांनी शनवार वाड्यावर इग्रजाचा झेंडा लावला; आणि पेशवाई बुडाल्यावर इतर हिंदूनी तर मोठाच उत्सव केला म्हणतात. त्याचप्रमाणे वृत्र जरी ब्राह्मण होता, तरी त्याला मारून सप्तसिंधूतील अंत:कलह बद पाडल्याबद्दल इन्द्राचे देव्हारे तेथील प्रजेने माजविणे अगदी साहजिक होतें. तेव्हा दासांच्या आणि आर्यांच्या सघर्षापासून जे कांही सुपरिणाम घडून आले, त्यांतला पहिला हा समजला पाहिजे की, सप्तसिंधूमध्ये एक प्रकारची शांतता नांदू लागली. दुसरी गोष्ट, ब्राह्मणांचे जे वर्चस्व राजकारणांत होतें ते नष्ट झाले. इन्द्राने त्वष्ट्याच्या मुलाला—विश्वरूपाला—पुरोहितपद दिले

आणि तो बड करील या भयाने त्यालाही ठार मारले, असा उल्लेख खुद्द ऋग्वेदांत आणि यजुर्वेदात सापडतो.* तथापि पुरोहिताची पदवी कोणत्या ना कोणत्या ब्राह्मणाकडे राहिली. राजकारणापासून अलिप्त राहिल्यामुळे ब्राह्मणसमाजाला वाङ्मयाची अभिवृद्धि करता आली.

## वैदिक भाषा

दासाच्या आणि आर्यांच्या संघर्षाने एक नवीन भाषा उत्पन्न झाली. हीच वैदिक भाषा होय. मुसलमानाच्या आणि हिंदूच्या संघर्षाने जशी हिंदुस्थानात उर्दू नावाची नवीन भाषा उत्पन्न झाली, तशी ही भाषा होती. पण वैदिक भाषेइतके उच्च स्थान उर्दूला कधीही मिळाले नाही आणि मिळण्याचा संभव नाही. वैदिक भाषा निव्वळ देववाणी होऊन बसली!

या वैदिक भाषेचा नीट अर्थ लावावयाचा असल्यास बाबिलोनियन भाषाच्या ज्ञानाची फार आवश्यकता आहे. काही मूळच्या शब्दाचे अर्थ कसे उलटले आहेत हे दास आणि आर्य या दोन शब्दावरूनच दिसून येते. दास शब्दाचा मूळचा अर्थ दाता असून सध्या गुलाम असा होऊन बसला आहे; आणि आर्य शब्दाचा मूळचा अर्थ फिरस्ता असता थोर, उदार, श्रेष्ठ असा झाला.

## आर्यांच्या जयाने झालेली हानि

दासांच्या आणि आर्यांच्या संघर्षणाने जी मोठी हानि झाली, ती ही की, दासाची घरे आणि नगरें बाधण्याची कला नष्टप्राय होऊन गेली. सिंध आणि पंजाब प्रांतांत सापडलेल्या प्राचीन नगरांची आणि घरांची परंपरा हिंदुस्थानांत राहिली नाही. दुसरी गोष्ट ही की, जगलांत राहणारे यति कशा रीतीने वागत, हें समजण्याचा

---

* हिंदी संस्कृति आणि अहिंसा, पृ० १९–२० पहा.

मार्ग राहिला नाही. वरच्या उताऱ्यात इन्द्राने त्यांना कुत्र्यांकडून खाववले असा उल्लेख आला आहे. मूळचा शब्द 'सालावृक'. ह्याचा अर्थ लांडगे किंवा कुत्रे असा होऊ शकतो. टीकाकाराने शालावृक म्हणजे लांडगे असाच अर्थ केला आहे. परंतु इंद्राजवळ पुष्कळ शिकारी कुत्रे होते आणि त्याने ते यतींच्या अंगावर घातले, हे अधिक संभवनीय दिसतें. या यतींचे वजन समाजावर फार असल्याशिवाय इन्द्राने त्यांना मारण्याचे काहीच कारण नव्हते. पण ते वागत होते कसे, लोक त्यांना का मानीत, इत्यादि गोष्टी समजण्याला कांही मार्ग राहिला नाही.

## आर्यांच्या संस्कृतीला कृष्णाचा विरोध

सप्तसिंधूच्या प्रदेशावर इन्द्राची पूर्ण सत्ता स्थापन झाल्यावर त्याचा मोर्चा मध्य हिंदुस्थानाकडे वळला असल्यास नवल नाही. पण तेथे त्याला मोठाच प्रतिस्पर्धी भेटला. देवकीनंदन कृष्ण केवळ गाईंचा प्रतिपालक राजा होता. इन्द्राची यज्ञयागाची संस्कृति आणि त्याचे वर्चस्व तो मान्य करण्यास तयार नव्हता. यास्तव इन्द्राने त्याच्यावर हल्ला केला. कृष्णाजवळ घोडदळ नव्हतें. तथापि त्याने माऱ्याची अशी जागा शोधून काढली की इन्द्राचे त्याच्यासमोर काही चालले नाही. बृहस्पतीच्या मदतीने तो कसा तरी आपला जीव संभाळून मागे हटला. ऋग्वेदात (८।९६।१३–१५) सापडणाऱ्या काही ऋचांवरून आणि भागवत इत्यादि पुराणांत आलेल्या दंतकथांवरून या विधानाला बरीच बळकटी येते.*

कृष्ण यज्ञयागाची संस्कृति मानण्याला तयार नव्हता. मग तो मानीत होता तरी काय? त्याला आंगिरस ऋषीने यज्ञाची एक सोपी पद्धति शिकविली. त्या यज्ञाच्या दक्षिणा म्हटल्या म्हणजे

* हिंदी संस्कृति आणि अहिंसा, पृ. २२–२५ पहा.

तपश्चर्या, दान, सरळपणा (आर्जव), अहिसा आणि सत्यवचन या होत. 'अथ यत्तपो दानमार्जवमहिंसा सत्यवचनमिति ता अस्य दक्षिणाः।' (छां० उ० ३।१७।४-६ ) यावरून असे दिसते की, आर्यांच्या आणि दासांच्या सघर्षात जी यतीची सस्कृति सप्तसिंधु प्रदेशात नष्ट झाली, तिचा काहीसा अश गगायमुनेच्या प्रदेशात कायम राहिला होता. तपश्चर्या करणाऱ्या अहिसक मुनीची कृष्णासारखे राजे या प्रदेशात पूजा करीत होते, हे वरील उताऱ्यावरून दिसून येते.

## वैदिक संस्कृतीचा विकास

परतु या अहिंसात्मक सस्कृतीची फारशी उन्नति झाली नाही. ब्राह्मणानी राजकारणातून अग काढून घेतल्यावर वाङ्मयाकडे आणि इतर लोकोपयोगी गोष्टींकडे चागले लक्ष पुरवले. हिंदुस्थानात सगळ्यांत प्राचीन विश्वविद्यालय म्हटले म्हणजे तक्षशिला येथे होते. तेथे ब्राह्मण वेद तर शिकवीतच; आणि त्याशिवाय धनुर्विद्या, वैद्यक इत्यादि शास्त्रेही शिकवीत. सप्तसिंधूतून इन्द्राच्या परपरेचे साम्राज्य नष्ट झाले, तरी त्या परपरेपासून उद्भवलेल्या नवीन सस्कृतीचे राज्य सुरू झाले, आणि त्याची वाढ होत गेली.

## वैदिक संस्कृतीचा मध्यदेशांत विजय

कृष्णाने इन्द्राचा पराभव केल्यानंतर सहाशे-सातशे वर्षांनी परीक्षित् आणि त्याचा मुलगा जनमेजय या दोन पाडवकुलोत्पन्न राजांनी सप्तसिंधूत तयार झालेल्या आर्यसस्कृतीची सस्थापना गगायमुनांच्या प्रदेशांत केली. पाडव आर्यसस्कृतीचे भोक्ते होते याला आधार वैदिक वाङ्मयांत सापडत नाही. कृष्णामध्ये आणि पांडवामध्ये तर निदान सहाशे वर्षांचा काळ लोटला असला पाहिजे. महाभारतांत ज्या कृष्णाच्या कथा येतात, त्या वरवर वाचल्या तरी

प्रक्षिप्त असाव्याशा वाटतात. निदान इन्द्राबरोबर युद्ध करणारा कृष्ण आणि महाभारतांतील कृष्ण एक नव्हत, असें मानावें लागते. पाडवाचे वशज परीक्षित् आणि जनमेजय या दोघानी मात्र वैदिक सस्कृतीला भरपूर आश्रय दिला, हे अथर्ववेदावरून (काण्ड २०, सू० १२७) चागले सिद्ध होते.*

सप्तसिंधूत यतीची सस्कृति साफ नष्ट झाली, तरी ती प्रामुख्याने मध्यहिंदुस्थानात वास करीत होती, हे वर दिलेल्या छादोग्य उपनिषदाच्या उताऱ्यावरून आणि पालि वाङ्मयातील सुत्त-निपातात सापडणाऱ्या 'ब्राह्मणधाम्मिक' सुत्तावरून दिसून येते.† सप्तसिंधूतील चातुर्वर्ण्य मध्यहिदुस्थानात देखील स्थिरावले होते. फरक एवढाच की, सप्तसिंधूतील ब्राह्मणानी आर्यांच्या विजयामुळे उत्पन्न झालेली यज्ञयागाची पद्धति पूर्णपणे स्वीकारली. मध्यहिदु-स्थानात जरी ब्राह्मण अग्निपूजा करीत असत, तरी त्या पूजेंत प्राण्याचे बलिदान होत नसे. तादूळ, जव वगैरे पदार्थांनीच ते अग्निदेवतेची पूजा करीत. परतु परीक्षित आणि जनमेजय यानी यज्ञयागाला सुरवात केल्यानतर ही जुनी अहिसात्मक ब्राह्मणसस्कृति नष्टप्राय झाली, आणि तिच्या जागी हिसात्मक यज्ञयागाची प्रथा जोराने पसरू लागली. सप्तसिधूच्या ऐवजी गगायमुनाच्या मधला प्रदेशाच आर्यावर्त बनला !

## अहिंसा टिकाव धरून राहिली

जुनी अहिंसात्मक अग्निहोत्रपद्धति मृतप्राय झाली खरी, तथापि ती अगदीच नाश पावली नाही. तिने राजदरबारातले आणि वरच्या दर्जातील लोकातले आपले वर्चस्व सोडून देऊन जगलाचा

---

* हिंदी सस्कृति आणि अहिसा पृ० ३७–३८.

† हिंदी सस्कृति आणि अहिंसा ३९–४०.

आश्रय धरला. म्हणजे जे लोक अहिंसात्मक संस्कृतीला चिकटून राहिले, त्यांनी आपली तपश्चर्या जंगलातील फळामुळांवर निर्वाह चालवून कायम ठेवली. जातक-अट्ठकथेत अशा लोकांच्या अनेक गोष्टी आल्या आहेत. नवीन स्थापन झालेल्या हिंसात्मक यज्ञपद्धतीला कटाळून अनेक ब्राह्मण आणि इतर वर्णीय लोक देखील जंगलांत जात आणि आश्रम बांधून तपःसाधन करीत. वर्षांतून काही दिवस हे लोक आंबट आणि खारट पदार्थ खाण्यासाठी लोकवस्तीत येत आणि पुन्हा आपल्या आश्रमात परत जात. तात्पर्य, सप्तसिंधूतील यतींप्रमाणे मध्यहिंदुस्थानातील ऋषिमुनि नष्टप्राय न होता जंगलाच्या आश्रयाने तपश्चर्या करीत कसे तरी बचाव धरून राहिले.

## आधुनिक उदाहरण

याला आधुनिक इतिहासातील एक उदाहरण देता येण्याजोगे आहे. पश्चिम सिंहलद्वीप पोर्तुगीजांनी काबीज केले, आणि तेथील बुद्धमंदिरे आणि भिक्षूंचे विहार जमीनदोस्त करून सर्वांना जबरदस्तीने रोमन कॅथॉलिक धर्माची दीक्षा दिली. या प्रसंगी सिंहलराजाने बुद्धाची दंतधातु बरोबर घेऊन क्याडीच्या जंगलात पळ काढला; आणि तेथे डोंगराआड आपली नवीन राजधानी स्थापन केली. पश्चिम सिंहलद्वीपांतून पोर्तुगीजांच्या हातून बचावलेले भिक्षु शक्य तेवढे बौद्ध ग्रंथ बरोबर घेऊन डोंगराळ प्रदेशात क्याडीच्या राजाच्या आश्रयाला जाऊन राहिले. हाच प्रकार काही अंशी गोव्यात घडून आला. पोर्तुगीजांनी साष्टी, बार्देश आणि तिसवाडा हे तीन तालुके प्रथमतः जिंकले, आणि काही वर्षांनी त्या तालुक्यातील देवळे जमीनदोस्त करून लोकांना जबरदस्तीने रोमन कॅथॉलिक करण्याचा सपाटा चालविला. अशा वेळीं कांही हिंदूंनी आपल्या इस्टेटींवर पाणी सोडून आणि देवदेवतांना

बरोबर घेऊन पळ काढला व जवळच्या सवदेकर सस्थानिकाच्या मुलखाचा आश्रय धरला. आजला पूर्वीची साष्टी प्रांतातील हिंदूची सर्व दैवते या सवदेकर सस्थानात आहेत. पुढे हा प्रान्त देखील पोर्तुगीजानी जिंकला, पण पुन्हा हिंदूच्या धर्मात त्यानी हात घातला नाही. तीच स्थिति काही अशी मध्यहिंदुस्थानातील अहिंसात्मक सस्कृतीची झाली असे म्हणण्यास हरकत नाही.

## अहिंसेचा प्रभाव

परीक्षित किंवा जनमेजय राजाने जोरजुलमाने बलिदानपूर्वक यज्ञयागांची प्रथा लोकावर लादली नाही. पण त्या प्रथेला राजाश्रय मिळाल्याबरोबर ब्राह्मणानी ती आपण होऊनच पत्करली आणि ज्याना ती पसत नव्हती, त्याना जगलाच्या व तपश्चर्येच्या आश्रयाने आपली जुनी परपरा कायम ठेवणे भाग पडले. पोर्तुगीजानी ख्रिस्ती केलेल्या बौद्धावर किंवा हिंदूवर जसा आजलाही बौद्ध आणि हिंदु सस्कृतीचा प्रभाव राहिला आहे, तसा मध्य हिंदुस्थानातील प्राचीन अहिंसात्मक सस्कृतीचा देखील सामान्य जनतेवर थोडाबहुत प्रभाव टिकाव धरून राहिला. जगलात राहणारे ऋषिमुनि जेव्हा गावात किंवा शहरात येत, तेव्हा लोक त्याची परमादराने पूजा करीत. बाकीच्या वेळीं यज्ञयाग आणि बलिदान हे पण प्रकार चालू असत.

## यज्ञसंस्कृतीची वाढ

ऋषिमुनींचा मान बराच होता खरा, पण त्या संस्कृतीने कांहीच उन्नति केली नाही. सप्तसिंधूच्या प्रदेशात तक्षशिलेसारखीं जीं विश्वविद्यालये स्थापन झालीं तींच शिक्षणाचीं केन्द्रे होऊन बसलीं. जातक-अट्ठकथेतील अनेक गोष्टींवरून दिसून येते की, ब्राह्मणकुमार वेदाध्ययन करण्यासाठी आणि राजकुमार धनुर्विद्या शिकण्यासाठी तक्षशिलेसारख्या दूरच्या सप्तसिंधुप्रदेशांत जात असत.

सप्तसिंधूच्या प्रदेशात काय किंवा मध्यहिंदुस्थानांत काय, इन्द्राच्यासारखे एक बलाढ्य साम्राज्य राहिले नाही. परीक्षित किंवा जनमेजय याच्या राज्याची इन्द्राच्या राज्याशीं तुलना करता येत नाही. त्यानी बलिदानपूर्वक यज्ञयागाना उत्तेजन दिले, आणि त्याच्या प्रयत्नामुळे गगायमुनाच्या मधला प्रदेश आर्यावर्त झाला, एवढेच काय ते. त्याच्या कारकीर्दीनतर सप्तसिंधु आणि मध्यहिदुस्थान प्रदेशाचे ल्हानसहान भाग पडले असावे. तथापि आर्यांच्या आणि दासाच्या संघर्षापासून उत्पन्न झालेली बलिदानपूर्वक यज्ञयागाची संस्कृति मात्र दृढ होऊन बळावली.

---

## प्रकरण दुसरें

# समकालीन राजकीय परिस्थिति

### सोळा राष्ट्रं

यो इमेस सोळसन्न महाजनपदान पहूतसत्तरतनान इस्सराधिपच्च रज्ज कारेय्य, सेय्यथीद —(१) अगान (२) मगधान (३) कासीनं (४) कोसलानं (५) वज्जीन (६) मल्लान (७) चेतीन (८) वसान (९) कुरून (१०) पञ्चालान (११) मच्छान (१२) सूरसेनान (१३) अस्सकान (१४) अवतीन (१५) गधारान (१६) कबोजान.

हा उतारा अगुत्तनिकायात चार ठिकाणीं सापडतो. ललितविस्तराच्या तिसऱ्या अध्यायातही बुद्ध जन्माला येण्यापूर्वी जबुद्वीपात (हिंदुस्थानात) निरनिराळीं सोळा राज्ये होतीं असा उल्लेख आहे; पण त्यापैकी आठ राज्यातील राजकुलाचे तेवढे वर्णन आढळतें. या सर्व देशांचा उल्लेख बहुवचनी आहे. यावरून असे दिसून येते की,

एका काळीं हे देश महाजनसत्ताक होते. यातील महाजनांना राजे म्हणत आणि त्याच्या अध्यक्षाला महाराजा म्हणत असत. बुद्धसमकालीं ही महाजनसत्ताक पद्धति दुर्बल होऊन नष्ट होण्याच्या मार्गाला लागली; आणि तिच्या जागी एकसत्ताक राज्यपद्धति जोराने अमलांत येत चालली होती. या घडामोडीचीं कारणे काय असावींत याचा विचार करण्यापूर्वी वरील सोळा देशांसबंधाने सापडणारी माहिती संक्षेपरूपाने येथे दाखल करणे योग्य वाटते.

## १. अंगा

अंगाचा देश मगधांच्या पूर्वेला होता. त्याच्या उत्तर भागाला अंगुत्तराप म्हणत. मगध देशाच्या राजाने अंग देश जिंकल्यामुळे तेथील महाजनसत्ताक पद्धति नष्ट झाली. पूर्वीच्या महाजनाचे किंवा राजाचे वंशज होते, तरी त्यांची स्वतंत्र सत्ता राहिली नाही, आणि कालांतराने 'अंगमगधा' असा त्या देशाचा मगध देशाशी द्वंद्वसमासात निर्देश होऊ लागला.

बुद्ध भगवान् त्या देशात धर्मोपदेश करीत असे व त्या देशाच्या मुख्य शहरात—चंपा नगरीत—गग्गरा राणीने बांधलेल्या तलावाच्या काठी तो मुक्कामाला राहत असे, असा त्रिपिटक ग्रंथात पुष्कळ ठिकाणी उल्लेख सापडतो. पण हे चंपा नगर देखील एखाद्या जुन्या राजाच्या ताब्यात नव्हते. बिंबिसार राजाने ते सोणदंड नावाच्या ब्राह्मणाला इनाम दिले. या इनामाच्या उत्पन्नावर सोणदंड ब्राह्मण मधून मधून मोठमोठाले यज्ञयाग करीत होता.*

## २. मगधा

बुद्धकाळच्या राज्यांत मगध आणि कोसल या देशांची एकसारखी भरभराट होत चालली होती; आणि तीं राष्ट्रे एकसत्ताक

* दीघनिकाय 'सोणदण्डसुत्त' पहा.

राज्यपद्धतीच्या कह्यात पूर्णपणे सापडलीं होतीं. मगधांचा राजा बिंबिसार आणि कोसलाचा राजा पसेनदि (प्रसेनजित्) हे दोघेही महाराजे उदारधी असल्यामुळे त्याची एकसत्ताक राज्यपद्धति प्रजेला फार सुखावह झाली. हे दोघेही राजे यज्ञयागाना उत्तेजन देत होते खरे, तथापि श्रमणाना (परिव्राजकाना) त्याच्या राज्यात आपला धर्मोपदेश करण्याला पूर्णपणे मुभा होती. एवढेच नव्हे, तर बिंबिसार राजा त्याच्या राहण्याची वगैरे व्यवस्था करून त्याना उत्तेजन देत असे. गोतम जेव्हा प्रथमत' सन्यास घेऊन राजगृहाला आला तेव्हा बिंबिसार राजाने पाडवपर्वताच्या पायथ्याशी जाऊन त्याची भेट घेतली, आणि त्याला आपल्या सैन्यात मोठी पदवी स्वीकारण्याची विनती केली. पण गोतमाने आपला तपश्चर्या करण्याचा निश्चय ढळू दिला नाही. गयेजवळ उरुवेला येथे जाऊन त्याने तपश्चर्या आरभिली, आणि शेवटीं तत्त्वबोधाचा मध्यम मार्ग शोधून काढला. वाराणसीला पहिला उपदेश करून आपल्या पाच शिष्यासह बुद्ध भगवान जेव्हा राजगृहाला आला, तेव्हा बिंबिसार राजाने त्याला आणि त्याच्या भिक्षुसघाला राहण्यासाठी वेळुवन नावाचे उद्यान दिले. या उद्यानात एखादा विहार होता, असा उल्लेख कोठेच सापडत नाही. बिंबिसार राजाने बुद्धाला आणि भिक्षुसघाला येथे निर्विघ्नपणे राहण्याची परवानगी दिली, एवढाच या वेळुवनदानाचा अर्थ समजला पाहिजे. परतु त्यांवरून भिक्षुसघाविषयीं त्याचा आदर स्पष्ट दिसतो.

केवळ बुद्धाच्याच भिक्षुसघासाठी नव्हे, तर या वेळीं जे श्रमणाचे मोठमोठाले सघ होते त्यानाही बिंबिसार राजाने आश्रय दिला होता. एकाच वेळीं हे श्रमणसघ राजगृहाच्या आसपास राहत होते, असा उल्लेख दीघनिकायातील सामञ्ञफलसुत्तात आणि मज्झिमनिकायातील (न. ७७) महासकुलुदायिसुत्तात आढळतो.

बिंबिसार राजाचा मुलगा अजातशत्रु आपल्या अमात्यांसह पौर्णिमेच्या रात्रीं प्रासादाच्या गच्चीवर बसला आहे. त्या वेळीं त्याला कोणातरी एखाद्या मोठ्या श्रमणनायकाची भेट घ्यावी अशी इच्छा होते. तेव्हा त्याच्या अमात्यांपैकी प्रत्येकजण एकेका श्रमणसघाच्या नायकाची स्तुति करतो व राजाला त्याच्याजवळ जाण्यास विनवितो. त्याचा गृहवैद्य मुकाट्याने बसला होता. त्याला अजातशत्रु प्रश्न करतो; तेव्हा जीवक बुद्ध भगवताची स्तुति करून त्याची भेट घेण्यास राजाचे मन वळवितो. आणि जरी या श्रमणसघाच्या पुढाऱ्यांत बुद्ध वयाने लहान होता, आणि त्याचा सघ नुकताच स्थापन झाला होता, तरी त्याचीच भेट घ्यावी असें अजातशत्रु ठरवतो, आणि सहपरिवार बुद्धाच्या दर्शनासाठी जीवकाच्या आम्रवनात जातो.

अजातशत्रूने आपल्या बापाला कैद करून ठार केले व गादी बळकावली. तथापि बापाने जो श्रमणाचा आदर ठेवला होता, तो त्याने कमी पडू दिला नाही. बिंबिसार राजाच्या मरणानतर बुद्ध भगवान क्वचितच राजगृहाला येत असे. त्यापैकी वर सागितलेला एक प्रसग होता. गादी मिळण्यापूर्वी अजातशत्रूला आपल्या बाजूला वळवून देवदत्ताने बुद्धावर नालगिरि नावाचा उन्मत्त हत्ती सोडण्याचा कट केला होता, इत्यादि गोष्टी विनयपिटकात वर्णिल्या आहेत. त्यांत कितपत तथ्य असावे हे सागता येत नाही. तथापि एक गोष्ट खरी की, अजातशत्रूचा देदवत्ताला चागलाच पाठिंबा होता. आणि त्यामुळेच बुद्ध भगवान राजगृहापासून दूर राहत असावा. पण जेव्हा तो राजगृहाला आला तेव्हा त्याची भेट घेण्याला अजातशत्रु कचरला नाही. आणि त्याच वेळी राजगृहाच्या आजूबाजूला मोठमोठाल्या श्रमणसघाचे सहा नेते राहत असत, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे अजातशत्रु आपल्या बापापेक्षा देखील श्रमणाचा आदर विशेष ठेवीत होता, असें स्पष्ट दिसून येतें. किंबहुना त्याच्या कारकीर्दीत मगध देशांतील

यज्ञयाग नष्टप्राय होत चालले, आणि श्रमणसंघांची भरभराट होत गेली.

मगधाची राजधानी राजगृह. ही जागा बिहार प्रांतांत तिलय्या नांवाच्या स्टेशनापासून सोळा मैलावर आहे. चारी बाजूंना डोंगर असून त्याच्या मध्यभागीं हें शहर वसले होते. शहरात जाण्याला डोंगराच्या खिंडींतून दोनच रस्ते असल्यामुळे शत्रूपासून शहराचे रक्षण करणे सोपे काम वाटल्यावरून येथे हे शहर बांधण्यात आले असावे. पण अजातशत्रूचे सामर्थ्य इतके वाढत गेलें की, त्याला आपल्या रक्षणासाठी या डोंगरातील गोठ्यात (गिरिव्रजात) राहण्याची गरज वाटली नाही. बुद्धाच्या परिनिर्वाणापूर्वी तो पाटलिपुत्र येथे एक नवीन शहर बांधीत होता; आणि पुढे त्याने आपली राजधानी त्याच ठिकाणीं नेली असावी.

अजातशत्रूला वैदेहीपुत्र म्हटले आहे. यावरून त्याची आई विदेह राष्ट्रातील असावी असे सकृद्दर्शनी दिसून येते. आणि जैनांच्या 'आचारांग' सूत्रादिकांतही त्याची आई वज्जी राजांपैकी एका राजाची कन्या होती असा उल्लेख आढळतो. परंतु कोसलसंयुत्ताच्या दुसऱ्या वग्गाच्या चौथ्या सुत्ताच्या अट्ठकथेत त्याला पसेनदीचा भाचा म्हटलें आहे, आणि वैदेही शब्दाचा अर्थ 'पण्डिताधिवचनमेत, पण्डितित्थिया पुत्तो ति अत्थो' असा केला आहे. ललितविस्तरांत मगध देशाच्या राजकुलाला वैदेहीकुल हीच संज्ञा दिली आहे. यावरून असे दिसते की, हें कुल पितृपरंपरेने अप्रसिद्ध होतें. आणि पुढे त्यांतील एखाद्या राजाचा विदेह देशांतील राजकन्येशीं संबंध जडल्यामुळे तें नावारूपास आले; आणि कांही राजपुत्र आपणास वैदेहीपुत्र म्हणवून घेऊ लागले.

अजातशत्रूने बिंबिसाराला ठार मारल्याची बातमी ऐकली तेव्हा अवंतीचा चंडप्रद्योत राजा फार रागावला व अजातशत्रूवर स्वारी करण्याचा त्याने घाट घातला. त्याच्या भयाने अजातशत्रूने

राजगृहाच्या तटाची डागडुजी केली.* पुढे चंडप्रद्योताच्या स्वारीचा बेत रहित झाला असावा. चडप्रद्योतासारखा परकीय राजा अजातशत्रूवर रागावला, पण मगधांतील प्रजेचा प्रक्षोभ मुळीच झाला नाही. यावरून या देशात एकसत्ताक राज्यपद्धति कशी दृढमूल झाली होती, याचे चागले अनुमान करता येतें.

### ३. कासी

कासी किंवा काशी याची राजधानी वाराणसी होती. तेथल्या बहुतेक राजाना ब्रह्मदत्त म्हणत असत, असे जातक अट्ठकथेवरून दिसून येते. त्याच्या राज्यपद्धतीसबधाने फारशी माहिती सापडत नाही. तथापि काशीचे राजे (महाजन) फारच उदारधी होते. त्याच्या राज्यात कलाकौशल्याचा उत्तम विकास झाला होता. बुद्धसमकालीं देखील उत्कृष्ट पदार्थाना 'कासिक' म्हणत असत. कासिक वस्त्र, कासिक चदन इत्यादि शब्द त्रिपिटक वाङ्मयांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात. वाराणसीतील अश्वसेन राजाच्या वामा राणीच्या उदरीं पार्श्वनाथ–जैनाचा तेविसावा तीर्थंकर–जन्मला. त्याने आपल्या उपदेशाला सुरवात गोतम बुद्धाच्या जन्मापूर्वी सरासरी २४३ व्या वर्षी केली असावी. म्हणजे काशीचे महाजन केवळ कलाकौशल्यातच नव्हे, तर धार्मिक विचारात देखील अग्रणी होते, असे म्हणावें लागते. परतु बुद्धसमकालीं या देशाचे स्वातत्र्य पार नष्ट होऊन कोसल देशांत त्याचा समावेश झाला होता. 'अगमगधा'च्या समासाप्रमाणेंच 'कासीकोसला' हा देखील शब्द प्रचारांत आला होता.

### ४. कोसला

कोसल देशाची राजधानी श्रावस्ती. ही अचिरवती (सध्या राप्ती) नदीच्या काठीं होती; आणि तेथे पसेनदि (प्रसेनजित्) राजा

* मज्झिमनिकायातील गोपकमोग्गल्लानसुत्ताची अट्ठकथा पहा.

राज्य करीत असे. तो वैदिक धर्माचा पूर्ण अनुयायी असून मोठमोठाले यज्ञ करीत होता, असे कोसलसुत्तातील एका सुत्तावरून दिसून येतें. तथापि त्याच्या राज्यात श्रमणाचा मान ठेवला जात असे. अनाथ-पिंडिक* नावाने प्रसिद्धीस आलेल्या एका मोठया श्रेष्ठीने बुद्धाच्या भिक्षुसघासाठी श्रावस्ती येथे जेतवन नावाचा विहार बांधला. विशाखा नांवाच्या प्रसिद्ध उपासिकेने देखील पूर्वाराम नावाचा एक मोठा प्रासाद भिक्षूसाठी बाधून दिला. या दोन्ही ठिकाणी बुद्ध भगवान भिक्षुसघासह मधून मधून राहत असे. त्याचे पुष्कळ चातुर्मास येथेच गेले असावेत. का की, बुद्धाने सर्वात जास्त उपदेश अनाथपिंडि-काच्या आरामांत केल्याचा दाखला त्रिपिटक वाङ्मयांत सापडतो. पसेनदि राजा जरी यज्ञयागाचा भोक्ता होता, तरी मधूनमधून तो बुद्धाच्या दर्शनासाठी अनाथपिंडिकाच्या आरामात जात असे. त्याला अनेकदा बुद्धाने केलेल्या उपदेशाचा सग्रह कोसलसुत्तांत सापडतो.†

ललितविस्तरातील या राजवशाच्या वर्णनावरून असें दिसून येते की, ते राजे मातगाच्या हीन जातीतून उदयाला आले. धम्मपद-अट्ठकथेत सापडणाऱ्या विडूडभाच्या (विदुर्दभाच्या) गोष्टीवरून देखील ललितविस्तरातील विधानाला बळकटी येते.

पसेनदि राजा बुद्धाला फार मानीत होता. त्याच्या शाक्य-कुळांतून एखाद्या राजकन्येशीं लग्न करण्याचा पसेनदीने बेत केला.

---

* याचे खरे नाव सुदत्त होते. अनाथाना तो जेवण (पिण्ड) देत असे, म्हणून त्याला अनाथपिण्डिक म्हणत.

† या सयुत्ताच्या पहिल्याच सुत्तात पसेनदि बुद्धाचा उपासक झाल्याची कथा आहे; पण नवव्या सुत्तात पसेनदीच्या महायज्ञाचें वर्णन येतें तेव्हा पसेनदि राजा खरा बुद्धोपासक झाला होता, असें म्हणता येत नाही.

पण शाक्य राजे कोसलराजकुलाला नीच मानीत असल्यामुळे त्यांना आपली कन्या कोसलराजाला देणें योग्य वाटत नव्हतें. तथापि शाक्यावर कोसलराजाचीच सत्ता चालत असल्यामुळे त्याची मागणी नाकबूल करतां येईना. त्यांनी अशी युक्ति योजिली की, महानाम शाक्याची दासीकन्या वासभखत्तिया हिला महानामाने आपली स्वतःची कन्या म्हणून कोसल राजाला द्यावी. कोसल राजाच्या अमात्याना ही कन्या पसत पडली. महानाम तिच्याबरोबर बसून जेवल्यामुळे ती त्याची मुलगी, अशी त्याची खात्री झाली; आणि ठरल्याप्रमाणें वासभखत्तियेचा शुभमुहूर्तावर कोसलराजाशीं विवाह झाला. राजाने तिला पट्टराणी केले. तिचा मुलगा विडूडभ सोळा वर्षांचा झाल्यावर आपल्या आजोळीं शाक्यांकडे गेला. शाक्यानी आपल्या सस्थागारात (नगरमदिरात) त्याचा योग्य सन्मान केला. पण तो निघून गेल्यावर त्याचे आसन धुण्यात आले; आणि आपण दासीपुत्र आहों, ही गोष्ट विडूडभाच्या कानीं गेली. वयात आल्यावर विडूडभाने जबरदस्तीने कोसल देशाचे राज्य बळकावले व वृद्ध पसेनदीला श्रावस्तीतून हाकून दिलें. पसेनदि आपला भाचा अजातशत्रु याच्या आश्रयाला जाण्यासाठी अज्ञात वेषाने राजगृहाला जात असतां अत्यत कष्ट पावून राजगृहाबाहेरच्या एका धर्मशाळेत निवर्तला.

बापाच्या निधनानतर विडूडभाने शाक्यांवर स्वारी करण्याचा बेत केला. भगवान् बुद्धाने त्याला उपदेश करून त्याचा हा बेत दोनदा रहित करविला. परतु तिसऱ्या वेळीं मध्यस्थी करण्याला बुद्धाला सवड न मिळाल्यामुळे विडूडभाने आपला बेत पार पाडला. त्याने शाक्यांवर स्वारी करून त्यांची दाणादाण केली. ज शरण आले किंवा पळून गेले त्यांना सोडून इतरांची बायका-मुलांसकट कत्तल केली व त्यांच्या रक्ताने आपले आसन धुवावयास लावलें.

शाक्यांचा निःपात करून विडूडभ श्रावस्तीला येऊन अचिरवतीच्या काठी आपल्या सैन्याचा तळ देऊन राहिला. आसपासच्या प्रदेशात अकालमेघाचा भयंकर वर्षाव होऊन अचिरवतीला महापूर आला, आणि सैन्यातील काही लोकांसह विडूडभ त्या पुरात सापडून वाहून गेला.

मगध देशाप्रमाणेंच कोसल देशांत देखील एकसत्ताक राज्यपद्धति बळकट होत चालली होती, हे विडूडभाच्या कथेवरून स्पष्ट होतें. त्याने आपल्या लोकप्रिय बापाची गादी बळकावली असताही कोसलांनी त्याविरुद्ध एक ब्र देखील काढला नाही.

## ५ वज्जी

महाजनसत्ताक राज्यांत तीनच राज्ये स्वतंत्र राहिलीं होतीं. एक वज्जीचे, आणि दोन पावा व कुशिनारा येथील मल्लांची. त्यात वज्जींचे राज्य बलाढ्य असून भरभराटींत होतें, तरी त्याचा अस्त देखील फार दूर नव्हता. तथापि पहाटेच्या प्रहरीं शुक्राच्या चांदणीप्रमाणें तें चमकत होते. बुद्ध भगवान् अशाच एका महाजनसत्ताक राज्यात जन्मला. पण शाक्यांचे स्वातंत्र्य पूर्वीच नष्ट झालें होते. वज्जी आपल्या एकीने व पराक्रमाने बुद्धाच्या हयातीत स्वतंत्र राहिल्यामुळे बुद्धाला त्यांच्याविषयीं आदर असणें साहजिक होतें. महापरिनिब्बानसुत्तात भगवान् दुरून येणाऱ्या लिच्छवींकडे पाहून भिक्षूंना म्हणतो, "भिक्षूनो, ज्यांनी तावत्त्रिंशत् देव पाहिले नसतील, त्यानी या लिच्छवींच्या समुदायाकडे पाहावे !"

वज्जींची राजधानी वैशाली नगरी होती. तिच्या आसपास राहणाऱ्या वज्जींना लिच्छवी म्हणत. त्यांच्या पूर्वेला पूर्वी विदेहांचें राज्य होतें, जेथे जनकासारखे उदारधी राजे होऊन गेले. विदेहांचा शेवटचा राजा सुमित्र मिथिलानगरींत राज्य करीत होता, असें

ललितविस्तरावरून दिसून येतें. त्याच्या पश्चात् विदेहाचे राज्य वज्जींच्या राज्याला जोडण्यात आले असावें.

बुद्ध भगवन्ताने वज्जींना अभिवृद्धीचे सात नियम उपदेशिल्याचें वर्णन महापरिनिब्बानसुत्ताच्या आरंभीं आणि अगुत्तरनिकायाच्या सत्तकनिपातात सापडतें. महापरिनिब्बानसुत्ताच्या अट्ठकथेत या नियमांवर विस्तृत टीका आहे. तिजवरून असें अनुमान करता येतें की, वज्जींच्या राज्यात एक प्रकारची ज्यूरीची पद्धति होती व सहसा निरपराधी माणसाला शिक्षा होत नसे. त्याचे कायदे लिहिलेले असत व त्याप्रमाणे चालण्याविषयीं ते दक्षता बाळगीत.

## ६ मल्ल

मल्लाचे राज्य वज्जीच्या पूर्वेस व कोसल देशाच्या पश्चिमेस होते. तेथे वज्जींप्रमाणेच गणसत्ताक राज्यपद्धति प्रचलित होती. परतु मल्लात फूट पडून त्याचे पावा येथील मल्ल व कुशिनारा येथील मल्ल असे दोन विभाग झाले होते.

मगध देशातून कोसल देशाकडे जाण्याचा रस्ता मल्लाच्या राज्यातून असल्यामुळे बुद्ध भगवान् तेथून वारवार प्रवास करीत असे. बुद्ध भगवताने पावा येथे राहणाऱ्या चुन्द लोहाराचे अन्न ग्रहण केलं; आणि तो आजारी झाला, व तेथून कुसिनारेला गेल्यावर त्या रात्रीं परिनिर्वाण पावला. आजला त्या ठिकाणीं एक लहानसा स्तूप व मदिर अस्तित्वात आहे. त्याच्या दर्शनाला अनेक बौद्ध यात्रेकरू जातात. पावा किंवा पडवणा हा गावही येथून जवळच आहे. तेव्हा पावा येथील मल्ल व कुसिनारा येथील मल्ल जवळ जवळ राहत असें दिसतें. या दोन राज्यातून बुद्धाचे बरेच शिष्य होते. हीं राज्ये स्वतत्र होतीं खरीं, पण त्याचा प्रभाव वज्जींच्या गणसत्ताक राज्याएवढा खास नव्हता. किंबहुना, वज्जींच्या बलाढ्य राज्याच्या अस्तित्वामुळेच तीं राहिलीं असावीं.

## ७. चेती

या राष्ट्राची माहिती जातकातील चेतिय जातक आणि वेस्सतर जातक या दोन जातकात आली आहे. त्याची राजधानी सोत्थिवती (स्वस्तिवती) होती असें चेतिय जातकात (न. ४२२) म्हटलें आहे; आणि तेथील राजाची परपराही दिली आहे. शेवटला राजा उपचर किंवा अपचर हा खोटे बोलला आणि आपल्या पुरोहिताच्या शापामुळे नरकांत पडला. त्याचे पाच मुलगे पुरोहिताला शरण गेले. पुरोहितानें तें राज्य सोडून जाण्यास त्याना सागितले आणि त्याप्रमाणें त्यानी बाहेर जाऊन निरनिराळीं पाच शहरें वसविलीं, असे वर्णन या जातकांत आढळतें.

वेस्सतराची पत्नी मद्दी (माद्री) ही मद्द (मद्र) राष्ट्रांतील राजकन्या होती. याच राष्ट्राला चेतिय राष्ट्र म्हणत असें वेस्सतर जातकातील कथेवरून दिसून येतें. खुद्द वेस्संतराचा देश शिवि हा या चेतिय राष्ट्राच्या जवळ होता. तेथल्या शिविराजाने आपले डोळे ब्राह्मणाला दिल्याची कथा जातकांत प्रसिद्ध आहे.* वेस्सतर राजकुमाराने देखील आपला मंगल हत्ती, दोन मुले आणि बायको ब्राह्मणाना दान दिल्याची कथा वेस्सतर जातकांत आली आहे. यावरून फार तर एवढे सिद्ध होतें की, शिवींच्या आणि चेतींच्या (चैद्यांच्या) राष्ट्रांत ब्राह्मणांचे फार वर्चस्व असे आणि त्यामुळे हीं राज्ये कोठे तरी पश्चिमेच्या बाजूला असावीं. बुद्धकाळीं शिवीचें व चेतीचे नाव अस्तित्वात होते; पण बुद्ध त्याच्या राज्यांत गेल्याचें, किंवा अगाचा जसा मगधाच्या राज्यात समावेश झाला, तसा त्या राज्याचा दुसऱ्या राज्यात समावेश झाल्याचेही दिसून येत नाही. काही असो, बुद्ध भगवताच्या चरित्राशीं या राज्याचा कोणत्याही रीतीने सबध आला नाही एवढे खास.

---

* सिविजातक (न. ४९९) पहा.

## ८. वंसा (वत्सा)

यांची राजधानी कोसम्बी (कौशाम्बी). बुद्धसमकालीं येथील गणसत्ताक राज्यपद्धति नष्ट झाली व उदयन नावाचा मोठा चैनी राजा सर्वसत्ताधिकारी झाला, असें दिसते. धम्मपद अट्ठकथेत या राजाची एक गोष्ट आली आहे, ती अशी:—

उदयनाचे आणि उज्जयिनीचा राजा चडप्रद्योत याचें अत्यत वैर होतें. लढाईत उदयनाला जिंकणे शक्य नसल्यामुळे प्रद्योताला काही तरी युक्ति लढवून उदयनास धरण्याचा बेत करावा लागला. उदयन राजा हत्ती पकडण्याचा मत्र जाणत होता; आणि जगलात हत्ती आल्याबरोबर शिकारी लोकाना घेऊन तो त्याच्या मागे लागत असे. चडप्रद्योताने एक कृत्रिम हत्ती तयार करविला व त्याला वत्साच्या सरहद्दीवर नेऊन ठेवण्यास लावले. आपल्या सरहद्दीवर नवीन हत्ती आल्याची बातमी समजल्याबरोबर उदयन राजा त्याच्या मागे लागला. या कृत्रिम हत्तीच्या आत दडून राहिलेल्या मनुष्यानी तो हत्ती चडप्रद्योताच्या हद्दीत नेला. उदयन त्याच्या मागोमाग पळत गेला असता तेथे दबा धरून राहिलेल्या प्रद्योताच्या शिपायानी त्याला पकडून उज्जयिनीला नेले.

चडप्रद्योत त्याला म्हणाला, "हत्तीचा मत्र शिकवशील तर मी तुला सोडून देईन, नाही तर येथेच ठार करीन." उदयन त्याच्या लालचीला किंवा शिक्षेला मुळीच घाबरला नाही. तो म्हणाला, "मला नमस्कार करून शिष्य या नात्याने मत्राध्ययन करशील तरच मी तुला मत्र शिकवीन; नाही तर तुला जें करावयाचे असेल ते कर." प्रद्योत अत्यत अभिमानी असल्यामुळे त्याला हें रुचले नाही. पण उदयनाला मारून मत्र नष्ट करणेही योग्य नव्हतें. म्हणून तो उदयनाला म्हणाला, "दुसऱ्या एखाद्या माणसाला तू हा मंत्र शिकवशील काय? माझ्या प्रीतीतल्या माणसाला तू हा मंत्र शिकविलास, तर मी तुला बधमुक्त करीन."

उदयन म्हणाला, "जी स्त्री किंवा जो पुरुष मला नमस्कार करून शिष्यत्वाने मंत्राध्ययन करील, तिला किंवा त्याला मी तो शिकवीन."

चंडप्रद्योताची कन्या वासुलदत्ता (वासवदत्ता) मोठी हुशार होती. मंत्र ग्रहण करण्याला ती समर्थ होती खरी; पण उदयनाला आणि तिला एकत्र येऊ देणे प्रद्योताला योग्य वाटले नाही. तो उदयनाला म्हणाला, "माझ्या घरीं एक कुबडी दासी आहे, ती पडद्याच्या आड राहून तुला नमस्कार करील आणि तुझे शिष्यत्व पत्करून मंत्र शिकेल. तिला जर मंत्रसिद्धि मिळाली, तर तुला मी बंधमुक्त करून तुझ्या राज्यात पाठवीन."

उदयनाने ही गोष्ट कबूल केली. प्रद्योताने वासवदत्तेला सांगितले की, "एक श्वेतकुष्ठी मनुष्य हत्तीचा मंत्र जाणतो. त्याचे तोंड न पाहता त्याला नमस्कार करून तो मंत्र ग्रहण केला पाहिजे." त्याप्रमाणे वासवदत्तेने उदयनाला पडद्याआडून नमस्कार करून मंत्र शिकण्यास सुरुवात केली. तो शिकत असता काही अक्षरे तिला नीट उच्चारता येईनात. तेव्हा उदयन रागावून म्हणाला, "हे कुबडे, तुझे ओठ फारच जाड असले पाहिजेत!" ते ऐकून वासवदत्ता अत्यंत संतापली व म्हणाली, "अरे कुष्ठया, तू राजकन्येला कुबडी म्हणतोस काय?"

उदयनाला हा काय प्रकार आहे ते समजेना. ते जाणण्यासाठी त्याने एकदम पडदा बाजूला सारला. तेव्हा त्या दोघांनाही प्रद्योताचा मतलब समजला. तांबडतोब दोघांचे परस्परावर प्रेम जडले व अवंतीहून पळून जाण्याचा त्यांनी बेत रचला. शुभ मुहूर्तावर मंत्रसिद्धीसाठी एक औषधि आणली पाहिजे म्हणून वासवदत्तेने आपल्या बापाकडून भद्रवती नावाची हत्तीण मागून घेतली. आणि प्रद्योत उद्यानक्रीडेला गेला आहे, असें पाहून तिने व उदयनाने त्या हत्तिणीवर बसून पळ काढला. उदयन हत्ती चालवण्यांत पटाईत

होताच. तथापि त्याच्या मागोमाग पाठवलेल्या शिपायांनी त्याला वाटेत गाठले. वासवदत्तेने बापाच्या खजिन्यांतून शक्य तेवढया सोन्याच्या नाण्यांच्या पिशव्या बरोबर आणल्या होत्या. त्यापैकी एक पिशवी सोडून तिने नाणीं रस्त्यांत फैलावलीं. शिपाई तीं वेचण्यात गुतले असता उदयनाने हत्तिणीला पुढे हाकले. पुन्हा शिपायानी हत्तिणीला गाठले, तेव्हा तसाच प्रयोग करण्यांत आला; आणि या उपायाने त्या दोघानी कौशाम्बी गाठली.

उदयन एकदा आपल्या उद्यानांत क्रीडेसाठी गेला असता तेथेच झोपला. पिंडोल भारद्वाज भिक्षु जवळच्या एका वृक्षाखाली बसला होता. राजाला झोप लागली आहे, असे पाहून त्याच्या बायका पिंडोल भारद्वाजापाशीं गेल्या आणि त्याचा उपदेश ऐकत बसल्या. इतक्यांत राजा जागा झाला व रागावून पिंडोल भारद्वाजाच्या अगावर ताबडया मुग्या सोडण्याचा त्याने प्रयत्न केला, असा उल्लेख सयुत्तनिकायाच्या अट्ठकथेत सापडतो. पण पुढे पिंडोल भारद्वाजाचाच उपदेश ऐकून उदयन बुद्धोपासक झाला.

कौशाम्बी येथे घोषित, कुक्कुट आणि पावारिक या तीन श्रेष्ठींनी बुद्धाच्या भिक्षुसघाला राहण्यासाठी अनुक्रमे घोषिताराम, कुक्कुटाराम आणि पावारिकाराम असे तीन विहार बाधल्याचा उल्लेख अंगुत्तरनिकायाच्या अट्ठकथेत आणि धम्मपदअट्ठकथेत सापडतो. उदयनाची एक प्रमुख राणी सामावती आणि तिची दासी खुज्जुत्तरा (कुब्जा उत्तरा) या बुद्धाच्या दोन मुख्य उपासिका होत्या. यावरून असे दिसते की, उदयन राजा जरी फारसा श्रद्धाळू नव्हता, तरी कौशाम्बीच्या लोकांत बुद्धभक्त पुष्कळ होते आणि भिक्षूंचा योगक्षेम नीट चालवण्यास ते उत्सुक असत.

---

* 'बौद्धसघाचा परिचय', पृ० २३७–२४५ पहा.

### ९. कुरू

या देशाची राजधानी इन्द्रप्रस्थ नगर होतें. बुद्धसमकालीं तेथे कौरव्य नांवाचा राजा राज्य करीत असे, एवढीच काय ती माहिती सापडते. पण तेथील राज्यव्यवस्था कशी चालत होती, याची माहिती कोठे सापडत नाही. या देशात बुद्धाच्या भिक्षुसघासाठी एक देखील विहार नव्हता. बुद्ध भगवान् उपदेश करीत त्या देशात जाई, तेव्हा एखाद्या झाडाखाली किंवा अशाच दुसऱ्या ठिकाणीं मुक्कामाला राहत असे. तथापि या देशात बुद्धोपदेशाचे चाहते बरेच होते असे दिसते. त्यापैकी राष्ट्रपाल नावाचा धनाढ्य तरुण भिक्षु झाल्याची कथा मज्झिमनिकायात विस्तारपूर्वक दिली आहे. कुरु देशातील कम्मासदम्म (कल्माषदम्य) नावाच्या नगराजवळ बुद्ध भगवताने सतिपट्ठानासारखी काही उत्तम सुत्ते उपदेशिल्याचा उल्लेख सुत्तपिटकात सापडतो. त्यावरून असे दिसते की, तेथील सामान्य जनसमूह बुद्धाला मानीत असला, तरी अधिकारी वर्गांत त्याचा कोणी भक्त नव्हता आणि वैदिक धर्माचे येथे फारच वर्चस्व होते.

### १०–११. पञ्चाला (पांचाला) आणि मच्छा (मत्स्या)

उत्तरपाञ्चालांची राजधानी कम्पिल्ल (काम्पिल्य) होती, असा उल्लेख जातक अट्ठकथेत अनेक ठिकाणी सापडतो; पण मत्स्य देशाच्या राजधानीचा पत्ता नाही. यावरून असे दिसून येतें की, बुद्धसमकालीं या दोन देशाना फारसे महत्त्व राहिलें नव्हते आणि त्या देशांतून बुद्धाने प्रवास केला नसल्यामुळे तेथील लोकासबंधाने किंवा शहरासबंधाने बौद्धग्रथांत फारशी माहिती सापडत नाही.

### १२. सूरसेना (शूरसेना)

यांची राजधानी मधुरा (मथुरा). येथे अवंतिपुत्र नांवाचा राजा राज्य करीत होता. वर्णाश्रमधर्मासंबंधाने त्याचा व महाकात्यायनाचा

संवाद मज्झिमनिकायातील मधुरसुत्तांत वर्णिला आहे. या देशात बुद्ध क्वचितच जात असे. मधुरा त्याला फारशी आवडत नसावी, असें खालील सुत्तावरून दिसून येतें.

पञ्चिमे भिक्खवे आदीनवा मधुरायं। कतमे पञ्च? विसमा, बहुरजा, चण्डसुनखा, वाळयक्खा, दुल्लभपिण्डा। इमे खो भिक्खवे पञ्च आदीनवा मधुराय ति।

(अगुत्तरनिकाय पञ्चकनिपात)

भिक्षुहो, मथुरेत हे पांच दोष आहेत. कोणते पाच? तिचे रस्ते खडबडीत, धूळ फार, कुत्रे द्वाड, यक्ष क्रूर आणि तेथे भिक्षा मिळणे फार कठीण. भिक्षुहो, मथुरेत हे पाच दोष आहेत.

## १३. अस्सका (अश्मका)

सुत्तनिपातातील पारायणवग्गाच्या आरंभी ज्या वत्थुगाथा आहेत, त्याजवरून असे दिसून येते की, अस्सकाचे राज्य कोठे तरी गोदावरी नदीच्या आसपास होते. बावरी नावाच्या श्रावस्ती येथे राहणाऱ्या ब्राह्मणाने आपल्या सोळा शिष्यासहवर्तमान या राज्यात वस्ती केली.

सो अस्सकस्स विसये अळकस्स समासने।
वसी गोदावरीकूले उञ्छेन च फलेन च॥

तो (बावरी) अश्वकाच्या राज्यात आणि अळकाच्या राज्याजवळ गोदावरीतीरी भिक्षेवर आणि फळावर निर्वाह करून वास करिता झाला.

अस्सक आणि अळक हे दोन आन्ध्र (अन्धक) राजे होते व त्याच्या राज्याच्या दरम्यान बावरीने आपल्या सोळा शिष्यांसह-वर्तमान एक वसाहत केली आणि ती उत्तरोत्तर वाढत गेली, असे अट्ठकथाकाराचे म्हणणे आहे. वैदिक धर्मप्रचारकांची दक्षिणेत ही पहिली वसाहत होती, असे म्हणण्यास हरकत नाही. बुद्ध किंवा

तत्समकालीन भिक्षु एथवर पोचले नसल्यामुळे या राज्याची विशेष माहिती बौद्ध वाङ्मयात सापडत नाही. तथापि बुद्धाची कीर्ति येथवर जाऊन थडकली होती. ती ऐकून बावरीने आपल्या सोळाही शिष्यांना बुद्धदर्शनाला पाठविले. ते प्रवास करीत मध्य देशात आले व अखेरीस राजगृह येथे बुद्धाला गाठून त्याचे शिष्य झाल्याची हकीकत वर निर्देशिलेल्या पारायणवग्गातच आहे. परंतु त्यानंतर त्यांनी परत जाऊन गोदावरीच्या प्रदेशांत उपदेश केल्याचा उल्लेख कोठेच आढळत नाही.

## १४. अवंती

अवंतीची राजधानी उज्जयिनी व त्याचा राजा चंडप्रद्योत याच्या संबंधाने बरीच माहिती आढळते. चंडप्रद्योत आजारी पडला असतां त्याच्या आमंत्रणावरून मगध देशातील प्रसिद्ध वैद्य जीवक कौमारभृत्य त्याला बरे करण्यासाठी उज्जयिनीला गेला. प्रद्योताच्या अत्यंत क्रूर स्वभावामुळे त्याला चंड हे विशेषण लावीत; आणि ही गोष्ट जीवकाला चांगली माहीत होती. राजाला औषध देण्यापूर्वी जीवकाने जंगलात जाऊन औषधे आणण्याच्या निमित्ताने भद्दवती नावाची हत्तीण मागून घेतली आणि राजाला औषध देऊन त्या हत्तिणीवर बसून पळ काढला. इकडे औषध घेतल्याबरोबर प्रद्योताला भयंकर वांत्या होऊ लागल्या. त्यामुळे तो खवळला; आणि त्याने जीवकाला पकडून आणण्याचा हुकूम सोडला. परंतु जीवक तेथून निसटला होता. त्याचा पाठलाग करण्यासाठी राजाने काक नावाच्या आपल्या दासाला पाठविले. काकाने कौशाम्बीपर्यंत प्रवास करून जीवकाला गाठले. जीवकाने त्याला एक औषधी आवळा खाण्यास दिला, त्यामुळे काकाची दुर्दशा झाली आणि जीवकाने भद्दवतीवर बसून सुखरूपपणे राजगृहाला प्रयाण केलें. इकडे प्रद्योत साफ बरा झाला. काक दास देखील बरा होऊन उज्जयिनीला गेला. रोग नष्ट होऊन प्रकृति पूर्वीप्रमाणें

बरी झाल्याकारणाने प्रद्योताची जीवकावर मर्जी बसली आणि त्याला अर्पण करण्यासाठी प्रद्योताने सिवेय्यक नावाच्या उत्तम वस्त्राची जोडी राजगृहाला पाठविली.*

या गोष्टींत आणि धम्मपद अट्ठकथेतील गोष्टीत बरेच साम्य आहे. परतु एकीवरून दुसरी रचण्यात आली किंवा त्या भिन्न भिन्न काळीं घडून आल्या, हें सांगतां येत नाही. या दोन्ही गोष्टीवरून प्रद्योताची चडप्रकृति व्यक्त होते आणि तो सर्वसत्ताधारी राजा होता, असे दिसून येते.

बुद्ध भगवान् प्रद्योताच्या राज्यात कधीही गेला नाही. परतु त्याच्या प्रमुख शिष्यापैकी एक–महाकात्यायन–प्रद्योताच्या पुरोहिताचा मुलगा होता. पित्याच्या मरणानतर त्याला पुरोहितपद मिळाले. पण त्यांत समाधान न मानता तो मध्यदेशात जाऊन बुद्धाचा भिक्षुशिष्य झाला. महाकात्यायन परत स्वदेशीं आल्यावर प्रद्योताने आणि इतर लोकानी त्याचा चागला आदरसत्कार केला.† त्याचा आणि मथुरेचा राजा अवतिपुत्र यांचा जातिभेदाविषयीचा सवाद मज्झिमनिकायांतील मधुर किंवा मधुरिय सुत्तात सापडतो. मथुरेत आणि उज्जयिनींत महाकात्यायन जरी प्रसिद्ध होता, तरी या प्रदेशात बुद्ध भगवताच्या हयातींत बौद्धमताचा फारसा प्रसार झाला होता, असें दिसत नाही. बुद्धाचे भिक्षुशिष्य तुरळक असल्यामुळे या प्रदेशात पाच भिक्षूनी देखील दुसऱ्या भिक्षूला उपसपदा देऊन सघात दाखल करून घेण्याची बुद्ध भगवंताने परवानगी दिली.‡ या कामीं मध्य देशात कमींत कमी वीस भिक्षूची जरूरी लागत होती.

---

* महावग्ग, भाग ८ वा पहा.

† विशेष माहितीसाठी 'बौद्धसघाचा परिचय' पृ. १६५–१६८ पहा.

‡ महावग्ग, भाग ८ वा, 'बौद्धसघाचा परिचय' पृ. ३०–३१.

## १५. गंधारा (गांधारा)

यांची राजधानी तक्कसिला (तक्षशिला). येथे पुक्कुसाति नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याने उतारवयांत आपले राज्य सोडले व राजगृहापर्यंत पायी प्रवास करून भिक्षुसघांत प्रवेश केला. तदनतर पात्र आणि चीवर शोधण्यासाठी फिरत असतां त्याला एका उन्मत्त गाईने ठार केले. त्याला गाईने मारल्याची कथा मज्झिम निकायाच्या धातुविभगसुत्तात आली आहे. तो तक्षशिलेचा राजा होता आणि त्याची व बिंबिसार राजाची मैत्री कशी झाली, इत्यादि सविस्तर वर्णन या सुत्ताच्या अट्ठकथेत सापडतें. त्याचा साराश असा :

तक्षशिलेतील कांही व्यापारी राजगृहाला आले. बिंबिसार राजाने वहिवाटीप्रमाणे त्याचा आदरसत्कार करून त्याच्या राजाची प्रवृत्ति विचारली. तो अत्यंत सज्जन असून वयाने आपल्या एवढाच आहे, असें समजल्यावर बिंबिसार राजाच्या मनात त्याच्याविषयी प्रेमादर उत्पन्न झाला; आणि त्याने त्या व्यापाऱ्याचा कर माफ करून पुक्कुसाति राजाला दोस्तीचा निरोप पाठविला. त्यामुळे पुक्कुसाति बिंबिसारावर फार प्रसन्न झाला. मगध देशातून येणाऱ्या व्यापाऱ्यांवर असलेला कर त्याने माफ केला आणि आपल्या नोकराकडून त्या व्यापाऱ्याबरोबर बिंबिसार राजासाठी आठ पचरगी बहुमोल शाली पाठविल्या. बिंबिसार राजाने या भेटीचा मोबदला एक सुवर्णपट उत्तम करडकात घालून पाठविला. त्या सुवर्णपटावर बुद्ध, धर्म आणि संघ याचे गुण उत्कृष्ट हिंगुळाने लिहिले होते. तो मजकूर वाचून पुक्कुसातीला बुद्धाचा निदिध्यास लागला, आणि शेवटी राज्यत्याग करून तो राजगृहापर्यंत पायीं चालत आला.

तेथे एका कुंभाराच्या घरीं त्याची व बुद्धाची गाठ कशी पडली, त्याला बुद्धाने कोणता उपदेश केला आणि शेवटी उन्मत्त

गाईकडून तो कसा मारला गेला, हा मजकूर वर निर्देशिलेल्या धातु-विभगसुत्तातच सापडतो.

गांधाराचा आणि त्यांच्या राजधानीचा (तक्षशिलेचा) उल्लेख जातक अट्ठकथेत अनेक ठिकाणीं आहे. तक्षशिला जशी कलाकौशल्यात तशीच विद्वत्ततही आघाडीवर होती. ब्राह्मणकुमार वेदाभ्यास करण्यासाठी, क्षत्रिय धनुर्विद्या व राज्यकारभार शिकण्यासाठी आणि तरुण वैश्य शिल्पकला व इतर धंदे शिकण्यासाठी दूरदूरच्या प्रदेशातून तक्षशिलेला येत असत. राजगृह येथील विख्यात वैद्य जीवक कौमारभृत्य याने आयुर्वेदाचा अभ्यास याच ठिकाणी केला. हिंदुस्थानात अगदी प्राचीन असे प्रसिद्ध विश्वविद्यालय तक्षशिलेलाच होतें.

## १६. कंबोजा (काम्बोज)

याचे राज्य वायव्य दिशेला असून त्यांची राजधानी द्वारका होती, असे प्रो० व्हिस् डेव्हिड्स् याचे मत आहे.* परतु मज्झिमनिकायातील अस्सलायनसुत्तात 'योनकबोजेसु' असा त्या देशाचा यवनाबरोबर उल्लेख केला असल्यामुळे हा देश गाधाराच्याही पलीकडे होता असें दिसतें. त्याच सुत्तात यवनकाम्बोज देशात आर्य आणि दास अशा दोनच जाती आहेत व कधी कधी आर्याचा दास आणि दासाचा आर्य होत असतो असेंही म्हटले आहे. गाधारांच्या देशात वर्णाश्रमधर्म दृढमूल झाला असल्याचे कांही जातककथावरून स्पष्ट होते. खुद्द तक्षशिलेत बहुतेक गुरु ब्राह्मणजातीचे असत. पण काम्बोजात चातुर्वर्ण्याचा प्रवेश झाला नव्हता. तेव्हा तो देश गांधाराच्या पलीकडे होता असें म्हणावे लागते.

या देशातील लोक जगली घोडे पकडण्यात पटाईत होते असे कुणालजातकाच्या अट्ठकथेवरून दिसून येतें. घोडे पकडणारे लोक

* Buddhist India, p 28.

जगली घोडे ज्या ठिकाणी पाणी पिण्यास येत त्या पाण्यावरच्या शेवाळाला आणि जवळच्या गवताला मध फाशीत. घोडे ते गवत खात खात त्या लोकानी तयार केलेल्या एका मोठ्या कुपणांत शिरत. ते आत शिरल्याबरोबर घोडे पकडणारे कुपणाचा दरवाजा बद करीत आणि त्या घोडयांना हळूहळू आपल्या कह्यात आणीत असत. (आजकाल अशाच काही उपायांनी म्हैसूरात हत्ती पकडत असतात हे सर्वश्रुत आहेच.) जगली घोडयाना लगामात आणून त्याना हे लोक काम्बोजातील व्यापाऱ्याना विकत असावेत. व्यापारी लोक घोडयाना तेथून मध्यदेशांत बनारस वगैरे ठिकाणी आणून विकीत.*

काम्बोज देशातील बहुजन किडे, पतग वगैरे प्राण्याना मारल्यानेच आत्मशुद्धि होते, असे समजत.

कीटा पतगा उरगा च भेका
हन्त्वा किमिं सुज्झति मक्खिका च।
एते हि धम्मा अनरियरूपा
कम्बोजकान वितथा बहुन्न ॥†

'किडे, पतग, सर्प, बेडूक, कृमि आणि माशा मारल्याने मनुष्यप्राणी शुद्ध होतो, असा अनार्य आणि अतथ्य धर्म काम्बोजातील बहुजन मानतात.'

यावरून हे लोक, सध्या जसे सरहद्दीवरचे लोक आहेत, तसेच मागासलेले होते असे दिसतें.

मनोरथपूरणी अट्ठकथेत महाकप्पिनाची गोष्ट आली आहे. तो सरहद्दीवरील कुक्कुटवती नांवाच्या राजधानींत राज्य करीत होता, आणि पुढे बुद्धाचे गुण ऐकून मध्यदेशात आला. चन्द्रभागा नदीच्या

* उदाहरणार्थ तण्डुलनालिजातक पहा.

† भूरिदत्तजातक श्लोक ९०३.

काठीं त्याची आणि भगवान बुद्धाची गाठ पडली. तेथे भगवताने कप्पिनाला त्याच्या अमात्यासह भिक्षुसघात घेतले. इत्यादि.*

महाकप्पिन राजा होता व तो कुक्कुटवतीत राज्य करीत होता याला आधार सयुत्तनिकायाच्या अट्ठकथेत सापडतो. परतु ही कुक्कुट-वती राजधानी काम्बोजात होती, किंवा त्याच्या जवळच्या कुठल्या तरी दुसऱ्या डोंगराळ संस्थानात होती, हे काहीच समजत नाही. एवढे खरे की, बुद्धाच्या हयातींतच त्याची कीर्ति आणि प्रभाव या सरहद्दीवरच्या रानटी लोकात पसरला होता. याला एक आजकालचे उदाहरण देता येण्यासारखे आहे. पजाबच्या जातिनिविष्ट लोकात जेवढे गांधीजींचे वजन आहे, त्याच्यापेक्षा किती तरी पटीने जास्त सरहद्दीवरच्या पठाणात दिसून येते. असाच कांहीसा प्रकार बुद्धाच्या वेळी घडून आला असल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखे काही नाही.

## सोळा राज्यांचा ललितविस्तरांत उल्लेख

या सोळा राज्याचा उल्लेख ललितविस्तरांत सापडतो, असें वर म्हटलेच आहे. प्रसग असा आहे की, बोधिसत्त्व तुषितदेवभवनांत असतां कोणत्या राज्यात जन्म घेऊन लोकोद्धार करावा याचा विचार करतो. त्याला निरनिराळे देवपुत्र भिन्नभिन्न राजकुलाचे गुण सागतात व दुसरे कांही देवपुत्र त्या कुलाचे दोष दाखवितात.

### मगधराजकुल

(१) कोणी देवपुत्र म्हणाले, "मगध देशामध्ये हे वैदेहिकुल फार सपन्न असून बोधिसत्त्वाला जन्मण्याला ते स्थान योग्य आहे." यावर दुसरे देवपुत्र म्हणाले, "हें कुल योग्य नाही. कारण, ते मातृशुद्ध आणि पितृशुद्ध नसून चचल आहे; विपुल पुण्याने अभि-

* बौद्धसघाचा परिचय पृ. २०३ पहा.

पिक्त झालेले नाही. उद्यान, तडाग इत्यादिकांनी त्यांची राजधानी सुशोभित नसून जगली लोकांना शोभेल अशी आहे."

### कोसलराजकुल

(२) दुसरे देवपुत्र म्हणाले, "हे कोसलकुल सेना वाहन व धन यानी संपन्न असल्यामुळे बोधिसत्त्वाला प्रतिरूप आहे." त्यावर दुसरे म्हणाले, "ते मातंगच्युतीपासून उत्पन्न झाले असून मातृपितृशुद्ध नाही, आणि हीन धर्मावर श्रद्धा ठेवणारें आहे. म्हणून ते योग्य नव्हे."

### वंशराजकुल

(३) दुसरे म्हणाले, "हें वंशराजकुल भरभराटीला आलेले, व सुक्षेम असून त्याच्या देशात संपन्नता असल्याकारणाने तें बोधिसत्त्वाला योग्य आहे." त्यावर दुसरे म्हणाले, "ते प्राकृत आणि चंड आहे. परपुरुषापासून त्या कुलातील पुष्कळ राजाचा जन्म झाला आहे. आणि त्या कुलातील सध्याचा राजा उच्छेदवादी (नास्तिक) असल्याकारणाने ते बोधिसत्त्वाला योग्य नाही."

### वैशालींतील राजे

(४) दुसरे देवपुत्र म्हणाले, "ही वैशाली महानगरी भरभराटीला चढलेली, क्षेम, सुभिक्ष, रमणीय, मनुष्यानी गजबजलेली, घरे आणि वाडे यांनीं अलंकृत, पुष्पवाटिका आणि उद्याने यानी प्रफुल्लित अशी असल्यामुळे जणु देवाच्या राजधानीचे अनुकरण करीत आहे. म्हणून बोधिसत्त्वाला जन्मण्यास ती योग्य दिसते." त्यावर दुसरे म्हणाले, "तेथल्या राजांचे परस्पराविषयीं न्याय्य वर्तन नाही. ते धर्माचरणी नव्हत. आणि उत्तम, मध्यम, वृद्ध व ज्येष्ठ इत्यादिकांविषयीं ते आदर बाळगीत नाहीत. प्रत्येक जण आपल्यालाच राजा समजतो. कोणी कोणाचा शिष्य होऊ इच्छीत नाही. कोणी कोणाची चाड ठेवीत नाही. म्हणून ती नगरी बोधिसत्त्वाला अयोग्य आहे."

## अवंतिराजकुल

(५) दुसरे देवपुत्र म्हणाले, "हे प्रद्योताचें कुल अत्यत बलाढ्य, महावाहनसपन्न व शत्रुसेनेवर विजय मिळवणारे असल्याकारणाने बोधिसत्त्वाला योग्य आहे." त्यावर दुसरे म्हणाले, "त्या कुलातील राजे चड, क्रूर, व ठोर बोलणारे आणि धाडसी आहेत. कर्मावर त्याचा विश्वास नाहीं. म्हणून ते कुल बोधिसत्त्वाला शोभण्यासारखे नाही."

## मथुराराजकुल

(६) दुसरे म्हणाले, "ही मथुरा नगरी समृद्ध, क्षेम, सुभिक्ष आणि मनुष्यानी गजबजलेली आहे. कसकुलांतील शूरसेनाचा राजा सुबाहु त्याची ही राजधानी आहे. ही बोधिसत्त्वाला योग्य होय." त्यावर दुसरे म्हणाले, "हा राजा मिथ्यादृष्टि कुलात जन्मलेला असून दस्युराजा असल्यामुळे ही नगरी देखील बोधिसत्त्वाला योग्य नाही."

## कुरुराजकुल

(७) दुसरे म्हणाले, "या हस्तिनापुरामध्ये पाडव कुलातील शूर आणि सुस्वरूप राजा राज्य करीत आहे. परसैन्याचा पराभव करणारे तें कुल असल्यामुळे बोधिसत्त्वाला योग्य आहे." त्यावर दुसरे म्हणाले, "पांडव कुलांतील राजांनी आपला वश व्याकूळ करून टाकला आहे. युधिष्ठिराला धर्माचा, भीमसेनाला वायूचा, अर्जुनाला इन्द्राचा आणि नकुल-सहदेवांना अश्विनाचे पुत्र म्हणतात. यास्तव हें देखील कुल बोधिसत्त्वाला योग्य नाही."

## मैथिलराजकुल

(८) दुसरे म्हणाले, "मैथिल राजा सुमित्र याची राजधानी ही मिथिला नगरी अत्यंत रमणीय असून हत्ती, घोडे, पायदळ यांनी तो राजा संपन्न आहे. सोनें, मोतीं आणि जवाहीर त्याजपाशीं आहेत.

सामन्त राजांची सैन्यें त्याच्या पराक्रमाला घाबरतात. तो मित्रवान आणि धर्मवत्सल आहे. म्हणून हें कुल बोधिसत्त्वाला योग्य होय." त्यावर दुसरे म्हणाले, "असा हा राजा आहे खरा, परतु त्याला पुष्कळ सनति असून तो अतिवृद्ध असल्याकारणाने पुत्रोत्पादन करण्याला समर्थ नाही. म्हणून तें देखील कुल बोधिसत्त्वाला अयोग्य आहे."

"याप्रमाणे त्या देवपुत्रानी जबुद्वीपातील सोळा राज्यात (षोडश जानपदेषु) जी लहान मोठी राजघराणी होतीं तीं सर्व पाहिलीं. पण तीं त्याना सदोष दिसलीं."*

## आठच कुलांची माहिती

सोळा जनपदापैकी येथे आठाच्याच राजकुलाचे वर्णन आहे. त्यापैकी सुमित्राचे कुल त्याच्या मागोमागच नष्ट होऊन विदेहाचा अतर्भाव वज्जींच्या राज्यांत झाला असावा. बाकी राहिलेल्या सातात पाडवाच्या परपरेंत कोणता राजा राज्य करीत होता, हे सागितले नाही आणि त्याची माहिती इतर बौद्ध ग्रथातही सापडत नाही. कुरुदेशात कौरव्य नावाचा राजा राज्य करीत होता असा उल्लेख रट्ठपाल सुत्तांत आहे. तो पांडवकुलातील होता याजबद्दल कोठे पुरावा नाही. राहिलेल्या सहा राजकुलाची जी माहिती येथे दिली आहे, तशीच कमीजास्त प्रमाणांत त्रिपिटक ग्रथात सापडते.

## शाक्यकुल

बौद्ध ग्रथात शाक्यकुलाची माहिती विस्तारपूर्वक दिली आहे. असे असता वरील सोळा जनपदात शाक्यांचा नामनिर्देश मुळीच नाही, हें कसें? याला उत्तर हें की, ही यादी तयार होण्यापूर्वीच शाक्याचे स्वातत्र्य नष्ट होऊन त्या देशाचा समावेश कोसलांच्या राज्यात झाला, आणि म्हणूनच या यादींत त्यांचा निर्देश सापडत नाही.

---

* हे मूळ उताऱ्याचे सक्षिप्त रूपातर आहे.

बोधिसत्त्व गृहत्याग करून राजगृहाला आला असता बिंबिसार राजाने त्याची भेट घेऊन तू कोण आहेस असा प्रश्न विचारला. तेव्हा तो म्हणाला--

उजु जानपदो राजा हिमवन्तस्स पस्सतो ।
धनविरियेन सम्पन्नो कोसलेसु निकेतिनो ॥
आदिच्चा नाम गोत्तेन, साकिया नाम जातिया ।
तम्हा कुला पब्बजितोम्हि राज न कामे अभिपत्थय ॥

(सुत्तनिपात, पब्बज्जासुत्त)

'हे राजा, येथून सरळ हिमालयाच्या पायथ्याशी कोसल देशापैकी एक जानपद (प्रान्त) आहे. त्यांचे गोत्र आदित्य व जाति शाक्य. त्या कुलातून, हे राजा, मी कामोपभोगाची इच्छा सोडून परिव्राजक झालो आहे.'

ह्या गाथात 'कोसलेसु निकेतिनो' हे शब्द महत्त्वाचे आहेत. कोसल देशात ज्याचे घर आहे, म्हणजे जे कोसल देशात गणले जातात. यावरून शाक्याचे स्वातंत्र्य कधीच नष्ट झाले होतें असे सहज दिसून येतें.

शाक्य कोसलराजाला कर देत असत आणि अन्तर्गत व्यवस्था आपण पाहत. महानामाच्या दासीकन्येशीं पसेनदीचा विवाह झाल्याची हकीकत वर दिलीच आहे. याविषयी प्रो० र्‍हिस डेव्हिड्स शंका प्रदर्शित करतात. कोसल राजाचा सर्वाधिकार जर शाक्याना मान्य होता, तर आपली मुलगी त्याला देण्याला शाक्याना हरकत का वाटावी, असे त्याचे म्हणणे दिसतें.* परंतु हिंदुस्थानातील जातिभेद किती तीव्र होता हे त्याना माहीत नसावे. उदेपूरच्या प्रतापसिंहाला अकबराचे सार्वभौमत्व मान्य असले तरी आपली मुलगी

* Buddhist India, P. 11-12

अकबराला देण्याला तो तयार नव्हता. कोसलकुल 'मातगच्युत्येुत्पन्न' असें ललितविस्तरांत म्हटलें आहे. त्यावरून हें कुल मातगांच्या (मागांच्या) जातींतून उदयाला आलें असावें असें वाटतें. अशा घराण्याशीं शाक्यानी शरीरसबंध करणे नाकारलें असल्यास त्यांत आश्चर्य मानण्याजोगे कांही नाही.

## गणराज्यांची व्यवस्था

हीं राज्ये एका काळीं गणसत्ताक किंवा महाजनसत्ताक होतीं, असें वर म्हटलेच आहे. वज्जी, मल्ल किंवा शाक्य यांच्या संबधाने जी माहिती त्रिपिटक ग्रथात सापडते, तिजवरून असें दिसून येतें की, या राज्यातील गावोगावच्या पुढाऱ्याना राजा म्हणत. हे सर्व राजे एकत्र जमून आपल्यापैकी एखाद्याला अध्यक्ष निवडीत. त्याची मुदत तहाहयात किंवा कांही कालपर्यंतच असे, यासबधीं कांहीच माहिती मिळत नाही. वज्जीमध्ये कोणी तरी महाराजा होता असेंही दिसून येत नाही. वज्जींच्या सेनापतीचा उल्लेख आहे, पण महाराजाचा नाही; कदाचित तेवढया वेळेपुरता अध्यक्ष निवडून ते काम चालवीत असतील. या गणराज्यांत न्यायदानासबधाने आणि राज्यव्यवस्था कशी ठेवावी यासबधाने काही कायदे ठरलेले असत आणि त्यांना अनुसरूनच हे गणराजे आपली राज्ये चालवीत.

## गणराज्यांच्या नाशाचीं कारणें

सोळा जनपदाच्या गणराजाचा नाश होऊन बहुतेक राज्यात महाराजसत्ता स्थापन झाली होती. आणि मल्लांचीं लहानशीं दोन व वज्जींचे बलाढय एक मिळून जीं तीन गणसत्ताक स्वतत्र राज्ये बाकी राहिलीं, ती पण एकसत्ताक राज्यपद्धतीच्या आहारीं जाण्याच्या बेतांत होतीं. याचीं कारणे काय झालीं असावीं? माझ्या मतें

गणराजांचा ऐषआराम आणि ब्राह्मणाचे राजकारणात वर्चस्व, ही या क्रातीचीं प्रमुख कारणें असलीं पाहिजेत.

गणराजाना कोणी निवडून देत नसे. बापाचा मुलगा त्याच्या मागोमाग राजा होत असे. वशपरपरेने हा अधिकार भोगावयास मिळाल्यामुळे हे चैनी आणि बेजबाबदार होणे अगदी साहजिक होते वर जे ललितविस्तरातून वज्जींचे वर्णन दिले आहे, त्याचा विचार केला असता, ते गणराजे जरी प्रबळ होते, तरी परस्पराविषयी त्याचा आदर नसून प्रत्येक जण आपणालाच राजा समजत होता असे दिसते. त्यामुळे बुद्धाच्या परिनिर्वाणानतर अजातशत्रूला वज्जीच्या गणराजात फूट पाडून ते राज्य अनायासे काबीज करता आले.

सामान्य जनतेचा या गणराजाना पाठिंबा असणें शक्य नव्हते. जो तो राजा आपल्या परीने लोकावर जुलूम करू लागला, तर त्याला आळा घालण्याचे सामर्थ्य लोकात किंवा इतर राजात नव्हते. त्यापेक्षा हे सर्व राजे नष्ट होऊन एकच सर्वाधिकारी राजा असणे सामान्य माणसाच्या दृष्टीने अधिक सोईवार होते. महाराजा आपल्या अधिकाऱ्यावर जोर जुलूम करी, राजधानीच्या आजूबाजूला एखादी सुस्वरूप तरुणी सापडली, तर तिला आपल्या झनानखान्यात घाली. असले काही थोडेबहुत जुलुमाचे प्रकार त्याच्याकडून घडले, तरी ते गणराजाइतके असणे शक्यच नव्हते. गणराजे गावोगावीं असल्याकारणाने त्याचा जुलूम सुरू झाला, तर त्यातून बहुजनापैकी कोणीही सुटू शकत नव्हता. कराच्या आणि बेगारीच्या रूपाने हे राजे सर्वानाच त्रास देत असावेत. एकसत्ताक महाराजाला अशा रीतीने शेतकऱ्याना सतावण्याची मुळीच आवश्यकता नव्हती. त्याच्या ऐषआरामापुरता पैसा त्याला नियमित कराच्या रूपाने सहज वसूल करता येत होता. तेव्हा सामान्य लोकाना, 'दगडापेक्षा वीट मऊ,' या न्यायाने एकसत्ताक राज्यपद्धतीच बरी वाटली असल्यास नवल नाही.

एकसत्ताक राज्यात पुरोहिताचे काम वंशपरंपरेने किंवा ब्राह्मणसमुदायाच्या संमतीने ब्राह्मणालाच मिळत असे. मुख्यप्रधानादिकाची कामे देखील ब्राह्मणानाच मिळत. अर्थात् ब्राह्मण एकसत्ताक राज्यपद्धतीचे मोठे भोक्ते झाले. ब्राह्मणी ग्रंथात गणसत्ताक राजाचा नामनिर्देश देखील नाही, ही गोष्ट विचार करण्याजोगी आहे. यावरून असे दिसते की, ब्राह्मणाना गणसत्ताक राज्यपद्धति मुळीच पसंत नव्हती. शाक्यासारखे गणराजे ब्राह्मणाना मान देत नाहीत, असा अंबष्ठ ब्राह्मणाने त्याच्यावर आरोप केल्याचा अंबट्ठसुत्तात उल्लेख आहे.* गणराज्यात यज्ञयागाना मुळीच उत्तेजन मिळत नव्हते, आणि एकसत्ताक राज्यात तर महाराजे यज्ञयाग चालवण्यासाठी ब्राह्मणाना वंशपरंपरेने इनामे देत. एका बिंबिसाराच्या राज्यात सोणदण्ड, कूटदन्त वगैरे ब्राह्मणाना, त्याचप्रमाणे कोसल देशात पोक्खरसाति (पौष्करसादि) तारुक्ख (तारुक्ष) वगैरे ब्राह्मणाना मोठमोठाली इनामे होती, असे सुत्तपिटकातील त्याच्या वर्णनावरून दिसून येते. तेव्हा 'परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ' या न्यायाने ब्राह्मणजातीचे आणि एकतंत्री राज्यपद्धतीचे परस्पराच्या साहाय्याने वर्चस्व वृद्धिंगत होणे साहजिक झाले.

बुद्धसमकाली ब्राह्मणापेक्षा श्रमणाचे (परिव्राजकाचे) महत्त्व अधिकाधिक वाढत चालले होते, हे पुढील प्रकरणावरून स्पष्ट दिसून येईल. या श्रमणाचा गणसत्ताक राज्याविषयी आदर होता. कारण, अशा राज्यातून यज्ञयागाना कोणी विचारीत नसे. तथापि अध्यात्मचिंतनात गुंतून गेल्यामुळे राजकीय बाबतीत विचार करून या गणसत्ताक राज्याची सुधारणा कशी करतां येईल, ह्याचा मार्ग शोधून

---

* चण्डा भो गोतम सक्यजाति. .इब्भा सन्ता इब्भा समाना न ब्राह्मणे सक्करोन्ति, न ब्राह्मणे मानेन्ति, इत्यादि ।। (दीघनिकाय अम्बट्ठसुत्त)

काढण्याला त्यांना अवकाशच नव्हता. जे कांही चालले आहे तें अपरिहार्य असावें, अशी त्यांची समजूत झाली होती असें दिसते.

गणराजासंबंधाने बुद्धाचा आदर स्पष्ट दिसतो. वज्जींना त्याने उन्नतीचे सात नियम घालून दिल्याचा उल्लेख वर आलाच आहे. परंतु त्याने देखील या जुन्या राज्यघटनेंतून नवीन सुव्यवस्थित घटना कशी तयार करतां येईल यासंबंधाने आपले विचार प्रकट केल्याचे दिसून येत नाही. गणराजापैकी एखाद्या राजाने जर जुलूम केला, तर इतर राजानी एकवट होऊन त्याला आळा घालावा? किंवा या सर्वच गणराजांना लोकानी वेळोवेळी निवडून देऊन त्याच्यावर आपला दाब ठेवावा? इत्यादि विचार बौद्धवाङ्मयात कोठेच सापडत नाहीत.

बुद्धाच्या अनुयायानी तर गणसत्ताक राज्याची कल्पना निखालस सोडून दिली. दीघनिकायात नमुनेदार राज्यपद्धति दर्शविणारीं चक्कवत्तिसुत्त आणि महासुदस्सनसुत्त अशीं दोन सुत्ते आहेत. त्यात चक्रवर्ती राजाचे महत्त्व अतिशयोक्तिपूर्वक वर्णिले आहे. ब्राह्मणाच्या सम्राटामध्ये आणि या चक्रवर्तीमध्ये फरक एवढाच की, पहिला सामान्य जनतेची काळजी न करतां पुष्कळ यज्ञयाग करून ब्राह्मणाची तेवढी काळजी घेतो, आणि दुसरा सर्व जनतेला न्यायाने वागवून सुखी करण्यात दक्ष असतो. राज्यात शातता स्थापित झाल्याबरोबर तो लोकाना उपदेश करतो की,

**पाणो न हन्तब्बो, अदिन्नं नादातब्बं, कामेसु मिच्छा न चरितब्बा, मुसा न भासितब्बा, मज्जं न पातब्बं।**

'प्राण्याची हत्या करूं नये, चोरी करूं नये, व्यभिचार करू नये, खोटे बोलूं नये, दारू पिऊं नये.'

म्हणजे बौद्ध गृहस्थांचे जे पांच शीलनियम आहेत, त्यांचें पालन करण्यास हे चक्रवर्ती राजे उपदेश करीत असत. एवंच, ब्राह्मणांच्या दृष्टीने काय, किंवा बुद्धाच्या अनुयायांच्या दृष्टीने काय,

एकसत्ताक राज्यपद्धतिच चागली ठरली. तत्त्वाचा फरक नसून तपशिलाचा तेवढा फरक राहिला.

परतु खुद्द गौतम बोधिसत्त्वावर गणसत्ताक राज्यपद्धतीचा चागला परिणाम झाला होता. सघाची रचना बुद्धाने गणसत्ताक राज्याच्या राज्यपद्धतीवरूनच केली असली पाहिजे. यास्तव या गणसत्ताक राज्याची मिळणारी अल्पस्वल्प माहिती विशेष महत्त्वाची वाटते.

---

## प्रकरण तिसरें

# समकालीन धार्मिक परिस्थिति

### भ्रामक विचार

आजकालच्या पुष्कळ विद्वानांची अशी समजूत दिसते की, प्रथमत: ब्राह्मणाचा वेदांवर सर्व भार होता, नतर त्यांनी यज्ञयागाचे स्तोम माजवले, त्यातून उपनिषदाचे तत्त्वज्ञान निघालें आणि मग बुद्धाने त्या तत्त्वज्ञानात सुधारणा करून आपला संप्रदाय स्थापला. ही विचारसरणी अत्यंत भ्रममूलक आहे. ती सोडून दिल्याशिवाय बुद्धचरित्राचा यथातथ्य बोध होणें शक्य नाही. म्हणून या प्रकरणांत बुद्धसमकालीं धार्मिक परिस्थिति कशा प्रकारची होती याचे संक्षिप्त वर्णन करणे योग्य वाटतें.

### यज्ञसंस्कृतीचा प्रवाह

पहिल्या प्रकरणांत सांगितलें आहे की, आर्यांच्या आणि दासांच्या सघर्षामुळे सप्तसिंधूच्या प्रदेशांत यज्ञयागाची संस्कृति उद्भवली, आणि परिक्षित् आणि त्याचा मुलगा जनमेजय यांच्या कारकीर्दींत या वैदिक संस्कृतीने कुरु देशात आपलें कायमचे ठाणें दिलें.

परंतु त्या संस्कृतीचा प्रवाह कुरूंच्या पलीकडे पूर्वेला जोराने वाहत गेला नाही. त्या प्रवाहाची गति कुरु देशातच कुंठित झाली. याचे मुख्य कारण पूर्वेकडील देशांत ऋषिमुनींच्या अहिंसेला आणि तपश्चर्येला महत्त्व देणारे लोक पुष्कळ होते.

## तपस्वी ऋषिमुनि

जातकअट्ठकथेत तपस्वी ऋषिमुनींच्या अनेक गोष्टी आल्या आहेत त्यावरून असे दिसते की, हे लोक जंगलांत जाऊन तपश्चर्या करीत. त्यांच्या तपश्चर्येचा मुख्य विषय म्हटला म्हणजे कोणत्याही प्राण्याला दुखवावयाचे नाही आणि शक्य तेवढे देहदंडन करावयाचे. हे लोक एकाकी किंवा संघ बनवून राहत असत. एकेका संघात पाचशे पाचशे तपस्वी परिव्राजक असल्याचा उल्लेख अनेक जातककथांत सापडतो. जंगलातील कंद, फळे वगैरे पदार्थांवर ते आपला निर्वाह करीत, आणि प्रसंगोपात्त खारट आणि आंबट पदार्थ (लोण–अम्बिल–सेवनत्थ) खाण्यासाठी लोकवस्तीच्या ठिकाणीं येत. त्यांच्याविषयी लोकांना फार आदर वाटत असे आणि त्यांना लागणाऱ्या पदार्थांची ते वाण पडू देत नसत. या ऋषिमुनींचे लोकांवर फार वजन होते; पण ते लोकांना धर्मोपदेश करीत नसत. त्यांच्या उदाहरणाने लोक अहिंसेला मानीत, एवढेंच काय ते.

## ऋषिमुनींचें भोळेपण

हे तपस्वी लोक व्यवहारानभिज्ञ असल्याकारणाने कधी कधी प्रपंचात फसत. ऋष्यशृंगाला बायकांनी फसवून आणल्याचे आणि पराशर सत्यवतीशीं रत झाल्याचे वर्णन पुराणांत आहेच. याशिवाय जातकअट्ठकथेत देखील हे ऋषिमुनि भलत्याच मार्गाला लागल्याच्या अनेक गोष्टी आढळून येतात. त्यांपैकी येथे एक देतों–

प्राचीन काळी वाराणसी नगरीत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असता बोधिसत्त्व काशी राष्ट्रांत औदिच्य ब्राह्मणकुलात जन्मला. वयात आल्यावर त्याने प्रव्रज्या घेतली; आणि तो पाचशे शिष्यासह-वर्तमान हिमालयाच्या पायथ्याशी राहू लागला. पावसाळा जवळ आला, तेव्हा त्याचे शिष्य त्याला म्हणाले, "आचार्य, आपण लोकवस्तीत जाऊन खारट आणि आंबट पदार्थ सेवन करू या." आचार्य म्हणाला, "आयुष्मन्तानो, मी इथेच राहतो. तुम्ही जाऊन शरीराला अनुकूल पदार्थ खाऊन या."

ते तपस्वी वाराणसीला आले. राजाने त्यांची कीर्ति ऐकून त्याना आपल्या उद्यानात चातुर्मासात राहण्याची विनती केली, व त्यांच्या जेवण्याखाण्याची व्यवस्था आपल्याच राजवाड्यात करविली. एक दिवस शहरात सुरापानमहोत्सव चालला होता. परिव्राजकाना जंगलात दारू मिळणे कठीण, म्हणून राजाने या तपस्व्याना उत्तम दारू देवविली. तपस्वी दारू पिऊन नाचू लागले, गाऊ लागले, आणि काही अव्यवस्थितपणे खाली पडले. जेव्हा ते पूर्वस्थितीवर आले, तेव्हा त्याना फार पश्चात्ताप झाला. त्याच दिवशी राजाचे उद्यान सोडून ते हिमालयाकडे वळले, आणि क्रमशः आपल्या आश्रमात येऊन आचार्याला नमस्कार करून एका बाजूला बसले. आचार्य त्याना म्हणाला, "तुम्हाला लोकवस्तीत भिक्षेचा त्रास झाला नाही ना? आणि तुम्ही समग्रभावाने राहिलात ना?" ते म्हणाले, "आचार्य! आम्ही सुखाने राहिलो, मात्र ज्या पदार्थांचे पान करू नये त्याचे पान केले.

अपायिम्ह अनच्चिम्ह अगायिम्ह रुदिम्ह च।
विसञ्ञकरणिं पित्वा दिट्ठा नाहुम्ह वानरा॥

आम्ही प्यालो, नाचलो, गाऊ लागलो आणि रडलो. उन्मत्त करणारी (दारू) पिऊन आम्ही वानर बनलो नाही, एवढेच काय तें!"*

---

* सुरापान जातक (नं ८१)

## ऋषिमुनींत जातिभेद नव्हता

तपस्वी ऋषिमुनींत जातिभेदाला मुळीच थारा नव्हता. कोण-त्याही जातीचा मनुष्य तपस्वी झाला, तरी त्याचा सर्व समाजांत बहुमान होत असे. उदाहरणादाखल येथे जातकांत आलेली मातंग ऋषीची गोष्ट* संक्षेपाने देत आहें.—

मातग वाराणसी नगराच्या बाहेर चाडालकुलांत जन्मला. तो वयांत आल्यावर एके दिवशीं त्याची व वाराणसी श्रेष्ठीच्या दृष्टमगलिका नावाच्या तरुण कन्येची रस्त्यात गाठ पडली. तेव्हा मातग एका बाजूला उभा राहिला. आपल्या परिवारातील नोकरांना दृष्टमगलिकेने विचारलें की, हा बाजूला उभा राहिलेला मनुष्य कोण? तो चाडाल आहे, असें तिच्या नोकराने सागितल्याबरोबर अपशकुन झाला असे समजून ती तेथूनच मागे फिरली.

दृष्टमगलिका महिन्या दोन महिन्यानी एकदा उद्यानात जाऊन आपल्या बरोबरच्या व तेथे जमणाऱ्या इतर लोकाना पैसे वाटीत असे. ती माघारी घरीं गेल्यामुळे त्या लोकाची निराशा झाली. त्यानी मातगाला झोडपून निश्चेष्ट करून रस्त्यांत पाडले. मातग काही वेळाने शुद्धीवर आला आणि दृष्टमगलिकेच्या बापाच्या दरवा-जात पायरीवर आडवा पडून राहिला. "हा त्रागा का करतोस?" असें जेव्हा त्याला विचारले, तेव्हा तो म्हणाला, "दृष्टमगलिकेला घेतल्यावाचून मी येथून हलणार नाही." सात दिवस तसाच पडून राहिल्यावर श्रेष्ठीने निरुपाय होऊन आपल्या मुलीला त्याच्या स्वाधीन केले. तिला घेऊन तो चाडालग्रामांत गेला.

दृष्टमगलिका जरी त्याच्याशीं पत्नीच्या नात्याने वागण्यास तयार होती, तथापि त्याने तिला तशा रीतीने न वागवता अरण्यांत जाऊन घोर तपश्चर्या आरंभिली. सात दिवसांनी मातंग परत आला

---

* मातग जातक (न. ४९७)

आणि दृष्टमंगलिकेला म्हणाला, "तू जाहीर कर की, माझा पति मातंग नसून महाब्रह्मा आहे; व तो पौर्णिमेच्या दिवशी चन्द्रमंडळातून खाली उतरणार आहे." त्याप्रमाणे दृष्टमंगलिकेने हे वर्तमान सर्वांना सांगितले. पौर्णिमेच्या दिवशीं रात्री मोठा जनसमुदाय चांडालग्रामांत तिच्या घरासमोर जमला. तेव्हा मातंग ऋषि चन्द्रमंडळातून खाली उतरला, आणि आपल्या झोपडींत शिरून त्याने दृष्टमंगलिकेच्या नाभीला आपल्या अंगठ्याने स्पर्श केला.

तेथे जमलेल्या ब्रह्मभक्तांनी हा अद्भुत चमत्कार पाहून दृष्टमंगलिकेला उचलून वाराणसी नगरीत नेले आणि नगरीच्या मध्यभागी एक मोठा मंडप उभारून तिची पूजा चालविली. लोक तिला नवस करू लागले. नऊ महिन्यानंतर त्याच मंडपात तिला मुलगा झाला. मंडपात जन्मल्यामुळे त्याचे नांव मांडव्य ठेवण्यात आले. लोकांनी त्या मंडपाजवळच एक मोठा प्रासाद बांधला, आणि या मातापुत्रांना त्या प्रासादात ठेवले. त्यांची पूजा चालू होती.

लहानपणापासून मांडव्यकुमाराला शिकविण्यासाठी मोठमोठाले वैदिक पंडित स्वेच्छेने आले. तो तीनही वेदांत पारंगत झाला. आणि ब्राह्मणांना पुष्कळ मदत करू लागला. एके दिवशी मातंग ऋषि त्याच्या दारात भिक्षेसाठी उभा राहिला असता मांडव्य त्याला म्हणाला, "चिंध्या पांघरून पिशाचासारखा येथे उभा राहणारा तू कोण आहेस ?"

मातंग—तुझ्या घरी अन्नपान पुष्कळ आहे. यास्तव कांही तरी खरकटे मला मिळेल, या हेतूने मी येथे उभा आहे.

मांडव्य—पण हे अन्न ब्राह्मणांसाठी आहे. तुझ्यासारख्या हलकटाला देण्यासाठी नाही.

दोघांचाही बराच संवाद झाल्यावर मांडव्याने मातंगाला आपल्या तीन द्वारपालांकडून धक्के मारून घालवून दिले. पण

त्यामुळे त्याची बोबडी वळली, डोळे पांढरे फटफटीत झाले आणि तो निश्चेष्टित होऊन पडला. त्याच्या बरोबरच्या ब्राह्मणांची देखील कांही कमी प्रमाणांत हीच स्थिति झाली. तोंडे वेडीवाकडी करून ते गडबडा लोळू लागले. हा प्रकार पाहून दृष्टमंगलिका घाबरून गेली. एका दरिद्री तपस्व्याच्या प्रभावाने आपल्या मुलाची व इतर ब्राह्मणाची ही स्थिति झाल्याचे जेव्हा तिला समजले, तेव्हा त्या तपस्व्याचा शोध करण्यासाठी ती निघाली. मातंग ऋषि एका ठिकाणीं बसून भिक्षाटनात मिळालेली पेज खात होता. दृष्टमंगलिकेने त्याला ओळखले आणि आपल्या मुलाला क्षमा करण्याची विनती केली. आपल्या उष्टया पेजेचा काही भाग त्याने तिला दिला आणि सांगितले की, ही पेज मुलाच्या आणि इतर ब्राह्मणाच्या तोंडात घाल, म्हणजे ते बरे होतील. त्याप्रमाणे दृष्टमंगलिकेने केल्यावर ते सर्व ब्राह्मण पूर्वस्थितीवर आले. पण चांडाळाच्या उष्टयाने ब्राह्मण बरे झाल्याचें वर्तमान सर्व वाराणसीत पसरले. तेव्हा लोकाना लाजून ते मेज्झ (मेध्य) राष्ट्रांत गेले. मांडव्य मात्र तेथेच राहिला.

मातंग ऋषि कांही काळाने प्रवास करीत मेज्झ राष्ट्रात जाऊन पोचला. हें वर्तमान मांडव्याबरोबरच्या ब्राह्मणाना समजल्याबरोबर त्यांनी मेज्झराजाची अशी समजूत करून दिली की, हा नवीन आलेला भिकारी मायावी आहे आणि तो सर्व राष्ट्रांचा नाश करील. हें ऐकल्याबरोबर राजाने आपले शिपाई मातंगाच्या शोधासाठी पाठविले. त्यांनी त्याला एका भिंतीजवळ बसून भिक्षेत मिळालेले अन्न खात असताना गाठलें आणि तेथेच ठार केले. त्यामुळे देवता क्षोभल्या आणि त्यानी तें राष्ट्र ओस पाडलें.

मातंगाच्या हत्येमुळे मेज्झ राष्ट्र ओस पडल्याचा उल्लेख अनेक जातकांत सापडतो. या दंतकथेंत कितपत तथ्य आहे हें सांगता येत नाही. तथापि मातंग ऋषि चांडाळ होता व त्याची पूजा ब्राह्मण

आणि क्षत्रिय देखील करीत होते, हें वसलसुत्तांतील खालील गाथावरून स्पष्ट होतें.

तदमिना पि जानाथ यथा मेद निदस्सन ॥
चण्डालपुत्तो सोपाको मातगो इति विस्सुतो ॥१॥
सो यस परम पत्तो मातगो य सुदुल्लभ ।
आगच्छु तस्सुपट्ठान खत्तिया ब्राह्मणा बहू ।।२॥
देवयान अभिरुय्ह विरज सो महापथ ।
कामराग विराजेत्वा ब्रह्मलोकूपगो अहु ।
न न जाति निवारेसि ब्रह्मलोकूपपत्तिया ॥३॥

(१) ह्याला मी एक उदाहरण देतों. कुत्र्याचे मास खाणाऱ्या चांडाळाचा एक पुत्र मातग या नावाने प्रसिद्ध होता.

(२) त्या मातगाला अत्यत श्रेष्ठ आणि दुर्लभ यश मिळालें. त्याच्या सेवेस पुष्कळ क्षत्रिय आणि ब्राह्मण हजर असत.

(३) विषयवासनेचा क्षय करणाऱ्या थोर मार्गाचा व देवयानाचा (समाधीचा) अवलब करून तो ब्रह्मलोकाला गेला. ब्रह्मलोकीं उत्पन्न होण्यास त्याचा जन्म त्याला आड आला नाही.

## शंबूकाची कथा काल्पनिक

शंबूक नावाचा शूद्र अरण्यात तपश्चर्या करीत होता. त्यामुळे एका ब्राह्मणाचा मुलगा मरण पावला. रामाला ही गोष्ट समजल्यावर त्याने अरण्यात जाऊन शबूकाचा शिरश्छेद केला आणि ब्राह्मणाच्या मुलाला जिवत केले. ही कथा रामायणात अत्यत खुलवून वर्णिली आहे. काही सौम्य स्वरूप देऊन भवभूतीने हा प्रसग उत्तररामचरितांत देखील दाखल केला आहे. पण असा प्रकार बुद्धाच्या पूर्वी किंवा बौद्धधर्म हिंदुस्थानात असेपर्यंत घडून आल्याचा कोठेच

पुरावा सापडत नाही. राजाने असे वर्तन केले पाहिजे, एवढेच दाखविण्याचा ही कथा रचणाऱ्याचा हेतु असावा.

### श्रमण

जगलात राहणाऱ्या या ऋषिमुनींना तापस किंवा परिव्राजक म्हणत असत, ते तपश्चर्या कशी करीत याची विशेष माहिती सापडत नाही. याच तपस्वी लोकाच्या सघामधून लोकवस्तींत फिरून लोकाना उपदेश करणारे निरनिराळे श्रमणसघ निघाले. श्रमण हा शब्द श्रम् धातूपासून निघाला आहे. त्याचा अर्थ कष्ट करणारा असा होतो. आज जसे शारीरिक कष्ट करणाऱ्या मजुराचे महत्त्व वाढत चालले आहे, तसे ते बुद्धसमकाली श्रमणाचे वाढत चालले होते. पण मजुरामध्ये आणि याच्यामध्ये फरक असा की, मजर समाजाला उपयोगी पडणाऱ्या वस्तु उत्पादन करण्यासाठी कष्ट करतात आणि हे श्रमण लोक समाजात आध्यात्मिक जागृति पैदा करण्यासाठी कष्ट करीत. कदाचित् शरीराला तपश्चर्येच्या योगाने हे लोक श्रम देत असत, म्हणून याना श्रमण ही सज्ञा लावण्यात येत असावी. पण जगलात राहणारे ऋषिमुनि देखील तपश्चर्येने शरीर कष्टवीत असतच, तरी त्याना श्रमण म्हणत नसत. तेव्हा लोकाच्या हितासाठी स्वत: श्रम करणारे म्हणूनच याना श्रमण म्हणत, हे अधिक सभवनीय दिसते.

### त्रेसष्ट श्रमणपंथ

बुद्धसमकालीं असे लहानमोठे त्रेसष्ट श्रमणसघ अस्तित्वात होते. 'यानि च तीणि यानि च सट्ठि' या वाक्यात जी तीन आणि साठ मतें सागितलीं आहेत त्यात बौद्धमताचा देखील समावेश होतो की काय हे सागतां येत नाही. तो होतो असें जर गृहीत धरले, तर पालिवाङ्मयांत अनेक ठिकाणीं सापडणाऱ्या बासष्ट मतांच्या (द्वासट्ठि

दिट्ठिगतानि ) उल्लेखाचा अर्थ बरोबर लागतो. म्हणजे बुद्धाच्या श्रमणपथाबाहेर या वेळी आणखी बासष्ट श्रमणपथ अस्तित्वात होते असे ठरते. या बासष्ट श्रमणपथाची मते तपशीलवार दाखविण्याचा प्रयत्न दीघनिकायाच्या पहिल्या ब्रह्मजालसुत्तात केला आहे. पण तो कृत्रिम दिसतो. ज्या वेळी हे सुत्त लिहिले, त्या वेळी बासष्ट या संख्येशिवाय तपशीलवार माहिती अस्तित्वात राहिली नव्हती. तेव्हा सुत्त रचणाऱ्याने बासष्ट ही संख्या भरून काढण्यासाठी नवीन तपशील रचून या सुत्तात घातला. या जुन्या बासष्ट श्रमणपथाची माहिती नष्ट होण्याचे कारण असे दिसते की, त्यापैकी प्रसिद्ध असे फारच थोडे श्रमणपथ होते आणि लहानसहान संप्रदायाचा मोठ्या संप्रदायात समावेश होत गेला. आजकालच्या बुवा, बैरागी वगैरे पंथाची नीट मोजणी केली, तर ते किती तरी भरतील. पण त्यात नाव घेण्याजोगे कबीर, दादू, उदासी वगैरे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच शिल्लक राहतील.

## तपश्चर्येचे प्रकार

बुद्धाच्या वेळी सर्वांत मोठे श्रमणसंघ सहाच होते आणि त्यांत देखील निर्ग्रंथ श्रमणांच्या संप्रदायाचा नंबर पहिला लागतो. या पंथाचा ऐतिहासिक संस्थापक पार्श्व मुनि होय. त्याचे परिनिर्वाण बुद्धाच्या जन्मापूर्वी १९३ व्या वर्षी झाले, असे अनुमान करता येते. त्यापूर्वी चाळीस पन्नास वर्षे तरी पार्श्व तीर्थंकर आपल्या धर्माचा उपदेश करीत असावा. याच्या आणि इतर श्रमणसंघनायकांच्या मतांचा विचार पुढे करण्यात येईल. सध्या या लोकांच्या तपश्चर्येचे प्रकार कोणते होते हे निर्दिष्ट करणे इष्ट वाटते. कां की, त्यामुळे तापसांच्या तपश्चर्येचा देखील अल्पस्वल्प बोध होऊ शकेल. श्रमणांच्या तपश्चर्येचे प्रकार अनेक सुत्तांत सापडतात. पण त्यांपैकी मज्झिम-

निकायांतील महासीहनाद सुत्तांत आलेलें तपश्चर्येचें वर्णन विशेष महत्त्वाचे वाटल्याकारणाने त्याचा गोषवारा येथे देत आहें.

बुद्ध भगवान सारिपुत्ताला म्हणतो, "हे सारिपुत्ता, मी चार तऱ्हेचे तप आचरले होते, हे मला आठवतें. मी तपस्वी झालों, रूक्ष झालो, जुगुप्सी झालो आणि प्रविवित्त झालो.

### तपस्विता

"हे सारिपुत्त, माझी तपस्विता कशी होती, ती सागतो.

(नि) मी नागवा राहत असे. लौकिक आचार पाळीत नसे. हातावर भिक्षा घेऊन खात असें. 'भदन्त, इकडे या' असे कोणी म्हटले तर ते ऐकत नसे. 'भदन्त, उभा रहा' असें कोणी म्हटले तर तें ऐकत नसे. बसल्या ठिकाणी आणून दिलेल्या अन्नाचा, मला उद्देशून तयार केलेल्या अन्नाचा आणि निमत्रणाचा मी स्वीकार करीत नसें. ज्यात अन्न शिजविलें, त्याच भाडयातून अन्न आणून दिले तर ते घेत नसे. उखळातून खाण्याचा पदार्थ आणून दिला तर तो घेत नसे. उबरठयाच्या आणि दाडक्याच्या पलीकडे राहून दिलेली भिक्षा घेत नसे. दोघे जेवीत असताना एकाने उठून दिलेली भिक्षा घेत नसें. गर्भिणी, मुलाला पाजणारी, किवा पुरुषाशी एकातात असणारी, अशा स्त्रियाकडून भिक्षा घेत नसें. मेळ्यांत आणि जत्रेत तयार केलेल्या अन्नाची भिक्षा घेत नसे. जेथे कुत्रा उभा असेल, किंवा माश्याची गर्दी आणि गोगाट असेल तेथे भिक्षा घेत नसें. मत्स्य, मांस, सुरा, वगैरे पदार्थ घेत नसें.* एकाच घरांत भिक्षा घेऊन एकाच घासावर मी राहत असे. किंवा दोन घरांत भिक्षा घेऊन दोन

---

* जैन साधु मत्स्य आणि मास घेत असत; पण सुरा घेत असल्याचा दाखला सापडत नाही. मासाहाराची चर्चा अकराव्या प्रकरणात केली आहे.

घासावर, याप्रमाणे सात दिवस वाढवीत जाऊन सात घरीं भिक्षा घेऊन सात घास खाऊन राहत असें. पळाभरच अन्न घेत असें. याप्रमाणे सात दिवस वाढवीत जाऊन सात पळे अन्न घेऊन त्यावर निर्वाह करीत असें. एका दिवसाआड जेवीत असें. दोन दिवसांआड जेवीत असें. याप्रमाणे उपासाची मर्यादा वाढवीत जाऊन, सात दिवसाआड किंवा पधरवडयातून एक दिवस जेवीत असें.

(इ) "शाक, श्यामाक, नीवार, चांभाराने फेकलेले चामडयाचे तुकडे, शेवाळ, कोंडा, करपलेलें अन्न, पेंड, गवत किंवा गाईचें शेण खाऊन राहत असें. किंवा अरण्यांत सहजासहजीं मिळालेल्या फळमुळांवर निर्वाह करीत असें. मी सणाची वस्त्रे धारण करीत असें. मिश्र वस्त्रें धारण करीत असे. प्रेतावर टाकलेलीं वस्त्रें धारण करीत असें. रस्त्यातील चिंध्याची वस्त्रें बनवून तीं धारण करीत असे. वल्कले धारण करीत असे अजिनमृगचर्म धारण करीत असें. कुशाचें बनविलेले चीवर धारण करीत असें. वाकाचे चीवर धारण करीत असें. मनुष्याच्या केसांची कांबळ किंवा घोडयाच्या केसाची कांबळ, अथवा घुबडाच्या पिसाचे बनविलेले चीवर धारण करीत असे.

(नि) "मी दाढीमिशा आणि केस उपटून काढीत असे. उभा राहून तपस्या करीत असें. उकिडव्याने बसून तपस्या करीत असें.

(इ) "मी कटकाच्या शय्येवर निजत असें. दिवसातून तीनदा स्नान करीत असें. अशा प्रकारे अनेक परीनी देहदंडन करीत होतो. ही माझी तपस्विता."

## रूक्षता

"हे सारिपुत्त, माझी रूक्षता कशी होती हें सागतो:—

(नि) अनेक वर्षांच्या धुळीने माझ्या अगावर मळाचा थर चढल होता. जसा एखादा तिंदुक वृक्षाचा सोट अनेक वर्षांच्या धुळीने माखला जातो, तसा माझा देह झाला होता. पण मला असें वाटत नव्हते

की, हा धुळीचा पापुद्रा मी स्वत. किंवा दुसऱ्या कोणी तरी हाताने झाडावा. अशी माझी रूक्षता होती.”

## जुगुप्सा

“आता माझी जुगुप्सा कशी होती हे सागतो'--(नि) मी मोठ्या काळजीपूर्वक जात येत असे. पाण्याच्या थेबावर देखील माझी तीव्र दया होती. अशा विषम अवस्थेत सापडलेल्या सूक्ष्म प्राण्याचा माझ्या हातून नाश होऊ नये, याबद्दल मी अत्यत काळजी घेत असे. अशी माझी जुगुप्सा होती.” (जुगुप्सा म्हणजे हिंसेचा कटाळा.)

## प्रविविक्तता

“हे सारिपुत्त, आता माझी प्रविविक्तता कशी होती हे सागतो --(इ) मी एखाद्या अरण्यात राहत असता कोणा तरी गुराख्याला, गवत कापणाऱ्याला, लाकडे नेणाऱ्याला किंवा जगलाची देखरेख ठेवणाऱ्या माणसाला पाहून गहन जगलातून, खोलगट किंवा सपाट प्रदेशातून एकसारखा पळत सुटे. हेतु हा की, त्यानी मला पाहू नये आणि मी त्याना पाहू नये. जसा एखादा अरण्यमृग मनुष्याना पाहून पळत सुटतो, तसा मी पळत सुटत असे अशी माझी प्रविविक्तता होती.”

## विकट भोजन

(इ) “जेथे गाई बाधण्याची जागा असे व जेथून नुकत्याच गाई चरावयास गेलेल्या असत, तेथे हातापायावर चालत जाऊन मी वासराचे शेण खात असे. जोपर्यंत माझे मलमूत्र कायम असे, तोपर्यंत त्यावरच मी निर्वाह करीत होतो. असे माझे महाविकट भोजन होते.”

## उपेक्षा

(नि) “मी एखाद्या भयानक अरण्यात राहत असे. जो कोणी अवीतरागी त्या अरण्यात प्रवेश करी, त्याच्या अगावर काटा उभा

राहावयाचा, इतकें ते भयकर होते. हिवाळयात भयकर हिमपात होत असता मी मोकळया जागीं राहत होतों, आणि दिवसा जंगलांत शिरत होतो. उन्हाळयाच्या शेवटल्या महिन्यात दिवसा मोकळया जागीं राहत असे, आणि रात्रीं जगलात शिरत असें. मी स्मशानात माणसाचीं हाडे उशाला घेऊन निजत असे. गावढळ लोक येऊन माझ्यावर थुकत, लघवी करीत, धूळ फेकीत अथवा माझ्या कानात काडया घालीत. तथापि त्याच्याविषयीं माझ्या मनात कधीही पापबुद्धि उत्पन्न झाली नाही.

### आहारव्रत

(इ) "आहाराने आत्मशुद्धि होते, अशी कित्येक श्रमणांची आणि ब्राह्मणाची दृष्टि आहे. ते केवळ बोरे खाऊन राहतात, बोराचें चूर्ण खातात, बोराचा काढा पितात, किंवा दुसरा कोणताही पदार्थ बोराचाच करून खातात. मी एकच बोर खाऊन राहत असल्याची मला आठवण आहे. हे सारिपुत्ता, तू असें समजू नकोस की, त्या काळीं बोरें फार मोठीं होतीं. आजला जशीं बोरे आहेत, तशी ती त्या काळीही असत. याप्रमाणे एकच बोर खाऊन राहिल्यामुळे माझे शरीर अत्यत कृश होत असे. आसीतक वल्लीच्या किंवा कालवल्लीच्या गाठींप्रमाणे माझे साधे स्पष्ट दिसत असत. माझा कटिबंध उटाच्या पावलासारखा दिसे. सुताच्या चात्याच्या माळेप्रमाणे माझा पाठीचा कणा दिसे. मोडक्या घराचे वासे जसे खालीवर होतात, तशा माझ्या बरगडया झाल्या. खोल विहिरीत पडलेल्या नक्षत्राच्या छायेप्रमाणे माझी बुबुळे खोल गेलीं. कच्चा कडू भोपळा कापून उन्हात टाकला असता जसा कोमेजून जातो, तशी माझ्या डोक्याची चामडी कोमेजून गेली. मी पोटावरून हात फिरवण्यास जाई, तो पाठीचा कणाच माझ्या हातीं लागे. त्यावर हात फिरवीं, तेव्हा पोटाची

चामडी हाताला लागे. येणेप्रमाणे माझा पाठीचा कणा आणि पोटाची चामडी हीं एक झालीं होतीं. शौचाला किंवा लघवीला बसण्याचा प्रयत्न केला, तर मी तेथेच पडत असें. अगावरून हात फिरवला तर माझे दुर्बळ झालेले लोम खाली पडत. त्या उपोषणाच्या योगाने माझी स्थिति तशी झाली.

"कित्येक श्रमण आणि ब्राह्मण मूग खाऊन राहतात, तीळ खाऊन राहतात किंवा तांदूळ खाऊन राहतात. या पदार्थांनी आत्मशुद्धि होते अशी त्यांची समजूत आहे. हे सारिपुत्ता, मी एकच तीळ, एकच तांदूळ किंवा एकच मूग खाऊन राहत होतो. त्या वेळीं हे दाणे फार मोठे होते असें समजू नकोस. आजकालच्या सारखेच हे दाणे होते. या उपोषणाने माझी स्थिति तशीच (वर वर्णिल्याप्रमाणे) होत असे."

बुद्धघोषाचार्यांचे म्हणणे की, भगवताने ही तपश्चर्या एका पूर्वजन्मीं केली. त्या काळीं बोरें वगैरे पदार्थ आताच्या सारखेच होत असत, या मजकुरावरून बुद्धघोषाचार्यांचे म्हणणे सयुक्तिक आहे असे दिसून येते. बुद्धसमकाली चालू असलेल्या भिन्न भिन्न तपश्चर्यांचे निरर्थकत्व दाखवून देण्यासाठी सुत्ताच्या कर्त्याने वरील मजकूर भगवताच्या तोंडीं घातला आहे हे सांगणे नलगे.

टिपेंत दिलेल्या फरकाशिवाय (नि) सदराखाली आलेली तपश्चर्या निर्ग्रंथ (जैन साधु) करीत असत. आजलाही केस उपटण्याची, उपासनापास करण्याची वगैरे प्रथा त्यांच्यात चालू आहे.

(इ) सदराखाली आलेली तपश्चर्या इतर पंथांचे श्रमण आणि ब्राह्मण करीत असत. त्यांतील बहुतेक प्रकार बुवा, बैरागी वगैरे लोकांत अद्यापि चालू आहेत.

## मलमूत्र खाण्याची चाल

स्वतःचें मलमूत्र खाण्याची चाल अद्यापिही अघोरीसारख्या पंथांत चालू असल्याचे दिसून येतें. काशींत तेलंगस्वामी म्हणून एक

प्रसिद्ध सन्यासी होऊन गेले. ते नागवे राहत. त्यांच्यासारखे नागवे फिरणारे दुसरेही पुष्कळ परमहस काशीला होते. त्या वेळी गोड्विन् नावाचा (याला काशीचे लोक गोविंद साहेब म्हणत) मोठा लोकप्रिय कलेक्टर होता. हिदु लोकान्च्या चालीरीतींची त्याने सहानुभूतिपूर्वक माहिती करून घेतली, आणि या नग्या बुवानी लगोटी लावून फिरावे म्हणून खालील युक्ति योजिली.

रस्त्यात फिरणारा नगा बुवा भेटल्याबरोबर पोलीस त्याला साहेबाकडे घेऊन जात. आणि साहेब त्याला विचारी, "तू परमहस आहेस का ?" त्याने होय म्हणून सागितल्याबरोबर त्याला तो आपले अन्न खाण्यास सागत असे. अर्थातच ते नग्या बुवाला पसत पडत नसे. तेव्हा गोविंद साहेब म्हणे, "परमहस कसलाच भेद ठेवीत नसतो, असें शास्त्रात सागितले आहे; आणि तुमच्या मनात तर भेदभाव आहे; तेव्हा तुम्ही नग्न हिंडता कामा नये." येणेप्रमाणे पुष्कळशा नग्या बुवाना त्याने लगोटी लावण्यास भाग पाडले.

असाच प्रसग एकदा तेलगस्वामीवर आला. पोलीस स्वामीला घेऊन कलेक्टर साहेबाच्या बगल्यावर गेल्याचे वर्तमान समजताच त्याचे शिष्य व चाहाते मोठमोठे पडित व इतर वजनदार लोक साहेबाच्या बगल्यावर गेले. साहेबाने सर्वांस बसवून घेऊन तेलग-स्वामीला प्रश्न केला, "तुम्ही परमहस आहात काय ?" स्वामीकडून 'होय' असें उत्तर मिळाल्यावर साहेबाने दुसरा प्रश्न केला, "माझ्या-कडचे अन्न खाल काय ?" त्यावर स्वामी म्हणाले, "तुम्ही माझे अन्न खाल काय ?" "मी जरी परमहस नाही, तरी कोणाचेही अन्न खातो," साहेबाने उत्तर केले.

स्वामीनी तेथल्या तेथे आपल्या हातावर शौचविधि केला व तो हात पुढे करून स्वामी गोविंदसाहेबाला म्हणाले, "हे घ्या माझे अन्न. हें तुम्ही खाऊन दाखवा." साहेब अत्यत कटाळला आणि

संतापून म्हणाला, "हें काय माणसाने खाण्याजोगे अन्न आहे ?" तेव्हा स्वामीनी ते पार खाल्ले आणि हात चाटून साफसूफ केला ! साहेबाने स्वामीला सोडून दिले, इतकेच नव्हे, पण पुन्हा त्याची चौकशी देखील केली नाही !

मी १९०२ सालीं काशीला असताना ही गोष्ट काशीच्या पंडितानी मोठया आदराने सागितलेली ऐकली आहे. आणि त्यापूर्वी ती तशाच आदरबुद्धीने 'काशीयात्रा' या पुस्तकात लिहिलेली मी वाचली.

## आधुनिक तपस्या

हेच तेलगस्वामी भर थंडीच्या दिवसात केवळ डोके वर ठेवून गंगेत बसत; आणि भर उन्हाळ्यांत ज्या ठिकाणीं चालल्याने पायाला फोड येई, त्या गंगेच्या वाळवटात बसत.

लोखडाच्या काटयाची खाट बनवून त्याच्यावर निजणारे बैरागी पुष्कळानी पाहिले असतील. १९०२ सालीं असा एक बैरागी काशींत बिंदुमाधवाच्या मदिराजवळ राहत होता. लाकडाची लगोटी घालून फिरणारे बुवाबैरागीही माझ्या पाहण्यात आले आहेत.

## श्रमणांचा तपश्चर्येविषयीं आदर

वर दिलेल्या तपश्चर्येच्या प्रकारापैकी शाक, शामाक व अरण्यांतील सहज मिळालेलीं फळेमुळें खाऊन राहणे, हा प्रकार अरण्यांत राहणारे ऋषिमुनि आचरीत असत. ते वल्कलें नेसत आणि बहुतेक अग्निहोत्रही ठेवीत. परंतु हे जे नवीन श्रमणसप्रदाय निघाले त्यांनी अग्निहोत्राला फाटा दिला आणि अरण्यांत राहणाऱ्या ऋषिमुनींच्या बऱ्याच तपश्चर्या घेऊन त्यांत चामडयाचे तुकडे वगैरे खाण्याच्या तपश्चर्यांची भर घातली.

बुद्धाच्या वेळीं निर्ग्रंथांचा (जैनाचा) संप्रदाय जोमांत होता हे वर सागितलेच आहे. त्याशिवाय पूरणकाश्यप, मक्खलि गोसाल, अजित केसकम्बल, पकुध कात्यायन आणि सजय बेलट्ठपुत्त या पाच श्रमणनायकांचे श्रमणसप्रदाय फार प्रसिद्ध होते. या लोकांच्या तत्त्वज्ञानाचा विचार सक्षेपाने सातव्या प्रकरणात केला आहे. त्यावरून असे दिसून येईल की, तत्त्वाविषयीं त्यांचा फार मोठा मतभेद होता; तथापि दोन गोष्टींत त्याची एकवाक्यता होती—

(१) या सर्वांना यज्ञयाग पसंत नव्हते, आणि

(२) तपश्चर्येविषयीं थोडयाबहुत प्रमाणात त्याचा आदर होता.

## श्रमणांचे प्रचारकार्य

या आणि इतर श्रमणाचें वजन लोकावर फार होते, हे वर सांगितलेच आहे. हे श्रमण पूर्वेला चपा (भागलपूर), पश्चिमेला कुरूचा देश, उत्तरेला हिमालय आणि दक्षिणेला विंध्य, यांच्या मधल्या प्रदेशात पावसाळ्याचे चार महिने खेरीज करून बाकी आठ महिने सारखे फिरत आणि आपापल्या मताचा लोकाना उपदेश करीत. त्यामुळे लोकात यज्ञयागाविषयीं अनादर आणि तपश्चर्येबद्दल आदर उत्पन्न झाला.

## यज्ञयागांची व्याप्ति

परतु राजे लोकाना युद्धांत जय मिळावा म्हणून यज्ञयाग करणे आवश्यक वाटत होते. यज्ञयाग चालू ठेवण्यासाठी कोसलाच्या पसेनदि राजाने उक्कट्ठा नावाचा गाव पोक्खरसाति (पौष्करसादि) आणि सालवतिका गाव लोहिच्च (लौहित्य) ब्राह्मणाला, त्याचप्रमाणे मगध देशांत बिंबिसार राजाने चंपा सोणदंड ब्राह्मणाला व खाणुमत गाव कूटदन्त ब्राह्मणाला इनाम दिल्याचा दाखला दीघनिकायांत सापडतो. याशिवाय खुद्द पसेनदि राजा यज्ञयाग करीत होता असें

कोसलसयुत्तातील नवव्या सुत्तावरून दिसून येते. पण या यज्ञयागाची व्याप्ति कोसलाचा पसेनदि आणि मगधाचा बिंबिसार याच्या राज्यापुरतीच होती. कारण मोठमोठाले यज्ञयाग करणे राजाना आणि इनामदार ब्राह्मणानाच काय ते शक्य होतें.

असले अवाढव्य यज्ञयाग करणे सामान्य जनतेच्या शक्तीपलीकडचे असल्यामुळे यज्ञयागाच्या लघु आवृत्त्या निघाल्या होत्या. अमुक तऱ्हेच्या लाकडाच्या अमुक तऱ्हेच्या दर्वीने, तुसाचा, कोंडयाचा, अमुक तऱ्हेच्या तादळाचा, अमुक प्रकारच्या तुपाचा, अमुक प्रकारच्या तेलाचा, अमुक प्राण्याच्या रक्ताचा होम केला असता अमुकतमुक कार्यसिद्धि होते, असें सागून ब्राह्मणलोक सामान्य जनतेला हे होम करावयास लावीत व काही श्रमण देखील यात भाग घेत असत, असे दीघनिकायातील मजकुरावरून दिसून येते.* कार्यसिद्धीसाठी हे लोक होम करीत असले, तरी त्याची गणना धार्मिक विधीत करीत नसत असे वाटते. कारण, ते होम करणाऱ्या ब्राह्मणाना आणि श्रमणाना लोक फारसे मानीत नसत.

## देवतांची पूजा

आजकाल हिंदु लोक जसे देवदेवता, यक्ष, पिशाच इत्यादिकाना मानतात व त्याची समजूत करण्यासाठी बलिदान देतात, तसेच बुद्धसमकालचे हिंदु लोक देवताना मानीत व बलिकर्म करीत. विशेष एवढाच होता की, सध्याच्या बऱ्याच दैवताना पुजारी लागतात आणि ते बहुधा ब्राह्मण असतात. याशिवाय सध्याचीं दैवते जरी बुद्धसमकालच्या दैवताप्रमाणेच काल्पनिक असली, तरी त्यापैकी बहुतेकाची पुराणे होऊन बसलीं आहेत. हा प्रकार बुद्धसमकालीं नव्हता. वडासारख्या झाडावर, एखाद्या डोंगरावर

---

* दीघनिकाय–ब्रह्मजाल, सामञ्ञफल वगैरे सुत्तें पहा.

किंवा वनात महानुभाव देवता राहतात आणि त्यांना नवस केले असता त्या पावतात, अशी लोकाची समजूत होती; आणि बकरे, कोंबडी वगैरे प्राण्याचा बळी देऊन ते आपला नवस फेडीत असत. पलास जातकाच्या (नं. ३०७) कथेवरून असें दिसते की, देवताची पूजा ब्राह्मण देखील करीत असत, पण त्यांनी त्या देवताचा पुजारी-पणा स्वतःची वृत्ति म्हणून बळकावल्याचा पुरावा कोठेच सापडत नाही. जसे आज दगडोबा म्हसोबाला किंवा जाखाई जोखाईला पुजारी ब्राह्मण नाहीत, तसे त्या वेळीं सर्वच देवताना नव्हते. लोक नवस करीत आणि मध्यस्थीशिवाय आपल्या हातानेच बलिदान देत. सुजातेने वटवृक्षवासी देवतेला दुधाच्या खिरीचा नवस केला आणि शेवटी त्या झाडाखाली बसलेल्या गोतम बोधिसत्त्वालाच तिने ती खीर दिली, ही कथा बौद्धवाङ्मयात प्रसिद्ध आहे आणि बौद्ध चित्रकलेवर तिचा उत्तम परिणाम झाल्याचे दिसून येतें. तात्पर्य, या देवदेवताच्या पूजेत पुजारी ब्राह्मणाची आवश्यकता नव्हती.

## श्रमणांचा उत्कर्ष

या देवताच्या मागे पुराणें आणि पुजारी नसल्यामुळे त्यांना आजकालचे धार्मिक स्वरूप आले नव्हते. सर्व दर्जाचे लोक आप-ल्यावरची आपत्ति टाळण्यासाठी, किंवा आपण केलेल्या नवसाला देवता पावली म्हणून, तिला बलिदान देत. पण हे कृत्य धार्मिक समजत नसत. ब्राह्मणाच्या यज्ञयागाना वेदाची आणि वैदिक वाङ्मयाची पुष्टि मिळाल्यामुळे त्याची गणना धार्मिक कृत्यात होत होती. पण हे यज्ञयाग फारच खर्चाचे असल्यामुळे, सामान्य जनतेच्या आवाक्याबाहेरचे होते. त्यात शेंकडो गाईबैल मारण्यात येत. शेतीला उपयोगी पडणारीं हीं जनावरे राजे आणि इतर प्रतिष्ठित लोकांना जबरदस्तीने हिरावून घ्यावी लागल्यामुळे सामान्य जनतेला हे

यज्ञयाग अत्यंत अप्रिय होत चालले होते. याच्या उलट श्रमणांना सामान्य लोक आदरातिथ्याने वागवीत, चातुर्मासात झोपड्या वगैरे बांधून त्यांच्या राहण्याची व्यवस्था करीत आणि त्यांचा उपदेश ऐकण्याला तत्पर असत. म्हणजे श्रमणसंघाची एकसारखी भरभराट होत चालली होती.

## उपनिषत्कालीन ऋषि

सांप्रत अशी एक समजूत प्रचलित आहे की, वेदांपासून उपनिषदे आणि त्यांच्यापासून बौद्ध, जैन वगैरे धर्म निघाल्यामुळे ते देखील वैदिक धर्मच आहेत. बौद्धांची आणि जैनांची परंपरा वेद किंवा उपनिषदे यांपासून निघाली नसून ती वेदकालापूर्वी मध्यहिंदुस्थानात अस्तित्वात असलेल्या ऋषिमुनींच्या परंपरेपासून निघाली, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल असा भरवसा वाटतो. तथापि उपनिषदांत वर्णिलेल्या ब्राह्मणांची बुद्धसमकाली कशी स्थिति होती, याचा थोडक्यात विचार करणे अप्रस्तुत होणार नाही.

आरण्यके आणि उपनिषदे बुद्धकालानंतर बऱ्याच वर्षांनी रचण्यात आलीं हें मी ‘हिंदी संस्कृति आणि अहिंसा’ या पुस्तकांत दाखवून दिले आहे. (पृ० ४८–५० पहा.) परंतु बुद्धसमकालीं उपनिषदांत वर्णिलेल्या ब्राह्मणांसारखे काही ब्राह्मण आणि क्षत्रिय होते, असें समजण्यास मुळीच हरकत नाही. पण त्यांपैकी बहुतेक होमहवनाचा धर्म सोडून शुद्ध श्रमण होत असत, असें जातकांतील पुष्कळशा गोष्टींवरून दिसून येते. उदाहरणार्थ, नंगुट्ठजातकाचा (नं. १४४) गोषवारा येथे देतों.

वाराणसींत ब्रह्मदत्त राज्य करीत असतां बोधिसत्त्व औदीच्य ब्राह्मणकुलांत जन्मला. त्याच्या जन्मदिवशीं आईबापांनी जाताग्नि ठेवला. आणि तो सोळा वर्षांचा झाल्यावर त्यांनी त्याला म्हटले,

"बाबारे, तुझ्या जन्मदिवशीं हा अग्नि स्थापित केला आहे. जर तुला गृहस्थ होऊन राहावयाचे असेल, तर तीन वेदाचें अध्ययन कर, पण जर ब्रह्मलोकपरायण होण्याची इच्छा असेल, तर हा अग्नि घेऊन अरण्यांत जा आणि त्याच्या सेवेने ब्रह्मदेवाची आराधना करून ब्रह्मलोकपरायण हो."

बोधिसत्त्वाला गृहस्थाश्रम नको होता. आपला जाताग्नि घेऊन तो अरण्यात गेला आणि तेथे आश्रम बाधून त्या अग्नीची सेवा करीत राहिला. एके दिवशी बोधिसत्त्वाला एका शेतकऱ्याने दक्षिणे-दाखल एक बैल दिला. त्याचा बळी देऊन अग्निभगवताची पूजा करण्याचा बोधिसत्त्वाचा विचार होता. पण आश्रमात मीठ शिल्लक नव्हते. ते आणण्यासाठी तो गावात गेला असता, इकडे काही गुड लोकानी त्या बैलाला मारून अग्निहोत्रावर आपणाला पाहिजे तेवढे त्याचे मास शिजवून खाल्ले व बाकीचे बरोबर नेले.

ब्राह्मण मीठ घेऊन परत आला आणि पाहतो, तो बैलाचे कातडे, शपूट आणि हाडे तेवढीं शिल्लक होती. तो स्वतःशींच म्हणाला, "हा अग्निभगवान् याच्या बलीचेच रक्षण करू शकत नाही, मग माझे रक्षण कसें करील?" असे म्हणन त्याने आपले अग्निहोत्र पाण्यात फेकून दिले आणि ऋषिप्रव्रज्या घेतली.

बुद्धाचा उपदेश ऐकून उरुवेलकाश्यप, नदीकाश्यप आणि गयाकाश्यप या तिघा ब्राह्मणबधूनी आपली अग्निहोत्रे नदीत फेकून दिल्याची कथा बौद्धवाङ्मयात प्रसिद्ध आहे.

### उपनिषदृषि

काही ब्राह्मणाना अशा रीतीने उघडपणे श्रमणधर्म स्वीकार-ण्याचे धाडस नव्हते. ते वैदिक यज्ञयाग आणि श्रमणाचे तत्त्वज्ञान याच्या दरम्यान हेलकावे खात असत; अश्वमेधावर वगैरे रूपकें

रचून त्यांतूनच आत्मतत्त्व काढण्याचा प्रयत्न करीत. उदाहरणार्थ, बृहदारण्यकोपनिषदाच्या पहिल्या अध्यायातील दुसऱ्या ब्राह्मणाच्या आरंभीं आलेली कथा पहा. तेथे ऋषि म्हणतो, "या जगात उत्पत्तीच्या पूर्वी काही एक नव्हते. मृत्यूने हे सर्व झाकले होते, ते का तर खाण्याच्या इच्छेने. कारण, खाण्याच्या इच्छेलाच मृत्यु म्हणतात. त्याला आत्मवान् व्हावे असे वाटले . मोठया यज्ञाने मी पुनरपि यजन करावे अशी तो मृत्यु कामना करता झाला. अशी कामना करून तो श्रांत झाला; तप करू लागला. त्या श्रांत व तपाने तप्त झालेल्या मृत्यूपासून यश व वीर्य उत्पन्न झाले. प्राण हे यश आणि हेच वीर्य आहे. याप्रमाणे ते प्राण शरीर सोडून निघून गेले असता ते प्रजापतीचे शरीर फुगले. तथापि त्याचे मन त्या शरीरात होते. माझे हे शरीर मेध्य (यज्ञिय) व्हावे व त्यायोगे मी आत्मवान् (आत्मन्वी) व्हावें, अशी तो कामना करता झाला. ज्याअर्थी ते शरीर माझ्या वियोगाने यश आणि वीर्य यानी विरहित होत चालले, फुगले, त्याअर्थी तो अश्व (फुगलेला) झाला. आणि ज्याअर्थी ते मेध्य झाले त्याअर्थी तेंच अश्वमेधाचे अश्वमेधत्व आहे. जो या अश्वाला याप्रमाणे जाणतो तोच अश्वमेधाला जाणतो."

यात अश्वमेधाच्या मिषाने तपश्चर्याप्रधान अहिंसाधर्म सांगण्याचा प्रयत्न दिसतो. खाण्याची इच्छा हाच मृत्यु. तो आत्मवान् झाला म्हणजे त्याला व्यक्तित्व आले आणि क्रमशः त्याला यज्ञाची इच्छा उद्भवली. त्या इच्छेपासून यश आणि वीर्य हे दोन गुण निघाले, ते खरे प्राण होत. ते जर निघून गेले, तर शरीर मरून फुगल्यासारखें (अश्वयित) समजावे. आणि ते जाळून टाकण्याला योग्य आहे. हे तत्त्व जो जाणतो तोच अश्वमेध जाणतो.

छांदोग्य उपनिषदात प्रवाहण जैवलि अरुणाच्या पुत्राला म्हणतो, "हे गौतमा, द्युलोक हाच अग्नि आहे. त्याची आदित्य

हीच समिधा, किरण हा धूम, दिवस ही ज्वाला, चन्द्रमा हे निखारे, आणि नक्षत्रे किटाळे (विस्फुलिंग) आहेत." (छा. उ. ५।४)

यावरून असें दिसून येईल की, या ब्राह्मण ऋषीच्या मनावर श्रमण संस्कृतीचा पूर्ण पगडा बसला होता, पण व्यवहारात तीं तत्त्वें उघड उघड प्रतिपादणे त्याना इष्ट वाटत नव्हते, आणि म्हणूनच अशा रूपकात्मक भाषेचा ते प्रयोग करीत.

## उपनिषदृषि देखील जातिभेद मानीत नव्हते

पूर्वीचे ऋषिमुनि, श्रमण आणि उपनिषदृषि याच्यामध्ये एका बाबतीत एकवाक्यता होती. ही बाब म्हटली म्हणजे जातिभेदाची होय. मातग ऋषीची गोष्ट वर आलीच आहे. तिजवरून ऋषिमुनीत जातिभेद नव्हता हे स्पष्ट होते. श्रमणसघात तर जातिभेदाला मुळीच थारा नव्हता आणि उपनिषदृषि देखील जातीला फारसे महत्त्व देत नसत हे खालील गोष्टीवरून दिसून येईल.

सत्यकाम आपली आई जबाला हिला म्हणाला, "आई, मी ब्रह्मचर्याचे आचरण करू इच्छितों. (ब्रह्मज्ञान मिळवण्याची इच्छा करतों.) माझे गोत्र कोणते हे साग." ती त्याला म्हणाली, "बाळ, हे मला माहीत नाही. तरुणपणीं मी पुष्कळांपाशीं राहिले (बहृवह चरन्ती) आणि तू जन्मलास. तेव्हा तुझे गोत्र मी जाणत नाही. माझे नाव जबाला आणि तुझे नाव सत्यकाम आहे. म्हणून तू सत्यकाम जाबाल आहेस असें साग."

तो (सत्यकाम) हारिद्रुमत गौतमाला म्हणाला, "आपणापाशीं ब्रह्मज्ञान शिकण्याच्या उद्देशाने मी आलो आहें."

गौतम म्हणाला, "तुझे गोत्र कोणतें ?"

सत्यकाम म्हणाला, "ते मला माहीत नाही. आईला मी विचारले. पण ती मला म्हणाली की, तारुण्यात पुष्कळ पुरुषांशीं सबध

आल्यामुळे आपणाला गोत्र माहीत नाही. तेव्हा तू सत्यकाम जाबाल आहेस असे सांग."

त्याला गौतम म्हणाला, "तू सत्यापासून च्युत झाला नाहीस. अब्राह्मणाला हे शक्य नव्हे. म्हणून समिधा घेऊन ये. तुझे उपनयन करतो." असे म्हणून या ऋषीने त्याचे उपनयन केले. (छां. उ. ४।४).

## गुप्तांच्या कारकीर्दीपासून जातिभेद बळावला

उपनिषदृषि जरी जातिभेद पाळीत असत, तरी जातीपेक्षा सत्याला ते विशेष मान देत हे सत्यकामाच्या गोष्टीवरून सिद्ध होते. परंतु त्याच उपनिषदांचा समन्वय करू पाहणारे बादरायण व्यास आणि भाष्यकार शंकराचार्य जातिभेदाचे किती स्तोम माजवतात पहा:—

श्रवणाध्ययनार्थप्रतिषेधात्स्मृतेश्च। अ० १।३।३८

इतश्च न शूद्रस्याधिकार: । यदस्य स्मृते: श्रवणाध्ययनार्थप्रतिषेधो भवति । वेदश्रवणप्रतिषेधो वेदाध्ययनप्रतिषेधस्तदर्थज्ञानानुष्ठानयोश्चप्रतिषेध शूद्रस्य स्मर्यते। श्रवणप्रतिषेधस्तावत् 'अथास्य वेदमुपशृण्वतस्त्रपुजतुभ्यां श्रोत्रप्रपूरणम्' इति। 'पद्युह वा एतत् श्मशानं यच्छूद्रस्तस्माच्छूद्रसमीपे नाध्येतव्यम्' इति च। अत एवाध्ययनप्रतिषेध: । यस्य हि समीपेऽपि नाध्येतव्यं भवति, स कथमश्रुतमधीयीत। भवति च वेदोच्चारणे जिह्वाच्छेदो धारणे शरीरभेद इति। अत एव चार्थादर्थज्ञानानुष्ठानयो प्रतिषेधो भवति 'न शूद्राय मतिं दद्यात्' इति। (ब्रह्मसूत्रशांकरभाष्य अ० १।३।३८.)

"आणि म्हणूनच शूद्राला (ब्रह्मज्ञानाचा) अधिकार नाही. कारण, स्मृतीने त्याला वेद ऐकण्याचा व अध्ययन करण्याचा प्रतिषेध केला आहे. वेदश्रवणाचा प्रतिषेध, वेदाध्ययनाचा प्रतिषेध आणि त्याचें अर्थज्ञान व अनुष्ठान यांचा प्रतिषेध स्मृतीने शूद्राला केला आहे. श्रवणप्रतिषेध असा, 'त्याने वेदवाक्य ऐकले तर त्याचे कान

लाखेने आणि शिशाने भरावे'. 'शूद्र म्हणजे पाय असलेले स्मशान होय. म्हणून शूद्राच्या जवळपास अध्ययन करू नये.' आणि म्हणूनच अध्ययनप्रतिषेध देखील होतो. कारण ज्याच्या जवळपास देखील अध्ययन करता कामा नये, तो स्वतः श्रुतीचे अध्ययन कसे करील ? आणि त्याने वेदोच्चारण केले असता त्याचा जिव्हाच्छेद करावा, (वेदमंत्राचे) धारण केले असता ठार मारावे (शरीरभेद करावा), असे सांगितले आहे. यास्तव त्याने वेदाचे अर्थज्ञान आणि अनुष्ठान करू नये, असे सिद्ध होते. 'शूद्राला मति देऊ नये.' "

शंकराचार्यांनी शूद्राचा छळ करण्यासाठी घेतलेले आधार गौतमधर्मसूत्र इत्यादि गुप्त राजांच्या समकाली झालेल्या ग्रंथांतील आहेत. म्हणजे समुद्रगुप्तापासून (इ० स० च्या ४थ्या शतकापासून) तहत् शंकराचार्यांपर्यंत (इ० स० च्या ९व्या शतकाच्या आरंभापर्यंत) आमच्या ब्राह्मण पूर्वजांचा शूद्रांना दाबून आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न अव्याहत चालू होता असे दिसते. धर्मसूत्रकार आणि शंकराचार्य यांच्यामध्ये फरक एवढाच की, सूत्रकारांच्या वेळीं मुसलमान लोकांनी या प्रदेशांत प्रवेश केला नव्हता आणि शंकराचार्यांच्या वेळी सिंध देश मुसलमानांच्या ताब्यात गेला असून तेथे मुसलमानी धर्माचा एकसारखा प्रसार होत होता. त्यांच्याकडून तरी आमच्या आचार्यांनी समानत्वाचा धडा शिकावयास पाहिजे होता. तसें न करता हे आचार्य आपले जातिभेदाचे घोडे तसेंच दामटीत राहिले. त्याचे परिणाम या हतभागी देशाला कसे भोगावे लागले, हे इतिहास सांगतच आहे.

## स्त्री साध्वींचे संघ

तपस्वी ऋषिमुनींत किंवा वैदिक ऋषींत स्त्रियांचा समावेश झाला नव्हता. गार्गी वाचक्नवी सारख्या स्त्रिया ब्रह्मज्ञानाच्या चर्चेत

भाग घेत होत्या.* परंतु त्यांचे स्वतंत्र संघ नव्हते. स्त्रियांचे स्वतंत्र संघ बुद्धकालापूर्वी एकदोन शतकें स्थापन झाले. त्यांपैकी सर्वांत जुना जैन साध्वींचा संघ होता, असें वाटतें. या जैन साध्वी वाद-विवादांत पटाईत होत्या, हें भद्रा कुंडलकेशा† इत्यादिकांच्या गोष्टी-वरून समजून येईल.

पूर्वीचे ऋषिमुनि जंगलांत राहत आणि गावांत क्वचितच संचार करीत. यास्तव त्यांना स्त्रियांचे संघ स्थापन करणें शक्य नव्हतें. परंतु श्रमण लोक वस्तीच्या आसपास राहत आणि त्या काळची परिस्थिति अनुकूल असल्यामुळें त्यांना स्त्रियांचे संघ स्थापतां आले. बौद्ध आणि जैन वाङ्मय वाचलें असतां एक विशेष गोष्ट दिसून येते ती ही की, त्या काळीं स्त्रिया धार्मिक बाबतींत पुरुषांप्रमाणेंच पुढारलेल्या होत्या. याचें कारण गणसत्ताक राज्यांत स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य असे. बुद्ध भगवंतानें वज्जींना जे उन्नतीचे सात नियम घालून दिले, त्यांपैकी पांचवा, 'स्त्रियांचा मान राखला पाहिजे, विवाहित किंवा अविवाहित स्त्रीवर कोणत्याही प्रकारें बलात्कार होऊं देतां नये' हा आहे. आणि त्याला अनुसरून बुद्धाच्या मरणापर्यंत तरी वज्जी लोक वागत असत. वज्जींप्रमाणेंच मल्लांच्या राज्यांत देखील बायकांचा मान ठेवण्यांत येत होता असें मानण्यास हरकत नाहीं. अंग, काशी, शाक्य, कोलिय इत्यादि गणसत्ताक राज्यांचें स्वातंत्र्य नष्ट झालें होतें, तरी अन्तर्गत व्यवस्था त्यांच्या हातांत असल्यामुळें त्यांच्या राज्यांत स्त्रीस्वातंत्र्याला फारसा धक्का पोंचला नाहीं.

मगध आणि कोसल या देशांत एकसत्ताक राज्यपद्धति दृढमूल झाली असली, तरी त्या देशांच्या राजांना मूळच्या गणसत्ताक

---

* बृ. उ० ३।६।१ इत्यादि.

† बौद्धसंघाचा परिचय, पृ. २१४–२१७ पहा.

राज्यपद्धतीचे समूळ उन्मूलन करता आले नाही. बिंबिसार महाराजाने किंवा पसेनदि महाराजाने कोणत्याही स्त्रीला जबरदस्तीने आपल्या जनानखान्यात आणल्याचा दाखला कोठेच सापडत नाही.

## कांही एकसत्ताक राज्यांत स्त्रियांचा मान

गणसत्ताक राज्यपद्धति लोकांच्या स्मृतिपथातून जात चालली आणि एकसत्ताक राज्यपद्धति जसजशी प्रबल होत गेली, तसतसें स्त्रियांचे स्वातंत्र्य देखील संपुष्टात येत चालले. तथापि कांही राजे स्त्रियांचा योग्य मान ठेवीत असे उन्मादयन्तीच्या (उम्मदंतीच्या) गोष्टीवरून दिसून येईल.*

बोधिसत्त्व शिवि राजकुलात जन्मला. त्याला शिविकुमार असेंच म्हणत. शिविराजाच्या सेनापतीचा पुत्र अभिपारक आणि शिविकुमार समवयस्क होते. तक्षशिलेला जाऊन त्या दोघांनी शास्त्राध्ययन केले. बापाच्या मरणानंतर शिविकुमार राजा झाला. आणि सेनापतीच्या मरणानंतर त्याने अभिपारकाला सेनापति केले. अभिपारकाने उन्माद-यन्ती नावाच्या अत्यंत सुस्वरूप श्रेष्ठिकन्येशी लग्न केले. राजा नगरप्रदक्षिणेला निघाला असता खिडकीत उभी असलेल्या उन्मा-दयंतीची व त्याची दृष्टादृष्ट झाली. राजा तिच्यावर मोहित होऊन उन्मत्त झाला व राजवाड्यात जाऊन बिछान्यावर पडून राहिला. अभिपारकाला हे वर्तमान समजले, तेव्हा राजाजवळ जाऊन आपल्या बायकोचा स्वीकार करून उन्मत्तपणा सोडून देण्याबद्दल राजाची याने प्रार्थना केली. त्यामुळे राजा शुद्धीवर येऊन म्हणाला, "हा शिवींचा धर्म नव्हे. मी शिवींचा पुढारी आहें. आणि शिवींचा धर्म अनुपालन करणे माझे कर्तव्य आहे, म्हणून माझ्या चित्तविकाराला वश होणें मला योग्य नव्हे."

* उम्मदंतीजातक नं. ५२७.

ही कथा विस्तृत आणि रोचक आहे. तिचे सार तेवढे येथे दिले आहे. ही रचणाराच्या वेळी गणसत्ताक राज्यपद्धति पार नष्ट झाली होती असे दिसतें. तथापि शिवीसारख्या गणसत्ताक राजाचे स्त्रियाविषयीचे कर्तव्य त्याला पूर्णपणे माहीत होतें, आणि ते सर्वसत्ताधारी राजानी लक्षात ठेवावे असा त्याचा हेतु होता. शिविकुमाराच्या भाषणाच्या शेवटी त्याने ही गाथा घातली आहे—

नेता पिता उग्गतो रट्ठपालो
धम्म शिवीन अपचायमानो ।
सो धम्ममेवानुविचिन्तयन्तो
तस्मा सके चित्तवसे न वत्ते ॥

'मी शिवीचा नेता, पिता आणि राष्ट्रपालक पुढारी आहें म्हणून शिवीच्या कर्तव्याला मान देऊन आणि शिवीच्या धर्माचा नीट विचार करून माझ्या स्वतःच्या चित्तविकाराला मी वश होणार नाही.'

## बालविवाहाची प्रथा

या गोष्टीचा परिणाम बौद्ध राजावर तरी चांगलाच झाला असला पाहिजे. पण त्यामुळे दुसरीच एक वाईट चाल निघाली असावी. ब्रह्मदेशांतील राजे विवाहित स्त्रीला आपल्या झनानखान्यात ठेवीत नसत; जरी विवाहित स्त्रीच्या पतीने आपल्या बायकोशीं काडीमोड करून तिला राजाच्या हवाली करण्याचे कबूल केले, तरी हा मोठा अधर्म समजत असत. पण अविवाहित स्त्रीला तिच्या आईबापाच्या समतीशिवाय खुशाल उचलून घेऊन जात. राजा आपल्या मुलीला जबरदस्तीने नेईल या भयाने आईबाप मुलीचे लग्न लहानपणींच करून त्याच्या गळयात मगळसूत्र बांधीत. ही लग्ने साफ खोटीं असत. मुली नवऱ्याच्या घरीं जात नसत, एवढेच

नव्हे, तर पहिला नवरा सोडून वाटेल त्या नवऱ्याशीं लग्न लावण्यास त्याना पूर्ण मुभा असे. केवळ राजाच्या जुलमापासून मुलीचे रक्षण करण्याचा हा उपाय होता. हिंदुस्थानात बालविवाहाची दृढमूल झालेली चाल अशाच परिस्थितींतून निघाली की काय हे सागता येणे शक्य नाही. पण ही चाल बुद्धसमकाली सार्वत्रिक झाली नव्हती आणि एकसत्ताक राज्यपद्धति बळकट झाल्यावर ती धार्मिक होऊन बसली, याबद्दल शका नाही. हिंदुस्थानात गणसत्ताक राज्यपद्धतीचा विकास झाला असता, तर बालविवाहाला मुळीच थारा मिळाला नसता, हे सागावयालाच नको.

## चार प्रकारचे श्रमणब्राह्मण

बुद्धकालापर्यंत चार प्रकारचे श्रमणब्राह्मण झाले, याच्यावर एक रूपक व त्याचे स्पष्टीकरण मज्झिमनिकायांतील निवापसुत्तांत सापडतें. त्याचा सारांश असा:—

बुद्ध भगवान् श्रावस्ती येथे अनाथपिंडिकाच्या आरामात राहत असतां भिक्षूना उद्देशून म्हणाला, "भिक्षुहो, कुरण लावणारा मनुष्य तें मृगांच्या कल्याणासाठी लावीत नसतो. या कुरणातील गवत खाऊन मृग प्रमत्त व्हावेत व सर्वस्वी आपल्या ताब्यात यावेत, असा त्याचा हेतु असतो.

"(१) भिक्षुहो, अशा एका कुरणामध्ये मृग शिरले आणि ते यथास्थित गवत खाऊन प्रमत्त झाल्यामुळे त्या कुरण लावणाऱ्या मनुष्याच्या ताब्यात गेले. (२) ते पाहून दुसऱ्या काही मृगानी असा विचार केला की, या कुरणात शिरणें अतिशय अनिष्ट आहे. ते कुरण सोडून देऊन ते ओसाड अरण्यात गेले. उन्हाळ्याचे दिवस आल्यावर तेथे त्याना चारापाणी मिळेनासे झालें. आणि त्यामुळे

त्यांच्या शरीरांत बळ राहिले नाही. उदरपीडेने त्रस्त होऊन ते त्या कुरणांत शिरले आणि प्रमत्तपणे चारापाण्याचा उपभोग घेऊ लागल्यामुळे त्या मनुष्याच्या ताब्यात गेले. (३) तिसऱ्या काही मृगानी हे दोन्ही मार्ग सोडून देऊन कुरणाच्या जवळच्या जगलाचा आश्रय धरला व मोठ्या सावधगिरीने ते कुरणातील गवत खाऊ लागले. बराच काळपर्यंत कुरणाच्या मालकाला ते समजले नाही. काही काळाने त्याने त्या मृगाचे आश्रयस्थान शोधून काढले आणि त्या जागेभोवती जाळी पसरून त्या मृगाना हस्तगत केले. (४) पण चौथे मृग फार हुशार होते. त्यानी कुरणापासून दूर अतरावर गहन अरण्यात वस्ती केली, आणि तेथून ते कुरणातील चारापाण्याचा सावधगिरीने उपभोग घेऊ लागले. त्याच्या आश्रयस्थानाचा पत्ता कुरणाच्या मालकाला लागला नाही.

"भिक्षुहो, मी हे रूपक केले आहे. कुरण लावणारा मनुष्य दुसरा कोणी नसून मार आहे. (१) ज्या श्रमणब्राह्मणानी विषयसुखामध्येच आनद मानला, ते पहिले मृग होत. (२) विषयसुखाच्या भयाने ज्यानी अरण्यवास पत्करला आणि जे सर्व जगापासून वेगळे झाले, ते दुसरे मृग. (३) जे श्रमणब्राह्मण विषयाचा उपयोग मोठ्या सावधगिरीने घेऊन 'जग हे शाश्वत आहे की अशाश्वत आहे, आत्मा अमर आहे की नाशवत आहे' इत्यादि प्रश्नाविषयीं वादविवाद करतात व आपला वेळ फुकट घालवतात, ते तिसरे मृग. (४) परतु जे असल्या वादविवादात न पडता आपले अत करण निष्कलक ठेवण्याविषयीं काळजी घेतात, ते चौथे मृग होत."

या सुत्तात सागितलेले पहिले श्रमण ब्राह्मण म्हटले म्हणजे यज्ञयागात व सोमरसपानात धर्मसर्वस्व समजणारे वैदिक ब्राह्मण होत. वैदिक हिंसेला आणि सोमपानाला कटाळून जे अरण्यात शिरले, आणि तेथील कदमूलावर निर्वाह करू लागले, ते ऋषिमुनि

दुसऱ्या प्रकारचे श्रमण ब्राह्मण समजावेत. अरण्यात फळेमुळे मिळेनाशीं झाली, किंवा खारट अगर आंबट पदार्थ खाण्याची इच्छा झाली, म्हणजे ते लोक गावात येत आणि प्रपंचाच्या जाळ्यात फसत. याचे एक उदाहरण वर (पृ० ९४--९९) दिलेच आहे. ऋषिमुनींचा फळामुळांवर निर्वाह करण्याचा मार्ग सोडून ज्यांनी भिन्न भिन्न श्रमणसंप्रदाय स्थापन केले, ते तिसऱ्या प्रकारचे श्रमण-ब्राह्मण होत. हे परिव्राजक गहन जंगलात न जाता लोकवसतीच्या आश्रयाने रहात आणि लोकांकडून मिळालेल्या अन्नवस्त्राचा मोठ्या सावधगिरीने उपभोग घेत. पण ते 'आत्मा आहे किंवा नाही' इत्यादि वादात गढून जात. त्यामुळे त्यांची आत्मशुद्धि न होता ते माराच्या जाळ्यात सापडत. बुद्धाने हे सर्व निरर्थक वाद सोडून देऊन अध्यात्मशुद्धीचा मार्ग शोधून काढला. त्याच्या भिक्षूंची चौथ्या श्रमणब्राह्मणात गणना केली आहे. इतर श्रमणब्राह्मणांच्या आणि बुद्धाच्या आत्मवादात कसा फरक होता, याचे स्पष्टीकरण सातव्या प्रकरणात करण्यांत येईल. येथे एवढेच सांगावयाचे आहे की, या चार प्रकारच्या श्रमणब्राह्मणात उपनिषद्‌पीचा मुळीच समावेश होत नाही; आणि यावरून, उपनिषदांपासून बौद्धधर्म निघाला, ही कल्पना निराधार ठरते.

---

## प्रकरण चवथें

# गोतम बोधिसत्त्व

### गोतमाची जन्मतिथि

गोतमाच्या जन्मतिथीसंबंधाने अर्वाचीन पंडितांत बराच मतभेद आढळतो. दिवाण बहादूर स्वामिकन्नू पिल्ले यांच्या मतें बुद्धाचे परिनिर्वाण ख्रिस्तापूर्वी ४७८ व्या वर्षी झालें. इतर काही पंडितांचे

म्हणणें की, तें ख्रिस्तापूर्वी ४८६–८७ व्या वर्षी घडले. पण आजकाल लागलेल्या नवीन शोधावरून महावस आणि दीपवस यात दिलेली बुद्धपरिनिर्वाणाची तिथिच योग्य ठरते.* या ग्रथावरून बुद्धाचे परिनिर्वाण ख्रिस्तापूर्वी ५४३ व्या वर्षी झाले, असे सिद्ध होते, आणि बुद्धपरिनिर्वाणाची ही तिथि गृहीत धरली, तर बुद्धाचा जन्म ख्रिस्तापूर्वी ६२३ व्या वर्षी झाला असे म्हणावे लागते.

## बोधिसत्त्व

गोतमाच्या जन्मापासून बुद्धत्वापर्यंत त्याला बोधिसत्त्व म्हणण्याची वहिवाट फार प्राचीन आहे. पालि वाङ्मयात सगळ्यात प्राचीन जो सुत्तनिपात त्यात म्हटले आहे की,

सो बोधिसत्तो रतनवरो अतुल्यो ।
मनुस्सलोके हितसुखताय जातो ।
सक्यान गामे जनपदे लुम्बिनेय्ये ।

श्रेष्ठ रत्नाप्रमाणे अतुलनीय असा तो बोधिसत्त्व लुम्बिनी जनपदात शाक्यांच्या गावीं मानवाच्या हितसुखासाठी जन्मला.

बोधि म्हणजे मनुष्याच्या उद्धाराचे ज्ञान, आणि त्यासाठी प्रयत्न करणारा जो प्राणी (सत्त्व) तो बोधिसत्त्व होय. आरभीं गोतमाच्या जन्मापासून त्याला सबोधिज्ञान होईपर्यंत हे विशेषण लावीत असावे. होता होतां त्याने त्या जन्मापूर्वी दुसरे अनेक जन्म घेतले, अशी कल्पना प्रचलित झाली; आणि त्या पूर्व जन्मात देखील त्याला बोधिसत्त्व हे विशेषण लावण्यांत येऊं लागले. त्याच्या पूर्वजन्मींच्या कथाचा सग्रह जातकात केला आहे; त्या गोष्टींमध्ये जे कोणी मुख्य पात्र असेल, त्याला बोधिसत्त्व ही सज्ञा लावून तो

* The Early History of India by V. A Smith (Oxford 1924) p. 49-50

पूर्वजन्मीचा गोतमच होता असे म्हटले आहे. ज्या कथेत योग्य पात्र सापडले नाही, तेथे बोधिसत्त्वाला कथेशी विशेष संबंध नसलेल्या एखाद्या वनदेवतेचे किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचे स्वरूप देऊन कसा तरी संबंध जुळवून आणला आहे. अस्तु. येथे गोतमाच्या जन्मापासून बुद्धत्वापर्यंत त्याला बोधिसत्त्व या नावाने संबोधावयाचे आहे, त्याच्या पूर्वजन्माशीं या विशेषणाचा काही संबंध नाही, असे समजावे.

## बोधिसत्त्वाचें कुल

बोधिसत्त्वाच्या कुळाची आणि बाळपणाची माहिती त्रिपिटकांत फार थोडी सापडते. ती प्रसंगवशात् उपदेशिलेल्या सुत्तांत आली असून तिचा आणि अट्ठकथांत सापडणाऱ्या माहितीचा कधी कधी मुळीच मेळ बसत नाही. यास्तव, या परस्परविरोधी माहितीची नीट छाननी करून त्यातून काय निष्पन्न होते तें पाहणे योग्य आहे.

मज्झिमनिकायाच्या चूळदुक्खक्खन्ध सुत्ताच्य अट्ठकथेंत गोतमाच्या कुटुंबाची माहिती सापडते ती अशी:—

"शुद्धोदन, शुक्लोदन, शाक्योदन, धोतोदन आणि अमितोदन हे पांच भाऊ. अमितादेवी त्यांची बहीण. तिष्यस्थविर तिचा मुलगा. तथागत आणि नंद शुद्धोदनाचे मुलगे. महानाम आणि अनुरुद्ध शुक्लोदनाचे, आणि आनन्दस्थविर अमितोदनाचा मुलगा. तो भगवंतापेक्षा लहान, आणि महानाम मोठा."

येथे दिलेल्या अनुक्रमाप्रमाणे अमितोदन शेवटला भाऊ दिसतो व त्याचा मुलगा आनंद भगवंतापेक्षा वयाने लहान होता, हे ठीकच आहे. परंतु मनोरथपूरणी अट्ठकथेत अनुरुद्धासंबंधाने लिहितांना 'अमितोदनसक्कस गेहे पटिसंधि गण्हि' (अमितोदन शाक्याच्या घरीं जन्मला) असें म्हटले आहे! एकाच बुद्धघोषा-

*बौद्धसंघाचा परिचय, पृ० १५४ पहा.

चार्याने लिहिलेल्या या दोन अट्ठकथात असा विरोध दिसतो. पहिल्या अट्ठकथेत आनद अमितोदनाचा मुलगा होता असे म्हणतो; आणि दुसऱ्या अट्ठकथेत अनुरुद्ध त्याचा मुलगा म्हणतो. तेव्हा शुक्लोदन इत्यादि नावे देखील काल्पनिक आहेत की काय असा सशय येतो.

## बोधिसत्त्वाचें जन्मस्थान

सुत्तनिपाताच्या वर दिलेल्या अवतरणांत बुद्धाचा जन्म लुम्बिनी जनपदात झाला असे आहे. आजला देखील या ठिकाणाला लुम्बिनीदेवी असे म्हणतात आणि त्या ठिकाणी जो जमिनीत गाडून गेलेला अशोकाचा शिलास्तभ सापडला, त्याच्यावरील लेखात "लुमिनिगामे उबालिके कते" हे वाक्य आहे. अर्थात् बोधिसत्त्वाचा जन्म लुम्बिनी गावात झाला, असे पूर्णपणे सिद्ध होते.

दुसऱ्या अनेक सुत्तातून महानाम शाक्य कपिलवस्तूचा राहणारा होता अशा अर्थाचा उल्लेख सापडतो. पण शुद्धोदन कपिलवस्तूत होता असा महावग्गात तेवढा उल्लेख आहे. लुम्बिनीग्राम आणि कपिलवस्तु याच्यामध्ये १४।१५ मैलाचे अतर होते. तेव्हा शुद्धोदन कधी कधी लुम्बिनी गावाच्या आपल्या जमीनदारीत राहत होता व तेथेच बोधिसत्त्व जन्मला असे म्हणावें लागेल. पण खाली दिलेल्या अगुत्तरनिकायाच्या तिकनिपातातील १२४ व्या सुत्तावरून या विधानालाही बळकट बाधा येते.

## कालामाचा आश्रम

एके समयीं भगवान् कोसल देशात प्रवास करीत करीत कपिलवस्तूला आला. तो आल्याचे वर्तमान ऐकून महानाम शाक्याने त्याची भेट घेतली. तेव्हा महानामाला त्याने आपणाला एक रात्र राहण्यासाठी जागा पाहण्यास सागितले. परतु भगवताला राहण्यासाठी योग्य जागा महानामाला कोठेच सापडली नाही. परत येऊन

तो भगवताला म्हणाला, "भदन्त, आपणासाठी योग्य जागा मला सापडत नाही. आपला पूर्वीचा सब्रह्मचारी भरण्डु कालाम याच्या आश्रमात आपण एक रात्र रहा." भगवताने महानामाला तेथे आसन तयार करावयास सांगितलें व तो त्या रात्रीं त्या आश्रमांत राहिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं महानाम भगवताच्या भेटीला गेला. तेव्हा भगवान् त्याला म्हणाला, "या लोकीं, हे महानाम, तीन प्रकारचे धर्मगुरु आहेत. पहिला कामोपभोगाचा समतिक्रम (त्याग) दाखवितो, पण रूपाचा आणि वेदनाचा समतिक्रम दाखवीत नाही. दुसरा कामोपभोगाचा व रूपाचा समतिक्रम दाखवितो, पण वेदनाचा समतिक्रम दाखवीत नाही. तिसरा ह्या तिहींचाही समतिक्रम दाखवितो. ह्या धर्मगुरूंचें ध्येय एक आहे की भिन्न आहे?"

त्यावर भरण्डु कालाम म्हणाला, "हे महानाम, या सर्वांचें ध्येय एकच आहे असें म्हण." पण भगवान् म्हणाला, "महानामा, त्याचे ध्येय भिन्न आहे असे म्हण." दुसऱ्यादा व तिसऱ्यादाही भरण्डूने त्याचे एकच ध्येय असे म्हणण्यास सागितले; व भगवताने त्यांचीं ध्येयें भिन्न आहेत असे म्हणण्यास सागितले. महानामासारख्या प्रभावशाली शाक्यासमोर श्रमण गोतमाने आपला उपमर्द केला असें वाटून भरण्डु कालाम जो कपिलवस्तूहून चालता झाला, तो कधीही परत आला नाही.

## भरण्डु-कालाम-सुत्तावरून होणारा उलगडा

या सुत्ताचे समग्र भाषातर येथे दिले आहे. त्यावरून बुद्ध-चरित्रातील दोन तीन गोष्टींचा चागला उलगडा होतो. त्यांत पहिली ही की, बुद्ध झाल्यानतर भगवान गोतम मोठया भिक्षुसघासह कपिल-वस्तूला आला नाही, आणि त्याचा शाक्यानी बहुमान केला नाही

तो एकाकी आला; आणि त्याच्यासाठी योग्य जागा शोधण्याला महानामाला मोठा त्रास पडला. शुद्धोदन राजाने जर बोधिसत्त्वासाठी तीन प्रासाद बांधले होते, तर त्यापैकी एक खाली करून बुद्धाला कां देण्यांत आला नाही? शाक्याचे कपिलवस्तूमध्ये एक सस्थागार (म्हणजे नगर-मदिर) असल्याचा उल्लेख अनेक ठिकाणीं सापडतो. बुद्धाच्या उतार वयात शाक्यानी हे सस्थागार पुन: बाधले, आणि त्यात प्रथमत: बुद्धाला भिक्षुसघासह एक रात्र राहावयास विनती करून धर्मोपदेश करावयास लावले.* पण वरच्या प्रसगीं बुद्धाला त्या सस्थागारात राहण्यास मिळाले नाही. म्हणजे बुद्ध शाक्यापैकी एक सामान्य तरुण असून त्याची कपिलवस्तूत फारशी महती नव्हती असें दिसतें.

दुसरी गोष्ट ही की, गोतमाने गृहत्याग करण्यापूर्वी कपिलवस्तूमध्ये हा कालामाचा आश्रम अस्तित्वात होता. कालामाचा धर्म जाणण्यासाठी त्याला मगधाच्या राजगृहापर्यंत प्रवास करण्याची मुळीच आवश्यकता नव्हती. कालामाचे तत्त्वज्ञान तो कपिलवस्तूमध्ये शिकला, हे या सुत्तावरूनच सिद्ध होतें.

तिसरी गोष्ट ही की, महानाम शाक्य बुद्धाचा चुलतभाऊ असता तर त्याची व्यवस्था त्याने भरण्डु कालामाच्या आश्रमात न करतां आपल्या घराशेजारी कोठे तरी प्रशस्त जागी केली असती. श्रमण गृहस्थाच्या घरीं तीन दिवसाच्यापेक्षा जास्त राहत नसत. येथे तर एका रात्रीपुरतीच राहण्याची व्यवस्था पाहिजे होती; आणि ती देखील महानामाला आपल्या घरीं किंवा आपल्या अतिथिगृहात करतां आली नाही. एक तर महानामाचे घर अगदीच लहान असावें, किंवा बुद्धाला एक रात्र आश्रय देण्याचें त्याला कारण वाटलें नसावें.

---

* सळायतन सयुत्त, आसीविसवग्ग, सुत्त ६ पहा

या सर्व गोष्टीचा विचार केला असता असें वाटते की, महानाम शाक्य आणि भगवान् बुद्ध याचा फार निकट संबंध नव्हता, आणि शुद्धोदन शाक्य तर कपिलवस्तूहून चौदा मैलांच्या अंतरावर राहत होता. त्याचा आणि कपिलवस्तूचा फार थोडा संबंध असावा. शाक्यांची सभा भरली, तरच तो कपिलवस्तूला जात असावा.

## भद्दिय राजाची कथा

महापदानसुत्तात शुद्धोदनाला राजा म्हटले असून त्याची राजधानी कपिलवस्तु होती असे म्हटले आहे. परंतु विनयपिटकातील चुल्लवग्गात जी भद्दियाची कथा आली आहे, तिचा या विधानाशी पूर्णपणे विरोध येतो.

अनुरुद्धाचा थोरला भाऊ महानाम पित्याच्या मरणानंतर घरची सर्व व्यवस्था पाहत असे. अनुरुद्धाला प्रपंचाची माहिती मुळीच नव्हती. बुद्ध भगवंताची सर्वत्र प्रसिद्धि झाल्यावर थोर थोर शाक्य कुळांतील तरुण भिक्षु होऊन त्याच्या संघात प्रवेश करू लागले. हें पाहून महानाम अनुरुद्धाला म्हणाला, "आमच्या कुळांतून एकही भिक्षु झाला नाही, तेव्हा तू तरी भिक्षु हो, किंवा मी तरी भिक्षु होतो." अनुरुद्ध म्हणाला, "मला हे काम झेपणार नाही, तुम्हीच भिक्षु व्हा."

महानामाने ही गोष्ट कबूल केली व धाकटया भावाला तो प्रपंचाची माहिती करून देऊ लागला. तो म्हणाला, "प्रथमतः शेत नांगरले पाहिजे. नंतर पेरणी केली पाहिजे. त्यानंतर त्याला कालव्याचे पाणी द्यावे लागते. पाणी बाहेर काढून त्याची खुरपणी करतात. आणि ते पिकले म्हणजे कापणी करावी लागते."

अनुरुद्ध म्हणाला, "ही खटपट फारच मोठी दिसते. घरचा व्यवहार तुम्हीच सांभाळा. मी भिक्षु होतो." पण या कामीं त्याला

आपल्या आईची समति मिळेना. आणि तो तर हट्ट धरून बसला, तेव्हा ती म्हणाली, "शाक्याचा राजा भद्दिय जर तुझ्याबरोबर भिक्षु होत असेल, तर मी तुला भिक्षु होण्यास परवानगी देते."

भद्दिय राजा अनुरुद्धाचा मित्र होता. पण तो राज्यपद सोडून भिक्षु होणार नाही, असे अनुरुद्धाच्या आईला वाटले, आणि म्हणूनच तिने ही अट घातली. अनुरुद्ध आपल्या मित्राजवळ जाऊन त्यालाही भिक्षु होण्यास आग्रह करू लागला. तेव्हा भद्दिय म्हणाला, "तू सात वर्षे थाब मग आपण भिक्षु होऊ." पण इतकी वर्षे अनुरुद्ध वाट पाहण्याला तयार नव्हता. सहा वर्षे, पाच वर्षे, चार, तीन, दोन, एक वर्ष, सात महिने, असें करता करता भद्दिय सात दिवसांनी अनुरुद्धाबरोबर जाण्यास कबूल झाला. आणि सात दिवसानतर भद्दिय, अनुरुद्ध, आनद, भगु, किम्बिल व देवदत्त हे सहा शाक्यपुत्र आणि त्याच्याबरोबर उपालि नावाचा न्हावी असे सात असामी चतुरगिनी सेना सज्ज करून त्या सेनेसह कपिलवस्तूपासून दूर अतरावर गेले; व तेथून सैन्य मागे फिरवून त्यानी शाक्य देशाची सीमा उल्लघिली. त्या वेळीं भगवान् मल्लाच्या अनुप्रिय नावाच्या गावीं राहत होता. तेथे जाऊन या सात असामींनी प्रव्रज्या घेतली.

## भद्दियाच्या कथेवरून निघणारा निष्कर्ष

बुद्ध भगवताची कीर्ति ऐकून पुष्कळ शाक्य कुमार भिक्षु होऊ लागले; आणि तोपर्यंत शाक्याच्या गादीवर भद्दिय राजा होता. मग शुद्धोदन राजा झाला कधी? शाक्याच्या राजाला सगळे शाक्य एकत्रित होऊन निवडीत असत, किंवा त्याची नेमणूक कोसल महाराजाकडून होत असे, हे सांगता येत नाही. शाक्यानी जर त्याची निवड केली म्हणावी, तर त्यांना त्याच्यापेक्षा वडील महानाम शाक्यासारखा एखादा शाक्य सहज निवडता आला असता. या

शिवाय अगुत्तरनिकायाच्या पहिल्या निपातात, उच्च कुलांत जन्मलेल्या माझ्या भिक्षुश्रावकात कालिगोधेचा पुत्र भद्दिय श्रेष्ठ आहे, असे बुद्धवचन सापडते. केवळ उच्च कुळात जन्मल्याने शाक्यामारखे गणराजे भद्दियाला आपला राजा करतील हें सभवनीय दिसत नाही. कोसल देशाच्या पसेनदि राजाकडूनच त्याची नेमणूक झाली असावी, हे विशेष ग्राह्य दिसतें. काही झाले तरी शुद्धोदन कधीही शाक्याचा राजा झाला नाही, असे म्हणावे लागते.

## शाक्यांचा मुख्य धंदा शेती

त्रिपिटक वाङ्मयात मिळणाऱ्या माहितीची अशोकाच्या लुम्बिनीदेवी येथील शिलालेखाच्या आधारे छाननी केली असता असें दिसून येते की, शुद्धोदन शाक्यापैकी एक असून लुम्बिनी गावात राहत होता, आणि तेथेच बोधिसत्त्व जन्मला. वर दिलेल्या महानामाच्या आणि अनुरुद्धाच्या संवादावरून सिद्ध होते की, शाक्याचा मुख्य धदा शेतीचा होता. महानामासारखे शाक्य जसे स्वत: शेती करीत; तसाच शुद्धोदन शाक्यही करीत होता. जातकाच्या निदानकथेत शुद्धोदनाला महाराजा बनवून त्याच्या शेतीचे वर्णन केले आहे, ते येणेप्रमाणे:—

" एके दिवशीं राजाच्या पेरणीचा समारभ (वप्पमगल) होता. त्या दिवशीं सगळे शहर देवांच्या विमानाप्रमाणें शृगारीत असत. सर्व दास आणि कामगार नवीन वस्त्रे नेसून आणि गधमालादिकानी भूषित होऊन राजवाड्यात एकत्र होत. राजाच्या शेतीवर एक हजार नागराचा उपयोग होत असे. त्या दिवशीं सातशे नव्याण्णव नागरांच्या दोऱ्या, बैल आणि बैलाचीं वेसणे रुप्याने मढवलेलीं असत; आणि राजाचा नांगर वगैरे शभर नंबरी सोन्याने मढविलेलीं असत.... ....राजा सोन्याने मढविलेला नागर धरी, आणि रुप्याने मढविलेले

सातशें नव्याण्णव नागर अमात्य धरीत. बाकीचे (२००) इतर लोक घेत व सर्वजण मिळून शेत नागरीत. राजा सरळ इकडून तिकडे नागर फिरवीत असे.''

या कथेत पराचा कावळा झाला असला, तरी एवढे तथ्य आहे की, शुद्धोदन स्वत: शेती करीत होता. आजकाल महाराष्ट्रात आणि गुजराथेत जसे वतनदार पाटील स्वत: शेती करतात आणि मजुराकडूनही करवून घेतात, त्याच्यासारखेच शाक्य होते. फरक एवढाच की, आजकालच्या पाटलाना राजकीय अधिकार फार थोडे आहेत आणि शाक्याना ते बरेच होते. आपल्या जमिनीतील कुळाचा आणि मजुराचा न्याय ते स्वत: करीत, व आपल्या देशाची अन्तर्गत व्यवस्था सस्थागारात एकत्र जमून पाहत असत. परस्परामध्ये काही तटा बखेडा उपस्थित झाला, तर त्याचा निकाल ते स्वत.च देत. मात्र कोणाला हद्दपार करावयाचे असले, किंवा फाशी द्यावयाचे असले, तर त्यासाठी त्याना कोसल राजाची परवानगी घ्यावी लागत असे, असे चूळसच्चकसुत्तातील खालील सवादावरून दिसून येईल:—

''भगवान् म्हणतो, 'हे अग्गिवेस्सन, पसेनदि कोसलासारख्या किंवा मगधाच्या अजातशत्रूसारख्या मूर्धाविसिक्त राजाला आपल्या प्रजेपैकी एखाद्या अपराध्याला देहातशिक्षा देण्याचा, दड करण्याचा किंवा हद्दपार करण्याचा पूर्ण अधिकार आहे की नाही?'

''सच्चक, 'भो गोतम, वज्जी आणि मल्ल या गणराजांना देखील आपल्या राज्यांतील अपराध्याला फाशी देण्याचा, दड करण्याचा किंवा हद्दपार करण्याचा अधिकार आहे; तर मग पसेनदि कोसल राजाला किंवा अजातशत्रूला हा अधिकार आहे हें सागावयास नको.' ''

या संवादावरून जाणता येईल की, गणराज्यांपैकी वज्जींचें आणि मल्लांचें तेवढे पूर्ण स्वातंत्र्य कायम होतें, आणि शाक्य, कोलिय, काशी, अंग इत्यादि गणराजांना अपराध्याला देहान्त शासन देण्याचा, तसाच मोठा दंड करण्याचा किंवा हद्‌पार करण्याचा अधिकार राहिला नव्हता. त्यासाठी शाक्य, कोलिय व काशी या गणराजांना कोसल राजाची व अंग गणराजांना मगधराजाची परवानगी घ्यावी लागत असे.

## मायादेवीची माहिती

बोधिसत्त्वाच्या आईची माहिती फारच थोडी मिळते. तिचें नाव मायादेवी होतें, यांत शंका नाही. पण शुद्धोदनाचें लग्न कोणत्या वयात झालें, आणि मायादेवी बोधिसत्त्वाला कोणत्या वयात प्रसवली, इत्यादि गोष्टींची माहिती कोठेंच सापडत नाही. अपदान ग्रंथात महाप्रजापती गोतमीचें एक अपदान आहे. त्यात ती म्हणते—

> पच्छिमे च भवे दानि जाता देवदहे पुरे।
> पिता अञ्जनसक्को मे माता मम सुलक्खणा॥
> ततो कपिलवत्थुस्मि सुद्धोदनघरं गता।

'आणि ह्या शेवटल्या जन्मीं मी देवदह नगरांत जन्मले. माझा पिता अञ्जन शाक्य, आणि माझी माता सुलक्षणा. नंतर (वयांत आल्यावर) मी कपिलवस्तूला शुद्धोदनाच्या घरीं गेले. (म्हणजे शुद्धोदनाबरोबर माझें लग्न झालें.)'

या गोतमीच्या म्हणण्यांत कितपत तथ्य आहे हें सांगतां येत नाही. 'कपिलवस्तूला शुद्धोदनाच्या घरी गेले' हें म्हणणें वर दिलेल्या विवेचनाशीं जुळत नाही.* पण ज्या अर्थी अञ्जनशाक्याची आणि

* कारण भरण्डूच्या कथेवरून शुद्धोदन कपिलवस्तूंत राहत नव्हता असे ठरतें.

सुलक्षणेची ही मुलगी होती, ह्या म्हणण्याला बाध येईल असा मजकूर कोठेच सापडला नाही, त्या अर्थी ती व तिची वडील बहीण मायादेवी अञ्जनशाक्याच्या मुली होत्या व त्या दोघींचीही लग्ने शुद्धोदनाबरोबर झालीं, असें म्हणण्यास हरकत नाही. पण ती लग्ने एकदम झाली की कालान्तराने झाली हे समजण्यास मार्ग नाही.

बोधिसत्त्व जन्मल्यावर सातव्या दिवशीं मायादेवी परलोकवासी झाली, ही गोष्ट बौद्धवाङ्मयात सुप्रसिद्ध आहे. त्यानतर बोधिसत्त्वाची हयगय होऊ लागल्याकारणाने शुद्धोदनाने मायादेवीच्याच धाकटया बहिणीशी लग्न केले असावे हे विशेष सभवनीय दिसते. एवढें खरे की, गोतमीने बोधिसत्त्वाचे लालनपालन आईप्रमाणे अत्यत प्रेमाने केले. त्याला खऱ्या आईची कधीच वाण भासली नसावी.

## बोधिसत्त्वाचा जन्म

"मायादेवी दहा महिन्यांची गरोदर होती. तेव्हा तिने माहेरीं जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. शुद्धोदन राजाने तिची इच्छा जाणून कपिलवस्तूपासून देवदह नगरापर्यंत सर्व मार्ग साफसूफ करून ध्वज-पताकादिकानी शृगारला, आणि तिची सोन्याच्या पालखींतून मोठया लवाजम्यासह माहेरी रवानगी केली. तिकडे जात असता वाटेत लुम्बिनीवनांत ती एका शालवृक्षाखाली प्रसूत झाली." हा जातकाच्या निदानकथेतील वर्णनाचा साराश. शुद्धोदन राजा जर एक सामान्य जमीनदार होता तर तो एवढा सगळा मार्ग शृगारूं शकेल हें सभवनीयच नाही. दुसरे हे की, दश मास पूर्ण झाल्यावर गरोदर स्त्रीला कोणीही माहेरीं पाठवणार नाहीत. तेव्हा या गोष्टींत फारच अल्प तथ्य आहे असें दिसते.

महापदानसुत्तांत बोधिसत्त्व मातेच्या उदरांत प्रवेश करतो तिथपासून जन्मल्यानंतर सात दिवसांचा होईपर्यंत एकदरींत सोळा

लोकोत्तर विशेष (धम्मता) घडून येतात, असें वर्णिले आहे. त्यांपैकी (९) बोधिसत्त्वाची आई दहा महिने पूर्ण झाल्यावरच प्रसूत होते, (१०) ती उभी असतांना प्रसूत होते आणि (८) बोधिसत्त्व जन्मल्यावर सात दिवसानी मरण पावते, हे तीन लोकोत्तर विशेष गोतम बोधिसत्त्वाच्या आयुष्यातून घेतले असावेत. बाकीचे सर्व काल्पनिक असून हळूहळू त्याचाही प्रवेश गोतमाच्या चरित्रात झाला असें दिसते. साराश, बोधिसत्त्वाची माता उभी असताना प्रसूत झाली आणि त्याच्या जन्मानतर सात दिवसानी निवर्तली असें गृहीत धरून चालण्यास हरकत नाही. जातकाच्या निदानकथेत ती शालवृक्षाखाली प्रसूत झाली, आणि ललितविस्तरात प्लक्ष वृक्षाखाली झाली असे वर्णन आहे. लुम्बिनी गावात शुद्धोदनाच्या घरीं बाहेर बगीच्यात फिरत असता ती प्रसूत झाली, मग ती शालवृक्षाखाली असो किंवा प्लक्षवृक्षाखाली असो. मात्र उभी असताना प्रसूत झाली, एवढेंच ह्या वर्णनात तथ्य आहे, असें समजावे.

## बोधिसत्त्वाचें भविष्य

"बोधिसत्त्व जन्मल्यानतर त्याला मातेसह घरीं आणून शुद्धोदनाने मोठमोठया पडित ब्राह्मणाकडून त्याचे भविष्य वर्तविले. पडितानी त्याचीं बत्तीस लक्षणे पाहून हा एकतर चक्रवर्ती राजा होणार, किंवा सम्यक् सबुद्ध होणार असे भविष्य सागितले." अशा अर्थाचीं विस्तृत वर्णने जातकाच्या निदानकथेत, ललितविस्तरात आणि बुद्धचरितकाव्यांत आली आहेत. त्या कालीं या लक्षणावर लोकाचा फार भरवसा होता यांत शका नाही. त्रिपिटक वाङ्मयात त्याचा अनेक ठिकाणीं सविस्तर उल्लेख आला आहे. पोक्खरसाति ब्राह्मणाने तरुण अम्बष्ठाला बुद्धाच्या शरीरावर हीं लक्षणे आहेत की नाहीत हें पाहण्यासाठी पाठविले. त्याने तीस लक्षणे स्पष्ट पाहिलीं; पण त्याला

दोन दिसेनात. बुद्धाने अद्भुत चमत्कार करून तीं त्याला दाखविलीं.* अशा रीतीने बुद्धचरित्राशीं या लक्षणांचा जिकडे तिकडे संबंध दाखविला आहे. बुद्धाची थोरवी गाण्याचा हा भक्तजनाचा प्रयत्न असल्यामुळे त्यात विशेष तथ्य आहे असें समजण्याची आवश्यकता नाही. तथापि बोधिसत्त्वाच्या जन्मानंतर असित ऋषीने येऊन त्याचें भविष्य वर्तविले, ही कथा फार प्राचीन दिसते. तिचें वर्णन सुत्तनिपातातील नालकसुत्ताच्या प्रस्तावनेत सापडते. त्याचा गोषवारा येथे देतो.

"चांगलीं वस्त्रे नेसून व इंद्राचा सत्कार करून देव आपलीं उपवस्त्रे आकाशात फेकून उत्सव करीत होते. त्याना असित ऋषीने पाहिले आणि हा उत्सव कशासाठी आहे असे विचारले. लुम्बिनीग्रामात शाक्यकुलात बोधिसत्त्वाचा जन्म झाला आहे व त्यामुळे आपण उत्सव करीत आहोत, असे त्या देवानी असिताला सांगितले. ते ऐकून असित ऋषि नम्रपणे शुद्धोदनाच्या घरी आला, आणि त्याने कुमाराला पाहण्याची इच्छा प्रदर्शित केली. शाक्यानी बोधिसत्त्वाला असितासमोर आणले, तेव्हा त्याची लक्षणसंपन्नता पाहून 'हा मनुष्यप्राण्यात सर्वश्रेष्ठ आहे', असे उद्गार असिताच्या तोंडून निघाले. पण आपले आयुष्य थोडे राहिले आहे, हे लक्षात आल्याने असितऋषीच्या डोळ्यातून आसवे गळू लागलीं. ते पाहून, कुमाराच्या जिवाला काही धोका आहे की काय, असा शाक्यानी प्रश्न केला. तेव्हा असिताने, 'हा कुमार पुढे संबुद्ध होणार आहे, परंतु माझे आयुष्य थोडेच अवशिष्ट राहिले असल्यामुळे मला त्याचा धर्म श्रवण करण्याची संधि मिळणार नाही, म्हणून वाईट वाटतें,' असें सांगून शाक्यांचें समाधान केलें. आणि त्याना आनंदित करून असित ऋषि तेथून निघून गेला."

---

* दीघनिकाय, अम्बट्ठसुत्त

## बोधिसत्त्वाचें नांव

स शाक्यसिंहः सर्वार्थसिद्धः शौद्धोदनिश्च सः ।
गौतमश्चार्कबधुश्च मायादेवीसुतश्च सः ॥

अमरकोशांत ही बोधिसत्त्वाची सहा नावें दिलीं आहेत. त्यापैकी शाक्यसिंह, शौद्धोदनि आणि मायादेवीसुत ही तीन विशेषणें व अर्कबधु हें त्याच्या गोत्राचे नांव आहे. बाकी सर्वार्थसिद्ध आणि गौतम या दोन नावांपैकी त्याचे खरें नाव कोणतें ? किंवा हीं दोन्हीही त्याचीं नावें होतीं की काय ? असा प्रश्न उपस्थित होतो.

त्रिपिटक वाङ्मयांत बोधिसत्त्वाचे सर्वार्थसिद्ध नांव होतें, असा उल्लेख कोठेंच सापडला नाही. जातकाच्या निदानकथेत तेवढें सिद्धत्थ (सिद्धार्थ) हे त्याचे नांव आले आहे. पण तें देखील ललितविस्तरावरून घेतले असावें. त्या ग्रंथात म्हटले आहे की,—

'अस्य हि जातमात्रेण मम सर्वार्थाःससिद्धाः । यन्न्वहमस्य सर्वार्थसिद्ध इति नाम कुर्याम् । ततो राजा बोधिसत्त्व महता सत्कारेण सत्कृत्य सर्वार्थसिद्धोऽय कुमारो नाम्ना भवतु इति नामास्याकार्षीत् ॥'

सर्वार्थसिद्ध हेंच नाव अमरकोशात दिले आहे. पण ललितविस्तरात बोधिसत्त्वाला वारवार सिद्धार्थकुमार असेंही म्हटलें आहे. आणि त्याचेच 'सिद्धत्थ' हे पालि रूपान्तर. सर्वार्थसिद्ध याचें पालि रूपान्तर सब्बत्थसिद्ध असे झाले असते, आणि तें चमत्कारिक दिसत असल्यामुळे जातकअट्ठकथाकाराने सिद्धत्थ हेच नाव वापरले असावें. अर्थात् सर्वार्थसिद्ध किंवा सिद्धार्थ हीं दोन्ही नावें ललितविस्तरकाराच्या अथवा तशाच एखद्या बुद्धभक्त कवीच्या कल्पनेतून निघालीं असलीं पाहिजेत.

बोधिसत्त्वाचें खरे नांव गोतम होतें यात शंका नाही. थेरीगाथेंत महाप्रजापती गोतमीच्या ज्या गाथा आहेत त्यापैकी एक ही—

बहूनं वत अत्थाय माया जनयि गोतमं ।
ब्याधिमरणतुन्नान दुक्खक्खन्ध ब्यपानुदि ॥

'पुष्कळाच्या कल्याणासाठी मायेने गोतमाला जन्म दिला. व्याधि आणि मरण ह्यानी पीडित झालेल्या जनाचा दु:खराशि त्याने नष्ट केला.'

परतु महापदानसुत्तात बुद्धाला 'गोतमो गोत्तेन' असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे अपदानग्रथात अनेक ठिकाणीं 'गोतमो नाम नामेन' आणि 'गोतमो नाम गोत्तेन' असे दोन प्रकारचे उल्लेख सापडतात. त्यावरून बोधिसत्त्वाचे नाव आणि गोत्र एकच होते की काय असा सशय येतो. पण सुत्तनिपातातील खालील गाथावरून तो दूर होण्याजोगा आहे.

उजु जानपदो राजा हिमवन्तस्स पस्सतो ।
धनविरियेन सपन्नो कोसलेसु निकेतिनो ॥
आदिच्चा नाम गोत्तेन साकिया नाम जातिया ।
तम्हा कुला पब्बजितोऽम्हि राज न कामे अभिपत्थय ॥

(पब्बज्जासुत्त, गा० १८-१९).

(बोधिसत्त्व बिबिसार राजाला म्हणतो)-'हे राजा, येथून सरळ हिमालयाच्या पायथ्याशी एक धनाने आणि शौर्याने सपन्न असा प्रदेश आहे. कोसल राष्ट्रात त्याचा समावेश होतो. तेथल्या लोकांचें गोत्र आदित्य असून त्याना शाक्य म्हणतात. त्या कुळातून मी परिव्राजक झालो, तो, हे राजा, कामोपभोगाच्या इच्छेने नव्हे.'

या गाथांत शाक्याचे गोत्र आदित्य होतें असें म्हटले आहे. एकाच काळी आदित्य आणि गोतम हीं दोन गोत्रे असणे शक्य दिसत नाही. सुत्तनिपात प्राचीनतम असल्यामुळे आदित्य हेंच शाक्याचे खरें गोत्र असावे. वर दिलेल्या अमरकोशाच्या श्लोकात अर्कबधु हे जे बुद्धाचे नाव, ते त्याचे गोत्रनाव आहे असें समजलें पाहिजे. कारण तें 'आदिच्चा नाम गोत्तेन' या वाक्याशीं चागलें

जुळते. बोधिसत्त्वाचें खरे नाव गोतम होतें व तो बुद्धपदाला पावल्यावर त्याच नावाने प्रसिद्धीला आला. 'समणो खलु भो गोतमो सक्यकुलापब्बजितो' अशा प्रकारचे उल्लेख सुत्तपिटकांत किती तरी ठिकाणीं आहेत.

## बोधिसत्त्वाचें समाधिप्रेम

"वर निर्दिष्ट केलेल्या शुद्धोदन राजाच्या कृषिसमारभाच्या वेळीं बालपणी बोधिसत्त्वाला नेण्यात आले होते, आणि त्याच्या दायानी त्याला एका जबुवृक्षाखाली बिछान्यावर निजविले. सिद्धार्थकुमार निजला आहे, असे पाहून दाया कृषिसमारभ पाहावयास गेल्या. इतक्यात बोधिसत्त्व उठून आसनमाडी ठोकून ध्यानस्थ बसला. बऱ्याच वेळाने दाया येऊन पाहतात, तो इतर वृक्षाची छाया उलटली होती. पण या जबुवृक्षाची पूर्वीप्रमाणेच राहिली! हा अद्भुत चमत्कार पाहून शुद्धोदन राजाने बोधिसत्त्वाला नमस्कार केला." जातकातील दतकथेचे हे सार आहे. बोधिसत्त्वाच्या आयुष्यातील या महत्त्वाच्या गोष्टीला अशा प्रकारें अद्भुत चमत्काराचे स्वरूप दिल्यामुळे तिच्यात कांहीच अर्थ राहिला नाही. खरी गोष्ट अशी दिसते की, बोधिसत्त्व बापाबरोबर शेतावर जाऊन नागरणीचे वगैरे काम करी आणि सुटीच्या वेळी एका जम्बुवृक्षाखाली ध्यानस्थ बसत असे.

मज्झिमनिकायातील महासच्चकसुत्तात बुद्ध भगवान सच्चकाला उद्देशून म्हणतो—

"मला आठवतें की, माझ्या पित्याच्या शेतावर गेलों असतां जम्बुवृक्षाच्या शीतल छायेखाली बसून कामोपभोगापासून आणि अकुशल विचारापासून विमुक्त होऊन सवितर्क, सविचार आणि विवेकापासून उत्पन्न होणारे प्रीतिसुख ज्यात आहे असें प्रथमध्यान मी सपादन करीत होतों. हाच तर बोधाचा खरा मार्ग नसेल ना? त्या माझें विज्ञान स्मृतीला अनुसरलें आणि हाच तो

बोधाचा मार्ग असावा असे मला वाटलें. हे अग्गिवेस्सन, मी माझ्याशीच म्हणालो, 'जे सुख कामोपभोगापासून आणि अकुशल विचारांपासून अलिप्त आहे, त्या सुखाला मी का भितो?' नंतर मी विचार केला की, त्या सुखाला मीं भितां कामा नये. परंतु तें सुख अशा (देहदंडाने झालेल्या) दुर्बल शरीराने प्राप्त करून घेता येणे शक्य नाही, म्हणून पुन: पुरेसें अन्न खाणें योग्य आहे."

बोधिसत्त्वाने सात वर्षे देहदंडन चालविल्यानंतर त्याला बापाच्या शेतींतील जम्बुवृक्षाखाली बसून मिळणाऱ्या प्रथमध्यानाची एकाएकी आठवण झाली, आणि तोच मार्ग तत्त्वबोधाचा असला पाहिजे असे गृहीत धरून त्याने देहदंडन सोडून दिले, आणि आहार सेवन करण्यास आरंभ केला.

परंतु बोधिसत्त्व लहानपणींच हे ध्यान कोणाकडून शिकला? किंवा तें त्याला आपोआपच प्राप्त झाले? जातकट्ठकथाकाराने ललितविस्तरकाराने किंवा बुद्धचरित्रकाराने हें ध्यान अत्यंत बालपणीं बुद्धाला प्राप्त झाले असें वर्णिले असल्यामुळे, ते त्याला आपोआपच मिळाले, व तो एक अद्भुत चमत्कार होता असें म्हणावे लागते. पण वर दिलेल्या भरण्डुकालामसुत्ताचा विचार केला असता ह्या अद्भुत चमत्काराचा सहज उलगडा होतो. कालामाचा आश्रम कपिलवस्तूमध्ये होता. म्हणजे शाक्य लोकांत त्याचा संप्रदाय जाणणारे पुष्कळ होतें, असें म्हटले पाहिजे. पुढे जी कालामाची हकीगत येणार आहे तिजवरून दिसून येईल की, कालाम ध्यानमार्गी असून तो समाधीच्या सात पायऱ्या शिकवीत होता. त्यापैकीं पहिली पायरी जें प्रथमध्यान तें बोधिसत्त्वाला घरीं असताच प्राप्त झालें असलें तर त्यांत अद्भुत चमत्कार कोणता? कांही चमत्कार असला तर तो एवढाच की लहानपणीं शेती करतांना देखील बोधिसत्त्वाची वृत्ति धार्मिक असून तो वेळोवेळीं ध्यानसमाधीचा अभ्यास करीत होता.

## बोधिसत्त्वाच्या समाधीचा विषय

बोधिसत्त्वाच्या ध्यानाचा विषय कोणता, हें सांगणें सोपे नाही. प्रथमध्यान ज्यावर साधतें, असे एकदरीत सव्वीस विषय* आहेत. त्यांपैकी बोधिसत्त्वाच्या ध्यानाचा विषय कोणता हें नक्की सांगतां येणे जरी कठीण आहे, तरी मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चार विषयांपैकी एखाद्या विषयावर तो ध्यान करीत असावा, असें अनुमान अप्रस्तुत होणार नाही. का की, ते त्याच्या प्रेमळ स्वभावाला अनुसरून होतें. आणि त्याला एक दुसरा आधार सापडतो तो असा–

"बुद्ध भगवान् कोलिय देशात हरिद्रवसन नावाच्या कोलियाच्या शहराजवळ राहत असता काही भिक्षु सकाळच्या प्रहरीं भिक्षाटण करण्यापूर्वी इतर परिव्राजकाच्या आरामात गेले. तेव्हा ते परिव्राजक त्याना म्हणाले, 'आम्ही आमच्या श्रावकांना उपदेश करतो की मित्रहो, चित्ताचे उपक्लेश आणि चित्ताला दुर्बल करणारीं जीं पाच नीवरणे आहेत,† तीं सोडून तुम्ही मैत्रीसहगत चित्ताने एक दिशा भरून टाका, दुसरी, तिसरी व चौथी भरून टाका. त्याचप्रमाणें वर खाली व चोहोबाजूला सर्व जगत् विपुल, श्रेष्ठ, निस्सीम, अवैर व द्वेषरहित मैत्रीसहगत चित्ताने भरून टाका, करुणासहगतचित्ताने ....मुदितासहगतचित्ताने . उपेक्षासहगतचित्ताने भरून टाका. श्रमण गोतम देखील असाच उपदेश करतो. मग त्याच्या आणि आमच्या उपदेशांत फरक कोणता?' " (बोज्झगसंयुत्त, वग्ग ६, सुत्त ४)

शाक्य आणि कोलिय शेजारीं असून त्यांचा निकट संबंध होता, आणि कधी कधी रोहिणी नदीच्या पाण्यासंबंधाने त्यांच्यात

---

* बुद्धघोषाचार्यांच्या आणि अभिधर्माच्या मते पंचवीस विषय. पण उपेक्षेवैर देखील प्रथमध्यान साध्य होते, असे गृहीत धरले तर सव्वीस विषय. समाधिमार्ग, पृ. ६८–६९ पाहा.

† समाधिमार्ग, पृ. ३१–३५ पहा.

भाडणे उपस्थित होत, असा उल्लेख जातकअट्ठकथेत आणि इतर अट्ठकथातून पुष्कळ ठिकाणीं आला आहे. त्या कोलियाच्या राज्यात अन्य पथातील परिव्राजक बौद्ध सघातील भिक्षूना वरील प्रश्न विचारतात. हे परिव्राजक तेथे बऱ्याच वर्षापासून राहत असले पाहिजेत. त्याचा आश्रम बुद्धाने धर्मोपदेश करण्याला सुरवात केल्यानतर स्थापन झाला नाही, तो पूर्वीपासूनच तेथे होता हे खास. आणि हे परिव्राजक मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा ह्या चार ब्रह्मविहाराची भावना करावी, असा उपदेश करीत * तेव्हा ते कालामाच्याच पथातील होते, असे समजण्याला हरकत कोणती? निदान हे ब्रह्मविहार बोधिसत्त्वाला तरुणपणींच माहीत होते, आणि तो त्याजवर ध्यान करून प्रथमध्यान सपादीत असे, या विधानाला बाधा येत नाही.

## बोधिसत्त्वाच्या गृहत्यागाला कारण कोणतें?

त्यानतरचा महत्त्वाचा प्रसग म्हटला म्हणजे बोधिसत्त्व आपल्या प्रासादातून उद्यानभूमीकडे जातो, हा होय. शुद्धोदन महाराजाने त्याच्या वाटेत कोणी म्हातारा, व्याधित किंवा मृत मनुष्य येऊ नये असा बदोबस्त केला असताही देवता एक निर्मित म्हातारा त्याच्या निदर्शनाला आणतात, आणि बोधिसत्त्व विरक्त होऊन परत आपल्या प्रासादात जातो. दुसऱ्या खेपेला व्याधित, तिसऱ्या खेपेला मृत आणि चौथ्या खेपेला देवता त्याला एक परिव्राजक दाखवितात; त्यामुळे तो पूर्ण विरक्त होऊन व गृहत्याग करून तत्त्वबोधाचा मार्ग शोधून काढण्याला प्रवृत्त होतो. ह्या प्रसगाचीं रसभरित वर्णनें ललितविस्तरादिक ग्रथात सापडतात. तीं सर्वथैव ग्राह्य नाहीत असें म्हणावें लागते. जर बोधिसत्त्व बापाबरोबर किंवा एकटाच शेतावर जाऊन

* ह्या ब्रह्मविहाराचे स्पष्टीकरण समाधिमार्गाच्या पाचव्या प्रकरणात केले आहे

काम करीत होता, आणि आळार कालामाच्या आश्रमात जाऊन त्याचे तत्त्वज्ञान शिकत होता, तर त्याने म्हातारा, व्याधित आणि मृत मनुष्य पाहिला नाही हे संभवेल कसे?

शेवटच्या दिवशी बोधिसत्त्व उद्यानात गेला असता "देवतानी एक उत्तम परिव्राजक निर्माण करून त्याच्या निदर्शनाला आणला. तेव्हा बोधिसत्त्वाने सारथ्याला प्रश्न केला, 'हा कोण आहे बरे?' जरी त्या वेळी–बोधिसत्त्व बुद्ध झाला नसल्या कारणाने–परिव्राजक किंवा परिव्राजकाचे गुण सारथ्याला माहीत नव्हते तरी देवताच्या प्रभावाने तो म्हणाला, 'हा परिव्राजक आहे', आणि त्याने प्रव्रज्येचे गुण वर्णिले," असे जातकअट्ठकथाकाराचे म्हणणे. पण जर कपिलवस्तूमध्ये आणि शाक्याच्या शेजारच्या राज्यात परिव्राजकाचे आश्रम होते, तर बोधिसत्त्वाला किंवा त्याच्या सारथ्याला परिव्राजकाची मुळीच माहिती नसावी, हे आश्चर्य नव्हे काय?

अंगुत्तरनिकायाच्या चतुक्कनिपातात (सुत्त नं. १९५) वप्प शाक्याची गोष्ट आली आहे तो निर्ग्रंथ (जैन) श्रावक होता. एकदा त्याचा व महामोग्गल्लानाचा संवाद चालला असता बुद्ध भगवान तेथे आला, आणि त्याने वप्पाला उपदेश केला. तेव्हा वप्प म्हणाला, "निर्ग्रंथाच्या (जैन साधूच्या) उपासनेपासून मला काही फायदा झाला नाही. आता मी भगवंताचा उपासक होतो." अट्ठकथाकार वप्प भगवंताचा चुलता होता असे म्हणतो. हे म्हणणे महादुक्खक्खन्धसुत्ताच्या अट्ठकथेशी जुळत नाही. काहीही असो, वप्प नावाचा एक वयोवृद्ध शाक्य जैन होता यांत शंका नाही. म्हणजे बोधिसत्त्वाच्या जन्मापूर्वीच शाक्य देशात जैन धर्माचा प्रसार झाला होता. तेव्हा बोधिसत्त्वाला परिव्राजकांची माहिती नव्हती हे मुळीच संभवत नाही.

मग ह्या सर्व अद्भुत गोष्टी बोधिसत्त्वाच्या चरित्रात आल्या

कोठून ? महापदानसुत्तांतून.* वृद्ध मनुष्याला पाहिल्यावर बोधिसत्त्वाने सारथ्याला प्रश्न कसा केला, यासंबंधी जातकअट्ठकथाकार म्हणतो, "महापदाने आगतनयेन पुच्छित्वा" (महापदानसुत्तात आलेल्या कथेला अनुसरून प्रश्न विचारून). म्हणजे या सर्व अद्भुत कथा महापदानसुत्तावरून घेतल्या आहेत असें म्हणावे लागते.

तर मग बोधिसत्त्वाच्या गृहत्यागाला कारण काय झाले असावे ? याचे उत्तर अत्तदण्डसुत्तात स्वत: बुद्ध भगवानच देत आहे.

अत्तदण्डा भयं जातं, जनं पस्सथ मेधकं ।
संवेगं कित्तयिस्सामि यथा संविजितं मया ॥१॥

---

* अपदान (सं० अवदान) म्हणजे सच्चरित्र. थोराच्या सच्चरित्राचा ज्या सुत्तात संग्रह आहे ते महापदानसुत्त. यांत पूर्वयुगीन सहा व ह्या युगातील गोतमबुद्ध मिळून सात बुद्धांची चरित्रें आरंभी संक्षेपाने देऊन मग विपस्सीबुद्धाचे चरित्र विस्ताराने वर्णिले आहे. तो एक नमुना असून त्याप्रमाणे इतर बुद्धांची चरित्रे वर्णावी, असे अट्ठकथाकार म्हणतात. ह्या वर्णनातील बहुतेक भाग हे सुत्त रचण्यापूर्वी किंवा नंतर गोतमबुद्धाच्या चरित्रात दाखल करण्यात आले, आणि ते खुद्द त्रिपिटकात भिन्न भिन्न स्थळी सापडतात. उद्यानदर्शनाचा भाग मात्र त्रिपिटकात नाही. तो जातकट्ठकथाकाराने उचलला. त्यापूर्वी ललितविस्तरात व बुद्धचरितकाव्यात ह्या कथेचा समावेश करण्यात आला.

गोतम बोधिसत्त्वासाठी तीन प्रासाद बांधण्यात आले होते, ही गोष्ट मी ऐतिहासिक समजत होतो. परंतु ती देखील काल्पनिक असावी. कारण शुद्धोदनासारखा स्वत: अंगमेहनत करणारा लहानसा जमीनदार आपल्या मुलासाठी तीन प्रासाद बांधील हे संभवत नाही.

'दीघनिकाय' भाग दुसरा, भाषांतरकार परलोकवासी चिंतामण वैजनाथ राजवाडे, (प्रकाशक, ग्रंथसंपादक व प्रकाशक मंडळी, नं० ३८० ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २) या ग्रंथाच्या आरंभीच महापदानसुत्ताचे मराठी भाषांतर आले आहे. ते जिज्ञासु वाचकांनी अवश्य वाचावे.

फन्दमान पज दिस्वा मच्छे अप्पोदके यथा ।
अञ्ञमञ्ञेहि व्यारुद्धे दिस्वा म भयमाविसि ॥२॥
समन्तमसरो लोको, दिसा सब्बा समेरिता ।
इच्छ भवनमत्तनो नाद्दसासिं अनोसित ।
ओसाने त्वेव व्यारुद्धे दिस्वा मे अरती अहु ॥३॥

(१) शस्त्रधारण भयावह वाटले. (त्यामुळे) ही जनता कशी भाडते पहा! मला सवेग (वैराग्य) कसा उत्पन्न झाला हे सागतो. (२) अपुऱ्या पाण्यात मासे जसे तडफडतात, त्याप्रमाणे परस्पराशी विरोध करून तडफडणाऱ्या प्रजेकडे पाहून माझ्या अन्त करणात भय शिरले. (३) चारी बाजूना जग असार दिसू लागले, सर्व दिशा कपित होत आहेत असे वाटले आणि त्यात आश्रयाची जागा शोधीत असता निर्भयस्थान सापडेना. कारण, शेवटपर्यंत सर्व जनता परस्पराशी विरुद्ध झालेलीच दिसून आल्यामुळे मला कटाळा आला.

रोहिणी नदीच्या पाण्यासाठी शाक्य आणि कोलिय भाडत होते, एके वेळी दोघानीही आपले सैन्य तयार करून रोहिणी नदीपाशी नेले, आणि त्या प्रसगी बुद्ध भगवान् दोन्ही सैन्याच्या मध्ये येऊन त्याने हे सुत्त उपदेशिले, असा उल्लेख जातकट्ठकथेत अनेक ठिकाणीं आला आहे. पण तो विपर्यस्त असावा असे वाटते. शाक्याना आणि कोलियाना भगवान् बुद्धाने उपदेश केला असेल आणि त्याचीं भाडणेही मिटवली असतील. परतु त्या प्रसगी हे सुत्त उपदेशिण्याचें काही कारण दिसत नाही. आपणाला वैराग्य कसे झाले व आपण घरातून बाहेर का पडलो, हे या सुत्तात भगवान सागत आहे. रोहिणी नदीच्या पाण्यासबधाने किवा अशाच क्षुद्र कारणास्तव शाक्य आणि कोलिय याचीं भाडणे होत. त्या प्रसगी आपण शस्त्र धरावे की नाही हा बोधिसत्त्वाला प्रश्न पडला असावा. पण शस्त्राने हीं भांडणें

मिटविणें शक्य नव्हतें. शाक्य आणि कोलिय यांचीं भांडणे जबरदस्तीने मिटवली गेलीं, तरी तीं मिटलीं नसती. का की, तीं मिटविणाऱ्याला पुन्हा शेजारच्या राजाशी शस्त्र धरावे लागले असते; आणि जर त्याने त्यालाही जिंकले, तर त्याच्या पलीकडच्या राजाला जिंकणें त्याला भाग पडले असतें. याप्रमाणे शस्त्रग्रहणामुळे जिकडे तिकडे जय मिळविल्यावाचून गत्यतर राहिले नसतें. पण तो मिळविला तरी त्याला शांति कोठून मिळणार होती? पसेनदि कोसल आणि बिंबिसार यांचे पुत्रच त्यांचे शत्रु झाले. तर मग या शस्त्रग्रहणापासून लाभ काय? शेवटपर्यंत भांडत राहावे हाच! या सशस्त्र प्रवृत्तिमार्गाचा प्रेमळ बोधिसत्त्वाला कंटाळा आला आणि त्याने शस्त्रनिवृत्तिमार्ग स्वीकारला.

सुत्तनिपातांतील पब्बज्जा सुत्तांत आरंभींच खालील गाथा आहेत.

पब्बज कित्तयिस्सामि, यथा पब्बजि चक्खुमा,<br>
यथा वीमंसमानो सो पब्बज समरोचयि ॥१॥<br>
सबाधोऽयं घरावासो रजस्सायतनं इति ।<br>
अब्भोकासो च पब्बज्जा इति दिस्वान पब्बजि ॥२॥

'(१) चक्षुष्मन्ताने प्रव्रज्या कां घेतली, आणि ती त्याला कोणत्या विचारामुळे आवडली हे सांगून (त्याच्या) प्रव्रज्येचे मी वर्णन करतो.

(२) गृहस्थाश्रम म्हणजे अडचणीची आणि कचऱ्याची जागा व प्रव्रज्या म्हणजे मोकळी हवा, असें जाणून तो परिव्राजक झाला.'

या म्हणण्याला आधार मज्झिमनिकायातील महासच्चक सुत्तातही सापडतो. तेथे भगवान् म्हणतो, "हे अग्गिवेस्सन, संबोधिज्ञान होण्यापूर्वी, बोधिसत्त्व असतानाच मला वाटले, 'गृहस्थाश्रम अडचणीची व कचऱ्याची जागा आहे. प्रव्रज्या म्हणजे मोकळी हवा. गृहस्थाश्रमात राहून अत्यंत परिपूर्ण आणि परिशुद्ध ब्रह्मचर्य आचरणें

शक्य नाही. म्हणून मुडण करून आणि काषाय वस्त्रें धारण करून घरातून बाहेर पडून परिव्राजक होणे योग्य आहे.' "

परतु अरियपरियेसनसुत्तात याच्यापेक्षा थोडेसे भिन्न कारण दिले आहे. भगवान् म्हणतो, "भिक्षुहो, सबोधिज्ञान होण्यापूर्वी बोधिसत्त्व असतानाच मी स्वत. जन्मधर्मी असताना, जन्माच्या फेऱ्यात सापडलेल्या वस्तूच्या (पुत्र, दारा, दासी, दास इत्यादिकांच्या) मागे लागलो होतो. (म्हणजे माझे सुख त्याजवर अवलबून आहे असे मला वाटे.) स्वत: जराधर्मी असताना, व्याधिधर्मी असताना, मरणधर्मी असताना, शोकधर्मी असतांना, जरा, व्याधि, मरण, शोक यांच्या फेऱ्यांत सापडलेल्या वस्तूऱ्याच मागे लागलो होतो. तेव्हा माझ्या मनात असा विचार आला की, मी स्वत जन्म, जरा, मरण, व्याधि व शोक यानी सबद्ध असता त्यानीच सबद्ध जे पुत्रदारादिक त्याच्या मागे लागलो आहे, हे ठीक नव्हे, तर मग मी या जन्मजरादिकानी होणारी हानि पाहून अजात, अजर, अव्याधि, अमर आणि अशोक असे जे परमश्रेष्ठ निर्वाणपद त्याचा शोध करावा हे योग्य आहे."

याप्रमाणे बोधिसत्त्वाच्या प्रव्रज्येला साधारणपणे तीन कारणे दिलीं आहेत. (१) आपल्या आप्तानी परस्पराशी लढण्यासाठी शस्त्र धारण केल्यामुळे त्याला भय वाटले; (२) घर अडचणीची व कचऱ्याची जागा आहे असें वाटले; आणि (३) आपण जन्म, जरा, मरण, व्याधि यानी सबद्ध असता अशाच प्रकारच्या वस्तूवर आसक्त होऊन राहता कामा नये असें वाटले. या तीन्ही कारणाची सगति लावता येणे शक्य आहे.

बोधिसत्त्वाचे जातभाई शाक्य व कोलिय याच्यामध्ये तटे बखेडे उत्पन्न झाले, आणि त्या प्रसगीं त्यांत आपण शिरावे की नाही हा बोधिसत्त्वाला प्रश्न पडला. मारामारीने हे खटले मिटणार नाहीत

हे त्याने जाणले. पण त्यात जर आपण शिरलो नाही तर लोक आपणाला भित्रा म्हणतील व गृहस्थाचा धर्म पाळला नाही असे होईल. अर्थात् गृहस्थाश्रम त्याला अडचणीची जागा भासू लागला त्यापेक्षा सन्यासी होऊन निरपेक्षपणे रानावनात हिंडत राहणे काय वाईट होते ? परतु त्याचे आपल्या पत्नीवर आणि मुलावर प्रेम असल्यामुळे गृहत्याग करणे फार कठीण होते. तेव्हा त्याला आणखीही विचार करावा लागला. मी स्वत: जाति–जरा–व्याधि–मरणधर्मी असता अशाच स्वभावाने बद्ध झालेले जे पुत्रदारादिक त्यान्यावर आसक्त होऊन ह्या अडचणीच्या आणि कचऱ्याच्या गृहस्थाश्रमात पडून राहणे योग्य नाही असे त्याला वाटले, आणि म्हणून तो परिव्राजक झाला. या तीन्ही कारणात मुख्य कारण म्हटले म्हणजे शाक्याच्या आणि कोलियाच्या मारामाऱ्या होत, हे लक्षात ठेवले असता बोधिसत्त्वाने पुढे बुद्ध होऊन शोधून काढलेल्या मध्यम मार्गाचा अर्थ बरोबर समजेल.

## राहुल कुमार

बोधिसत्त्वाचे लग्न तरुणपणी होऊन गृहत्याग करण्यापूर्वी त्याला राहुल नावाचा मुलगा झाला, याला त्रिपिटकात अनेक ठिकाणी आधार सापडतात. जातकाच्या निदानकथेत राहुल कुमार ज्या दिवशी जन्मला त्याच रात्री बोधिसत्त्वाने गृहत्याग केला, असे म्हटले आहे. पण दुसऱ्या अट्ठकथाकाराचे म्हणणे असे दिसते की, राहुल कुमार जन्मल्यानतर सातव्या दिवशी बोधिसत्त्वाने गृहत्याग केला. या दोन्ही विधानाना आधार प्राचीन वाङ्मयात सापडत नाही. एवढे खास की, बोधिसत्त्वाने गृहत्याग करण्यापूर्वी त्याला राहुल नावाचा एक मुलगा होता. गोतम बोधिसत्त्व बुद्ध होऊन कपिलवस्तूला आला, आणि त्याप्रसगीं त्याने राहुलाला दीक्षा दिली, अशीं

वर्णने महावग्गात व इतर ठिकाणी सापडतात. त्या वेळी राहुल सात वर्षांचा होता, असे अट्ठकथात अनेक ठिकाणी म्हटले आहे. राहुलाला भगवताने श्रामणेर केले की काय आणि तो त्या वेळी किती वर्षांचा असावा याचा विचार सहाव्या प्रकरणात करण्यात येईल. का की, श्रामणेराचा संबंध भिक्षुसंघाशी येतो.

## राहुलमाता देवी

राहुलाच्या आईला महावग्गात आणि जातकट्ठकथेंत सर्वत्र 'राहुलमाता देवी' म्हटले आहे. यसोधरा (यशोधरा) हे तिचे नांव फक्त अपदान ग्रंथात सापडते. जातकाच्या निदानकथेत म्हटले आहे की, " ज्या वेळी आमचा बोधिसत्त्व लुम्बिनी वनात जन्मला, त्याच वेळी राहुलमाता देवी, छन्न अमात्य, काळुदायि (काळा उदायि) अमात्य, कंथक अश्वराजा, (बुद्धगयेचा) महाबोधिवृक्ष आणि चार निधिकुंभी (द्रव्याने भरलेले राजण) उत्पन्न झाले." यात बोधिवृक्ष आणि ठेव्याचे राजण त्याच वेळी उत्पन्न झाले, ही शुद्ध दन्तकथा समजली पाहिजे. पण बोधिसत्त्व, राहुलमाता, छन्न आणि काळा उदायि ही एकाच वेळीं जन्मली नसली तरी समवयस्क होती असे मानण्याला हरकत नाही. राहुलमातेचे देहावसान ७८ व्या वर्षी म्हणजे बुद्धाच्या परिनिर्वाणापूर्वी दोन वर्षे झाले असावे. अपदानात (५८४) ती म्हणते,

अट्ठसत्ततिवस्साह पच्छिमो वत्तति भवो ।

.... .... ..

पहाय वो गमिस्सामि कतम्मे सरणमत्तनो ॥

'मी आज ७८ वर्षांची आहे. हा माझा शेवटला जन्म. तुम्हाला मी सोडून जाणार. माझी मुक्ति मी संपादिली आहे.'

या शेवटल्या जन्मीं आपण शाक्य कुलात जन्मले असेही ती म्हणते. परंतु त्या कुलाची माहिती कोठेच सापडली नाही. ती

भिक्षुणी होऊन राहिली आणि ७८ व्या वर्षी बुद्धाजवळ जाऊन तिने वर दिल्याप्रमाणे भाषण केले, असे अपदानकाराचे म्हणणे दिसते. पण भिक्षुणी झाल्यावर तिने कोणताही उपदेश केल्याचे किंवा तिचा कशाही प्रकारे बौद्धसंघाशीं संबंध आल्याचे आढळून येत नाही. तेव्हा ती खरोखरच भिक्षुणी झाली की नाही हे निश्चयाने सांगता येणे कठीण आहे. अपदान ग्रंथात तिचे नाव यशोधरा आणि ललितविस्तरात गोपा असें आले आहे. तेव्हा यापैकी खरे नाव कोणते, किंवा ही दोन्ही तिची नावे होतीं हे समजत नाही.

## गृहत्यागाचा प्रसंग

बोधिसत्त्वाने गृहत्याग केला त्या रात्री तो आपल्या प्रासादात बसला होता. त्याच्या परिवारातील स्त्रियांनी वाद्यगीतादिकांनी त्याला रंजविण्याचे पुष्कळ परिश्रम केले. पण बोधिसत्त्व त्यात रमला नाही. शेवटीं त्या स्त्रिया कंटाळून झोपीं गेल्या. कोणी बडबडत होत्या, तर कुणाच्या तोंडातून लाळ गळत होती. त्याला त्याचा भयंकर कंटाळा आला; व खाली जाऊन त्याने छन्न सारथ्याला हाक मारून जागे केले. छन्नाने कंथक नावाच्या घोडयाला सज्ज करून आणले. त्यावर बोधिसत्त्व आरूढ झाला व छन्न घोडयाची शेपटी धरून बसला. देवतांनी त्या दोघांसाठी नगरद्वार खुले केले. त्यातून बाहेर पडून ते दोघेही अनोमा नांवाच्या नदीतीरावर गेले. तेथे बोधिसत्त्वाने आपले केस आपल्या तरवारीने कापून टाकले. आणि दागदागिने छन्नाच्या स्वाधीन करून बोधिसत्त्व राजगृहाला गेला. बोधिसत्त्वाच्या वियोगामुळे कंथकाने अनोमा नदीवरच देहविसर्जन केले. आणि छन्न सारथि दागदागिने घेऊन कपिलवस्तूला गेला.

हा निदानकथेतील गोष्टीचा सारांश आहे. निदानकथेत, ललितविस्तरांत आणि बुद्धचरित काव्यात या प्रसंगाचीं रसभरित वर्णने आढळतात; आणि त्यांचा बौद्ध चित्रकलेवर चांगला परिणाम

झाला आहे. परंतु त्याच्यात तथ्य मुळीच नाही, किं वा फारच थोडे असावे, असें वाटतें. का की, प्राचीनतर सुत्तांतून ह्या असभाव्य दतकथेला मुळीच आधार सापडत नाही.

अरियपरियेसनसुत्तांत स्वत. भगवान् बुद्धाने आपल्या गृहत्यागसमयाची हकीगत दिली आहे, ती अशी' —

सो खो अहं भिक्खवे अपरेन समयेन दहरो व समानो सुसु काळकेसो भद्रेन योब्बनेन समन्नागतो पठमेन वयसा अकामकान मातापितुन्न अस्सुमुखान रुदन्तान केसमस्सु ओहारेत्वा कासावानि वत्थानि अच्छादेत्वा अगारस्मा अनगारियं पब्बजिं।

'भिक्षुहो, असा विचार करीत असता काही काळाने, जरी मी त्या वेळीं तरुण होतो, माझा एकही केस पिकला नव्हता, मी भरज्वानीत होतो आणि माझे आईबाप मला परवानगी देत नव्हते, डोळयातून निघणाऱ्या अश्रुप्रवाहाने त्याची मुखे भिजली होती, ते सारखे रडत होते, तरी मी (त्या सगळयाची पर्वा न करता) शिरोमुडन करून, काषाय वस्त्रांनी देह आच्छादून, घरातून बाहेर पडलों ( मी सन्यासी झालो ).'

हाच उतारा जशाचा तसाच महासच्चकसुत्तात सापडतो. यावरून बोधिसत्त्व घरच्या माणसाना कळू न देता छन्नासह कथकावर स्वार होऊन पळून गेला हें म्हणणे साफ चुकीचें आहे असें दिसते. बोधिसत्त्वाची खुद्द आई मायादेवी सातव्या दिवशीं जरी निवर्तली असली तरी त्याचे पालन महाप्रजापती गोतमीने स्वत च्या मुलाप्रमाणेंच केले. अर्थात वरील उताऱ्यात तिलाच बुद्ध भगवताने आई म्हटले असले पाहिजे. शुद्धोदनाला व गोतमीला तो परिव्राजक होणार, हे पुष्कळ दिवसापासून माहीत होतें, आणि त्याच्या इच्छेविरुद्ध व त्याच्या समक्षच त्याने प्रव्रज्या घेतली हें या उताऱ्यावरून स्पष्ट होतें.

## प्रकरण पांचवें

# तपश्चर्या व तत्त्वबोध

### आळार कालामाची भेट

घर सोडून बोधिसत्त्व थेट राजगृहाला गेला, तेथें त्याची व बिंबिसार राजाची भेट झाली, आणि तदनंतर तो आळार कालामाकडे जाऊन त्याचें तत्त्वज्ञान शिकला, अशा अर्थाचें वर्णन जातकाच्या निदानकथेंत सापडतें. अश्वघोषकृत बुद्धचरितकाव्यांत निदानकथेचाच क्रम स्वीकारला आहे. ललितविस्तरांत 'बोधिसत्त्व प्रथम वैशालीला गेला, व तेथें आडार कालामाचा शिष्य झाला, आणि नंतर राजगृहाला गेला, तेथें बिंबिसार राजानें त्याची भेट घेतल्यावर तो उद्रक रामपुत्रापाशीं गेला,' अशा प्रकारचें सविस्तर वर्णन आहे. पण हीं दोन्ही वर्णनें प्राचीन सुत्ताशीं जुळत नाहीत. वर दिलेल्या आर्यपरियेसन सुत्ताच्या उताऱ्यांत बोधिसत्त्वानें घरीं असतानाच आईबापासमक्ष प्रव्रज्या घेतली असें म्हटलें आहे त्यानंतर ताबडतोब हा मजकूर आढळतो'—

सो एव पब्बजितो समानो किंकुसलगवेसी अनुत्तरं सन्तिवरपदं परियेसमानो येन आळारो कालामो तेनुपसंकमिं ।

(भगवान् म्हणतो,) "याप्रमाणें प्रव्रज्या घेतल्यावर हितकर मार्ग कोणता हें जाणण्याच्या उद्देशानें श्रेष्ठ, लोकोत्तर, शान्त तत्त्वाचा शोध करीत मी आळार कालामापाशीं गेलों."

या उताऱ्यावरून असें दिसून येतें की, बोधिसत्त्व राजगृहाला न जाता प्रथमतः आळार कालामापाशीं गेला. आळार कालाम कोसल देशाचाच रहिवाशी होता. अंगुत्तरनिकायाच्या तिकनिपातांत

(सुत्त न. ६५) कालाम नावाच्या क्षत्रियाच्या केसपुत्त शहराचा उल्लेख आला आहे. त्यावरून असें दिसतें की, त्याच कालामापैकी आळार कालाम हा एक होता. शाक्य आणि कोलिय राज्यात त्याची बरीच ख्याति होती. त्याच्या एका शिष्याचा—भरण्डु कालामाचा—आश्रम कपिलवस्तूला होता, हे वर सांगितलेच आहे. दुसरे त्याचे किंवा फार झाले तर उद्दक रामपुत्ताचे शिष्य जवळच्या कोलियाच्या देशात राहत असत; आणि या सप्रदायाचे ग्रंथ शाक्य आणि कोलिय देशात बरेच होते, यात शंका नाही. बोधिसत्त्व प्रथम-ध्यानाची पद्धति ह्याच परिव्राजकाकडून शिकला, आणि त्यानीच त्याला सन्यासदीक्षा दिली असली पाहिजे.

परतु शाक्य किंवा कोलिय देशातील एखाद्या आश्रमात राहून काल कठणे बोधिसत्त्वाला योग्य वाटले नाही. हितकर मार्गाचा आणि श्रेष्ठ, लोकोत्तर, शान्त तत्त्वाचा बोध करून घेण्यासाठी त्याने खुद्द आळार कालामाची भेट घेतली. त्या वेळीं आळार कालाम कोठे तरी कोसल देशात राहत असावा. त्याने बोधिसत्त्वाला चार ध्यानें व त्याच्यावरच्या तीन पायऱ्या शिकविल्या. पण केवळ या समाधीच्या सात पायऱ्यानी त्याचे समाधान झाले नाही. हा मनोनिग्रहाचा मार्ग होता खरा, पण सर्व मनुष्यजातीला त्याचा उपयोग काय? याचसाठी हितकर मार्गाचा शोध बोधिसत्त्वाने पुढे चालविला.

## उद्दक रामपुत्ताची भेट

आळार कालाम आणि उद्दक रामपुत्त हे दोघेही एकच समाधिमार्ग शिकवीत होते. त्यांच्यांत एवढाच फरक होता की, आळार कालाम समाधीच्या सात पायऱ्या व उद्दक रामपुत्त आठ पायऱ्या शिकवीत असे. या दोघांना कोणी तरी एकच गुरु असावा,

आणि नंतर त्यांनी हे दोन पंथ काढले असावेत. आळार कालामाला सोडून बोधिसत्त्व उद्दकापाशीं गेला. पण त्याच्याही मार्गांत त्याला विशेष तथ्य दिसले नाही. तेव्हा राजगृहाला जाऊन तेथील प्रसिद्ध श्रमणपंथाचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याचा त्याने निश्चय केला.

## बिंबिसार राजाची भेट

राजगृहात बोधिसत्त्वाच्या आगमनाचे वर्णन एका अज्ञात कवीने सुत्तनिपातातील पब्बज्जासुत्तात केले आहे. त्याचे भाषान्तर येणेप्रमाणे –

१. चक्षुष्मन्ताने (बोधिसत्त्वाने) प्रव्रज्या का घेतली व कोणत्या विचारामुळे त्याला ती आवडली हे सांगून (त्याच्या) प्रव्रज्येचे मी वर्णन करतो.

२. गृहस्थाश्रम ही अडचणीची आणि कचऱ्याची जागा व प्रव्रज्या म्हणजे मोकळी हवा असे जाणून त्याने प्रव्रज्या घेतली.

३. प्रव्रज्या घेऊन त्याने शारीरिक पापकर्म वर्ज्य केले. वाचसिक दुर्वर्तन सोडून दिले आणि आपली उपजीविका शुद्ध मार्गाने चालविली.

४. बुद्ध मगधांच्या गिरिव्रजाला (राजगृहाला) आला. सर्व शरीरावर उत्तम लक्षणें फैलावलीं आहेत अशा त्याने राजगृहात भिक्षाटनासाठी प्रवेश केला.

५. आपल्या प्रासादावरून बिंबिसाराने त्याला पाहिलें. त्याची लक्षणसंपत्ति पाहून बिंबिसार म्हणाला,

६. अहो माझे ऐका:–हा सुंदर, भव्य, शुद्ध आणि आचरणाने संपन्न असून पायापाशीं दोन हाताच्या अंतरावर दृष्टि ठेवून चालतो. (युगमत्तं च पेक्खति).

७. हा दृष्टि पायापाशीं ठेवून चालणारा जागृत भिक्षु नीच कुळांतला वाटत नाही. तो कोठे जात आहे, हें राजदूतांना धावत जाऊन पाहू द्या.

८. तो भिक्षु (बोधिसत्त्व) कोठे जातो व वस्तीला कोठे राहतो हे पाहण्यासाठी ते (बिंबिसार राजाने पाठविलेले) दूत त्याच्या मागोमाग गेले.

९. इन्द्रियाचे सरक्षण करीत घरोघरी भिक्षा घेऊन विवेकी आणि जागृत बोधिसत्त्वाने ताबडतोब पात्रभर भिक्षा मिळविली.

१०. भिक्षाटन पुरें करून तो मुनि नगरातून बाहेर पडला आणि वस्तीला येथे राहीन अशा उद्देशाने पाण्डव पर्वताजवळ आला.

११. त्याला वस्तीला राहिलेला पाहून ते दूत त्याच्याजवळ बसले आणि त्यापैकी एकाने जाऊन राजाला खबर दिली,—

१२. 'महाराज, तो भिक्षु पाण्डव पर्वताच्या पूर्वेला व्याघ्रासारखा, ऋषभासारखा किंवा गिरिगव्हरात राहणाऱ्या सिंहासारखा बसला आहे!'

१३. तें दूताचे वचन ऐकून तो क्षत्रिय (राजा) उत्तम यानांत बसला व त्वरेने पाण्डव पर्वताकडे जाण्यास निघाला.

१४. जिथपर्यंत यानाने जाणे शक्य होते तिथपर्यंत जाऊन तो क्षत्रिय यानातून खाली उतरला आणि पायींच (बोधिसत्त्वाच्या) जवळ येऊन त्याच्या सनिध बसला.

१५. तेथे बसून राजाने त्याला कुशलप्रश्नादिक विचारले. कुशलप्रश्नादिक विचारून तो येणेप्रमाणे बोलला.—

१६. तू जवान आणि तरुण आहेस; मनुष्याच्या प्रथम वयांतला आहेस. तुझी कान्ति कुलीन क्षत्रियासारखी अत्यंत रोचक दिसते.

१७. तूं हत्तीचा समुदाय बरोबर घेऊन माझ्या सेनेला शोभा आण. मी तुला संपत्ति देतो, तिचा उपभोग घे, आणि आता तुझी जाति कोणती, हे मला सांग.

१८. हे राजा, येथून सरळ हिमालयाच्या पायथ्याशीं धनाने आणि वीर्याने सपन्न–ज्याचा कोसल राष्ट्रात समावेश होतो–असा देश आहे.

१९. त्याचे (तेथल्या महाजनाचे) गोत्र आदित्य आहे आणि त्याच्या जातीला शाक्य म्हणतात. त्या कुलातून, हे राजा, मी परिव्राजक झालो, तो कामोपभोगाच्या इच्छेने नव्हे.

२०. कामोपभोगात मला दोष दिसला आणि एकान्तवास सुखाचा वाटला. आता मी तपश्चर्येसाठी जात आहे. त्या मार्गांत माझे मन रमते.

या सुत्ताच्या तिसऱ्या गाथेत बोधिसत्त्वाने काया, वाचा व उपजीविका याचे सशोधन केल्याचा उल्लेख आला आहे. हे कृत्य घरांतून निघाल्यानतर वाटेतल्या वाटेत त्याला करता येणे शक्य दिसत नाही. आळार कालाम व उद्दक रामपुत्त यापाशीं राहून त्याचे आचार विचार नीट साभाळून बोधिसत्त्वाने हे काम केले असावे असे दिसतें. पण एवढयाने त्याचे समाधान न होता प्रसिद्ध श्रमण-नायकाचें तत्त्वज्ञान जाणून घेण्याच्या उद्देशाने तो राजगृहाला आला. तेथे त्या सर्व संप्रदायामध्ये कमीजास्ती प्रमाणाने तपश्चर्या आढळून आल्यामुळे आपणही अशीच तपश्चर्या केली पाहिजे, असे त्याला वाटले, आणि म्हणूनच या सुत्ताच्या शेवटल्या गाथेत, 'आता मी तपश्चर्येसाठी जात आहे,' असे तो म्हणतो. कामोपभोगातून त्याचे मन पूर्वीच निघाले असल्यामुळे मगधराजाने देऊं केलेला अधिकार त्याला आवडला नाही, हे सांगावयालाच नको.

## उरुवेलेला आगमन

राजगृहाहून बोधिसत्त्व उरुवेलेला आला आणि तपश्चर्या करण्यासाठी हे स्थान त्याने पसंत केले. त्याचे वर्णन अरियपरियेसन सुत्तात सापडते.

भगवान् म्हणतो, "भिक्षुहो, तो मी कुशल कोणते हे जाणण्याच्या हेतूने लोकोत्तर शांतीच्या श्रेष्ठ स्थानाचा शोध करीत करीत क्रमशः प्रवास करून उरुवेला येथे सेनानिगमाला आलो. तेथे मी रमणीय भूमिभाग पाहिला. त्यात सुशोभित वन असून नदी मंद मंद वाहत होती. तिच्या दोन्ही बाजूला सफेत वाळवंट व उतार सोपा, आणि ती अत्यंत रमणीय. या वनाच्या चारी बाजूंना भिक्षाटन करण्यासाठी गाव दिसले. हा रमणीय भूमिभाग असल्यामुळे कुलीन मनुष्याला तपश्चर्या करण्याला योग्य वाटून मी त्याच ठिकाणी तपश्चर्या चालविली."

राजगृहाच्या सभोवतीं ज्या टेकड्या आहेत त्यांच्यावर निर्ग्रंथ वगैरे श्रमण तपश्चर्या करीत असत, असा उल्लेख बऱ्याच ठिकाणी सापडतो. पण बोधिसत्त्वाला तपश्चर्येसाठी हे रुक्ष पर्वत आवडले नाहीत, उरुवेलेचा रम्य प्रदेश आवडला. यावरून सृष्टिसौंदर्यावर असलेले त्याचे प्रेम व्यक्त होते.

## तीन उपमा

तपश्चर्येला आरंभ करण्यापूर्वी बोधिसत्त्वाला तीन उपमा सुचल्या. त्यांचे वर्णन महासच्चकसुत्तात केले आहे. भगवान् म्हणतो, "हे अग्गिवेस्सना, एखादे ओले लाकूड पाण्यात पडलेले असले, आणि एखादा मनुष्य उत्तरारणि घेऊन त्याच्यावर घासून अग्नि उत्पन्न करू लागला, तर त्यापासून आग उत्पन्न होईल काय?"

सच्चक– भो गोतम, त्या लाकडातून आग उत्पन्न होणे शक्य नाही. का की, ते ओले आहे. त्या माणसाचे परिश्रम व्यर्थ जाऊन त्याला त्रास मात्र होईल.

भगवान्–त्याचप्रमाणे, हे अग्गिवेस्सना, जे कोणी श्रमण आणि ब्राह्मण शरीराने आणि मनाने कामोपभोगापासून अलिप्त झाले नाहीत आणि ज्याचा कामविकार शांत झाला नाही त्यांनी कितीही कष्ट भोगले तरी त्यांना ज्ञानदृष्टि आणि लोकोत्तर संबोध प्राप्त व्हावयाचा नाही. हे अग्गिवेस्सना, दुसरी मला उपमा अशी सुचली की, एखादे ओले लाकूड पाण्याहून दूर पडले आहे आणि एखादा मनुष्य उत्तरारणि घासून त्यातून अग्नि उत्पन्न करण्याचा प्रयत्न करू लागला, तर त्यापासून आग उत्पन्न होईल काय ?

सच्चक–नाही, भो गोतम, त्याचा प्रयत्न व्यर्थ जाऊन त्याला त्रास मात्र होईल. का की, हे लाकूड ओले आहे.

भगवान–त्याचप्रमाणे, हे अग्गिवेस्सना, जे श्रमण आणि ब्राह्मण कामोपभोग सोडून शरीराने आणि मनाने त्यापासून अलिप्त राहतात खरे, पण ज्यांच्या मनातील कामविकार शमलेले नसतात, त्यांनी जरी कितीही कष्ट सोसले, तरी त्यापासून त्यांना ज्ञानदृष्टि आणि लोकोत्तर संबोध प्राप्त व्हावयाचा नाही. हे अग्गिवेस्सना, आणखी तिसरी एक उपमा मला सुचली. एखादे कोरडे लाकूड, पाण्यापासून दूर पडले आहे, आणि एखादा मनुष्य त्याच्यावर उत्तरारणि घासून अग्नि उत्पन्न करण्याचा प्रयत्न करू लागला, तर तो आग उत्पन्न करू शकेल की नाही ?

सच्चक—होय, भो गोतम, कारण ते लाकूड साफ कोरडें आहे, आणि पाण्यामध्ये पडलेले नाही.

भगवान्—त्याचप्रमाणे, हे अग्गिवेस्सना, जे श्रमणब्राह्मण कायेने आणि चित्ताने कामोपभोगापासून दूर राहतात, आणि

ज्यांच्या मनातील कामविकार साफ नष्ट झाले आहेत, त्यानी शरीराला अत्यंत कष्ट दिले काय किंवा न दिले काय, त्याना ज्ञानदृष्टि आणि लोकोत्तर सबोध प्राप्त होणे शक्य आहे.

ह्या तीन उपमा बोधिसत्त्वाला तपश्चर्येला आरंभ करताना सुचल्या. जे श्रमणब्राह्मण यज्ञयागादिकातच समाधान मानतात, त्यानी तशा प्रसगी तपश्चर्या करून शरीराला कष्ट दिले, तरी त्याना तत्त्वबोध व्हावयाचा नाही. दुसरे श्रमणब्राह्मण यज्ञयागाचा मार्ग सोडून देऊन जगलात जाऊन राहिले, पण जर त्याच्या अन्तःकरणातील कामविकार नष्ट झाले नाहीत, तर त्याच्या तपश्चर्येपासून काही निष्पन्न होणार नाही. ओल्या लाकडावर उत्तरारणि घासून अग्नि उत्पन्न करण्याप्रमाणे त्याचा प्रयत्न व्यर्थ जाणार. पण जर एखादा माणूस कामोपभोगापासून दूर राहून मनातील कामविकार साफ नष्ट करू शकला, तर त्याला देहदडावाचून तत्त्वबोध प्राप्त करून घेता येईल.

### हठयोग

बोधिसत्त्वाला ह्या उपमा सुचल्या, तरी त्याने त्या काळच्या श्रमणव्यवहाराला अनुसरून तीव्र तपश्चर्या करण्याचा निश्चय केला. प्रथमतः त्याने हठयोगावर भर दिला. भगवान सच्चकाला म्हणतो, "हे अग्गिवेस्सन, मी जेव्हा दातावर दात दाबून आणि जीभ टाळूला लावून माझ्या चित्ताचे दमन करी, तेव्हा माझ्या काखेतून घाम सुटे. ज्याप्रमाणे एखादा बलवान पुरुष दुर्बल माणसाला डोक्याला किंवा खाद्याला धरून दाबतो, त्याप्रमाणें मी माझे चित्त दाबीत होतों.

"हे अग्गिवेस्सन, त्यानतर आश्वासप्रश्वास दाबून मी ध्यान करू लागलो. त्या वेळीं माझ्या कानांतून श्वास निघण्याचा शब्द होऊ लागला. जसा लोहाराचा भाता चालतो, तसा माझ्या कानातून आवाज येऊ लागला. तरी पण हे अग्गिवेस्सन, मी आश्वासप्रश्वास

आणि कान दाबून ध्यान करू लागलों. तेव्हा तीक्ष्ण तरवारीच्या टोकाने माझे डोके कोणी मथन करीत आहे, असा मला भास झाला. तथापि हेच ध्यान मी पुढे चालविले आणि माझ्या डोक्याला चामड्याच्या पट्ट्याचे वेष्टन देऊन कोणी घट्ट आवळीत आहे असें वाटूं लागले. तरी तेच ध्यान मी पुढे चालू ठेवले. त्यामुळे माझ्या उदरात वेदना उठल्या. कसाई शस्त्राने जसें गाईचे पोट कोरतो, तसें माझे पोट कोरले जात आहे असें मला वाटलें. या सर्व प्रसगीं माझा उत्साह कायम होता, स्मृति स्थिर होती, पण शरीरामध्ये त्राण कमी झाले. तथापि त्या कष्टप्रद वेदना माझ्या चित्ताला बाधू शकल्या नाहीत."

तिसऱ्या प्रकरणात श्रमणांच्या नानाविध तपश्चर्या दिल्या आहेत. त्याच्यांत हठयोगाचा समावेश झालेला नाही. तथापि त्या काळीं वरच्या सारख्या हठयोगाचा अभ्यास करणारे तपस्वी होते, असें गृहीत धरावें लागतें. नाही तर बोधिसत्त्वाने तशा योगाचा अभ्यास आरभिला नसता.

## उपोषणें

याप्रमाणे हठयोगाचा अभ्यास करून त्याच्यांत तथ्य नाही असें दिसून आल्यावर बोधिसत्त्वाने उपोषणाला सुरुवात केली. अन्नपाणी साफ सोडून देणें त्याला योग्य वाटले नाही. पण तो अत्यत अल्पाहार सेवन करू लागला. भगवान् सच्चकाला म्हणतो, "हे अग्गिवेस्सन, मी थोडा थोडा आहार खाऊ लागलो. मुगांचा काढा, कुळथांचा काढा, वाटाण्याचा काढा किंवा हरभऱ्यांचा (हरेणु) काढा पिऊनच मी राहत होतो. तो देखील अत्यत अल्प असल्यामुळे माझे शरीर फारच कृश झालें. आसीतकवल्लीच्या किंवा कालवल्लीच्या गाठींप्रमाणे माझ्या अवयवाचे सांधे दिसू लागले. उंटाच्या पावलाप्रमाणे माझा कटिबंध झाला. सुताच्या चात्यांच्या

माळप्रमाणे माझा पाठीचा कणा दिसू लागला. मोडक्या घराचे वासे जसे खालीवर होतात, तशा माझ्या बरगडया झाल्या. खोल विहिरीत पडलेल्या नक्षत्राच्या छायेप्रमाणे माझी बुबुळे खोल गेली. कच्चा भोपळा कापून उन्हात टाकला असता जसा कोमेजून जातो, तशी माझ्या डोक्याची चामडी कोमेजून गेली. मी पोटावरून हात फिरविला तर पाठीचा कणा माझ्या हाती लागे आणि पाठीच्या कण्यावरून हात फिरविला म्हणजे पोटाची चामडी हाती लागत असे. याप्रमाणे पाठीचा कणा आणि पोटाची चामडी एक झाली होती. शौचाला किंवा लघवीला बसलो, तर मी तेथेच पडून राही. अंगावरून हात फिरविला असता माझे दुर्बळ झालेले लोम आपोआप खाली पडत."

## वितर्कांवर ताबा

बोधिसत्त्वाने सात वर्षे तपश्चर्या केली असा उल्लेख अनेक ठिकाणी सापडतो. या सात वर्षांत बोधिसत्त्व प्राधान्येकरून देहदंडन करीत असला, तरी त्याच्या मनात दुसरे विचार घोळत नव्हते, असें नाही. वर दिलेल्या तीन उपमा पाहिल्या तरी असे दिसून येते की, कामविकार पुरे नष्ट केल्यावाचून नानाविध कायक्लेशाचा उपयोग होणार नाही, हे त्याला स्पष्ट दिसत होते. याशिवाय आणखीही सद्विचार त्याच्या मनात येत, असे अनेक सुत्तावरून दिसते. त्यापैकी काही विचारांचा येथे थोडक्यात संग्रह करीत आहे.

मज्झिमनिकायातील द्वेधावितक्क सुत्तांत भगवान् म्हणतो, "भिक्षु हो, मला संबोध प्राप्त होण्यापूर्वी, मी बोधिसत्त्व असतानाच माझ्या मनात असा विचार आला की, वितर्कांचे दोन भाग करावे. त्याप्रमाणे कामवितर्क ( विषयवितर्क ), व्यापादवितर्क ( द्वेषवितर्क ) आणि विहिंसावितर्क ( दुसऱ्याला किंवा आपणाला त्रास देण्याचा वितर्क ), ह्या तीन वितर्कांचा मी एक विभाग केला; आणि नैष्कर्म्य

(एकान्तवास), अव्यापाद (मैत्री) आणि अविहिंसा (त्रास न देण्याची बुद्धि) या तीन वितर्कांचा दुसरा विभाग केला. त्यानंतर मी मोठ्या सावधगिरीने व दक्षतेने वागत असता पहिल्या तीन वितर्कांपैकी एखादा वितर्क माझ्या मनात उत्पन्न होत असे. त्या वेळीं मी विचार करीत होतो की, हा वाईट वितर्क माझ्या मनात उत्पन्न झाला आहे. तो माझ्या दु.खाला, दुसऱ्याच्या दु.खाला किंवा उभयताच्या दु खाला कारणीभूत होईल, प्रज्ञेचा निरोध करील, व निर्वाणाला जाऊ देणार नाही. या विचाराने तो वितर्क माझ्या मनातून नाहीसा होत असे.

"भिक्षु हो, शरदृतूत जिकडे तिकडे शेते पिकाला आली असता गुराखी गुराचे मोठ्या सावधगिरीने रक्षण करतो, काठीने बडवू .खील त्याना शेतापासून दूर ठेवतो. का की, तसे केले नाही तर गुरे लोकाच्या शेतात शिरतील, आणि आपणाला दड भरावा लागेल, हें तो जाणतो. त्याप्रमाणे काम, व्यापाद, विहिंसा इत्यादिक अकुशल मनोवृत्ति भयावह आहेत हें मी जाणले.

"त्या वेळीं मी मोठ्या सावधगिरीने आणि उत्साहाने वागत असतां माझ्या मनात नैष्कर्म्य, अव्यापाद आणि अविहिंसा ह्या तीन वितर्कांपैकी एखादा वितर्क उत्पन्न होत असे. तेव्हा मी असा विचार करीत होतो की हा कुशल वितर्क माझ्या मनात उत्पन्न झाला आहे, तो आपणाला, परक्याला किंवा उभयताना दुःख देणारा नव्हे, प्रज्ञेची अभिवृद्धि करणारा व निर्वाणाला पोचविणारा आहे. त्याचे सर्व रात्र किंवा सर्व दिवस चिंतन केले तरी त्यापासून भय नाही. तथापि पुष्कळ वेळ चिंतन केले असता माझा देह श्रान्त होईल, आणि त्यामुळे माझे चित्त स्थिर राहणार नाही. आणि अस्थिर चित्ताला समाधि कोठून मिळणार? म्हणून (काही वेळाने) माझे चित्त मी अभ्यन्तरींच स्थिर करीत असें...एखादा गुराखी उन्हाळ्याच्या

शेवटीं पिकें लोकांनी घरीं नेल्यावर गुराना खुशाल मोकळे सोडून देतो. तो झाडाखाली असला किंवा मोकळ्या जागेत असला तरी गाईवर नजर ठेवण्यापलीकडे दुसरे काही करीत नाही. त्याप्रमाणे नैष्कर्म्यादिक कुशल वितर्क उत्पन्न झाले असता हे कुशल धर्म आहेत एवढीच मी स्मृति ठेवीत होतो. ( त्याचा निग्रह करण्याचा प्रयत्न करीत नसें.) ”

## निर्भयता

कुशल वितर्कांच्या साहाय्याने अकुशल वितर्कांवर जय मिळविला, तरी जोपर्यंत धार्मिक माणसाच्या मनात निर्भयता उत्पन्न झाली नाही, तोपर्यंत त्याला तत्त्वबोध होणे अशक्य आहे. दरोडेखोर किंवा सैनिक आपल्या विरोधकावर धाडसाने तुटून पडतात. पण त्याच्यांत निर्भयता थोडीच असते ! ते शस्त्रास्त्रानी कितीही सज्ज असले, तरी भयभीत असतात, न जाणो, आपले शत्रु आपणावर कधी घाला घालतील याचा नेम नाही, असें त्यास वाटते. अर्थात् त्याची निर्भयता खरी नव्हे. अध्यात्ममार्गाने जी निर्भयता मिळते तीच खरी होय. ती बोधिसत्त्वाने कशी मिळविली हे खालील उताऱ्यावरून समजून येईल.

बुद्ध भगवान् जानुश्रोणी ब्राह्मणाला म्हणतो:—“हे ब्राह्मणा, जेव्हा मला सबोध प्राप्त झाला नव्हता, मी केवळ बोधिसत्त्व होतों, तेव्हा मला असें वाटलें की, जे कोणी श्रमण किंवा ब्राह्मण परिशुद्ध कायकर्म न आचरिता अरण्यामध्ये राहतात, ते ह्या दोषामुळे भयभैरवाला आमंत्रण देतात. पण माझीं कर्मे परिशुद्ध आहेत. परिशुद्ध कायकर्में असलेले जे सज्जन (आर्य) अरण्यांत राहतात त्यापकी मी एक आहें, असें जेव्हा मला दिसून आले, तेव्हा अरण्यवासांत मला अत्यत निर्भयता वाटली. दुसरे कित्येक श्रमण किंवा ब्राह्मण अपरिशुद्ध वाचसिक कर्मे आचरीत असतांना, अपरिशुद्ध मानसिक

कर्मे आचरीत असताना, अपरिशुद्ध आजीव (उपजीविका) करीत असताना अरण्यामध्ये राहतात, आणि या दोषामुळे ते भयभैरवाला आमंत्रण देतात. परंतु माझी वाचसिक आणि मानसिक कर्मे व उपजीविका परिशुद्ध आहेत. ज्या सज्जनाचीं ही सर्व परिशुद्ध आहेत त्यापैकी मी एक आहे, असे दिसून आल्यावर अरण्यवासात मला अत्यंत निर्भयता वाटली.

"हे ब्राह्मणा, जे श्रमण किंवा ब्राह्मण लोभी, प्रदुष्टचित्त, आळशी, भ्रान्तचित्त किंवा संशयग्रस्त होऊन अरण्यात राहतात, ते ह्या दोषामुळे भयभैरवाला आमंत्रण देतात. पण माझे चित्त कामविकारापासून अलिप्त आहे, द्वेषापासून मुक्त आहे (म्हणजे सर्व प्राणिमात्राविषयी माझ्या मनात मैत्री वसते), माझे मन उत्साहपूर्ण, स्थिर व निःशंक आहे. अशा गुणांनी युक्त जे सज्जन अरण्यात राहतात, त्यापैकी मी एक आहे, असे दिसून आल्यावर मला अरण्यवासात अत्यंत निर्भयता वाटली.

"हे ब्राह्मणा, जे श्रमण किंवा ब्राह्मण आत्मस्तुति आणि परनिंदा करतात, भ्याड असतात, मानमान्यतेची चाड धरून अरण्यात राहतात. ... किंवा जडबुद्धि असतात, ते या दोषामुळे भयभैरवाला आमंत्रण देतात. पण माझ्या अंगीं हे दुर्गुण नाहीत, मी आत्मस्तुति किंवा परनिंदा करीत नाही, भ्याड नाही, मानमान्यतेची मला इच्छा नाही. . . आणि मी प्रज्ञावान् आहे. जे सज्जन अशा गुणांनी युक्त होऊन अरण्यात राहतात, त्यापैकी मी एक आहे, असे दिसून आल्यावर मला अरण्यवासात अत्यंत निर्भयता वाटली.

"हे ब्राह्मणा, चतुर्दशी, पूर्णिमा, अमावास्या आणि अष्टमी या रात्री (भयासंबंधाने) प्रसिद्ध आहेत. त्या रात्री ज्या उद्यानात, अरण्यात किंवा वृक्षाखाली लोक देवतांना बलिदान देतात, किंवा जीं स्थळे अत्यंत भयंकर आहेत असें समजतात, त्या ठिकाणीं मी

(एकाकी) राहत असे, कारण भयभैरव कसे असते ते पाहण्याची माझी इच्छा होती. अशा स्थळी राहत असता एखादा हरिण त्या बाजूने जाई, एखादा मोर सुकलेले लाकूड खाली पाडी, किंवा झाडाची पाने वाऱ्याने हालत. त्या प्रसंगी मला वाटे, हेच ते भयभैरव होय, आणि मी म्हणे, भयभैरवाची इच्छा धरूनच मी या ठिकाणी आलो आहे, तेव्हा या स्थितीत असतानाच त्याचा नाश केला पाहिजे. मी चालत असताना ते भयभैरव आले, तर चालत असतानाच त्याचा नाश करीत असे. जोपर्यंत त्याचा नाश केला नाही, तोपर्यंत उभा राहत नसे आणि बसत नसे, किंवा अथरुणावर पडत नसे. जर ते भयभैरव उभा असताना आले, तर उभा असतानाच त्याचा मी नाश करीत असे. जोपर्यंत त्याचा नाश केला नाही, तोपर्यंत चालत नसे, बसत नसे, किंवा अथरुणावर पडत नसे. बसलो असता जर ते भयभैरव आले, तर मी निजत नसे, उभा राहत नसे, किंवा चालत नसे. बसलो असताच त्याचा नाश करीत असे. अथरुणावर पडलो असता ते आले तर बसत नसे, उभा राहत नसे किंवा चालत नसे, अथरुणावर पडलो असताच त्याचा नाश करीत असे.''

## राजयोग

बोधिसत्त्व केवळ हठयोग आणि तपश्चर्या याच्यामध्येच आपला सर्व काळ कठीत होता असे नाही. तसें करणे कोणत्याही तपस्व्याना शक्य नव्हते. मधून मधून त्याना चागले अन्न खावे लागत असे. शरीरात थोडे बळ आले म्हणजे पुन्हा ते उपोषणादिकाच्या योगाने देहदडन करीत. सात वर्षांच्या कालात बोधिसत्त्व प्राधान्येंकरून तपश्चर्या आचरीत असला, तरी मधून मधून चागले अन्न सेवन करीत होता, आणि शात समाधीही अनुभवीत होता, यांत शका नाही. हठयोग सोडून आपण आनापानस्मृतिसमाधीची भावना कशी करीत

होतों, हें भगवान बुद्धाने आनापानसंयुत्ताच्या पहिल्या वग्गाच्या आठव्या सुत्तांत सांगितलें आहे.

भगवान् म्हणतो:–"भिक्षुहो, आनापानस्मृतिसमाधीची भावना केली असता मोठा फायदा होतो. तिची कशा रीतीने भावना केली असतां मोठा फायदा होतो? एखादा भिक्षु अरण्यात झाडाखाली किंवा दुसऱ्या एकांत जागीं आसनमांडी घालून बसतो. तो दीर्घ आश्वास घेत असला, तर दीर्घ आश्वास घेत आहे, असें जाणतो; दीर्घ प्रश्वास सोडीत असला तर, दीर्घ प्रश्वास सोडीत आहे, असें जाणतो; ऱ्हस्व आश्वास घेत असला, इत्यादि.* .याप्रमाणें आनापानस्मृतिसमाधीची भावना केली असता मोठा फायदा होतो. भिक्षुहो, मी देखील संबोधिज्ञान होण्यापूर्वी, बोधिसत्त्वावस्थेत असताना बहुधा हीच भावना करीत होतो. त्यामुळे माझ्या शरीराला आणि डोळ्याना त्रास होत नसे, आणि माझे चित्त पापविचारापासून मुक्त होत असे."

यावरून स्पष्ट दिसून येईल की, बोधिसत्त्व सदोदित हठयोग आचरीत नव्हता. मधून मधून ह्या शांत राजयोगाचा तो अभ्यास करी व त्यायोगें त्याला समाधान मिळत असे.

## ध्यानमार्गाचा अवलंब

अशा रीतीने उपोषणें आणि आहार घेणे, हठयोग आणि राजयोग यांच्यामध्ये हेलकावे खात खात अखेरीस बोधिसत्त्वाच्या मनाचा एकाएकी असा निश्चय झाला की, तपश्चर्या निखालस निरर्थक आहे; तिच्यावाचून मुक्ति मिळणें शक्य आहे. म्हणून ती सोडून त्याने पुन्हा पूर्णपणें ध्यानमार्गाचें कसें अवलंबन केलें, याचें थोडक्यांत वर्णन महासच्चक सुत्तांत केलें आहे.

---

* विशेष माहितीसाठी, समाधिमार्ग पृ० ३८–४८ पहा.

भगवान् सच्चकाला म्हणतो, "हे अग्गिवेस्सन, माझ्या शाक्य पित्याच्या शेतावर काम चालले असता जबुवृक्षाच्या शीतल छायेत बसून प्रथमध्यान प्राप्त करून घेतल्याची मला आठवण झाली, आणि त्या आठवणीला अनुसरून माझी समजूत झाली की, हाच बोधाचा मार्ग असला पाहिजे. आणि जे सुख चैनीच्या पदार्थांच्या उपभोगावाचून आणि अकुशल विचारापासून लाभते, त्या सुखाला मी का भ्यावे? असा माझ्या मनात विचार आला, आणि त्यानतर या सुखाला मी भिणार नाही, असा मी निश्चय केला. परतु ते सुख अत्यंत कृश झालेल्या देहाने मिळणारे नव्हते. म्हणून थोडा थोडा आहार खाण्याचा विचार करून मी त्याप्रमाणे वागू लागलो. त्या वेळीं पाच भिक्षु माझी सेवा करीत होते. का की, मला ज्या धर्माचा बोध होईल तो धर्म त्याना शिकवीन, असे त्यास वाटे. परतु जेव्हा मी अन्न खाऊ लागलो (तपश्चर्या सोडून दिली), तेव्हा, 'हा गोतम तपश्चर्येपासून भ्रष्ट होऊन खाण्यापिण्याकडे वळला,' असे वाटून ते पाच भिक्षु मला कटाळून निघून गेले."

तथापि बोधिसत्त्वाचा निश्चय ढळला नाही. तपश्चर्येचा मार्ग सोडून साध्या ध्यानमार्गानेच तत्त्वबोध करून घेतला पाहिजे, याबद्दल त्याची खात्री झाली.

## मारयुद्ध

या प्रसगीं बोधिसत्त्वाशीं माराने युद्ध केल्याचे काव्यात्मक वर्णन बुद्धचरितादिक ग्रथातून आढळते. त्याचा उगम सुत्तनिपातातील पधानसुत्तांत आहे. त्या सुत्ताचे भाषातर येथे देतो:—

१. नैरजन नदीच्या काठीं तपश्चर्येला आरभ करून निर्वाण-प्राप्तीसाठी मोठ्या उत्साहाने मी ध्यान करीत असता—

२. मार करुणस्वर काढून माझ्याजवळ आला. (तो म्हणाला) तू कृश आणि दुर्वर्ण आहेस. मरण तुझ्याजवळ आहे.

३. हजार हिश्शानी त मरणार. एक हिस्सा तुझे जीवित बाकी आहे. अरे भल्या माणसा, तू जग. जगणे उत्तम आहे, जगलास तर पुण्यकर्में करशील.

४. ब्रह्मचर्याने राहिलास आणि अग्निहोत्राची पूजा केलीस तर पुष्कळ पुण्याचा साठा होईल. हा निर्वाणाचा उद्योग कशाला पाहिजे ?

५. निर्वाणाचा मार्ग अत्यंत कठीण आणि दुर्गम आहे. ह्या गाथा बोलून मार बुद्धापाशी उभा राहिला.

६. असे बोलणाऱ्या त्या माराला भगवान् म्हणाला, हे निष्काळजी मनुष्याच्या मित्रा, पाप्या, तू येथे का आलास (हे मी जाणतों).

७. तशा पुण्याची मला बिलकूल गरज नाही. ज्याला पुण्याची गरज असेल त्याला माराने ह्या गोष्टी सांगाव्या.

८. मला श्रद्धा आहे, वीर्य आहे आणि प्रज्ञा पण आहे. येणेप्रमाणे मी माझ्या ध्येयावर चित्त ठेवले असता मला जगण्याबद्दल का उपदेश करतोस ?

९. नदीचा ओघ देखील हा वारा सुकवू शकेल. परंतु ध्येया-वर चित्त ठेवणाऱ्याचे (प्रेषितात्म्याचे) माझे रक्त तो सुकवू शकणार नाही.

१०. (पण माझ्याच प्रयत्नाने) रक्त शोषित झाले, तर त्याबरोबर माझे पित्त आणि श्लेष्म हे विकार देखील आटतात; आणि माझें मांस क्षीण झालें असता चित्त अधिकतर प्रसन्न होऊन स्मृति, प्रज्ञा व समाधि उत्तरोत्तर वाढतात.

११. याप्रमाणे राहून उत्तम सुखाचा लाभ झाला असतां माझे चित्त कामोपभोगांकडे वळत नाही. ही माझी आत्मशुद्धि पहा.

१२. (हे मारा,) कामोपभोग ही तुझी पहिली सेना आहे. अरति ही दुसरी, भूक आणि तहान ही तिसरी, आणि तृष्णा ही तुझी चौथी सेना आहे.

१३. पाचवी आळस, सहावी भीति, सातवी कुशंका, आठवी अभिमान (किंवा गर्व),

१४. लाभ, सत्कार, पूजा (ही नववी), आणि खोटया मार्गाने मिळविलेली कीर्ति (ही दहावी) जिच्या योगे मनुष्य आत्मस्तुति आणि परनिंदा करतो.

१५. हे काळ्या नमुचि, (लोकावर) प्रहार करणारी ही तुझी सेना आहे. भ्याड मनुष्य तिला जिकू शकत नाही. जो तिला जिंकतो, त्यालाच सुख लाभतें.

१६. हे मी माझ्या शिरावर मुज गवत* धारण करीत आहें. माझा पराजय झाला, तर माझे जिणे व्यर्थ. पराजय पावून जगण्यापेक्षा सग्रामात मरण आलेलें बरें.

१७. कित्येक श्रमण-ब्राह्मण तुझ्या सेनेंत मिसळून गेल्यामुळे प्रकाशत नाहीत, आणि ज्या मार्गाने साधुपुरुष जातात तो मार्ग त्याना माहीत नाही.

१८. चारी बाजूना मारसेना दिसते, आणि मार आपल्या वाहनासह सज्ज झाला आहे. त्याच्याबरोबर युद्ध करण्यासाठी मी पुढे सरसावतों. कां की, त्याने मला स्थानभ्रष्ट करू नये.

१९. देव आणि मनुष्य तुझ्या सेनेपुढे उभे राहू शकत नाहीत. त्या तुझ्या सेनेचा, दगडाने मातीचें भांडे फोडून टाकावें त्याप्रमाणे, मी माझ्या प्रज्ञेने पराभव करून टाकतो.

---

*सग्रामातून पराजय पावून मागे फिरावयाचे नाही, यासाठी मुज नावाचे गवत डोक्याला बाधून प्रतिज्ञा करीत असत.

२०. संकल्प ताब्यात ठेवून आणि स्मृति जागृत करून अनेक श्रावकाना उपदेश करीत मी देशोदेशीं सचार करीन.

२१. ते (श्रावक) माझ्या उपदेशाप्रमाणे सावधपणे चालून आणि आपल्या ध्येयावर चित्त ठेवून तुझ्या इच्छेविरुद्ध अशा पदाला जातील की, जेथे शोक करण्याचा प्रसग येत नाही.

२२. (मार म्हणाला,) सात वर्षेपर्यंत भगवताच्या मागोमाग हिंडलो; परतु स्मृतिमान् बुद्धाचे काहीच वर्म सापडले नाही.

२३. येथे काही मऊ पदार्थ सापडेल, काही गोड पदार्थ मिळेल, अशा आशेने कावळा मेदवर्ण पाषाणाजवळ आला.

२४. परतु त्यात लाभ न दिसून आल्यामुळे कावळा तेथून निघून गेला. त्या कावळ्याप्रमाणे मी देखील गोतमापासून निवृत्त होऊन निघून जातो!

२५. याप्रमाणे शोक करीत असता माराच्या काखेतून वीणा खाली पडला; आणि तो दु:खी मार तेथेच अतर्धान पावला.

या सुत्ताचे भाषातर ललितविस्तराच्या अठराव्या अध्यायात आले आहे. त्यावरून याचे प्राचीनत्व सिद्ध होते. वर दिलेला भयभेरवसुत्तातील मजकूर वाचला असता या साध्या रूपकाचा अर्थ सहज लक्षात येतो. मनुष्यजातीच्या कल्याणाला कोणी पुढे सरसावला असता त्यावर पहिल्याने हल्ला करणारी मारसेना म्हटली म्हणजे कामोपभोगाची वासना होय. तिला दाबून पुढे पाऊल टाकतो न टाकतो, तों (अरति) असंतोष उत्पन्न होतो. त्यानतर भूक, तहान वगैरे एकामागून एक उपस्थित होतात आणि त्या सर्व वासनांवर व विकारावर जय मिळविल्याशिवाय कल्याणप्रद तत्त्वाचा साक्षात्कार होणें कधीही शक्य नाही. तेव्हा बुद्धाने माराचा पराभव केला म्हणजे अशा मनोवृत्तींवर जय मिळविला असें समजावें.

## सुजातेने दिलेली भिक्षा

बोधिसत्त्वाला सम्बोधिज्ञान वैशाख पूर्णिमेच्या रात्रीं झालें. त्या दिवशीं दुपारीं सुजाता नावाच्या कुलीन तरुण स्त्रीनें त्याला उत्तम अन्नाची भिक्षा दिली. याचा उल्लेख सुत्तपिटकांत क्वचित सापडतो* आणि या प्रसंगाशिवाय सुजातेचें नांव आलेलें कोठें आढळत नाही. तथापि बौद्ध चित्रकलेंत सुजातेला उत्तम स्थान मिळालें आहे; आणि बुद्धाच्या दृष्टीनें देखील हा प्रसंग चिरस्मरणीय झाला. चुंद लोहारानें दिलेली भिक्षा ग्रहण करून भगवान आजारी पडला. त्यांत आपलें परिनिर्वाण होणार आहे असें त्यानें ताडलें. आणि आपल्या पश्चात चुंदाला लोकांनी दोष देऊं नये म्हणून भगवान आनंदाला म्हणाला, "ज्या दिवशी मला सम्बोधिज्ञान प्राप्त झालें, त्या दिवशीं मिळालेली व आज मिळालेली अशा दोन्ही भिक्षा समसमान आहेत, असें तुम्ही चुंदाला सांगा व त्याचें सांत्वन करा."

## बोधिवृक्षाखालीं आसन

सुजातेनें दिलेली भिक्षा घेऊन बोधिसत्त्वानें नेरंजरा नदीच्या तीरीं भोजन केलें; आणि त्या रात्रीं तो एका पिंपळाच्या झाडाखालीं येऊन बसला. हे झाड सध्या अस्तित्वात नाही. शशांक राजानें त्याचा विध्वंस केला, असें म्हणतात. पण त्याच्याच जागीं लावलेला पिंपळ आणि त्यालाच टेकून बुद्धगयेचें प्रसिद्ध मंदिर आहे. त्या झाडाखालीं बोधिसत्त्व बसला, तेव्हा पुन्हा एकवार ललितविस्तरांत मारयुद्धाचा प्रसंग वर्णिला आहे. संयुत्तनिकायांतील सगाथावग्गांत मारानें बुद्धाला भुलविण्यासाठीं बोधिवृक्षाखालीं (त्या पिंपळाखालीं) तृष्णा, अरति, आणि रगा या आपल्या तीन मुलींना पाठविलें असें वर्णन आढळतें. जातकाच्या निदानकथेंत तर या प्रसंगीं मारसेनेनें

* अंगुत्तरनिकाय एककनिपात. 'बौद्धसंघाचा परिचय', पृ. २३६ पहा.

बुद्धावर चारी बाजूंनी कसा हल्ला चढविला, याचे सविस्तर वर्णन आहे. माराचें सैन्य पाहून ब्रह्मादिक देव पळून जातात, बोधिसत्त्व तेवढा एकटा राहतो. मग मार ते स्थान आपले आहे, असें म्हणून बुद्धाला तेथून उठण्यास सांगतो; आणि त्या स्थानावर आपला हक्क शाबीत करण्यासाठी मारसेनेची साक्ष देतो. सर्व देव पळून गेल्यामुळे त्या प्रसंगी बुद्धाला कोणीच साक्षी सापडत नाही. तेव्हा बुद्ध उजवा हात खाली करून, ही सर्वसहा वसुंधरा साक्ष आहे, असे म्हणतो; आणि पृथ्वी देवता, विराट्स्वरूप धारण करून मारसेनेचा पराभव करिते, इत्यादिक पुराणमय वर्णन जातकट्ठकथाकाराने केले आहे.

बौद्ध चित्रकलेत हा प्रसंग चित्रकारांनी छान रेखाटला आहे. लोभ, द्वेष, मोह, मद, मत्सर इत्यादिक दुष्ट मनोवृत्तींना मूर्तिमत स्वरूपें देण्याचा त्यांचा प्रयत्न वाखाणण्याला योग्य वाटतो. प्रथमतः कवीने या प्रसंगाचे वर्णन केले आणि तदनुसार चित्रकारांनी त्याला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला, किंवा चित्रकारांनी हा प्रसंग रेखाटल्यावर त्यांच्या मागोमाग जाऊन कवींनी त्याचे वर्णन केले, हें सांगता येणे शक्य नाही. तें कांही असो, पण एवढी गोष्ट खरी की, वर दिलेल्या मारसेनेला मूर्त स्वरूप देण्याचा हा प्रयत्न आहे.

## तत्त्वबोध

त्या वैशाखी पूर्णिमेच्या रात्रीं बोधिसत्त्वाला तत्त्वबोध झाला; आणि तेव्हापासून त्याला बुद्ध म्हणतात. म्हणजे तोपर्यंत गोतम बोधिसत्त्व होता, तो त्या दिवसापासून गोतम बुद्ध झाला. बुद्धाला झालेला तत्त्वबोध म्हटला म्हणजे चार आर्यसत्यें व तदन्तर्गत अष्टांगिक मार्ग होय. त्याचा उपदेश त्याने प्रथमतः आपल्या बरोबर राहणाऱ्या पांच साथ्यांना केला. (तो प्रसंग पुढे येणार असल्यामुळे येथे त्याचें विवरण करीत नाही.)

## विमुक्तिसुखाचा आस्वाद

तत्त्वबोध झाल्यावर बुद्ध भगवान त्याच बोधिवृक्षाखाली सात दिवस बसून विमुक्तिसुखाचा आस्वाद घेत होता; आणि त्याप्रसगीं रात्रींच्या तीन यामात त्याने खाली दिलेला प्रतीत्यसमुत्पाद सुलटउलट मनात आणला, असें महावग्गांत म्हटले आहे. परतु सयुत्तनिकायांतील दोन सुत्तात बुद्धाने बोधिसत्त्वावस्थेत असतानाच हा प्रतीत्यसमुत्पाद जाणला असे सागितले आहे.* त्या सुत्ताचा व महावग्गातील मजकुराचा मेळ बसत नाही. महावग्ग लिहिला त्या वेळीं या प्रतीत्यसमुत्पादाला भलतेच महत्त्व आले होते असे वाटते. नागार्जुनासारख्या महायानपथाच्या आचार्यांनी तर या प्रतीत्यसमुत्पादाला आपल्या तत्त्वज्ञानाचा आधारभूत पाया बनविले.†

## प्रतीत्यसमुत्पाद

तो प्रतीत्यसमुत्पाद सक्षेपत: येणेप्रमाणे—

> अविद्येपासून सस्कार, सस्कारापासून विज्ञान, विज्ञानापासून नामरूप, नामरूपापासून षडायतन, षडायतनापासून स्पर्श, स्पर्शापासून वेदना, वेदनेपासून तृष्णा, तृष्णेपासून उपादान, उपादानापासून भव, भवापासून जाति (जन्म), आणि जातीपासून जरा, मरण, शोक, परिदेवन, दुःख, दौर्मनस्य, उपायास हे उत्पन्न होतात.

पूर्ण वैराग्याने अविद्येचा निरोध केला असता सस्कारांचा निरोध होतो. सस्काराच्या निरोधाने विज्ञानाचा निरोध होतो. विज्ञानाच्या निरोधाने नामरूपाचा निरोध होतो. नामरूपाच्या निरोधाने षडायतनाचा निरोध, षडायतनाच्या निरोधाने स्पर्शाचा निरोध,

* निदानवग्गसयुत्त, सुत्त १० व ६५ पाहा.

† माध्यमककारिकेचा आरभ पाहा.

स्पर्शाच्या निरोधाने वेदनेचा निरोध, वेदनेच्या निरोधाने तृष्णेचा निरोध, तृष्णेच्या निरोधाने उपादानाचा निरोध, उपादानाच्या निरोधाने भवाचा निरोध, भवाच्या निरोधाने जन्माचा निरोध, जन्माच्या निरोधाने जरा, मरण, शोक, परिदेवन, दुःख, दौर्मनस्य, उपायास, यांचा निरोध होतो.

दुःखाच्या मागे एवढी कारणपरंपरा जोडल्याने तें सामान्य जनतेला समजणें बरेंच कठीण झालें. होता होता या प्रतीत्यसमुत्पादाला गहन तत्त्वज्ञानाचे स्वरूप आले, आणि त्याच्यावरच वादविवाद होऊं लागले. नागार्जुनाचार्याने आपली माध्यमककारिका या प्रतीत्यसमुत्पादाच्या पायावरच लिहिली आहे; आणि बुद्धघोषाचार्याने विशुद्धिमार्गाचा एकषष्ठांश भाग (जवळ जवळ शें सवाशें पृष्ठें) याच्या विवेचनात खर्च केला आहे. ही सगळी चर्चा वाचल्यावर विद्वान मनुष्य देखील घोटाळयात पडतो, मग सामान्य जनतेला हें तत्त्वज्ञान समजावें कसें? बुद्ध भगवन्ताचा धर्म ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे उच्च वर्णांच्या लोकांपेक्षा खालच्या वर्गाच्या लोकात विशेष फैलावला, तो अशा गहन तत्त्वज्ञानामुळे नव्हे. चार आर्यसत्याचे तत्त्वज्ञान अगदी साधे आहे. तें सर्व प्रकारच्या लोकाना पटलें, यात मुळीच नवल नाही. त्याचा विचार लौकरच करण्यांत येईल.

## ब्रह्मदेवाची विनंती

तत्त्वबोध झाल्यानंतर बुद्ध भगवताने एक आठवडा बोधिवृक्षाखाली (म्हणजे त्या पिंपळाखाली) घालवला, असें वर सांगितलेंच आहे. यानतर दुसरा आठवडा अजपाल न्यग्रोध वृक्षाखाली, तिसरा आठवडा मुचलिन्द वृक्षाखाली आणि चौथा आठवडा राजायतन वृक्षाखाली घालवून बुद्ध भगवान् पुन्हा अजपाल वृक्षाखाली आला. तेथे त्याच्या मनांत विचार आला की, हा धर्म मी अत्यंत कष्टाने

जाणला आहे, तेव्हा तो लोकाना उपदेशून आणखी त्रास सोसणें बरें नव्हे. हा विचार ब्रह्मदेवाने जाणला; आणि धर्मोपदेश करण्यासाठी भगवताची प्रार्थना केली. ही कथा सविस्तरपणे महावग्गांत आणि मज्झिमनिकायातील अरियपरियेसनसुत्तात आली आहे. पण ती गोतमबुद्धासबधाने मुळीच नसावी. कोणी तरी पुराणकाराने ती विपस्सी बुद्धासबधाने रचली व नतर ती जशीच्या तशीच गोतम बुद्धाच्या चरित्रात दाखल झाली. ह्या रूपकाचा अर्थ 'बुद्ध, धर्म आणि सघ' या पुस्तकांत (पृ० १६–१९) लावण्याचा मी प्रयत्न केला आहे; तेव्हा त्याची चर्चा येथे करीत नाही.

## पंचवर्गीय भिक्षूंना उपदेश करण्याचा बेत

आपणाला प्राप्त झालेल्या चार आर्यसत्याचे ज्ञान प्रथमतः कोणाला करून द्यावे असा विचार बुद्ध भगवन्ताला पडला. आळार कालाम व उद्दक रामपुत्त हे दोघे बोधिसत्त्वाचे गुरु जिवत असते, तर हा नवीन धर्ममार्ग त्याना तात्काळ पटला असता. परतु ते हयात नव्हते. तेव्हा भगवन्ताने आपल्या पाच साथ्याना (पचवर्गीय भिक्षूना) उपदेश करावा, असे ठरविले. हे भिक्षु त्या वेळीं बनारस जवळ ऋषिपत्तनात राहात होते. भगवान् तिकडे जाण्यास निघाला. वाटेत उपक नावाचा आजीवक श्रमण त्याला भेटला. आपणाला तत्त्वबोध झाला आहे, असे बुद्धाने त्याला सागितलें. पण उपकाला त्याबद्दल खात्री वाटली नाही. असेल कदाचित, असें म्हणून तो दुसऱ्या मार्गाने चालता झाला. ह्या एका प्रसगावरूनच दुसऱ्या पथाच्या श्रमणांना उपदेश करण्याची निरर्थकता भगवताने जाणली असावी.

## पंचवर्गीयांची समजूत

आषाढी पूर्णिमेपूर्वी भगवान वाराणसीला पोचला. तो ऋषिपत्तनांत आला, तेव्हा दुरूनच त्याला पाहून, त्याचा कोणत्याही प्रकारें

आदरसत्कार करावयाचा नाही, असा पचवर्गीयानी बेत ठरविला. पण तो जसजसा जवळ येत गेला, तसतसा त्याचा हा बेत ढासळत गेला. त्यानी क्रमशः त्याचा योग्य आदरसत्कार केला. पण त्याचा नवीन धर्ममार्ग ऐकून घेण्याला ते तयार नव्हते. आपणाला एक नवीन धर्ममार्ग सापडला आहे असें भगवताने जेव्हा त्यांना सांगितलें, तेव्हा ते म्हणाले, "आयुष्मान् गोतम, तुझ्या तशा तऱ्हेच्या तपश्चर्येने देखील तुला सद्धर्ममार्गाचा बोध झाला नाही. आता तू तपोभ्रष्ट होऊन खाण्यापिण्याकडे वळला आहेस. त्या तुला सद्धर्माचा बोध कसा होईल?"

भगवान म्हणाला, "भिक्षुहो, यापूर्वी मी भलतीच वल्गना कधी केली होती काय? जर नाही, तर तुम्ही माझ्या म्हणण्याकडे लक्ष द्या. अमृताचा माग मला सापडला आहे. या मार्गाचा अवलंब केला असता तुम्हाला लवकरच विमुक्ति मिळेल."

अशा रीतीने पचवर्गीय भिक्षूची समजूत घालून काही काळाने आपला नवीन धर्म ऐकून घेण्यास भगवताने त्याना प्रवृत्त केलें. त्या प्रसगीं त्याने केलेल्या उपदेशाला 'धर्मचक्रप्रवर्तन' म्हणतात. हे सुत्त सच्चसयुत्ताच्या दुसऱ्या वग्गात आणि विनयग्रथातील महावग्गात सापडतें. याचें संस्कृत भाषान्तर ललितविस्तराच्या सव्विसाव्या अध्यायांत दिले आहे. पैकी पालि सुत्ताचें रूपान्तर येथे देतों.

## धर्मचक्रप्रवर्तन

असें मी ऐकलें आहे. एके समयीं भगवान वाराणसी येथे ऋषिपत्तनांत मृगवनात राहत होता. तेथे भगवान् पचवर्गीय भिक्षूना उद्देशून म्हणाला, "भिक्षु हो, धार्मिक मनुष्याने (पब्बजितेन) या दोन अन्तांना जाऊ नये. ते दोन अन्त कोणते? पहिला कामोपभोगांत सुख मानणें. हा अन्त हीन, ग्राम्य, सामान्यजनसेवित, अनार्य

आणि अनर्थावह आहे. दुसरा देहदंडन करणे. हा अन्त दुःखकारक, अनार्य आणि अनर्थावह आहे. या दोन अन्ताना न जाता तथागताने ज्ञानचक्षु उत्पन्न करणारा, उपशमाला, प्रज्ञेला, सम्बोधाला आणि निर्वाणाला कारणीभूत होणारा मध्यम मार्ग शोधून काढला आहे. तो कोणता ? सम्यक् दृष्टि, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मान्त, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृति, सम्यक् समाधि, हा तो आर्य अष्टांगिक मार्ग होय.

"भिक्षुहो, दुःख नावाचे पहिले आर्यसत्य असें आहे. जन्म दुःखकारक आहे. जरा दुःखकारक आहे. व्याधि दुःखकारक आहे. मरण दुःखकारक आहे. अप्रियाचा समागम आणि प्रियांचा वियोग दुःखकारक आहे. इच्छिलेली वस्तु मिळत नसली म्हणजे तेणेकरूनही दुःख होते. संक्षेपाने पाच उपादानस्कन्ध दुःखकारक आहेत.*

"भिक्षुहो, पुनः पुनः उत्पन्न होणारी आणि अनेक विषयात रमणारी तृष्णा–जिला कामतृष्णा, भवतृष्णा आणि विनाशतृष्णा म्हणतात–ती दुःखसमुदय नावाचे दुसरे आर्यसत्य होय.

"त्या तृष्णेचा वैराग्याने पूर्ण निरोध करणे, त्याग करणे, तिच्यापासून मुक्ति मिळविणे, हे दुःखनिरोध नावाचे तिसरें आर्यसत्य होय.

"आणि (वर सांगितलेला) आर्य अष्टांगिक मार्ग हे दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा नावाचे चौथे आर्यसत्य होय.

"(क) हे दुःख आहे असे समजले तेव्हा मला अभिनव दृष्टि उत्पन्न झाली, ज्ञान उत्पन्न झाले, विद्या उद्भवली, आणि आलोक उत्पन्न झाला. हें दुःख जाणण्याला योग्य आहे असे समजले, तेव्हा

---

* स्कन्ध पाच आहेत. ते वासनामय असले म्हणजे त्याना उपादानस्कन्ध म्हणतात. 'बुद्ध, धर्म आणि संघ', पृ० ९०-९१ पहा.

मला अभिनव दृष्टि (इत्यादि) ......हे दु.ख मी जाणले, तेव्हा मला (इत्यादि) . ..

"(ख) हे दु खसमुदय आर्यसत्य आहे असे मी जाणले, ते त्याज्य आहे असे मी जाणले, त्याचा त्याग केला असे मी जाणले, तेव्हा मला अभिनव दृष्टि उत्पन्न झाली (इत्यादि पूर्वोक्त) . ..

"(ग) हे दुःखनिरोध आर्यसत्य आहे असे मी जाणले, त्याचा साक्षात्कार करणे योग्य आहे असे मी जाणले, त्याचा साक्षात्कार मला झाला असे मी जाणले, तेव्हा मला अभिनव दृष्टि (इत्यादि पूर्वोक्त)........ ...

"(घ) हे दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा नावाचे आर्यसत्य आहे असे मी जाणले, त्याचा अभ्यास करणे योग्य आहे असे मी जाणलें, त्याचा अभ्यास केला असे मी जाणले, तेव्हा मला अभिनव दृष्टि उत्पन्न झाली, ज्ञान उत्पन्न झाले, विद्या उद्भवली आणि आलोक उत्पन्न झाला. जोपर्यंत प्रत्येकी तीन व एकदरींत बारा प्रकारचे या चार आर्यसत्याविषयीं ज्ञान मला झाले नाही, तोंपर्यंत मला पूर्णसंबोधि लाभली नाही."

बुद्धाने केलेले अनेक उपदेश सुत्तपिटकात संगृहीत केले आहेत. पण त्याच्या धर्माचा आधारभूत असा कोणता उपदेश असेल, तर तो हा आहे. एका सच्चसयुत्तांत या चार आर्यसत्या-संबधाने एकंदर १३१ सुत्ते आहेत. याशिवाय इतर निकायात यांचा उल्लेख वारंवार येत असतो. बुद्धाचे इतर सर्व उपदेश या चार आर्यसत्यांना अनुसरून असल्यामुळे याचे महत्त्व फार मोठे आहे.

वरील रूपान्तरात (क) पासून (घ) पर्यंत आलेला मजकूर फक्त सच्चसंयुत्ताच्या एका सुत्तात व महावग्गात सापडतो. त्याच उल्लेख इतर ठिकाणीं नाही. यावरून तो मागाहून दाखल केला असावा, अशी बळकट शंका येते. तथापि चार आर्यसत्यांच्या

स्पष्टीकरणाला त्याची मदत होण्यासारखी असल्यामुळे तो येथे देण्यात आला आहे.

## चार आर्यसत्यांचें स्पष्टीकरण

जगात दु:ख आहे हे कोणालाही नाकबूल करता येत नाही. परतु जो तो आपले दु:ख कसे नष्ट होईल याच विचारात असतो. त्याचा परिणाम असा होतो की, दुसऱ्याचा घातपात करून देखील प्रत्येकजण आपण सुखी होऊ इच्छितो. त्यात जे हिंसक असून बुद्धिमान् असतात, ते पुढारी बनतात, व इतराना त्यांचे ताबेदार व्हावे लागते. हिंसक बुद्धीमुळे ह्या पुढाऱ्यात देखील एकोपा राहत नाही आणि त्याना सगळयात जास्त हिंसक आणि बुद्धिमान् पुढाऱ्याला आपला राजा करून त्याच्या तत्राने वागणे भाग पडतें. राजाला आपले राज्य दुसरा राजा घेईल असें भय वाटते आणि त्याच्या सुरक्षितपणासाठी तो यज्ञयाग करून अनेक प्राण्याचे बळी देतो. अशा प्रकारची मनुष्याना आणि इतर प्राण्याना उपद्रवकारक समाजरचना नष्ट करून तिच्या जागी दुसरी हितसुखकर सघटना उभारावयाची असेल, तर प्रत्येकाला आपले आणि इतराचें दु.ख एक आहे अशी जाणीव झाली पाहिजे, आणि म्हणूनच बुद्ध भगवताने पहिल्या आर्यसत्यात सर्वसाधारण दु खाचा समावेश केला.

जन्मजरामरणादिक सर्वसाधारण दु:ख श्रमणाना मान्य होते, इतकेच नव्हे, तर त्या दु:खाचा नाश करण्यासाठीच त्यांची तपश्चर्या असे. परतु दु.खाचें कारण कोणतें, यासबधीं त्याचा मतभेद होता. कोणी म्हणत, दु.ख आत्म्याने उत्पन्न केले (सयकत दुक्ख); दुसरे म्हणत, दु:ख पराने उत्पन्न केले (परकत दुक्ख); तिसरे म्हणत, कांही अंशीं आत्म्याने आणि कांही अंशीं पराने दु:ख उत्पन्न केले (सयकत च परंकत च दुक्खं); आणि चवथे म्हणत,

दु:ख आत्म्याने किंवा पराने उत्पन्न केले नसून आकस्मिक आहे (असयकार अपरकार अधिच्चसमुप्पन्न दुक्ख).*

यात पहिल्या प्रकारचे श्रमण म्हटले म्हणजे निर्ग्रन्थ (जैन) वगैरे होत. पूर्वजन्मी आत्म्याने पाप केल्यामुळे दु ख उत्पन्न झाले, असे ते समजत आणि त्याच्या परिहारार्थ देहदण्डन करून आत्म्याला कष्टवीत. दुसऱ्या प्रकारचे श्रमण सांख्यांसारखे होते. ते जड प्रकृतीमुळे दु ख उत्पन्न झाले असे मानीत आणि आत्म्याला प्रकृतीच्या तडाक्यांतून सोडविण्यासाठी खडतर तप करीत. तिसऱ्या प्रकारचे श्रमण आत्मा आणि प्रकृति मिळन दु:ख उत्पन्न करतात असे प्रतिपादीत आणि आत्म्याला त्यांतून सोडविण्यासाठी देहदण्डन करीत. चवथ्या प्रकारचे श्रमण दु ख आकस्मिक समजत असल्यामुळे अक्रियवादाकडे झुकत. अशा रीतीने श्रमण एक तर निष्फल तपश्चर्या करीत, किंवा निष्क्रिय बनत. बहुजनसमाजाला त्याचा फारच थोडा उपयोग होई.

दु.खाचे खरे कारण आत्मा किंवा प्रकृति नसून मनुष्याची तृष्णा आहे, हे प्रथमत: बुद्ध भगवन्ताने दाखवून दिले. पूर्वजन्मीच्या आणि ह्या जन्मीच्या तृष्णेमुळेच सर्व दु:ख उत्पन्न होते. तृष्णा कोठून आली, हा प्रश्न निरर्थक आहे. ती जोपर्यंत असेल तोपर्यंत दु:ख उत्पन्न होणारच. हे दुसरें आर्यसत्य.

तृष्णेचा नाश करण्यानेच मनुष्य दु:खातून मुक्त होतो, हें तिसरें आर्यसत्य.

आणि तृष्णानाशाचा उपाय म्हटला म्हणजे दोन अंतांच्या मधून जाणारा आर्य अष्टांगिक मार्ग, हे चवथे आर्यसत्य.

---

* निदानवग्गसयुत्त, वर्ग २, सुत्त ७ पहा.

## अष्टांगिक मार्गाचें स्पष्टीकरण

ह्या आर्य अष्टांगिक मार्गाची सम्यक् दृष्टि ही पहिली पायरी आहे. सम्यक् दृष्टि म्हणजे चार आर्यसत्यांचे यथार्थ ज्ञान. जगामध्ये दुःख भरले आहे. तें मनुष्यजातीच्या तीव्र तृष्णेमुळे उत्पन्न झाले, त्या तृष्णेचा क्षय केला असता सर्वांना शांति मिळणे शक्य आहे आणि परस्परांशीं कायावाचामनेंकरून सदाचाराने, सत्याने, प्रेमाने आणि कळकळीने वागणे, हा आर्य अष्टांगिक मार्ग त्या शांतीचा मार्ग आहे. अशी सम्यक् दृष्टि लोकांत उद्भवली नाही, तर अहंकाराच्या आणि स्वार्थाच्या पायीं होणारे तंटेबखेडे थांबावयाचे नाहीत, आणि जगाला शांति मिळावयाची नाही.

आपले ऐश्वर्य आणि सत्ता वाढविण्याचा संकल्प प्रत्येक व्यक्तीने केला तर त्यापासून त्याची आणि इतरांची सारखीच हानि होणार आहे. यासाठी कामोपभोगांत बद्ध न होण्याचा, इतरांवर पूर्ण-मैत्री करण्याचा, आणि इतरांच्या सुखसमाधानांत भर घालण्याचा शुद्ध संकल्प बाळगणें योग्य आहे.

खोटे भाषण, चहाडी, शिवीगाळ, वृथा बडबड, इत्यादि असद्वाणीच्या योगे समाजाची घडी बिघडते, व तंटेबखेडे उद्भवून ते हिंसेला कारणीभूत होतात म्हणून सत्य, परस्परांचे सख्य साधणारें, प्रिय आणि मित भाषण करणे योग्य आहे. यालाच सम्यक् वाचा म्हणतात.

प्राणघात, चोरी, व्यभिचार इत्यादि कर्मे कायेने आचरलीं, तर त्यापासून समाजांत मोठे अनर्थ उत्पन्न होतील. यास्तव प्राणघात, चोरी, व्यभिचार इत्यादिक कर्मांपासून अलिप्त राहून, लोकांचें कल्याण होईल अशींच कायकर्मे आचरलीं पाहिजेत. यालाच सम्यक् कर्मान्त म्हणतात.

सम्यक् आजीव म्हणजे समाजाला अपाय होणार नाही अशा रीतीने आपली उपजीविका करणे. उदाहरणार्थ, गृहस्थाने मद्यविक्रय, जनावराची देवघेव, इत्यादि व्यवसाय करता कामा नये. यापासून समाजाला मोठा त्रास होतो, हें उघड आहे. असे व्यवसाय वर्ज्य करून शुद्ध आणि सरळ व्यवहाराने आपली उपजीविका करणे, यालाच सम्यक् आजीव म्हणतात.

जे वाईट विचार मनात आले नसतील त्याना मनात येण्यास सवड न देणे, जे वाईट विचार मनात आले असतील त्याचा नाश करणे, जे सुविचार मनात उद्भवले नसतील ते उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें, आणि जे सुविचार मनात उद्भवले असतील ते वाढवून पूर्णतेला नेण्याचा प्रयत्न करणे, या चार मानसिक प्रयत्नाना सम्यक् व्यायाम म्हणतात. (शारिरीक व्यायामाशीं याचा संबध नाही.)

शरीर अपवित्र पदार्थांचें बनलें आहे, हा विवेक जागृत ठेवणे, शरीरातील सुखदु:खादि वेदनाचे वारवार अवलोकन करणे, स्वचित्ताचें अवलोकन करणे आणि इद्रिये व त्याचे विषय यापासून कोणती बधनें उत्पन्न होतात आणि त्यांचा नाश कसा करता येतो इत्यादि मनोधर्मांचा नीट विचार करणें, याला सम्यक् स्मृति म्हणतात.

आपल्या शरीरावर, मृतशरीरावर, मैत्री करुणादिक मनोवृत्तींवर किंवा पृथ्वी, आप, तेज, इत्यादिक पदार्थांवर चित्त एकाग्र करून चार ध्यानें संपादन करणें याला सम्यक्-समाधि म्हणतात.*

दोन अताला न जातां या मध्यम मार्गाची भावना केली पाहिजे. पहिला अन्त म्हणजे कामोपभोगांत सुख मानणें. त्याला हीन, ग्राम्य, सामान्यजनसेवित, अनार्य आणि अनर्थावह (हीनो

* ह्या सर्व पदार्थांवर ध्याने कशी संपादता येतात, याचे विवरण 'समाधिमार्गा'त केले आहे.

गम्मो पोथुज्जनिको अनरियो अनत्थसहितो) ही पाच विशेषणें जोडलीं आहेत. मनुष्यजाति दारिद्र्यात आणि अज्ञानात खितपत पडली असता आपण मौजमजेत आनद मानणे यासारखी हीन गोष्ट कोणती ? हा अन्त ग्राम्य म्हणजे गावढळ लोकाचा आहे. तो सामान्य लोकाचा आहे. आर्यांना (धीरवीराना) शोभण्याजोगा नाही आणि तो अनर्थकारक आहे. दुसरा अन्त देहदण्डन करणें हा. त्याला हीन आणि ग्राम्य हीं विशेषणे लावलीं नाहीत. पण तो दु:खकारक आहे. धीरवीराना शोभण्यासारखा नाही आणि अनर्था-वह आहे (दुक्खो अनरियो अनत्थसहितो). अष्टांगिक मार्गाचीं सर्व अंगें हे दोन अन्त वर्ज्य करतात.

उदाहरणार्थ, खावे, प्यावे, मजा करावी ही चैनी लोकाची दृष्टि, आणि उपोषणादिक व्रतांनी देह झिजवावा ही तपस्व्याची दृष्टि. यांच्या मधली दृष्टि म्हटली म्हणजे चार आर्यसत्यांचे ज्ञान. याप्रमाणें बाकीच्या अगाची देखील मध्यवर्तिता जाणावी.*

---

प्रकरण सहावें

# श्रावकसंघ

## पंचवर्गीय भिक्षूंची माहिती

ज्या पंचवर्गीय भिक्षूना बुद्ध भगवंताने पहिला धर्मोपदेश केला, त्यांची माहिती सुत्तपिटकांत फारच थोडी सापडते. पहिल्या प्रथम ज्याला बौद्धधर्माचा तत्त्वबोध झाला, तो आज्ञात कौण्डिन्य चिरकालाने राजगृहाला आला, व त्याने बुद्धाला साष्टांग प्रणिपात

---

* चार आर्यसत्यांची माहिती 'बुद्ध, धर्म आणि सघ' या पुस्तकाच्या तिसऱ्या परिशिष्टात (पृ. ९४–९९) दिली आहे, ती देखील पाहावी.

केला, असा उल्लेख सयुत्तनिकायातील वगीस सयुत्तांत (न. ९) सापडतो. दुसरा पचवर्गीय भिक्षु अस्सजि (अश्वजित्) राजगृह येथे आजारी होता व त्याला भगवताने उपदेश कला, अशी माहिती खन्धसयुत्ताच्या ८८ व्या सुत्तात आली आहे. या दोघाशिवाय बाकी तिघाची नावे सुत्तपिटकात मुळीच सापडत नाहीत.

जातकाच्या निदानकथेत व इतर अट्ठकथातून या पंचवर्गीय भिक्षूची थोडीबहुत माहिती सापडते, तिचा सारांश असा:—

रामो धजो लक्खणो चापि मन्ती
कोण्डञ्ञो च भोजो सुयामो सुदत्तो ।
एते तदा अट्ठ अहेसु ब्राह्मणा
छळगवा मन्त व्याकरिंसु ॥

'राम, ध्वज, लक्खण (लक्ष्मण), मन्ती (मत्री), कोण्डञ्ञ (कौण्डिन्य), भोज, सुयाम आणि सुदत्त हे आठ षडग वेद जाणणारे ब्राह्मण होते, त्यांनी बोधिसत्त्वाचे भविष्य वर्तविले.'

यापैकी सातानी बोधिसत्त्व गृहस्थाश्रमात राहिला, तर चक्रवर्ती होईल, आणि गृहस्थाश्रम सोडून सन्यासी झाला तर सम्यक्सबुद्ध होईल, असें द्विधा भाकीत केले. या आठात कौण्डिन्य अगदी तरुण होता. त्याने बोधिसत्त्व निसशय सम्यक्सबुद्ध होणार असे एकच भविष्य वर्तविले. द्विधा भविष्य वर्तविणाऱ्या सात ब्राह्मणानी घरीं जाऊन आपल्या मुलाना सागितले की, "आम्ही आता वृद्ध झालो आहोत, आणि सिद्धार्थ राजकुमार बुद्ध झाला, तर तें पाहण्याचें आमच्या नशिबी नाही. तो जर बुद्ध झाला तर तुम्ही त्याच्या सघात प्रवेश करा."

बोधिसत्त्वाने गृहत्याग केला, तेव्हा एकटा कौण्डिन्य हयात होता. बाकी सात ब्राह्मणाच्या मुलापाशीं जाऊन तो म्हणाला, " सिद्धार्थ कुमार परिव्राजक झाला आहे. तो खात्रीने बुद्ध होणार.

त्याच्या मागोमाग आपणही परिव्राजक होऊं." त्या तरुणांपैकी चौघानी कौण्डिन्याचे वचन मान्य केले, व त्याच्या बरोबर प्रव्रज्या घेऊन ते बोधिसत्त्वाच्या मागोमाग गेले. हे पांच जण पुढे पचवर्गीय या नावाने प्रसिद्धीस आले. त्याचीं नावे महावग्गांत आणि ललित-विस्तरात सापडतात, ती येणेंप्रमाणे --कोण्डञ्ञ (कौण्डिन्य), वप्प (वाष्प), भद्दिय (भद्रिक), महानाम आणि अस्सजि (अश्वजित्).

परतु वर दिलेली पचवर्गीयाची माहिती दतकथात्मक दिसते. गोतमकुमार बुद्ध होणार अशी जर कौण्डिन्याची खात्री होती, तर त्याला उरुवेलेत सोडून कौण्डिन्य वाराणसीला का गेला ? बोधि-सत्त्वाने शरीराला लागणारा आहार घेण्याला सुरवात केल्याबरोबर कौण्डिन्याची पूर्णश्रद्धा कशी नष्ट झाली ? मला वाटते की, हे पचवर्गीय भिक्षु पूर्वी आळार कालामाच्या पथातील असून शाक्याच्या किंवा त्यांच्या आसपासच्या प्रदेशात राहत असत. तेथे त्याची व बोधिसत्त्वाची मैत्री जमली. ते सर्वच ब्राह्मण होते, असेंही म्हणतां येत नाही. आळार कालामाच्या आणि उद्दक रामपुत्ताच्या सप्रदायात तथ्य न वाटल्यामुळे बोधिसत्त्व पुढील मार्ग शोधण्याच्या हेतूने राजगृहाला आला, तेव्हा त्याच्या बरोबर हे पचवर्गीय भिक्षु देखील आले असावेत. बोधिसत्त्वाला नवीन धर्ममार्गाचा बोध झाला तर त्याच मार्गाने आपण देखील जाऊ असा त्याचा विचार होता. पण बोधिसत्त्वाने तपस्या आणि उपोषणे सोडून दिलीं तेव्हा त्याचा विश्वास उडाला आणि ते वाराणसीला निघून गेले.

## पंचवर्गीय भिक्षुसंघ

गोतम बोधिसत्त्व बुद्ध होऊन वाराणसीला ऋषिपत्तनात आला तेव्हा त्या पचवर्गीय भिक्षूनी त्याचा आदरसत्कार देखील करू नये असा बेत केला होता, इत्यादिक मजकूर पांचव्या प्रकरणात आलाच

आहे. अखेरीस या पचवर्गीयांनी बोधिसत्त्वाचा धर्ममार्ग ऐकून घेतला आणि त्या प्रसगीं एका तेवढ्या कौण्डिन्याने आपली समति दर्शविली. तेव्हा बुद्ध भगवान उद्गारला, "कौण्डिन्याने जाणले (अञ्ञासि वत भो कोण्डञ्ञो)." त्यामुळे कौण्डिन्याला 'अञ्ञासि कोण्डञ्ञ (आज्ञात कौण्डिन्य)' हेच नाव पडले. आणि ह्या एकाच गोष्टीवरून बौद्ध वाङ्मयात कौण्डिन्याला प्रसिद्ध स्थान मिळाले. ह्यानतर त्याने कोण-तीही महत्त्वाची कामगिरी केल्याचा उल्लेख मुळीच सापडत नाही. प्रथमत' त्याने एकट्यानेच बुद्धाच्या नवीन धर्ममार्गाचे अभिनदन केले, हाच त्याचा पुरुषार्थ समजला पाहिजे.

तदनतर बुद्ध भगवताने वप्प (बाष्प) आणि भद्दिय (भद्रिक) या दोघाची समजूत घातली. आणि काही दिवसानी त्याना देखील या नवीन धर्ममार्गाचा बोध झाला. नतर काही काळाने महानाम व अस्सजि (अश्वजित्) यांना या नवीन धर्ममार्गाचा बोध झाला. आणि हे पचवर्गीय भिक्षु बुद्धाचे एकनिष्ठ भक्त झाले. या कामी किती वेळ गेला याचा कोठे उल्लेख नाही. पण पचवर्गीय भिक्षु प्रथमतः बुद्धाचे शिष्य झाले, आणि या पाचाचा भिक्षुसघ बनला, याबद्दल सुत्तपिटकाची आणि विनयपिटकाची एकवाक्यता आहे.

## यश आणि त्याचे साथी

पचवर्गीयांबरोबर बुद्ध भगवान् ऋषिपत्तनांत राहत असता त्याला आणखी ५५ भिक्षु कसे मिळाले आणि त्या चातुर्मासानतर भगवताने राजगृहापर्यंत प्रवास करून भिक्षुसघांत केवढी मोठी भर घातली याचे वर्णन महावग्गात सापडतें. त्याचा साराश येथे देत आहें.

वाराणसींत यश नांवाचा एक सुसपन्न तरुण राहत होता. एकाएकीं प्रपचातून त्याचे मन उठले आणि शांत स्थानाचा शोध

करीत तो ऋषिपत्तनात आला. बुद्धाने धर्मोपदेश करून त्याला आपल्या संघात दाखल करून घेतले. त्याच्या शोधासाठी त्याचे आईबाप आले. त्यांना बुद्धाने उपदेश केला आणि ते देखील बुद्धाचे उपासक झाले.

यश भिक्षु होऊन बुद्धाच्या संघात दाखल झाला, हे वर्तमान वाराणसी नगरात राहणाऱ्या त्याच्या विमल, सुबाहु, पुण्णजि (पूर्णजित्) आणि गवंपति (गवांपति) ह्या चार मित्रांना समजले, आणि ऋषिपत्तनात येऊन ते देखील बुद्धाच्या भिक्षुसंघात प्रविष्ट झाले. त्या सर्वांचे पन्नास तरुण मित्र होते. त्यांनी ऋषिपत्तनात येऊन बुद्धोपदेश ऐकला आणि आपल्या मित्राप्रमाणेच संघात प्रवेश केला. याप्रमाणे साठ भिक्षूंचा संघ ऋषिपत्तनांत गोळा झाला.

## बहुजनहितासाठी धर्मप्रचार

चातुर्मासाच्या शेवटी बुद्ध भगवान् या आपल्या भिक्षुसंघास म्हणाला, भिक्षुहो, "प्रापंचिक आणि स्वर्गीय पाशातून मी मुक्त झालो आहे, आणि तुम्हीं देखील या पाशातून मुक्त झाला आहां. तेव्हां आतां, भिक्षु हो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, देवांच्या आणि मनुष्यांच्या कल्याणासाठी, धर्मोपदेश करण्यास प्रवृत्त व्हा. एका मार्गाने दोघे जाऊ नका. प्रारंभीं कल्याणप्रद, मध्यंतरी कल्याणप्रद आणि शेवटी कल्याणप्रद अशा या धर्ममार्गाचा लोकांना उपदेश करा."

याप्रमाणे बुद्ध भगवताने आपल्या साठ भिक्षूंस चारी दिशांना पाठविले. ते इतर तरुणांना भगवतापाशी आणीत आणि भगवान् त्यांना प्रव्रज्या देऊन आपल्या भिक्षुसंघांत दाखल करून घेत असे. पण त्या कामीं साठ भिक्षूंना व तरुण उमेदवारांना त्रास पडूं लागला; म्हणून परस्परच प्रव्रज्या देऊन आपल्या संघांत दाखल करून

घेण्याला त्याने भिक्षूना परवानगी दिली व तो स्वत: उरुवेलेकडे जाण्यास निघाला.

## भद्रवर्गीय भिक्षु

वाटेत भद्रवग्गीय नावाचे तीस तरुण एका उद्यानात आपल्या स्त्रियासह क्रीडा करण्यासाठी आले होते. त्यापैकी एकाची बायको नव्हती, म्हणून त्याच्यासाठी एक वेश्या आणली होती. हे तीस असामी व एकोणतिसाच्या बायका मौजमजेत गुतून बेसावधपणे वागत असता शक्य तेवढ्या वस्तु घेऊन ती वेश्या पळून गेली ! त्या वेळी बुद्ध भगवान् या उपवनात एका वृक्षाखाली विश्रांतीसाठी बसला होता. उपयुक्त वस्तु घेऊन वेश्या पळून गेली, हें जेव्हा त्या तीस तरुणाना समजले, तेव्हा ते तिचा शोध करीत भगवान् बसला होता तिकडे आले, आणि म्हणाले, "भदत, ह्या बाजूने गेलेली एक तरुण स्त्री तुम्ही पाहिली आहे काय ?"

भगवान् म्हणाला, "तरुण गृहस्थहो, एखाद्या तरुण स्त्रीच्या शोधात लागून फिरत राहावे, किंवा आत्मबोध करावा यापैकी तुम्हाला कोणते बरे वाटतें ?"

ते बुद्धाचे वचन ऐकून ते त्याच्याजवळ बसले, आणि बराच वेळ बुद्धाचा उपदेश ऐकून घेतल्यावर गृहस्थाश्रमाचा त्याग करून त्यानी भिक्षुसघात प्रवेश केला.

## काश्यपबन्धु

त्या उपवनांतून भगवान् उरुवेलेला आला. तेथे उरुवेलकाश्यप, नदीकाश्यप व गयाकाश्यप हे तिघे जटिल बन्धु अनुक्रमे पांचशे, तीनशे व दोनशे जटाधारी शिष्यासह अग्निहोत्र साभाळून तपश्चर्या करीत होते. त्यापैकी वडील बधूच्या आश्रमांत बुद्ध भगवान् राहिला; आणि अनेक अद्भुत चमत्कार दाखवून त्याने उरुवेल काश्यपाला

आणि त्याच्या पाचशे शिष्यांना आपल्या भिक्षुसघात दाखल करून घेतले. उरुवेल काश्यपाच्या मागोमाग त्याचे धाकटे बधु आणि त्याचे सर्व अनुयायी बुद्धाचे शिष्य झाले.

## मोठ्या भिक्षुसंघासह राजगृहांत प्रवेश

या एकहजार तीन भिक्षूना बरोबर घेऊन बुद्ध भगवान् राजगृहाला आला. तेथे एवढया मोठया भिक्षुसघाला पाहून नागरिकात एकच खळबळ उडून गेली. बिबिसार राजा आणि त्याचे सर्व सरदार बुद्धाचे अभिनदन करण्यास आले. बिबिसाराने बुद्धाला आणि भिक्षुसघाला दुसऱ्या दिवशी राजवाडयात भिक्षा घेण्याला आमत्रण दिले आणि त्याचे जेवण सपल्यावर वेणुवन उद्यान भिक्षुसघाला दान दिले.

## सारिपुत्त आणि मोग्गल्लान

राजगृहाजवळ सजय नावाचा एक प्रसिद्ध परिव्राजक आपल्या पुष्कळ शिष्यासहवर्तमान राहत असे. सारिपुत्त आणि मोग्गल्लान हे दोघे सजयाचे प्रमुख शिष्य होते. पण त्या सप्रदायांत त्याचे मन रमेना. त्यांनी असा सकेत केला होता की, 'जर दोघापैकी एकाला सद्धर्ममार्ग दाखविणारा दुसरा कोणी सापडला तर त्याने दुसऱ्याला ही गोष्ट सागावी आणि दोघानी मिळून त्या धर्माची कास धरावी.'

एके दिवशीं अस्सजि भिक्षु राजगृहांत भिक्षाटन करीत होता. त्याची शात आणि गभीर मुद्रा पाहून हा कोणी तरी निर्वाण मार्गाला लागलेला परिव्राजक असावा असें सारिपुत्ताला वाटलें; अस्सजीशी संभाषण करून त्याने जाणले की, अस्सजि बुद्धाचा शिष्य आहे आणि बुद्धाचाच धर्ममार्ग खरा आहे. ही गोष्ट सारिपुत्ताने मोग्गल्लानाला कळविली; आणि ते दोघेही सजयाच्या पथातील

दोनशे पन्नास परिव्राजकांसह बुद्धाजवळ येऊन भिक्षुसघांत प्रविष्ट झाले.

## ऐतिहासिक कसोटी

यश आणि इतर ५४ तरुण भिक्षु झाले या कथेपासून येथपर्यंत कथन केलेला मजकूर हा महावग्गातून साराशरूपाने घेतलेला आहे.* आता या कथेला ऐतिहासिक कसोटी लावून पाहिली पाहिजे. बोधिसत्त्वाने उरुवेला येथे तपश्चर्या केली आणि तत्त्वबोध प्राप्त करून घेतला. अर्थात् बुद्ध भगवताला उरुवेलेच्या प्रदेशाची चागली माहिती असली पाहिजे. उरुवेलकाश्यप आणि त्याचे दोघ धाकटे बधु हजार जटाधारी शिष्यांसहवर्तमान त्याच प्रदेशात राहत होते. त्याना अद्भुत चमत्कार दाखवून जर भगवताला आपले शिष्य करावयाचे होते, तर त्याना सोडून भगवान् काशीपर्यंत का गेला ? आपला धर्म पचवर्गीयाशिवाय दुसरे कोणी जाणणार नाहीत, असे त्याला का वाटले ? त्या वेळीं त्याला अद्भुत चमत्कार दाखविण्याची शक्ति नव्हती, आणि काशीला जाऊन पचवर्गीयाना उपदेश केल्यानतर ती शक्ति मिळाली, असे समजावे की काय ?

ऋषिपत्तनात पचवर्गीयाशिवाय जे पचावन्न भिक्षु बुद्धाला मिळाले, त्यापैकी फक्त पाचाचींच नावे महावग्गांत दिलीं आहेत; बाकी पन्नासापैकी एकाचे देखील नाव नाही. तेव्हा भिक्षूची सख्या फुगविण्यासाठी पन्नासांची भर घातली असावी असें वाटते.

वाटेत तीस तरुण पुरुष स्त्रियासह क्रीडा करीत असता चुटकी-सरशीं बुद्ध भगवताने त्याना भिक्षु बनविले, हे सभवत नाही. तसें करावयाचे होतें, तर उरुवेलेहून काशीला जाण्याचे त्याने प्रयास

---

* 'बुद्धलीलासारसग्रह', पृ. १६०–१६५, आणि 'बौद्धसघाचा परिचय' पृ० ७–८ पहा.

कां केले ? उरुवेलेच्या आसपास मौजमजा करणारे कोणी तरुण त्याला सापडले नसते काय ? मध्येच या तीस तरुणाची गोष्ट का घुसडून दिली, हे समजत नाही.

बुद्ध भगवान् एक हजार तीन जटिलाना भिक्षु करून आणि बरोबर घेऊन राजगृहाला आला, त्या वेळी सर्व राजगृह उचबळून गेले असता सारिपुत्ताला बुद्ध कोण आहे याची बिलकूल माहिती नव्हती, हे कसे ? अस्सजि पचवर्गीयापैकी एक. त्याला इतर पचवर्गीयाबरोबर काशीच्या आसपास धर्मोपदेश करण्याला पाठवून भगवान् उरुवेलेला व तेथून राजगृहाला आला, असें असता हा अस्सजि एकाएकी राजगृहाला कसा पोचला ? तात्पर्य, पचवर्गीयाना, यशाला आणि त्याच्या चार साथ्यांना भिक्षुसघात दाखल करून घेतल्यानतर काशीहून राजगृहापर्यंत भगवताच्या प्रवासाची महावग्गात आलेली हकीगत बहुतांशीं दतकथात्मक आहे, असे म्हणावे लागते.

## ललितविस्तरांतील यादी

खरा प्रकार काय घडला हें जरी निश्चित सागतां आले नाही, तरी ललितविस्तराच्या आरभीं जी भिक्षूची यादी दिली आहे, तिच्यावरून भिक्षुसघाची प्राथमिक माहिती अल्प प्रमाणात जुळवितां येण्याजोगी असल्यामुळे ती यादी येथे देण्यात येत आहे:—

१. ज्ञानकौण्डिन्य (अञ्ञाकोण्डञ्ञ) २. अश्वजित् (अस्सजि) ३. वाष्प (वप्प) ४. महानाम ५. भद्रिक (भद्दिय) ६. यशोदेव (यस) ७. विमल ८. सुबाहु ९. पूर्ण (पुण्णजि) १०. गवाम्पति (गवम्पति) ११ उरुवेलकाश्यप (उरुवेलकस्सप) १२. नदीकाश्यप १३. गयाकाश्यप १४. शारिपुत्र (सारिपुत्त) १५. महामौद्गल्यायन (महामोग्गल्लान) १६. महाकाश्यप (महाकस्सप) १७. महाकात्यायन (महाकच्चान) १८. कफिल (?) १९. कौण्डिन्य (?) २०. चुनन्द

(चुन्द) २१. पूर्ण मैत्रायणीपुत्र (पुण्ण मन्ताणिपुत्त) २२. अनिरुद्ध (अनुरुद्ध) २३. नन्दिक (नन्दक) २४. कप्फिल (कप्पिन) २५. सुभूति २६. रेवत २७. खदिरवनिक २८ अमोघराज (मोघराज) २९. महापारणिक (?) ३०. वक्कुल (बक्कुल) ३१. नन्द ३२. राहुल ३३. स्वागत (सागत) ३४. आनन्द.

महावग्गांत दिलेल्या नाव नसलेल्या भिक्षूंची संख्या वगळली तर ह्या यादीतील पधरा भिक्षूंच्या परंपरेचा आणि महावग्गाच्या कथेचा मेळ बसतो, आणि त्यावरून असे अनुमान करतां येतें की, पचवर्गीयानंतर भगवंताला यश आणि त्याचे चार मित्र मिळाले. ह्या दहांना बरोबर घेऊन भगवान उरुवेलेला गेला. आणि तेथे त्याच्या सघात तिघे काश्यपबंधु सामील झाले. या तेरा शिष्यासहवर्तमान भगवान राजगृहाला गेला. तेथे संजयाच्या शिष्यांपैकी सारिपुत्त व मोग्गल्लान संजयाचा पंथ सोडून बुद्ध भगवंताचे शिष्य झाले. ह्या दोघांच्या आगमनामुळे भिक्षुसंघाची महती फार वाढली. कां की राजगृहात त्यांची बरीच प्रसिद्धि होती. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा ह्या दोघांनीही कसा विकास केला, याची साक्ष सुत्त आणि विनयपिटक देत आहेत. बहुतेक अभिधम्मपिटक तर सारिपुत्तानेच उपदेशिला असे समजण्यात येते.

यानंतर आलेल्या २९ भिक्षूंची परंपरा मात्र ऐतिहासिक दिसत नाही आनंद आणि अनुरुद्ध एकाच वेळीं भिक्षु झाले, असे चुल्लवग्गात (भा० ७) सांगितले असतां येथे अनुरुद्धाचा नंबर २२, व आनन्दाचा ३४ दिला आहे. याच्या बरोबर उपालि न्हाव्याने प्रव्रज्या घेतली, आणि तो पुढे विनयधर झाला, असें असतां ह्या यादींत त्याचे नाव सापडत नाही. येथे दिलेल्या बहुतेक भिक्षूंचीं चरित्रे 'बौद्धसंघाचा परिचय' या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत आली आहेत. जिज्ञासु वाचकांनी तीं वाचावी.

## भिक्षूंची संख्या

आता राजगृहापर्यंत बुद्धाने गोळा केलेल्या भिक्षूंची संख्या या पधरा भिक्षूपेक्षा अधिक होती की काय याचा थोडक्यांत विचार करूं. बुद्धाला वाराणसी येथे साठ भिक्षु मिळाले; उरुवेलेला जात असताना वाटेत तीस आणि उरुवेला येथे एक हजार तीन, मिळून एकदरींत १०९३ भिक्षूचा सघ एकत्रित झाल्यावर भगवताने राजगृहात प्रवेश केला. तेथे सारिपुत्त आणि मोग्गल्लान याजबरोबर सजय परिव्राजकाचे अडीचशे शिष्य येऊन बौद्ध सघाला मिळाले. म्हणजे त्या वेळीं भिक्षुसघाची सख्या १३४५ झाली. परतु तेवढा भिक्षुसघ बुद्धापाशीं असल्याचा उल्लेख सुत्तपिटकात कोठेही सापडत नाही. बुद्ध भगवान् परिनिर्वाणापूर्वी एकदोन वर्षें राजगृहाला आला तेव्हा त्याच्याबरोबर १२५० भिक्षु होते, असें सामञ्ञफलसुत्तात म्हटले आहे. परंतु दीघनिकायाच्या दुसऱ्या आठ सुत्तात भिक्षुसघाची सख्या ५०० दिली आहे; आणि भगवताच्या शेवटच्या प्रवासात देखील त्याच्याबरोबर ५०० च भिक्षु होते असें दिसतें. भगवताच्या परिनिर्वाणानतर राजगृह येथे जी भिक्षूची पहिली परिषद भरली तिच्यात देखील ५००च भिक्षु होते. तेव्हा भगवताच्या परिनिर्वाणापर्यंत भिक्षुसघाची सख्या ५००वर गेली नव्हती, असें अनुमान करता येतें.

बुद्ध भगवताच्या परिनिर्वाणानतर ही सख्या फुगविण्याचा क्रम सुरू झाला असावा. ललितविस्तराच्या आरभींच श्रावस्ती येथे भगवंताबरोबर बारा हजार भिक्षु आणि बत्तीस हजार बोधिसत्त्व होते, असें म्हटलें आहे. अशा रीतीने आपल्या सप्रदायाचें महत्त्व वाढविण्यासाठी त्या काळच्या भिक्षूनी पूर्वकालीन भिक्षूची सख्या वाढविण्यास आरभ केला, आणि महायान पथाच्या ग्रथकारांनी तर

त्यांन वाटेल तेवढया बोधिसत्त्वाची भर घातली! बौद्ध धर्माच्या अवनतीला जर कोणतें प्रमुख कारण झाले असेल, तर तें हेंच होय. आपल्या धर्माचे आणि सघाचे स्तोम माजविण्यासाठी बौद्ध भिक्षूनी भरमसाट दतकथा रचण्यास सुरवात केली आणि ब्राह्मणांनी त्याच्याहीपेक्षा विलक्षण दतकथा रचून भिक्षूचा पूर्ण पराभव केला!

## प्रसिद्ध सहा श्रमणसंघ

बुद्धसमकालीन बुद्धाच्या सघापेक्षा मोठे आणि प्रसिद्ध असे सहा श्रमणसघ अस्तित्वात होते आणि पूरण कास्सप, मक्खलि गोसाल, अजित केसकबल, पकुध कच्चायन, सजय बेलट्ठपुत्त व निगण्ठ नाथपुत्त या त्या सहा सघाच्या पुढाऱ्याचा लोकात फार मान असे. यासबधीं मज्झिमनिकायातील चूळसारोपम सुत्तात खालील उतारा सापडतो.

येमे भो गोतम समणब्राह्मणा सघिनो गणिनो गणाचरिया ञाता यसस्सिनो तित्थकरा साधुसम्मता बहुजनस्स, सेय्यथीद पूरणो कस्सपो, मक्खलि गोसालो, अजितो केसकम्बलो, पकुधो कच्चायनो, सञ्जयो बेलट्ठपुत्तो, निगण्ठो नाथपुत्तो.

(पिंगल कौत्स भगवताला म्हणतो,) "भो, गोतम, हे जे संघी, गणी, गणाचार्य, प्रसिद्ध, यशस्वी, तीर्थंकर आणि बहुजनाना मान्य असलेले (सहाजण आहेत), ते कोणते? पूरण कस्सप, मक्खलि गोसाल, अजित केसकम्बल, पकुध कच्चायन, सजय बेलट्ठपुत्त व निगठ नाथपुत्त."

## बौद्ध संघाची कर्तव्यनिष्ठा

हे सहाही आचार्य वयाने बुद्ध भगवतापेक्षा वडील होते आणि त्यांच्या भिक्षूची सख्या देखील बरीच मोठी होती. बुद्ध या सर्व आचार्यांत वयाने लहान, आणि त्याच्या भिक्षुसघाची सख्या देखील

कमी, असें असतां ह्या लहानशा नवीन भिक्षुसघाने सर्वांना मागे टाकले, आणि हिंदुस्थानावरच नव्हे, तर सर्व आशियाखण्डावर आपला प्रभाव पाडला हे कसे ?

याला उत्तर हें की, वरील सहा श्रमणसघ जरी सख्येने मोठे होते, तरी सामान्य जनसमुदायाची ते फारशी काळजी बाळगत नसत. त्यांपैकी बहुतेकाचे तपश्चर्येच्या मार्गाने मोक्ष मिळवावा हे ध्येय होतें. गावात किंवा शहरात प्रवेश करून ते गृहस्थाकडून भिक्षा घेत आणि प्रसगोपात्त आपल्या सम्प्रदायाचे तत्त्वज्ञान शिकवीत. तथापि गृहस्थाच्या हितसुखासाठी त्याचा विशेष प्रयत्न नव्हता.

बौद्ध सघाची गोष्ट याच्या उलट होती. ‘लोकाच्या हितासाठी आणि सुखासाठी तुम्ही चारी दिशांना जा, एका मार्गाने दोघे जाऊ नका,’ हा बुद्धाचा उपदेश वर दिलाच आहे. हा उपदेश महावग्गात आणि मारसयुत्तांत सापडतो आणि तशा अर्थाचे उपदेश सुत्तपिटकांत अनेक ठिकाणीं आढळतात. ह्या बुद्ध भगवताच्या उपदेशाला अनुसरून वागल्यामुळे त्याचा भिक्षुसघ बहुजनसमाजाला प्रिय आणि मान्य झाला, व सर्व लोकांवर त्याचा प्रभाव पडला.

परस्पराशीं भाडणाऱ्या लोकांकडे पाहून बोधिसत्त्वाला वैराग्य झाले, हे चवथ्या प्रकरणात सागितलेच आहे. तीं भांडणे राजसत्तेकडून मिटविता येणे शक्य नव्हते. जोपर्यंत लोकात हिंसात्मक बुद्धि राहील, तोपर्यंत समाजातील तटे बखेडे मिटणे शक्य नाही. म्हणून राजसत्तेपासून निवृत्त होऊन मनुष्यजातीच्या मुक्तीचा मार्ग शोधून काढण्यास बोधिसत्त्व प्रवृत्त झाला. सात वर्षें तपश्चर्येचे अनेक अनुभव घेतल्यानतर त्याला मागल्या प्रकरणांत दिलेला मध्यम मार्ग सापडला; आणि त्याचा सर्व लोकांत प्रसार करण्याचा त्याने बेत ठरविला. याच कामासाठी बुद्ध भगवंताने सघाची स्थापना केली.

तेव्हा इतर संघातील श्रमणापेक्षा बौद्ध श्रमण सामान्य जनतेच्या हितसुखाची विशेष काळजी घेत यांत नवल नाही.

## आध्यात्मिक शेतीची आवश्यकता

समाजाने शेती, व्यापार वगैरे धंदे सुरू केले, पण समाजात जर एकोपा नसला, तर त्या धंद्यापासून फायदा होणार नाही; एकाने पेरलेले शेत दुसरा कापून नेईल व एखाद्या व्यापाऱ्याला दुसरा चोर लुटील. अशा रीतीने समाजात अव्यवस्था सुरू झाली, तर त्या समाजांतील व्यक्तींना फार कष्ट भोगावे लागतील. हा एकोपा शस्त्रबळाने उत्पन्न करतां आला, तरी तो टिकाऊ होत नाही. परस्पराच्या सौजन्याने आणि त्यागाने उत्पन्न झालेली एकीच खरी एकी म्हणतां येईल. सामान्य जनसमूहात अशी एकी उत्पन्न करण्याचा बुद्धाचा हेतु होता, असें सुत्तनिपातांतील कासिभारद्वाज-सुत्तावरून दिसून येते. त्याचा सारांश येणेप्रमाणे.

एके दिवशीं बुद्ध भगवान् भिक्षाटन करीत असता भारद्वाज ब्राह्मणाच्या शेतावर गेला. तेथे भारद्वाज ब्राह्मण आपल्या मजुरांना जेवण देत होता. भगवान् भिक्षेसाठी उभा आहे, असे पाहून तो म्हणाला, "माझ्याप्रमाणे तू देखील शेत नांगर, पेर, धान्य गोळा कर आणि खा. भिक्षा कां मागतोस ?"

भगवान् म्हणाला, "मी देखील शेतकरी आहें. मी श्रद्धेचें बी पेरतो. त्यावर तपश्चर्येची (प्रयत्नाची) वृष्टि होते. प्रज्ञा माझा नांगर आहे. पापलज्जा इसाड, चित्त दोऱ्या, स्मृति (जागृति) नांगराचा फाळ आणि चाबूक आहे. कायेने आणि वाचेने मी संयम पाळतो. आहारांत नियमित राहून सत्याच्या योगे (मनोदोषांची) मी खुरपणी करतो. संतोष ही माझी सुटी आहे. उत्साह माझे

बैल; आणि माझे वाहन अशा दिशेकडे जातें की, जेथे शोक करण्याची पाळी येत नाही!"

या म्हणण्याचा अर्थ भारद्वाजाला तात्काळ समजला व तो बुद्धाचा शिष्य झाला.

ह्या उपदेशात बुद्धाने शेतीचा निषेध केलेला नाही. पण त्या शेतीला नीतिमत्तेचे पाठबळ नसले, तर तिच्यापासून समाजाला सुख न होता दुःख होईल, एवढाच त्या उपदेशाचा निष्कर्ष आहे. एकाने पेरलेली शेती पिकाच्या वेळीं दुसऱ्याने बळकावली, तर शेती करण्याला कोणी प्रवृत्त होणार नाही आणि समाजात भयंकर अव्यवस्था माजेल. म्हणून प्रथमत. परस्पराचे हितसंबध अहिंसात्मक असावयास पाहिजेत. तशा प्रकारची मानसिक शेती केल्याशिवाय या भौतिक शेतीचा उपयोग होणार नाही, हे जाणून बुद्धाने आपल्या सघाला समाजाची नैतिक जागृति करण्यासाठी प्रवृत्त केले. त्यामुळे बौद्ध संघ अल्पसख्याक असतानाही थोडक्याच काळात सामान्य लोकसमूहाला प्रिय झाला; आणि आपल्या कर्तबगारीने इतर श्रमणसंघाना त्याने मागे टाकले.

## संघाची संघटना

आपला संघ कार्यक्षम व्हावा, यास्तव बुद्ध भगवताने फार काळजी घेतली. सघाची रचना त्याने अशी केली की, आपल्या पश्चात त्यांत एकोपा राहावा आणि त्याच्याकडून लोकसेवा अव्याहत घडून यावी. वज्जींच्या गणराज्यांतील पुढाऱ्यांनी एकत्रित होऊन विचारविनिमय करण्याचे आणि परस्पराच्या हिताचे नियम ठरविण्याची जी पद्धति, तीच थोडेबहुत फेरफार करून बुद्ध भगवंताने आपल्या भिक्षुसंघाला लागू केली असावी, असें महापरिनिब्बानसुत्ताच्या आरंभी आलेल्या मजकुरावरून दिसून येते.

वस्सकार ब्राह्मण बुद्धापाशीं येतो आणि वज्जींवर स्वारी करण्याचा आपल्या धन्याचा–अजातशत्रूचा–बेत भगवताला कळवितो. आपण घालून दिलेल्या सात नियमाप्रमाणे जोंपर्यंत वज्जी चालतील, तोपर्यंत त्याना जिकणे शक्य नाही असे भगवान् वस्सकार ब्राह्मणाला सागतो. आणि वस्सकार निघून गेल्यावर भिक्षुसघाला म्हणतो : 'भिक्षुहो, मी तुम्हाला सात अभिवृद्धीचे नियम सागतो. (१) जोपर्यंत भिक्षु पुष्कळदा एके ठिकाणी जमतील, तोपयत भिक्षूची अभिवृद्धीच होईल, परिहानि होणार नाही. (२) जोपर्यंत भिक्षु एकमताने जमतील आणि आपल्या सघकर्माचा एकदिलाने विचार करून उठतील, तोपर्यंत भिक्षूची अभिवृद्धीच होईल, परिहानि होणार नाही. (३) जोपर्यंत सघाने न केलेला नियम, केला होता, असें म्हणणार नाहीत आणि केलेला नियम मोडणार नाहीत, नियमाचे रहस्य जाणून त्याप्रमाणे वागतील, तोंपर्यंत भिक्षूची अभिवृद्धीच होईल, परिहानि होणार नाही. (४) जोपर्यंत भिक्षु वृद्ध, शीलवान् पुढाऱ्याचा मान ठेवतील, (५) जोपर्यंत भिक्षु पुन. पुनः उत्पन्न होणाऱ्या तृष्णेला वश होणार नाहीत, (६) जोपर्यंत भिक्षु एकांतवासाची आवड धरतील, (७) जोपर्यंत भिक्षु न आलेले सुज्ञ सब्रह्मचारी यावे, आणि आलेले सुज्ञ सब्रह्मचारी सुखाने राहावे, यासाठी नेहमी जागृत राहतील, तोपर्यंत भिक्षूची अभिवृद्धीच होईल, परिहानि होणार नाही.''

यावरून असे दिसून येईल की, सघाने एकत्रित जमण्याचे एकमताने सघकृत्ये करण्याचे, वृद्ध, शीलवान्, भिक्षूंचा मान राखण्याचे वगैरे विनयपिटकात सापडणारे नियम बुद्ध भगवताने वज्जींसारख्या स्वतत्र गणराज्यात प्रचलित असलेल्या पद्धतीवरून घेतले.

## संघाचे कांहीं नियम लोकरूढीवरून ठरविले

परतु राज्यानुशासनाचे सर्वच नियम सघाला लागू करतां येणें शक्य नव्हते. सर्वांत एखाद्या भिक्षूने काही अपराध केला तरी त्याला

जास्तीत जास्त दंड म्हटला म्हणजे संघातून हाकून देणें हा होता; याच्या पलीकडे दुसरा कठोर दंड नव्हता. कां की, संघाचे सर्व नियम अहिंसात्मक होते. त्यांपैकी बरेचसे नियम केवळ चालू असलेल्या लोकरूढीवरून घेतले होते. उदाहरणार्थ, खालील नियम घ्या—

बुद्ध भगवान आळवी येथे अग्गाळव चेतियात राहत होता. त्या काळी आळवक भिक्षु बांधकाम करीत असतां जमीन खोदवीत. त्याच्यावर लोक टीका करूं लागले. ही गोष्ट समजली, तेव्हा भगवताने त्यांचा निषेध करून भिक्षूंना नियम घालून दिला तो असा:–

जो भिक्षु जमीन खणील किंवा खणवील, त्याला पाचित्तिय होते.*

भिक्षूंनी लहानशी कुटी किंवा बेताचा विहार बांधून त्यांत राहावे, एवढी परवानगी भगवताने दिली होती; आणि त्या कामीं जमीन स्वतः खोदणें किंवा दुसऱ्यास खोदावयास लावणे पाप आहे, असें नव्हतें. तथापि हा नियम केवळ लोकांच्या समाधानार्थ करावा लागला. बहुतेक श्रमण लहान सहान जंतूंचा नाश होऊं नये म्हणून खबरदारी घेत. ते रात्रीचा दिवा देखील पेटवीत नसत. कां की, त्या दिव्यावर पतंग वगैरे प्राणी येऊन पडण्याचा संभव होता. आणि त्यांचे हे आचार लोकांच्या आगवळणी पडले होते. एखादा श्रमण स्वतः कुदळ घेऊन जमीन खोदावयास लागला, तर सामान्य जनांच्या मनाला धक्का बसणे अगदी साहजिक होते. त्यांच्याशी वादविवाद करून त्यांचा दृष्टिकोण बदलण्याची बुद्ध भगवताला जरूर भासली नाही. तपश्चर्येंत वृथा काल न घालविता भिक्षूंना जनतेला धर्मोपदेश करण्यास आणि ध्यानसमाधीच्या योगें स्वचित्ताचें दमन करण्यास अवकाश मिळाला म्हणजे संघाचा कार्यभाग सुलभ

* 'बौद्धसंघाचा परिचय,' पृ० ९७ पहा.

होईल हें बुद्ध भगवान जाणून होता; आणि म्हणूनच ज्या रीतीभाती निरुपद्रवी होत्या, त्या संघाला लागू करण्यास भगवंताला हरकत वाटली नाही.

## भिक्षुसंघाचा साधेपणा

भगवंताला इतर संघात चालू असलेली तपश्चर्या मुळीच पसंत नव्हती, तथापि आपल्या संघातील भिक्षूंनी अत्यंत साधेपणाने वागावें याबद्दल भगवान फार काळजी घेत असे. भिक्षु जर परिग्रही बनले तर ते आपल्या परिग्रहासह चारी दिशांना जाऊन प्रचारकार्य कसे करू शकतील? सामञ्ञफलसुत्तात भगवान बुद्ध अजातशत्रु राजाला म्हणतो,

सेय्यथापि महाराज पक्खी सकुणो येन येनेव डेति सपत्तभारो व डेति। एवमेव महाराज भिक्खु संतुट्ठो होति, कायपरिहारिकेन चीवरेन, कुच्छिपरिहारिकेन पिण्डपातेन। सो येन येनेव पक्कमति समादायेव पक्कमति।

'हे महाराज, जसा एखादा पक्षी ज्या दिशेला उडतो त्या त्या दिशेला आपल्या पंखांसहच उडतो, त्याचप्रमाणे, हे महाराज, भिक्षु शरीराला लागणाऱ्या चीवराने आणि पोटाला लागणाऱ्या पिंडाने (भिक्षेने) संतुष्ट होतो. तो ज्या ज्या दिशेला जातो, त्या त्या दिशेला आपलें सामान बरोबर घेऊनच जातो.'

अशा भिक्षूजवळ फार झाले तर खालील गाथेत दिलेल्या आठ वस्तु असत.

तिचीवरं च पत्तो च वासि सूचि च बन्धनं।
परिस्सावनेन अट्ठेते युत्तयोगस्स भिक्खुनो॥

'तीन चीवरें, पात्र, वासि (लहानशी कुऱ्हाड), सुई, कमरबंध व पाणी गाळण्याचें फडके, या आठ वस्तु योगी भिक्षूला पुरे आहेत.'

## वागणुकीचे नियम

याप्रमाणे भिक्षूंनी अत्यंत साधेपणाने वागावे असा बुद्ध भगवंताचा उपदेश होता. तथापि मनुष्यस्वभावाला अनुसरून काही भिक्षु या वस्तु स्वीकारण्यात देखील अतिरेक करीत, म्हणजे तीन चीवरापेक्षा जास्त वस्त्रे घेत; मातीचे किंवा लोखंडाचे पात्र ठेवण्याऐवजी ताब्यापितळेचे पात्र स्वीकारीत; चीवरें प्रमाणाबाहेर मोठीं बनवीत. येणेकरून परिग्रहाला वाव मिळत असे. यास्तव त्याला आळा घालण्यासाठी पुष्कळसे नियम करावे लागले. अशा नियमांची संख्या बरीच मोठी आहे.

विनयपिटकात भिक्षुसंघासाठी एकंदरींत २२७ निषेधात्मक नियम दिले आहेत. त्यांना 'पातिमोक्ख' असें म्हणतात. त्यांपैकी दोन अनियत (अनियमित) आणि शेवटचे ७५ सेखिय, म्हणजे खाण्यापिण्यात चालण्याबोलण्यात शिष्टाचाराने कसे वागावें या संबधाचे नियम, एवढे वजा जाता, बाकी १५० नियमानाच अशोककालाच्या सुमाराला पातिमोक्ख म्हणत असत, असें वाटतें. त्या कालापूर्वी हे सर्व नियम अस्तित्वात नव्हते; आणि जे होते त्यात मूलभूत नियम सोडून बाकी नियमात योग्य फेरफार करण्याला संघाला पूर्णपणें अधिकार होता. परिनिर्वाण पावण्या पूर्वी भगवान् आनंदाला म्हणतो, "हे आनंदा, जर संघाची इच्छा असेल तर माझ्या पश्चात् संघाने बारीक सारीक नियम गाळावे."

यावरून बारीक सारीक नियम गाळण्याला किंवा देशकालानुसार सामान्य नियमात फेरफार करण्याला भगवंताने संघाला पूर्णपणें मुभा दिली होती, हें स्पष्ट होतें.

## शरीरोपयोगी पदार्थ वापरण्यात सावधगिरी

भिक्षूला लागणाऱ्या पदार्थांत चीवर, पिण्डपात (अन्न), शयनासन (राहण्याची जागा) आणि औषध हे चार पदार्थ मुख्य

असत. पातिमोक्खाच्या नियमानुसार त्याचा उपभोग घेत असताना देखील विचारपूर्वक वागावें, असे भगवताचे म्हणणे होतें.

चीवर वापरताना भिक्षूला म्हणावे लागे–'नीट विचार करून हे चीवर वापरतो, तें केवळ शीत, उष्ण, डास, माशा, वारा, ऊन, साप याची बाधा न व्हावी म्हणून आणि गुह्येंद्रिय झाकण्याच्या उद्देशाने.'

पिण्डपात सेवन करतांना म्हणावे लागे––'नीट विचार करून हा पिण्डपात सेवन करतो, तो शरीर क्रीडा करण्यास समर्थ व्हावे, मस्त व्हावे, मण्डित आणि विभूषित व्हावे, म्हणून नव्हे, तर केवळ या देहाचा संभाळ व्हावा, त्रास नष्ट व्हावा आणि ब्रह्मचर्याला मदत व्हावी म्हणून. याप्रमाणे मी (भुकेची) जुनी वेदना नाहीशी करीन, आणि (जास्त खाऊन) नवीन वेदना उत्पन्न करणार नाही. यामुळे माझी शरीरयात्रा चालेल, लोकापवाद राहणार नाही आणि जीवन सुखकर होईल.'

शयनासन वापरताना म्हणावे लागे––'नीट विचार करून हें शयनासन वापरतों, ते केवळ शीत, उष्ण, डास, माशा, वात, ऊन, साप याची बाधा न व्हावी म्हणून आणि एकातवासातील विश्रातीसाठी.' औषधि पदार्थ वापरताना म्हणावें लागे––'नीट विचार करून हा औषधि पदार्थ वापरतो, तो केवळ उत्पन्न झालेल्या रोगाच्या नाशासाठी आणि आरोग्य प्राप्त होईल तोपर्यंतच.'*

## देवदत्ताने केलेला संघभेद

सघात सरळपणा आणि मैत्रीभाव राहावा यासबधीं भगवान् फार खबरदारी घेत असे. तथापि मनुष्यस्वभाव असा काही विचित्र

---

*येणेप्रमाणे चार शरीरोपयोगी पदार्थ सावधानपणे वापरण्याला पच्चवेक्खण (प्रत्यवेक्षण) म्हणतात आणि त्याचो वहिवाट आजलाही चालू आहे.

आहे की, त्याच्या समुदायात मतभेद होऊन तट पडावयाचेच. याला मुख्य कारण म्हटले म्हणजे अभिमान आणि त्याच्या मागोमाग अज्ञान. मनुष्य कितीही साधेपणाने वागला, तरी तो जर पुढारी होण्याची इच्छा बाळगीत असला, तर दुसऱ्याच्या गुणाना अवगुणाचे स्वरूप देऊन आपला मोठेपणा वाढविण्याचा प्रयत्न केल्यावाचून राहणार नाही. त्याच्या जाळ्यात जर अज्ञानी लोक सापडले, तर त्याला सहज एखादा विलक्षण संप्रदाय स्थापता येतो.

बौद्ध संघात अशा प्रकारचा पहिला भिक्षु म्हटला म्हणजे देवदत्त होय. हा शाक्यांपैकी एक असून बुद्धाचा नातेवाईक होता. याने संघाचे पुढारीपण आपल्या स्वाधीन करावे अशी भगवताला विनवणी केली. भगवताने ती मान्य केली नाही. तेव्हा अजातशत्रु राजाकडून बुद्धाला मारण्यासाठी त्याने मारेकरी पाठविले. पण ते बुद्धाचा खून न करता उलट त्याचेच शिष्य झाले. तेव्हा देवदत्ताने गृध्रकूट पर्वताच्या एका टेकडीवरून बुद्धावर एक मोठी धोंड टाकली. तिची एक चीप बुद्धाच्या पायाला लागून त्याला जखम झाली. ती बरी झाल्यावर भगवान राजगृहात भिक्षाटनास गेला असता देवदत्ताने त्याच्यावर नालगिरि नावाचा मदोन्मत्त हत्ती सोडावयास लावले. त्याने भगवताची पदधूलि मस्तकावर घेतली आणि तो पुन्हा आपल्या पागेत जाऊन उभा राहिला. याप्रमाणे सर्व मसलती फसल्यावर देवदत्ताने संघाला तपश्चर्येचे कडक नियम घालून देण्याची भगवताला विनती केली आणि ती भगवताला मान्य न झाल्यामुळे संघात तट पाडून व कांही भिक्षूंना बरोबर घेऊन तो गयेला गेला.

देवदत्ताची ही कथा सविस्तरपणे चुल्लवग्गात आली आहे.* परन्तु तिच्यात ऐतिहासिक तथ्य फार थोडें दिसतें. का की, देवदत्त

---

* 'बुद्धलीलासारसंग्रह', पृ० १७९–१८८ पहा.

जर खून करण्याइतका दुष्ट होता, तर त्याला संघांत तट पाडता येणे शक्य झाले नसतें आणि काही भिक्षु त्याचे भक्त बनले नसते.

अजातशत्रु युवराज असतानाच त्याची आणि देवदत्ताची मैत्री जमली आणि तेव्हापासून देवदत्त पुढारीपणासाठी प्रयत्न करू लागला, असे लाभसत्कारसयुत्ताच्या ३६ व्या सुत्तावरून दिसून येते. त्या सुत्ताचा साराश असा'—

'बुद्ध भगवान राजगृह येथे वेळुवनात राहत होता. त्या काळीं अजातशत्रु राजकुमार ५०० रथ बरोबर घेऊन सकाळी सध्याकाळीं देवदत्ताच्या दर्शनास जात असे आणि देवदत्ताला ५०० पात्राचे जेवण पाठवीत असे. काही भिक्षूंनी ही गोष्ट भगवताला सागितली. तेव्हा भगवान म्हणाला, "भिक्षुहो, देवदत्ताच्या लाभसत्काराची स्पृहा करू नका. लाभामुळे देवदत्ताची हानीच होणार आहे, वृद्धि होणार नाही." '

याशिवाय देवदत्ताला उद्देशून भगवताने म्हटलेली खालील गाथा दोन ठिकाणीं आढळते.

> फल वे कदलि हन्ति फल वेळु फल नळ ।
> सक्कारो कापुरिम हन्ति गब्भो अस्सतरिं यथा ॥*

'फळ केळीचा नाश करते, फळ वेळूचा आणि फळ नळाचा नाश करतें; आणि खेचरीचा गर्भ खेचरीचा नाश करतो. त्याचप्रमाणे सत्कार कापुरुषाचा नाश करतो.'

यावरून देवदत्त अधिकार मिळविण्यासाठी अजातशत्रूच्या साहाय्याने कशी खटपट करीत होता याचे अनुमान करतां येतें. अजातशत्रु बापाला मारून गादीवर आला तरी देखील देवदत्ताने

---

* 'सयुत्तनिकाय' ( P. T. S. ) भाग २, पृ० २४१, आणि 'अगुत्तरनिकाय' ( P. T. S. ) भाग २, पृ० ७३.

त्याची संगति सोडली नाही आणि त्याच्याच मदतीने संघांत फूट पाडून बऱ्याच भिक्षूंना त्याने आपल्या नादीं लावले. हें त्याचें कृत्य बुद्ध भगवताला आवडले नाही यांत आश्चर्य कसले? परंतु देवदत्ताने पाडलेली फूट संघाला हानिकारक न होता त्या संकटांतून संघ सुखरूपपणें पार पडला.*

## भिक्षुसंघांतील दुसरें एक भांडण

दुसरें एक भिक्षुसंघांत साधारण भांडण कौशाम्बी येथे उद्भवल्याचे सविस्तर वर्णन महावग्गांत सांपडतें. महावग्गाच्या कर्त्याने किंवा कर्त्यांनी संघाला ह्यासारख्या इतर प्रसंगी उपयोगी पडेल अशा रीतीने या कथेची रचना केली आहे. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा की, दोघा विद्वान भिक्षूंत विनयाच्या एका क्षुद्र नियमासंबंधाने मतभेद होऊन हें भांडण उपस्थित झालें. त्या वेळी भगवंताने त्यांना दीर्घायूची गोष्ट सांगितली. परंतु ते ऐकेनात. त्यांपैकी एक भिक्षु म्हणाला, "भदन्त, आपण स्वस्थ रहा. आम्ही या भांडणाचे काय होतें तें पाहून घेऊ." त्या सर्वांचीं मनें कलुषित झाली आहेत असें पाहून भगवान् कौशाम्बीहून प्राचीन वंसदाव उपवनांत गेला. तेथे अनुरुद्ध, नंदिय व किम्बिल हे तिघे भिक्षु राहत असत. त्यांचा एकोपा पाहून भगवन्ताने त्यांचे अभिनंदन केलें; आणि तेथून भगवान पारिलेय्यक वनांत गेला. त्याच वेळीं एका हत्तींच्या कळपाचा पुढारी हत्ती आपल्या कळपाला कंटाळून त्या वनांत एकटाच राहत होता. त्याने भगवंताचें स्वागत केलें. भगवान् त्या ठिकाणी कांही काळ राहून श्रावस्तीला आला.

इकडे कौशाम्बी येथील उपासकांनी त्या भांडणाऱ्या भिक्षूंना ताळ्यावर आणण्यासाठी त्यांचा कोणत्याही रीतीने आदरसत्कार

---

* 'बुद्धलीलासार संग्रह', पृ० १८७–१८८ पहा.

करू नये आणि त्यांना भिक्षा देऊ नये, असा बेत केला. त्यामुळे वठणीला येऊन ते भिक्षु श्रावस्तीला गेले. तेव्हा भगवताने भाडण कसे मिटवावे यासबधाने काही नियम करून उपालि वगैरे भिक्षूकडून ते भाडण मिटविले.*

मज्झिमनिकायातील उपक्किलेससुत्तात (न. १२८) महावग्गाच्या मजकुरापैकी बराच भाग आला आहे. पण त्याच्यामध्ये दीर्घायूची गोष्ट तर नाहीच आणि त्या सुत्ताची समाप्ति प्राचीनवसदाव वनातच होते. पारिलेय्यक वनात बुद्ध भगवान गेल्याचा भाग त्या सुत्तात नाही. तो उदानवग्गात सापडतो.

कोसम्बियसुत्तात यापेक्षा निराळाच मजकूर आहे. त्याचा साराश असा—

भगवान कौशाम्बी येथे घोषितारामात राहत होता. त्या वेळी कौशाम्बींतील भिक्षु परस्पराशी भाडत होते. भगवन्ताला ही गोष्ट समजली. तेव्हा त्याने त्या भिक्षूना बोलावून आणले, आणि भगवान त्याना म्हणाला, "भिक्षुहो, जेव्हा तुम्ही परस्पराशीं भाडता तेव्हा तुमचे परस्पराविषयी कायिक, वाचसिक आणि मानसिक कर्म मैत्रीमय होणे शक्य आहे काय?"

"नाही," असे त्या भिक्षूनी उत्तर दिले. तेव्हा भगवान म्हणाला, "जर असें नाही, तर तुम्ही भाडता कशाला? निरर्थक माणसानो, अशा प्रकारचे भाडण तुम्हाला चिरकाल हानिकारक आणि दुःखकारक होईल."

पुन्हा भगवान म्हणाला, "भिक्षुहो, ह्या सहा सस्मरणीय गोष्टी भाडणें तोडण्याला, सामग्रीला आणि एकोप्याला कारणीभूत होतात. त्या कोणत्या? (१) मैत्रीमय कायिक कर्म, (२) मैत्रीमय वाचसिक

---

* 'बौद्धसघाचा परिचय', पृ० ३७–४३ पहा

कर्म, (३) मैत्रीमय मानसिक कर्म, (४) उपासकांकडून मिळालेल्या दानधर्माचा सर्व संघाबरोबर समविभागाने उपभोग घेणे, (५) आपल्या शीलात यत्किंचित् उणीव असू न देणे, आणि (६) आर्यश्रावकाला शोभण्यासारखी सम्यक् दृष्टि ठेवणे."

या सम्यक् दृष्टीचे भगवन्ताने बरेच विवेचन केले आहे. तें विस्तारपूर्वक येथे देण्याची आवश्यकता वाटत नाही. या उपदेशाच्या शेवटी त्या भिक्षूंनी भगवन्ताच्या भाषणाचे अभिनंदन केले.

याचा अर्थ असा होतो की, हें भांडण तेथल्या तेथेच मिटलें. नाही तर भगवन्ताच्या भाषणाचे त्या भिक्षूंनी अभिनंदन कसे केले असते ? महावग्गात आणि उपक्किलेस सुत्तांत त्या भिक्षूंनी भगवन्ताचें अभिनंदन केल्याचा उल्लेख नाही, ते भांडतच राहिले आणि त्यांना कंटाळून भगवान तेथून निघून प्राचीनवंसदाव वनात गेला असें तेथे म्हटले आहे. तेव्हा या परस्पर विरोधाचा मेळ कसा घालावा ?

अंगुत्तर निकायातील चतुक्क निपाताच्या २४१ व्या सुत्तांत हा मजकूर आहे:—

एके वेळीं भगवान कौशाम्बी येथे घोषितारामात राहत होता. तेव्हा आयुष्मान् आनंद त्याजपाशी येऊन नमस्कार करून एका बाजूला बसला. त्याला भगवान म्हणाला, "आनंदा, तो खटला मिटला की नाही ?"

आ०—भदन्त, खटला मिटणार कसा ? अनुरुद्धाचा शिष्य बाहिय जणू काय संघभेद करण्यासाठी प्रवृत्त झाला आहे, आणि अनुरुद्ध त्याला एक शब्द देखील बोलत नाही.

भ०—पण, आनन्दा, अनुरुद्ध संघातील भांडणे तोडण्याच्या कामीं कधी हात घालीत असतो ? तू आणि सारिपुत्त–मोग्गल्लान हीं भांडणें मिटवीत नसता काय ?

यावरून असें दिसून येईल की, बाहियामुळे हें भांडण उपस्थित होऊन विकोपाला गेले आणि तें मिटविण्याच्या कामीं खुद्द भगवन्ताला प्रयत्न करावा लागला. त्या भिक्षूंच्या सभेतून भगवान् काही काळ दुसरीकडे गेला असला, तरी तें भांडण कौशाम्बी येथेच मिटले असावें.

अशा प्रसगी भांडखोर भिक्षूना ताळयावर आणण्यासाठी उपासकानी त्याच्यावर बहिष्कार घालावा आणि ते शुद्धीवर आले म्हणजे कोणत्या तरी पद्धतीने ते भाडण मिटवावे, हें दाखविण्याच्या उद्देशाने महावग्गाच्या कर्त्याने ही गोष्ट रचली आहे, असें सिद्ध होते. असल्या लहानसहान भाडणाचा सघावर विपरीत परिणाम होणे मुळीच शक्य नव्हते.

## भिक्षुणीसघाची स्थापना

भिक्षुणीसंघाच्या स्थापनेची हकीगत चुल्लवग्गात आली आहे. तिचा सारांश असा:—

बुद्ध भगवान कपिलवस्तु येथे निग्रोधारामांत राहत होता. तेव्हा महाप्रजापती गोतमी भगवताजवळ येऊन म्हणाली, "भदन्त, बायकांना आपल्या सप्रदायांत प्रव्रज्या घेण्यास परवानगी द्या." भगवताने ती विनती तीनदा नाकारली आणि भगवान तेथून वैशाली येथे आला. महाप्रजापती गोतमी आपले केशवपन करून आणि बऱ्याच शाक्य स्त्रियाना बरोबर घेऊन भगवन्ताच्या मागोमाग वैशालीला आली. प्रवासाने तिचे पाय सुजले होते, अग धुळीने माखले होतें आणि तिच्या चेहऱ्यावर उदासीनता पसरली होती. आनदाने तिला पाहून तिच्या उदासीनतेचें कारण विचारलें. "स्त्रियांना बौद्ध संप्रदायांत प्रव्रज्या घेण्यास भगवान परवानगी देत नाही, म्हणून मी उदासीन झालें," असें गोतमी म्हणाली. तिला तेथेच राहण्यास सांगून

आनद भगवतापाशीं गेला आणि, स्त्रियांस प्रव्रज्या घेण्यास परवानगी द्यावी, अशी त्याने भगवन्ताला विनती केली. भगवन्ताने ती गोष्ट नाकारली. तेव्हा आनद म्हणाला, "भदन्त, तथागताने निवेदिलेल्या धर्मसप्रदायात भिक्षुणी होऊन एखाद्या स्त्रियेला स्रोतआपत्तिफल, सकृदागामिफल, अनागामिफल आणि अर्हत्फल* प्राप्त करून घेणे शक्य आहे की नाही?" भगवन्ताने 'शक्य आहे,' असें उत्तर दिल्यावर आनद म्हणाला, "असें जर आहे, तर ज्या मावशीने भगवन्ताला आईच्या अभावीं दूध पाजून लहानाचे मोठे केले तिच्या विनतीवरून भगवन्ताने स्त्रियाना प्रव्रज्या द्यावी."

भगवान म्हणाला, "जर महाप्रजापती गोतमी आठ जबाबदारीचे नियम (अट्ठ गरुधम्मा) पत्करील तर स्त्रियाना प्रव्रज्या घेण्यास मी परवानगी देतो. (१) भिक्षुणी सघात कितीही वर्षें राहिलेली असो, तिने लहान मोठया सर्व भिक्षूना नमस्कार केला पाहिजे. (२) ज्या गावी भिक्षु नसतील त्या गावीं भिक्षुणीने राहता कामा नये. (३) दर पधरवडयास उपोसथ कोणत्या दिवशी व धर्मोपदेश ऐकण्यास कधी यावें, या दोन गोष्टी भिक्षुणीने भिक्षुसघाला विचाराव्या. (४) चातुर्मासानतर भिक्षुणीने भिक्षुसघाची व भिक्षुणीसघाची प्रवारणा† केली पाहिजे. (५) ज्या भिक्षुणीकडून सघादिशेष आपत्ति घडली असेल, तिने दोन्ही सघांकडून पधरा दिवसांचे मानत्त‡ घेतले

---

*या चार फलाचे स्पष्टीकरण पुढे याच प्रकरणात आले आहे पृ० १७८ पहा.

† स्वदोष सागण्याविषयी सघाला विनती करणे. 'बौद्धसघाचा परिचय', पृ. २४–२६ पहा.

‡ सघाचा सतोष होण्यासाठी विहाराबाहेर रात्री काढणे. 'बौद्धसघाचा परिचय', पृ ४७ पहा.

पाहिजे. (६) दोन वर्षें अभ्यास केला असेल अशा श्रामणेरीला दोन्ही संघानी उपसंपदा दिली पाहिजे. (७) कोणत्याही कारणास्तव भिक्षुणीने भिक्षूला शिवीगाळ करता कामा नये. (८) भिक्षुणीने भिक्षूला उपदेश करतां कामा नये; भिक्षूने भिक्षुणीला उपदेश करावा."

आनंदाने ते आठ नियम महाप्रजापती गोतमीला कळविले आणि तिला ते पसंत पडले. येथवर ही कथा अंगुत्तरनिकायाच्या अट्ठकनिपातातही आढळते आणि त्यानंतर भगवान आनंदाला म्हणतो, "हे आनंद, जर स्त्रीला या धर्मविनयात प्रव्रज्या मिळाली नसती, तर हा धर्म (ब्रह्मचर्य) एक हजार वर्षें टिकला असता. ज्या अर्थी आता स्त्रीला संन्यासाचा अधिकार देण्यांत आला, त्या अर्थी हा सद्धर्म पाचशे वर्षेंच टिकेल."

याप्रमाणे विनय आणि अंगुत्तरनिकाय यांचा मेळ आहे, तरी देखील हे आठ गुरुधर्म मागाहून रचले असे म्हणावे लागते; कां की, विनयाचे नियम घालून देण्याची जी भगवंताची पद्धति होती, तिचा या नियमाशी उघड विरोध आहे.

बुद्ध भगवान वेरंजा गावाजवळ राहत होता. त्या काळी वेरंजा गावाच्या आसपास दुष्काळ पडल्यामुळे भिक्षूंचे फार हाल होऊ लागले. तेव्हा सारिपुत्ताने भगवंताला विनंती केली की, भिक्षूंना आचारविचारासंबंधीं नियम घालून द्यावे. भगवान् म्हणाला, "सारिपुत्ता, तू दम धर. नियम घालून देण्याचा प्रसंग कोणता तें तथागतालाच माहीत आहे. संघांत जोपर्यंत पापाचार शिरले नाहीत तोंपर्यंत तथागत तन्निवारक नियम घालून देत नसतो."*

या बुद्धाच्या वचनानुसार सर्व नियमांची रचना केली आहे. प्रथमतः एखादा भिक्षु काही तरी गुन्हा किंवा चूक करतो. ती गोष्ट बुद्धाच्या कानीं आल्यावर भिक्षुसंघ जमवून भगवान एखादा नियम

---

* 'बौद्धसंघाचा परिचय', पृ० ५२–५३ पहा.

घालून देतो; आणि त्या नियमाचा अर्थ बरोबर करण्यांत येत नाही, असा अनुभव आला, तर त्यात पुढे सुधारणा करतो.

परंतु महाप्रजापती गोतमीच्या बाबतींत ह्या पद्धतीचा अंगीकार केलेला नाही. भिक्षुणीसंघात काही एक दोष घडून आले नसता आरंभीच भिक्षुणींवर हे आठ नियम लादण्यात यावे, हे विलक्षण दिसतें; आणि भिक्षुसंघाने आपल्या हातीं सर्व सत्ता ठेवण्यासाठी मागाहून हे नियम रचून विनयांत व अंगुत्तरनिकायात दाखल केले, असें अनुमान करता येते.

विनयपिटकापेक्षा सुत्तपिटक प्राचीनतर आहे. तथापि त्यात काही सुत्तें मागाहून दाखल करण्यात आली आणि त्यापैकी हें एक असावे असे वाटते. इसवी सनापूर्वी पहिल्या किंवा दुसऱ्या शतकात जेव्हा महायान पंथाचा जारीने प्रसार होऊ लागला, अशा वेळीं ते लिहिले असावें. त्यांत सद्धर्म म्हणजे स्थविरवादी पंथ. भिक्षुणीसंघाच्या स्थापनेमुळे तो पांचशें वर्षें टिकेल आणि नंतर जिकडे तिकडे महायान संप्रदायाचा प्रसार होईल, असा ह्या सुत्तकर्त्याचा भविष्यवाद असावा. हें सुत्त भगवान बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर पांचशे वर्षांनी लिहिले; असे या भविष्यावरूनच सिद्ध होतें.

भारतवर्षात पहिला भिक्षुणीसंघ बुद्धानेच स्थापन केला असता, तर कदाचित् या आठ गुरुधर्मांची अल्पस्वल्प प्रमाणात इतिहासात गणना करता येणे शक्य होते. पण वस्तुस्थिति तशी नव्हती. जैन आणि इतर संप्रदाय बौद्ध संप्रदायापेक्षा एक दोन शतकापूर्वी अस्तित्वात आले होते आणि त्या संप्रदायात भिक्षुणींचे मोठमोठाले संघ असून त्यापैकी काहीं भिक्षुणी हुशार व विदुषी होत्या, अशी माहिती पालि वाङ्मयात बऱ्याच ठिकाणी सापडते. त्याच धर्तीवर बुद्धाचा भिक्षुणीसंघ स्थापन करण्यात आला. गणसत्ताक राज्यात, आणि ज्या देशात एकसत्ताक राज्यपद्धति उदयास आली होती तेथे

देखील, स्त्रियांचा मान चागलाच ठेवण्यात येत असे. त्यामुळे भिक्षुणीसघाच्या रक्षणासाठी विचित्र नियम करण्याची मुळीच गरज नव्हती. अशोककालानतर ही परिस्थिति पालटली. या देशावर यवन आणि शक लोकाच्या स्वाऱ्या होऊ लागल्या आणि उत्तरोत्तर बायकाचा दर्जा अगदी खालचा ठरून समाजात त्याचा मान राहिला नाही. त्या काळी भिक्षुणीसबधाने अशा प्रकारचे नियम अस्तित्वात आले तर त्यात नवल कोणते ?

## राहुल श्रामणेर

भिक्षुसघ आणि भिक्षुणीसघ स्थापन झाल्यावर त्यात श्रामणेर आणि श्रामणेरी दाखल करून घ्याव्या लागल्या. प्रथमत बुद्ध भगवताने राहुलाला श्रामणेर करून घेतल्याची कथा महावग्गात आली आहे, ती अशी.—

भगवान काही काळ राजगृहात राहून कपिलवस्तूला आला. तेथे तो निग्रोधारामात राहत असे. एके दिवशी भगवान् शुद्धोदनाच्या घराजवळून भिक्षाटन करीत असता राहुलमातेने त्याला पाहिले. तेव्हा ती राहुलाला म्हणाली, "बा राहुला, हा तुझा पिता आहे. त्याच्याजवळ जाऊन आपला दायभाग माग" मातेचे वचन ऐकून राहुल भगवतापुढे जाऊन उभा राहिला आणि म्हणाला, "श्रमणा, तुझी सावली सुखकर आहे." भगवान तेथून चालता झाला. राहुल त्याच्या मागोमाग, माझा दायभाग द्या, असे म्हणत गेला. विहारात गेल्यावर आपले दायाद्य राहुलाला देण्याच्या उद्देशाने सारिपुत्ताला बोलावून भगवताने राहुलाला श्रामणेर करविले. ती गोष्ट शुद्धोदनाला आवडली नाही. लहान मुलाना प्रव्रज्या दिली असता त्याच्या पालकांना दुःख कसे होते, हे सांगून त्याने भगवताला असा नियम करावयाला लावला की, अल्पवयी माणसाला प्रव्रज्या देऊ नये.

ही कथा ऐतिहासिक कसोटीला टिकत नाही. एक तर शुद्धोदन शाक्य कपिलवस्तूमध्ये राहत नव्हता. दुसरे, निग्रोधाराम बुद्धाच्या उतार वयात बांधण्यात आला आणि त्या वेळी राहुल अल्पवयी नव्हता. तेव्हा, ही गोष्ट पुष्कळ शतकानंतर रचून महावग्गात दाखल केली आहे, असे म्हणावे लागते.

बुद्ध भगवंताने राहुलाला श्रामणेरदीक्षा दिली, त्या वेळी त्याचे वय सात वर्षांचे होते, असे अम्बलट्ठिकराहुलोवाद सुत्ताच्या अट्ठकथेत म्हटले आहे आणि हीच समजूत बौद्ध लोकांत अद्यापिही प्रचलित आहे. बोधिसत्त्वाच्या गृहत्यागाच्या दिवशी राहुल कुमार जन्मला, असे गृहीत धरले, तर तो श्रामणेरदीक्षेच्या वेळी सात वर्षांचा होता हे संभवत नाही. का की गृहत्यागानंतर बोधिसत्त्वाने सात वर्षे तपश्चर्या केली आणि तत्त्वबोध झाल्यावर पहिला चातुर्मास वाराणसीला घालविला, आणि त्यानंतर संघस्थापनेला एक वर्ष तरी लागले असले पाहिजे. तेव्हा राहुल कुमार श्रामणेरदीक्षेच्या वेळी सात वर्षांचा राहणे शक्यच नव्हते.

राहुलाला श्रामणेर कशा प्रकारे करण्यात आले, ह्याचे अनुमान सुत्तनिपातातील राहुलसुत्तावरून करतां येण्याजोगे आहे, म्हणून त्या सुत्ताचे भाषांतर येथे देतो.

(भगवान–) (१) सतत परिचयाने तू पंडिताची अवज्ञा करीत नाहीस ना? मनुष्यांना ज्ञानप्रद्योत दाखवणाऱ्याची (त्याची) तू योग्य सेवा करतोस काय?

(राहुल–) (२) मी सतत परिचयामुळे पंडिताची अवज्ञा करीत नाही. मनुष्यांना ज्ञानप्रद्योत दाखवणाऱ्याची मी सदोदित योग्य सेवा करतो.

(ह्या प्रास्तविक गाथा होत.)

(भगवान–) (३) प्रिय वाटणारे मनोरम [पचेन्द्रियाचे] पाच कामोपभोग सोडून श्रद्धापूर्वक घरातून बाहेर नीघ आणि दुःखाचा अन्त करणारा हो.

(४) 'कल्याण मित्राची सगति धर. जेथे फारशी गडबड नाही, अशा एकात स्थळीं तुझे वसतिस्थान असू दे, आणि मिताहारी हो.

(५) चीवर (वस्त्र), पिण्डपात (अन्न), औषधि पदार्थ आणि राहण्याची जागा, यांची तृष्णा धरू नकोस आणि पुनर्जन्म घेऊ नकोस.

(६) विनयाच्या नियमात आणि पचेन्द्रियात सयम ठेव; कायगता स्मृति असू दे, आणि वैराग्यपूर्ण हो.

(७) कामविकाराने मिश्रित असे विषयाचे शुभ निमित्त सोडून दे व एकाग्रता आणि समाधि प्राप्त करून देणाऱ्या अशुभ निमित्ताची भावना* कर.

(८) आणि अनिमित्ताची (निर्वाणाची) भावना कर व अहकार सोड. अहकाराचा नाश केल्यावर तू शातपणे राहशील.

याप्रमाणे भगवान ह्या गाथांनी राहुलाला पुनः पुनः उपदेश करता झाला.

ह्या सुत्तात एकदरीत आठ गाथा आहेत. पैकी दुसरी राहुलाची व बाकीच्या भगवताच्या असे अट्ठकथाकाराचे म्हणणे आहे. पहिल्या गाथेत भगवताने ज्याला पडित म्हटले आहे, तो सारिपुत्त होता, असेही अट्ठकथाकार म्हणतो, आणि तें बरोबर असावे असे वाटते. राहुल अल्पवयस्क असतानाच त्याच्या शिक्षणासाठी भगवताने त्याला सारिपुत्ताच्या स्वाधीन केले. आणि एक दोन वर्षांनी राहुल वयात आल्यावर त्याला भगवताने हा उपदेश केला असावा. कां की, ह्या सुत्तात सागितलेल्या गोष्टी अल्पवयस्क मुलाला समजण्याजोग्या

* अशुभ भावनेसबधी 'समाधिमार्ग', पृ० ४९–५८ पहा

नाहीत. राहुल श्रामणेर झाला असता, तर त्याला, ‘ श्रद्धापूर्वक घरातून बाहेर निघून दुःखाचा अन्त करणारा हो,’ असा उपदेश करण्याची जरूरच नव्हती.

ब्राह्मण तरुण गुरुगृहीं जाऊन ब्रह्मचर्यपूर्वक वेदाध्ययन करीत आणि त्यानंतर यथारुचि गृहस्थाश्रम किंवा तपश्चर्येचा मार्ग अवलंबीत. तसाच प्रकार राहुलाच्या बाबतींत घडून आला असावा. त्याला सर्वसाधारण ज्ञान मिळावे या उद्देशाने भगवंताने सारिपुत्ताच्या स्वाधीन केले आणि सारिपुत्ताबरोबर तो राहत असल्यामुळे त्याला ब्रह्मचर्य पाळणे आवश्यकच होते. वयात आल्यावर त्याने पुनरपि गृहस्थाश्रमात जाऊ नये म्हणून भगवताने त्याला हा उपदेश केला. आणि ह्या राहुलाच्या गोष्टीच्या पायावर महावग्गकाराने श्रामणेरची विस्तृत कथा रचली.

## इतर श्रामणेर

बुद्ध भगवंताच्या हयातींत अल्पवयांत संघात दाखल झालेले श्रामणेर फारच थोडे होते. पण दुसऱ्या संप्रदायांतून जे परिव्राजक येत, त्यांना चार महिने उमेदवारी करावी लागे, आणि अशा प्रकारच्या श्रामणेरांचाच भरणा जास्त होता असे दिसते. दीघनिकायांतील महासीहनाद सुत्ताच्या शेवटी काश्यप परिव्राजक बुद्धाच्या भिक्षुसंघात प्रवेश करूं इच्छितो, तेव्हा भगवान त्याला म्हणतो, “काश्यपा, या संप्रदायांत जो प्रव्रज्या घेऊन संघात प्रवेश करूं इच्छितो, त्याला चार महिने उमेदवारी करावी लागते. चार महिन्यानंतर भिक्षूंची खात्री झाली, म्हणजे ते त्याला प्रव्रज्या देऊन संघात दाखल करतात. ह्या बाबतींत कांही अपवाद आहेत, हें मी जाणतो.”

त्याप्रमाणे काश्यपाने चार महिने उमेदवारी केली आणि भिक्षूंची खात्री झाल्यावर त्याला संघात दाखल करून घेण्यांत आले.

## श्रामणेरसंस्थेची वाढ

श्रामणेरांची संस्था भगवताच्या परिनिर्वाणानंतर वृद्धिंगत होत गेली आणि होता होता लहानपणी श्रामणेर होऊन भिक्षु होणाऱ्यांचीच संख्या फार मोठी झाली. त्यामुळे संघात अनेक दोष शिरले. खुद्द भगवान बुद्ध आणि त्यांचा भिक्षुसंघ यांना प्रपंचाचा अनुभव चांगला होता आणि पुन्हा प्रपंचाकडे त्यांचे मन धावणे शक्य नव्हते. पण लहानपणीच संन्यासदीक्षा देऊन प्रपंचातून ज्यांना बाहेर काढले, त्यांचा ओढा संसाराकडे जाणे साहजिकच होते. पण रूढि त्यांच्या आड येऊ लागली आणि त्यांच्या हातून मानसिक दोष पुष्कळ घडू लागले. संघाच्या नाशाला जी अनेक कारणे झालीं त्यांपैकी हे एक प्रमुख कारण समजले पाहिजे.

श्रामणेरांच्या धर्तीवरच श्रामणेरींची संस्था उभारली गेली होती. श्रामणेर भिक्षूंच्या आणि श्रामणेरी भिक्षुणींच्या आश्रयाने राहत, हाच काय तो फरक.

## श्रावकसंघाचे चार विभाग

परंतु संघाच्या चार विभागांत श्रामणेरांची आणि श्रामणेरींची गणना केलेली नाही. त्यामुळे भगवताच्या हयातींत त्यांना मुळीच महत्त्व नव्हतें असे समजले पाहिजे. भिक्षु, भिक्षुणी, उपासक आणि उपासिका हेच काय ते बुद्धाच्या श्रावकसंघाचे विभाग आहेत.

भिक्षुसंघाची कामगिरी फार मोठी होती, यांत शंका नाही. तथापि भिक्षुणी, उपासक आणि उपासिका यांनी देखील संघाच्या अभ्युन्नतींत पुष्कळ भर घातल्याचे अनेक दाखले त्रिपिटक वाङ्मयांत सापडतात.

## स्त्रियांचा दर्जा

बुद्धाच्या धर्ममार्गांत स्त्रियांचा दर्जा पुरुषाएवढाच होता, हे सोमा भिक्षुणीच्या माराबरोबर झालेल्या खालील संवादावरून दिसून येईल.

दुपारच्या प्रहरीं सोमा भिक्षुणी श्रावस्तीजवळच्या अंधवनात ध्यान करण्यासाठी बसली. तेव्हा मार तिजपाशीं येऊन म्हणाला,

यन्त इसीहि पत्तब्ब ठान दुरभिसम्भव ।
न त द्वगुलपञ्ञाय सक्का पप्पोतुमित्थिया ॥

'जे (निर्वाण) स्थान ऋषींना मिळणें कठीण, ते (भात शिजला असता तपासून पाहण्याची) दोन बोटांची जिची प्रज्ञा, त्या स्त्रीला मिळणे शक्य नाही.'

सोमा भिक्षुणी म्हणाली,

इत्थिभावो किं कयिरा चित्तम्हि सुसमाहिते ।
ञाणम्हि वत्तमानम्हि सम्मा धम्म विपस्सतो ॥
यस्स नून सिया एव इत्थाह पुरिसो ति वा ।
किञ्चि वा पन अस्मीति त मारो वत्तुमरहति ॥*

'चित्त उत्तम प्रकारें समाधान पावले असता आणि ज्ञानलाभ झाला असता सम्यक्पणे धर्म जाणणाऱ्या व्यक्तीला (निर्वाण मार्गात) स्त्रीत्व कसें आड येणार? ज्या कोणाला मी स्त्री आहें, मी पुरुष आहे, किंवा मी कोणी तरी आहें, असा अहंकार† असेल, त्याला माराने या गोष्टी सांगाव्या!'

आपणाला सोमा भिक्षुणीने ओळखलें, असे जाणून मार दु:खित अन्त:करणाने तेथेच अन्तर्धान पावला.

---

* भिक्खुणीसंयुत्त, सुत्त २.

† अहंकार तीन प्रकारचा (१) मी श्रेष्ठ आहे हा मान. (२) मी सदृश आहे हा मान आणि (३) मी हीन आहे हा मान. विभंग (P T S) पृ० ३४६ आणि ३५३

हा संवाद काव्यमय आहे. तथापि त्यावरून बौद्ध संघात स्त्रियांचा दर्जा कसा असे, हे स्पष्ट होते.

## निर्वाणमार्गांतील श्रावकांचे चार भेद

निर्वाणमार्गांत श्रावकांचे सोतापन्न, सकदागामी, अनागामी आणि अरहा, असे चार भेद असत. सक्काय दिट्ठि (आत्मा हा भिन्न पदार्थ असून तो नित्य आहे अशी दृष्टि), विचिकिच्छा (बुद्ध, धर्म आणि संघ यांजविषयीं शंका किंवा अविश्वास), सीलब्बतपरामास (स्नानादिक व्रतांनी आणि उपोषणांनी मुक्ति मिळेल असा विश्वास) या तीन संयोजनांचा (बंधनांचा) नाश केला असतां श्रावक सोतापन्न होतो, आणि त्या मार्गांत तो स्थिर झाला म्हणजे त्याला सोतापत्तिफलट्ठो* म्हणतात. त्यानंतर कामराग (कामवासना), आणि पटिघ (क्रोध) हीं दोन संयोजनें शिथिल होऊन अज्ञान कमी झालें म्हणजे तो सकदागामी होतो, आणि त्या मार्गांत स्थिर झाल्यावर त्याला सकदागामिफलट्ठो म्हणतात. या पांचही संयोजनांचा पूर्णपणे क्षय केल्यावर श्रावक अनागामी होतो, आणि त्या मार्गांत स्थिर झाल्यावर त्याला अनागामिफलट्ठो म्हणतात. त्यानंतर रूपराग (ब्रह्मलोकादिप्राप्तीची इच्छा), अरूपराग (अरूप देवलोक प्राप्तीची इच्छा), मान (अहंकार), उद्धच्च (भ्रान्तचित्तता), आणि अविज्जा (अविद्या), या पांच संयोजनांचा क्षय करून तो अरहा (अर्हन्) होतो, आणि त्या मार्गांत स्थिर झाला म्हणजे त्याला अरहत्फलट्ठो (अर्हत्फलस्थ) म्हणतात याप्रमाणें श्रावकांचे चार किंवा आठ भेद करण्यांत येतात.

चित्र आणि विशाख हे गृहस्थ असून अनागामी होते. आणि आनंद भिक्षु असतां बुद्ध भगवंताच्या हयातींत केवळ सोतापन्न होता. क्षेमा, उत्पलवर्णा वगैरे भिक्षुणी अर्हत्पदाला पावल्या होत्या. म्हणजे

* फलट्ठो–फलस्थ

निर्वाणमार्गांत प्रगति करण्याला स्त्रीत्व किंवा गृहस्थत्व मुळीच आड येत नसे.

## संघाची प्रतिष्ठा

बुद्ध सरण गच्छामि ।
धम्म सरण गच्छामि ।
सघ सरण गच्छामि ।

ह्याला शरणगमन म्हणतात. आजला देखील बौद्ध जनता हे त्रिशरण म्हणत असते. ही वहिवाट बुद्धाच्या हयातीतच सुरू झाली असावी. आपल्या धर्माइतकेच महत्त्व बुद्ध भगवताने सघाला देऊन ठेवले, हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. कोणत्याही दुसऱ्या धर्मात हा प्रकार नाही. येशू ख्रिस्त म्हणतो, "कष्टी आणि भाराक्रात जनहो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हाला विश्राति देईन."*

आणि कृष्ण भगवान म्हणतो,

सर्वधर्मान्परित्यज्य मामेक शरण व्रज ।
अह त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच ॥†

'सर्व धर्म सोडून तू मला एकट्यालाच शरण जा; मी तुला सर्व पापापासून मुक्त करीन. तू शोक करू नकोस.'

पण बुद्ध भगवान म्हणतो, "तुम्ही बुद्ध धर्म आणि सघ याचा आश्रय धरून स्वत च्या परिश्रमाने आपल्या आणि इतराच्या दु खाचा नाश करा, जगाचे दु.ख कमी करा."

जगातील सुज्ञ आणि शीलवान स्त्रीपुरुषाचा मोठा सघ बनवून त्याला जर आपण शरण गेलो, तर दु खविनाशाचा मार्ग सुगम होणार नाही काय?

---

* Matthew, 11, 28

† भगवद्गीता, अ० १८, श्लो० ६६.

## संघच सर्वांचा पुढारी

बुद्ध भगवन्ताने आपल्या मागे संघाचा पुढारी नेमला नाही, सर्व संघाने मिळून संघकार्यें केली पाहिजेत, असा नियम घालून दिला. एकसत्ताक राज्यपद्धतीत रुळलेल्या लोकाना ही बुद्धाची पद्धति चमत्कारिक वाटली, तर त्यात नवल नाही.

भगवान् परिनिर्वाण पावून फार काळ झाला नव्हता. त्या काळीं आनंद राजगृहात राहत असे प्रद्योताच्या भयाने अजातशत्रु राजाने राजगृहाची डागडुजी चालविली, आणि त्या कामावर गोपक मोग्गल्लान ब्राह्मणाची नेमणूक केली. आयुष्मान् आनंद राजगृहात भिक्षेसाठी जाण्यास निघाला. पण भिक्षाटनाला अद्यापि समय आहे असे वाटून तो गोपक मोग्गल्लान ब्राह्मणाच्या कामावर गेला. ब्राह्मणाने त्याला आसन दिले आणि स्वतः कमी दर्जाच्या आसनावर बसून प्रश्न विचारला, "भगवन्तासारखा गुणी भिक्षु आहे काय?" आनंदाने "नाही" असे उत्तर दिले.

ही गोष्ट चालली असता मगध देशाचा प्रमुख मंत्री वस्सकार ब्राह्मण तेथे आला, आणि त्याने चाललेली गोष्ट ऐकून घेऊन आनंदाला प्रश्न केला, "त्या भगवन्ताने अशा एखाद्या भिक्षूची निवड केली आहे काय, की भगवन्ताच्या अभावी संघ त्या भिक्षूला शरण जाईल?" आनंदाने "नाही" असे उत्तर दिल्यावर वस्सकार ब्राह्मण म्हणाला, "असा कोणी एखादा भिक्षु आहे काय, की ज्याला संघाने भगवन्ताच्या स्थानी निवडले आहे?" आनंदाने "नाही" असे उत्तर दिले. वस्सकार म्हणाला, "तेव्हा तुमच्या या भिक्षुसंघाला कोणताही नेता नाही. असे असता या संघात सामग्री कशी राहते?" आनंद म्हणाला, "आम्हाला नेता नाही असें समजू नये. भगवन्ताने विनयाचे नियम घालून दिले आहेत. जेवढे भिक्षु एका

गावात राहतात, तेवढे एकत्र जमून त्या नियमाची आम्ही उजळणी करतो, ज्याच्याकडून दोष झाला असेल तो आपला दोष प्रगट करतो आणि त्याबद्दल प्रायश्चित्त घेतो एखादा भिक्षु शीलादिक गुणानी सपन्न असला तर त्याचा आम्ही मान ठेवतो आणि त्याचा सल्ला घेतो."*

वस्सकार ब्राह्मण अजातशत्रु राजाचा दिवाण होता. कोणी तरी सर्वाधिकारी व्यक्ति असल्याशिवाय राज्यव्यवस्था सुरळीत चालणे शक्य नाही, असे त्याचे ठाम मत असले पाहिजे. बुद्धाने आपल्या गादीवर कोणाला बसविले नाही, तरी निदान सघाने एखाद्या भिक्षूला निवडून त्या गादीवर त्याची स्थापना केली पाहिजे, असे वस्सकार ब्राह्मणाचे म्हणणे. पण अशा सर्वाधिकाऱ्यावाचून बुद्धाच्या पश्चात् देखील सघाचे काम सुरळीत चालले, यावरून बुद्धाने केलेली सघाची रचना योग्य होती, असे म्हणावे लागते.

---

* मज्झिमनिकाय, गोपकमोग्गल्लानसुत्त (न. १०८) पहा.

# सूची

[ग्रंथाची नावे, उताऱ्याचे संदर्भ दर्शविणारी पालि सुत्तादिकाची नावे व विशेष महत्त्वाची नसलेली व्यक्तिनामे सूचीत समाविष्ट केलेली नाहीत ]


अकुशल वितर्क १२२–२३
अग्निहोत्र ६८, ७३, १२८, १४८
अंग देश (अंगा) २४,३३,७८,९३
अंगमगधा २४, २८
अजातशत्रु २६, २७, ३०, ५०, ९२, १५८, १६३, १६४, १८०–८१
अजित केसकम्बल ६९, १५४
अंजन शाक्य ९३,९४
अट्ठ गरुधम्मा (आठ गुरुधर्म) १६९–७१
अनागामि फल १६९, १७८
अनाथपिंडिक २९, ८१
अनुरुद्ध ८५, ८६, ८९–९१, १५२, १६५, १६७
अथर्ववेद २०
अभिपारक ७९
अभिवृद्धीचे नियम, सात १५८
अम्बष्ठ ९५
अरहत्फल १६९, १७८
अर्कबन्धु ९७
अल्लतु १०
अवंतिपुत्र ३७, ४०
अवंती २७, ३५, ३९
अवंतिराजकुल ४६
अशोक ८६, ९१, १७२
अश्वघोष ११२
अश्वमेध ७३, ७४
अष्टांगिक मार्ग १३३, १३७, १४०, १४१–४३
असित ऋषि ९६
अस्सका (अश्मक) ३८
अस्सजि १४४–१४६, १४९, १५१
अहंकार १४१, १७४, १७७
अहिंसा, अहिंसाधर्म २०,२२,५४,७४
अहिंसात्मक संस्कृति–पद्धति १९, २०, २१, २२
आंगिरस ऋषि १८
आत्मशुद्धि, बुद्धाची १२८
आत्मा १४०
आनन्दस्थविर, आनन्द ८५, ९०, १३१, १५२, १६७-६९, १७८, १८०
आनापानस्मृतिसमाधि १२५–२६
आरण्यके ७२

आर्य १२, १३, १६, १७, २०, ४२
-ची संस्कृति १८, १९
आर्यसत्ये, चार १३२, १३४, १३५, १३७-१४१, १४३
आर्यावर्त २०, २३
आहारव्रत ६५
आळा(डा)र कालाम ('कालाम, आळार' पहा)
इन्द्र १४, १५, १८, १९, २०, २३
-ची परंपरा १४, -चे अत्याचार १६, -चे साम्राज्य १६
इन्द्रप्रस्थ ३७
इश्तर १०, ११
उज्जयिनी ३४, ३९, ४०
उत्पलवर्णा १७८
उदयन ३४-३६
उद्दक रामपुत्र ११२-११४, ११६, १३५, १४५
उन्मादयन्ती ७९
उपक १३५
उपचर ३३
उपजीविका १२४
उपदेश, बुद्धाचा २९, १३०, १३८, १४४, १४७, १५५, १६७, १७५
उपनिषदे ५३, ७२, ७६, ८३
उपनिषदृषि ७३-७६, ८३
उपसंपदा ४०, १७०
उपादानस्कन्ध, पाच १३७
उपालि ९०, १५२, १६६
उपासक १६५, १६७-६८, १७६
उपासिका १७६
उपेक्षा ६४, १०१, १०२
उपोषण १२०, १२१, १२५, १२६, १४३, १४५
उपोसथ १६९
उरुवेल-नदी-गया काश्यप ७३
उरुवेला २५, ११७, १४५, १४८, १५०-५२
उषा, उषोदेवी ९, १०
ऋग्वेद ९, ११, १४-१८
ऋषि, ऋषिमुनि २१, २२, ५४, ५६, ६०, ६८, ७२, ७५-७८, ८२, ८३, १७७
ऋष्यशृंग ५४
ऋषिपत्तन १३५, १३६, १४०-१४७, १५०
एकसत्ताक (एकतंत्री) राज्यपद्धति २४, ३१, ४९-५३, ७८-८१, १७१, १८०
औदीच्य ब्राह्मण ५५, ७२
औषधि भिक्षूंच्या १६२, १७४
कंथक अश्व १०९-१११
कपिलवस्तु ८६-९०, ९३, ९४, १००, १०३, १०८, ११०, ११३, १६८, १७२-७३
कंबोजा (काम्बोज) ४२-४४
करुणा १०१, १०२, १४२

कामोपभोग ११६, ११८, ११९, १२८, १२९,१३०, १३६,१४१, १४२, १५४
कायकर्म १२३–२४
कायिक कर्म (मैत्रीमय) १६६
कालाम, आळार१०३,११२–११४, ११६, १३५, १४५
कालाम, भरण्डु ८६–८८, १००, १०२, ११३
काश्यप १७५
काश्यपबन्धु ७३, १४८, १५२
कासी (काशी) २८, ७८, ९३, १५०–५१
कुक्कुटवती ४३–४४
कुरु राजकुल ४६
कुरू ३७, ४७, ५३, ५४, ६९
कुशल वितर्क १२२–२३
कुशिनारा ३१, ३२
कूटदन्त ५१, ६९
कृष्ण १८, १९, २०, १७९
केशी लोक ११, १२
कोलिय ७८, ९३, १०१, १०२, १०५–१०८, ११३
कोसल देश (कोसला) २४, २५, २८–३२, ४७–४९, ७०, ७८, ८६, ९१,९८,११२,११३, ११६
कोसल राजा ३०, ९२, ९३
कोसल राजकुल ४५, ४९
कौण्डिन्य (आज्ञात) १४३–४६
कौरव्य ३७, ४७
कौशाम्बी (कोसम्बी) ३४, ३६, ३९, १६५–६८
क्षत्रिय ५९, ११३, ११५, १३४
क्षेमा १७८
गग्गरा राणी २४
गणराज्ये, गणसत्ताक राज्ये ४९–५३, ७८, १५७–५८, १७१
गणराजे ४९–५३, ८०, ९२, ९३
गणसत्ताक राज्यपद्धति ३२, ३४, ५१–५३, ७८–८१
गदश ११
गधाग (गाधार) ४१–४२
गया १६३
गार्गी वाचक्नवी ७७
गुप्त राजे ७६, ७७
गृहस्थाश्रम १०६, १०८, ११४, १४४, १४८, १७५
गोतम, गोतम बुद्ध २५, २८, ८७, ९२, १०१, १०४, १३०,१३२, १३५, १३६
गोतम (गौतम) बोधिसत्त्व ५३, ७१, ८३, ८४, ८७, ८८, ९५, ९७, ९८, ९९, १०८, १२७, १३२, १४५
गोपक मोग्गल्लान १८०
गोपा ११०
गोविद (गोडविन) साहेब ६७
गौतमत हारिद्रुमत ७५, ७६

घोड्याचा उपयोग ११, १२
चक्रवर्ती राजा ५२
चडप्रद्योत २७, २८, ३४, ३५, ३९, ४०, ४६, १८०
चपा नगरी २४, ६९
चातुर्वर्ण्य २०, ४९
चित्र आणि विशाख १७८
चीवर, भिक्षूचे १६०–६२, १७४
चुन्द, लोहार ३२, १३१
चेती (चेदि, चैद्य), चेतिय राष्ट्र ३३
छत्र १०९–१११
छादोग्य उपनिषत् ७४
जनक ३१
जनमेजय १९, २०, २२, २३, ५३
जन्मतिथि, गोतमाची, ८३–८४
जबुद्वीप २३, ४७
जातक ८४
जाताग्नि ७२–७३
जातिभेद ४०, ४८, ५६, ७५–७७
जीवक कौमारभृत्य ३९–४०, ४२
जुगुप्सा ६४
जेतवन २९
जैन १०३, १७१ ('निर्ग्रन्थ' पहा)
जैन साध्वीचा मघ ७८
ज्ञानदृष्टि ११८–१९
ज्यूरीची पद्धति ३२
झेंगिशखान १३
टिळक, लो०, ९
तक्षशिला (तक्कसिला) १९, २२, ४१–४२, ७९
तत्त्वज्ञान ११६, १३३, १३४, १५२, १५५
तत्त्वबोध १२३, १२७, १३२–३५, १४३, १५०, १७३
तत्त्वाचा साक्षात्कार १३०
तथागत ८५, १३७, १६९, १७०
तपश्चर्या, तपस्या १९, २१, ६१–६९, ७४, ११६, ११७–२७, १३६, १३९, १४०, १४५, १४८, १५०, १५५, १५६, १५९, १६०, १६३, १७३, १७५
तपस्विता ६२–६३
तम्मुज १०
तारुक्ख ५१
तीन उपमा ११७–१९, १२१
तृष्णा १३७, १४०, १४१, १७४
तेलगस्वामी ६६–६८
त्वष्टा १४, १५, १६
दमुत्सि (दमूनस्) १०
दास (दाहि) लोक, देश १२–१४, १६, १७, ४२
दिवोदास १४, १५
दीर्घायूची गोष्ट १६५–६६
दुःख १३७–३९
दुःखसमुदय १३७–३८
दुःखनिरोध १३७–३८
दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा १३७, १३८

दृष्टमगलिका ५६–५९
देवदत्त २६, ९०, १६२–६५
देवदह नगर ९४
देहदडन १३७, १४०, १४३
दोन अन्त १३६–३७, १४२–४३
द्वारका ४२
धर्म ४१, ७२, १३४, १३८, १५०, १५४, १७०, १७९ (शिवाय 'बौद्धधर्म' पहा )
धर्मचक्रप्रवर्तन १३६
धर्ममार्ग, नवीन १३५, १३६, १४५–४७, १४९, १७६
धर्मसूत्रकार ७७
धर्मोपदेश बुद्धाचा १४३, १४७ १५१, १५९, १६९, (शिवाय 'उपदेश' पहा )
ध्यान, ध्यानमार्ग ११९, १२०, १२६, १२७, १४२
ध्यानसमाधि १००, १०१, १५९
नहुष १४
नागार्जुन १३३, १३४
नालगिरि हत्ती २६, १६३
निगण्ठ नाथपुत्त १५४
निग्रोधाराम १६८, १७२, १७३
नियम, सघाचे १५८–६२
नियमाच्या रचनेची पद्धत १७०–७१
निर्ग्रन्थ सप्रदाय ६१, ६९, १४०
निर्ग्रन्थ श्रमण, श्रावक, साधु ६६, १०३. ११७
निर्भयता १२३–२४
निर्वाण १२२, १२७–२८, १३७, १७४, १७७
निर्वाणमार्ग १७८–७९
नीवरणे, पाच १०१
नैतिक जागृति १५७
नेरजरा नदी १२७, १३१
पकुध कच्चायन ६९, १५४
पचवर्गीय भिक्षु १३५–३६, १४३–४६, १५०–५२
पचाला (पाचाल) ३७
परिग्रह १६०–६१
परिनिर्वाण, बुद्धाचे २७, ३२, ५०, ८३–८४, १०९, १३१, १५३, १६१, १७१, १८०
परिव्राजक ५१, ५४, ५५, ६०, ९८, १०१–०३, १०६–०८, १११, ११३, ११६, १४४ १४९–५०, १७५
परिशुद्ध कर्मे १२३–२४
परीक्षित् १९, २०, २२, २३, ५३
पसेनदि २५, २७–३०, ४८, ६९, ७०, ७९, ९१, ९२, १०६
पहिली परिषद, भिक्षूची १५३
पाचित्तिय १५९
पाटलिपुत्र २७
पाडव १९, २०, ४६
पाण्डव पर्वत ११५
पातिमोक्ख १६१–६२

पार्श्वनाथ तीर्थंकर २८, ६१
पावा ३१, ३२
पिण्डपात, भिक्षूचा १६०–६२, १७४
पिंडोल भारद्वाज ३६
पिल्ले, दि० ब० स्वामिकन्नू ८३
पुक्कुसाति ४१
पुजारी ७१
पुराणे ७०, ७१
पूजा, देवताची ७०, ७१
पूरण काश्यप ६९, १५४
पूर्वाराम २९
पेरणीचा समारंभ ९१
पेशवाई १६
पोक्खरसाति ५१, ६९, ९५
पोर्तुगीज २१, २२
प्रकृति १४०
प्रतर्दन १५
प्रतीत्यसमुत्पाद १३२–३४
प्रथमध्यान ९९–१०२, ११३, १२७
प्रद्योत ('चंडप्रद्योत' पहा)
प्रवारणा १६९
प्रवाहण जैवलि ७४
प्रविविक्तता ६४
प्रव्रज्या ७३, १०६, १०७, १११, ११२, ११४, १४७, १५२, १७२, १७५, –स्त्रियांना १६८–७०
प्राचीन वसदाव उपवन १६५–६७
बलिदान, यज्ञयागांतील, २२, २३, ७०, ७१; –देवतांना १२४
बादरायण व्यास ७६
बाबिलोनियन लोक १०
बाबिलोनियन वाङ्मय ११
बाबिलोनिया ११, १३, १४
बालविवाह ८०–८१
बावरी ३८, ३९
बाहिय १६७–६८
बिंबिसार २४–२८, ४१, ४८, ५१, ६९, ७०, ७९, ९८, १०६, ११२, ११४, ११५, १४९
बुद्ध, बुद्धभगवान २३–२६, २९–३३, ३६–४४, ५२, ५३, ५९–६२, ७३, ७८, ८१, ८३, ८६–९२, ९९, १०१–११, ११४, ११८–२१, १२३, १२६, १३०–३८, १४३ पासून पुढे प्रत्येक पानावर
बुद्ध गया १३१
बुद्धघोषाचार्य ६६, ८५, १०१, १३४
बृहदारण्यकोपनिषद् ७४
बृहस्पति १८
बोधिवृक्ष १३१, १३३, १३४
बोधिसत्त्व ४४–४८, ५३, ५५, ७२, ७३, ७९, ८३–११२, ११४–१३२, १३५, १४४, १४६, १५०, १५३–५५
बोधिसत्त्व –कुल व बालपण ८५; –जन्मस्थान ८६, –ची आई ९३; –जन्म ९४, ९५, –चे भविष्य ९५, ९६, १४४, –ची नावे ९७–९९;

–चे गोत्र ९७,९८, –चे समाधिप्रेम ९९–१०१, –चे देहदडन १००, –चा गृहत्याग १०२,१०४, १०८,११०,१११, १४४,१७३, –चे वैराग्य १०५, –ची सन्यासदीक्षा ११३, –ची लक्षणसपत्ति ११४, –चा तत्त्वबोध १३२
बौद्ध चित्रकला ११०, १३१–३२
बौद्ध धर्म,–सप्रदाय ५९, ७२, ८३, १४३, १५४, १७५
बौद्ध सघ १५३–५५, १५७, १६३
ब्रह्मचर्य १०६, १२८, १७५
ब्रह्मदत्त २८, ५५, ७२
ब्रह्मदेश ८०
ब्रह्मविहार १०२
ब्राह्मण १६–२२,३३,४२,५०–५३, ५७–५९, ६५, ६६, ६९–७५, ७७, १२३–२४, १३४, १४४, १४५, १५४, १७५, १८०
भगवान्, भगवत, भगवान बुद्ध ('बुद्ध, बुद्ध भगवान' पहा)
भद्दिय (भद्रिक) ८९–९१, १४५, १४६, १५१
भद्रवती हत्तीण ३५, ३९
भद्रवर्गीय भिक्षु १४८
भयभैरव १२३–२५
भवभूति ५९
भाडणे, शाक्य व कोलिय याची १०५–०८
भारद्वाज ब्राह्मण १५६
भिक्षु ३८–४०, ८३,८९,९०,१०१, १०२, १२६,१२७, १४६,१४८–५४, १५८–६१, १६३–६८, १७०, १७६, १७८,१८०–८१
भिक्षुणी ११०, १६९–७२, १७६, १७८
भिक्षुणी सघ १६८–७२
भिक्षुसघ २५, ३६, ३७, ४०, ४१, ४४, ५३, ८७,१०९,१४६–५१, १५३, १५५, १५७,१५८,१६१, १६५, १६९–७२, १७५–७६, १७८, १८०, –चे वागणुकीचे नियम १६१–६२, –तील भाडण १६५–६८
भिक्षूची सख्या १५०–५४
मक्खलि गोसाल ६९, १५४
मगध देश (मगधा) २४–२८,३१–३३, ३९, ४१, ४४, ७०, ७८, ९३, १८०
मगध राजकुल ४४
मत्स्या (मच्छा) ३७
मथुरा (मधुरा) ३७, ३८, ४०
मथुराराजकुल ४६
मद्द (मद्र), मद्दी (माद्री) ३३
मध्यममार्ग १०८,१३७,१४२,१५५
मल्ल राष्ट्र (मल्ला) ३१,३२, ४९, ९०, ९२, ९३
महाकप्पिन ४३–४४

महाकात्यायन ३७, ४०
महाजनसत्ताक देश, राज्यें २४ ३१, ४९
महाजनसत्ताक राज्यपद्धति २४
महानाम ३०,४८, ८५–९१,१४५–४६, १५१
महाप्रजापती गोतमी ९३, ९४, ९८, १११, १६८–७१
महामोग्गल्लान १०३
महायान पथ १३३, १५३, १७१
मोहिंजो-दारो १३
माडव्य ५७
मातग ऋषि ५६–५९, ७५
मानत्त १ ९
मानसिक कर्मे १२३–२४;
मायादेवी ९३, ९४, ९८, १११
मार ८२,८३,१२७–३२,१७६–७७
मारयुद्ध, मारसेना १२७–३२
मिथिला ३१, ४६
मुदिता १०१–०२
मुसलमान ७७
मैत्री १०१–०२, १४१–४२
मैत्रीमय कर्मे १६६–६७
मैथिल राजकुल ४६
मोक्ष १५५
मोग्गल्लान १४९,१५२–५३, १६७
यजुर्वेद १७
यज्ञ, यज्ञयाग १३,१४,१८,२०,२२–२५,२७,२९,५१–५३,६९–७४, ८२, १३९;–ची सस्कृति ५३
यति १५, १७, १८, २१
यतीची सस्कृति १९, २०
यवन, यवनकाम्बोज ४२
यश आणि त्याचे साथी १४६–४७, १५०–५२
यशोधरा १०९, ११०
येशु ख्रिस्त १७९
राजगृह २५–२८, ३०, ३९–४२, ४८, ८८, ११०, ११२, ११४, ११७, १४३–४६, १४९–५३, १६३, १६४, १७२, १८०
राजयोग १२६
राम ५९
राहुल १०८, १०९, १७२–७५
राहुलमाता १०९, १७२
रूक्षता ६३
रोहिणी नदी १०१, १०५
र्‍हिस डेव्हिड्स ४२, ४८
लिच्छवी ३१
लुम्बिनी गाव, वन ८६, ९१, ९४, ९५, १०९
लोहिच्च ब्राह्मण ६९
वंश राजकुल ४५
वंसा (वत्सा) ३४
वज्जी राजे २७, ९२
वज्जी राज्य, राष्ट्र ३१–३२, ४७, ४९, ५०, ५२, ७८, ९२, ९३, १५७–५८

वप्प (वाष्प) १०३, १४५, १४६, १५१
वर्णाश्रमधर्म ४२
वस्सकार ब्राह्मण १५८, १८०–८१
वाचसिक कर्म १२३–२४
वाराणसी २५, २८, ५५–५८, ७२, १३५, १३६, १४५–४७, १७३
वासवदत्ता ३५–३६
वासभखत्तिया ३०
विकटभोजन ६४
विडूडभ (विदुर्दभ) २९–३१
वितर्क १२१–२३
विदेह २७, ३१, ३२, ४७
विनयाचे नियम १७४, १८०
विपस्सी बुद्ध १०४, १३५
विमुत्तिसुख १३३
विशाखा २९
विश्वरूप १६
वृत्र ब्राम्हण १४, १६
वेद ५३, ७३, ७६, ७७
वेरजा १७०
वेस्सतर ३३
वेळु(णु)वन २५, १४९, १६४
वैदिक धर्म २९, ३७, ३८, ७२
वैदिक सस्कृति १९, २०, ५३
वैदेहीकुल २७, ४४
वैशाली ३१, ४५, ११२, १६८
शंकराचार्य ७६, ७७
शबूक ५९
शयनासन, भिक्षूचे १६२
शरणगमन १७९
शशाक १३१
शस्त्रग्रहण १०५–०६
शाक्य, शाक्यकुल २८–३१, ४७–४९, ७८, ८७–९३, ९६, १००, १०१, १०३, १०५–१०९, ११३, ११६, १४५, १६३, १६८
शाक्य राजे ३०, ५१
शिवाजी १६
शिवि ३३, ७९, ८०
शिविकुमार ७९, ८०
शीलनियम ५२
शुद्धोदन ८५–९६, ९९, १०२, १०४, १११, १७२–७३
शूद्र ७६, ७७
शूरसेन (सूरसेना) ३७, ४६
शेती (मानसिक) १५६–५७
श्रमण २५, २६, २९, ५१, ६०, ६१, ६५, ६६, ६८–७५, ७८, ८८, ११८, १२३, १२४, १३५, १३९, १४०, १५६, १५९
श्रमणनायक ११६, १५४
श्रमणपथ–सप्रदाय ६०, ६१, ६८, ६९, ८३, ११४
श्रमणब्राह्मण, ८१–८३, ११८, ११९, १२९
श्रमणसघ २५, २६, २७, ६०–६१, ७२, ७५, १५४–५५, १५७

श्रामणेर १०९, १७२–७६
श्रामणेर दीक्षा १७३
श्रामणेरी १७०, १७२
श्रावक १०१, १३०
श्रावकसघाचे चार विभाग १७६
श्रावकाचे भेद १७८
श्रावस्ती २८–३१, ३८, ८१, १५३, १६५–६६
सयोजने १७८
सस्थागार, शाक्याचे ८८, ९२
सकदागामि फल १६९, १७८
सघ५४, १०२, ११०, १४४, १४७, १५४–५५, १५७–६५, १६७–७०, १७५–७६, १७९–८१; (शिवाय 'भिक्षुसघ' पहा), –ची सघटना १५७–५८, –च्या नाशाला कारणे १७६
सघभेद १६२–६५, १६७
सघर्ष, दास व आर्य याचा १६, १७, १९, २३, ५३
सघादिशेष आपत्ति १६९
सच्चक ११८
सजय बेलट्ठपुत्त ६९, १५४
सजय १४९, १५२–५३
सत्यकाम जाबाल ७५, ७६
सप्तसिधु १२, १५, १६, १८–२३, ५३
सप्तसिधूवरील स्वारी, आर्यांची १२
समाधि, समाधिमार्ग ११३, १२५, १२८, १७४
सबोधिज्ञान १०६, १०७, १२६, १३१, १३८
सबोध ११८, ११९, १२१, १२३
सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृति, सम्यक् समाधि १४२
सम्यक् दृष्टि, सम्यक् सकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मान्त १४१, १६७
सम्राट ('चक्रवर्ती' पहा)
सर्वाधिकारी १८१
सर्वार्थसिद्ध ९७
साख्य १४०
सारिपुत्त ६२, १४९, १५१–५३, १६७, १७०, १७२, १७४–७५
सिहलद्वीप २१
सिद्धार्थ, सिद्धार्थ कुमार ९७, ९९, १४४
सुजाता ७१, १३१
सुमित्र ३१, ४६, ४७
सुलक्षणा ९३, ९४
सोणदड ब्राह्मण २४, ५१, ६९
सोतापत्ति फल १६९, १७८
सोत्थिवती (स्वस्तिवती) ३३
सोमा भिक्षुणी १७६–७७
सोळा राज्ये–राष्ट्रे–देश-जनपद २३, २४, ४७, ४९
स्त्रियाचा (बायकाचा) दर्जा १७२, १७६–७८

स्त्रियांचे संघ ७८
स्त्रियांचे स्वातंत्र्य—मान ७८, ७९
स्मृति ७६, १२८, १३०, १५६
हठयोग ११९, १२०, १२५—२६
हरप्पा १३
हिंसा १४१, १५५,—वैदिक ८२
हितकर मार्ग ११२, ११३

---

**प्रा. श्री. ना. बनहट्टी**

यांनी भिन्न भिन्न विषयांवर वेळोवेळीं लिहिलेले लेख संगृहीत करून ते प्रकाशित करण्याचे कार्य त्यांच्या कांही विद्यार्थ्यांनी अंगावर घेतलें आहे.

या लेखसंग्रहाचा पहिला खंड

**ए का क ळी**

या नांवाने छापत असून

**तो लवकरच प्रसिद्ध होईल.**

मराठी वाचकांस बनहट्टींच्या लिखाणाचें महत्त्व वर्णन करून सांगण्याची गरज नाही. उत्सुक वाचकांनी प्रसिद्धीच्या तारखेकडे लक्ष ठेवावें इतकेंच सुचविणें बस आहे.